म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५६

१०२९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा

मोरोपंती वेंचे

मे [illegible] २१ (आ. १ली)

सं. ल. रा. पांगारकर

REFBK-0002583
REFBK-0002583

२५६३
का. १५८

॥ श्रीरामसमर्थ ॥

# मोरोपंतींवेंचे.

आर्याछंदें जोडुनि रामायणभारतादि आयकवी ।
नायकवीर कवींचा ऐसा होईल अन्य काय कवी ? ॥ १ ॥

—विठोबा अण्णा.

हें पुस्तक

## रा. रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए.

यांनीं तयार केलें

REFBK-0002583
REFBK-0002583

वैशाख शके १८४३—मे १

( आवृत्ति दुसरी. )

इ. स. १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें सर्व हक्क कर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

किंमत १॥ रुपये.

प्रकाशकः—रा. रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.
" मुमुक्षु कचेरी " बुधवार पेठ, पुणें शहर.

मुद्रकः—रा. रा. लक्ष्मण भाऊराव कोकाटे, यांनीं पुणें पेठ
सदाशिव घ. नं. ३०० येथें आपल्या " हनुमान् "
छापखान्यांत छापिलें.

# मोरोपंती वेंचे.

## पहिल्या आवृत्तीवरील अभिप्राय.

१ केसरी:—( ता. ५।९।१९०५ ) "रा. पांगारकर यांनीं मराठी कवितेचा व विशेषतः मोरोपंती काव्यांचा किती व्यासंग केला आहे आणि मोरोपंतांच्या चरित्राशीं संबंध असलेल्या प्रत्येक स्थळीं जाऊन त्यांचेबद्दलची विश्वसनीय व समग्र माहिती गोळा करण्यांत किती परिश्रम केले आहेत हें महाराष्ट्रवाचकांस सहशूरच आहे. पंतांच्या काव्यग्रंथांचा रसास्वाद घेत असतां त्यांस जो अत्यंत रमणीय, सरस व चित्ताकर्षक भाग आढळला त्यांतील निवडक वेंचे त्यांनीं प्रस्तुत पुस्तकांत सात भागांत घेतले आहेत १ ईश्वरविषयक कविता, २ कवि आणि कविता, ३ उपदेशपर कविता, ४ वर्णनपर कविता, ५ कथानकपर कविता ६ चक्रारामायण व ७ विविधविषयपर कविता असे या पुस्तकाचे सात भाग केले आहेत. सातवा भाग ' चक्रीरामायण ' हा आहे. पंतांच्या अष्टोत्तरशतरामायणांपैकीं ५० सरस रामायणांतील उत्कृष्ट वेंचे काढून ते अशा क्रमानें दिले आहेत कीं त्यांचे एक नवे, स्वतंत्र व संगतवार चक्रीरामायण बनलें असून त्यात संपूर्ण रामकथा पंतांच्याच शब्दांत आली आहे ! एकंदरींत प्रस्तुत पुस्तक वाचणारांचे मनांत पंतांविषयीं अज्ञानमूलक दुर्ग्रह असले तर ते जातील व आदरबुद्धि असेल तर ती दुणावेल. पंतांचा उदार, भाविक व प्रेमळ स्वभाव, त्यांची प्रतिभा व रसिकपणा याचे या वेंच्यांत उत्कृष्ट प्रतिबिंब वठलें आहे. याखेरीज प्रस्तावनेंत कवितेचें महत्व, काव्याचें लक्षण, काव्यरचनेचे अवश्य गुण, तिचे वर्णनीय विषय व काव्यरचनेचे हेतु या काव्यशास्त्रांतील मुख्य मुद्यांवर रा. पांगारकर यांनीं बरेंच विवेचन केलें आहे. त्यासंबंधी रसिक व काव्यशास्त्रज्ञ यांचा रा. पांगारकरांशीं कांहीं बाबतींत मतभेद होईल हें खरें, पण मराठी कवितेचें सामग्र्यानें अवलोकन करून व तिचा सामान्य स्वभाव लक्ष्यांत आणून

मराठी कविताशास्त्राची रचना कशी करावयाची या दृष्टीनें रा. पांगारकरांनीं ही चर्चा केली आहे व त्यामुळे हें विवेचन नवीन, स्वतंत्र व मार्मिक झालें आहे यांत संशय नाहीं. सारांश, महाराष्ट्रांतील रसिक, मार्मिक, प्रेमळ, भाषाभिमानी, धर्मनीतिव्यवहारज्ञ व बहुश्रुत अशा लहानथोर वाचकांनीं प्रस्तुत पुस्तक संग्रह करण्यासारखें झालें आहे.... असे ग्रंथ पाश्चात्य देशांत अनेकांनीं प्रसिद्ध केले आहेत. महाराष्ट्रांतील नावाजण्यासारखा हा पहिला प्रयत्न रा. पांगारकर यांनीं केला व त्यांत त्यांस इतकें यश आलें याबद्दल आम्ही महाराष्ट्राचे वतीनें त्यांचें अभिनंदन करितों..."

ज्ञानप्रकाश ( ता. १०।९।१९०५ ):—'मोरोपंतांच्या सर्व काव्यांतील उत्कृष्ट वेंचे रा. पांगारकर यांनीं दिले असून वेंच्यांची निवड फार मार्मिकपणें केली आहे. मोरोपंतांसारखा सर्वांगसुंदर कवि व रा. पांगारकरासारखे प्रेमळ व रसिक योजक अशा स्थितींत 'परस्परोभूषणभूष्यभावः ' या न्यायानें पुस्तकही सर्वांगसुंदर झालें आहे. सर्वच प्रकरणें अत्यंत वाचनीय झालीं आहेत, विशेषतः चक्रीरामायणाचें सौरस्य व रचना हीं फार वाखाणण्यासारखीं आहेत. प्रत्येक रामायणांतील १।२ उत्तम श्लोक घेऊन मूळ कथानकांत खंड पडूं न देतां निराळें रामायण तयार करणें हें फार श्रमाचें व मार्मिकपणाचें काम रा. पांगारकर यांनीं इतकें उत्कृष्ट केलें आहे कीं सर्व रसिकांस त्यांची ही कृति मान्य होईल."

३ इंदुप्रकाश ( ता. ३०।९।१९०५ ):—"वेंच्यांची निवड कौशल्यानें झाली असून वैचित्र्य चांगलें साधलें आहे. या ग्रंथाला रसिक लोक व विद्याखातें यांजकडून अवश्य आश्रय मिळावा अशी आमची शिफारस आहे."

२५३

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

धर्मार्थकाममोक्षेषु वैचक्षण्यं कलासु च ।
प्रीतिं करोति कीर्तिं च साधुकाव्यनिबंधनम् ॥ १ ॥

भामहालंकार.

## १ मोरोपंतांची लोकप्रियताः—

१. श्रीमहाकवि मोरोपंत यांच्या कवितेची त्यांच्या जिवंतपणींच इतकी प्रसिद्धि झाली होती कीं त्यांचे स्नेही व व्याही बाबा पाध्ये एकदां विनोदानें त्यांस ह्मणाले, 'पंत, ज्या तुमच्या आर्या जन्मतांच काशीरामेश्वर नमायला गेल्या, त्यांना प्रौढपण आल्यावर हें सारें जगतीतल सुद्धां वावरायला पुरणार नाहीं !' पंतांची कविता त्यांच्या जिवंतपणींच लोकमान्य झाली, व त्यांच्या पश्चात्‌ही तिनें हजारों रसिकांस चटका लावला आहे. पंतांच्या आर्या बारामतीस तयार होत असतांनाच त्यांच्या नकला करून घेण्यास ठिकठिकाणच्या रसिकांच्या उड्या पडत, त्यांना अनेक विषयांवर काव्यें करण्याच्या अनेकांकडून सूचना येत, हरिदास कथोपयोगी आख्यानें करून द्या ह्मणून त्यांच्या विनवण्या करीत, व मैराळबोवा, रामजोशी वगैरे कीर्तनकार त्यांच्या आर्यांवर कीर्तनें करीत महाराष्ट्रभर हिंडत. पंत इ. स. १७९० मध्यें काशीयात्रेस गेले तेव्हां काशीकर पंडितांनीं त्यांच्या कवितेची शलाकापरीक्षा करून ती मान्य केली; पंतांनीं अनेक साधुसंतांवर सुंदर आर्या केल्या, पण आपल्या लोकप्रसिद्ध पित्यावर आर्या केल्या नाहींत हें बरें न वाटून विठोबा गोसावी ताहराबादकर यांनीं पंतांस पत्र लिहून महिपतबावांवर कांहीं आर्या करण्याची विनंति केली; पुणें शहरीं पंतांची आर्या इतकी गाजली कीं पुढें बाजीरावास मोरोपंतांवरचा राग 'पंतांची आर्या कीर्तनांत कोणीही हरदासानें ह्मणतां कामा नये' अशी

---

१ ज्या उपजतांचि गेल्या काशीरामेश्वरा नमायाला ।
आर्यांला प्रौढपणीं जगतील हें पुरें न मायाला ॥ १ ॥

जगतीतल

सर्व हरिदासांस नोटीस देऊन काढावा लागला ! भोजनप्रसंगीं पंतांच्या निवडक आर्या ह्मणण्याची चाल पडली तीही आर्यांचा जास्त प्रसार झाल्याचेंच एक प्रमाण आहे. बापु गोखल्याला पंतप्रतिनिधींच्या तेलिणीनें सहा महिने दाद दिली नाहीं यावद्दलची ' तेलिण मारी सोटा बापु गोखल्या संभाळ कासोटा' ही सर्वप्रसिद्ध आर्याही बापु गोखल्यांच्या पंक्तींत तरुण मुलें ह्मणत; पुण्याच्या तुळशीबागेंतल्या राममूर्तीवरची ' श्रीरामाच्या मूर्ती तुळशीबागेमध्यें सदा रमल्या ' हीही आर्या पंतांनीं प्रसिद्धीस आणलेल्या आर्यावृत्तांतच झाली. ' ओवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंताची ' हा सर्वसंमत झालेला राम वडवे यांचा अभिप्रायही पंतांच्या जिवंतपणींच त्यांच्या पुढें येऊन पडला होता. पंतांच्या मागून आर्यावृत्तांत अनेक कवींनीं कविता केली आहेच, व त्यांच्या आर्यावृत्ताचें अनुकरण करून त्यांच्या कित्येक भक्तांनीं त्यांच्याच आर्यावृत्तांत त्यांना पत्रेंही पाठविलीं आहेत ! आपल्याच कविता घेऊन आपल्यापुढें हरिदास कीर्तन करीत आहेत व सर्व लोक त्या कवितेचा प्रेमपुरस्सर आदर करीत आहेत हें पाहण्याचें भाग्य पंतांचें होतें. त्यांच्या आर्येशिवाय कीर्तनाला रंग भरेनासा झाला अशी स्थिति त्यांचाच हयातींत झाली होती. कवीची त्याच्या हयातींत इतकी चहा झाल्याचीं उदाहरणें थोडींच सांपडतील.

२. इंग्रजी झाल्यापासून ही मोरोपंतांच्या कवितेची प्रसिद्धी फार झपाट्यानें झाली आहे व पंतांचा भक्तवर्गही मोठा झाला आहे. पंतांच्या एकट्या केकावलीवर टीपा देऊन पांच सहाजणांनीं ती छापून काढली आहे. केकावलीवर एक संस्कृत टीकाही माझ्या पाहाण्यांत आहे.* माधवचंद्रोबांच्या सर्वसंग्रहांत पंतांची कविता बहुतेक प्रथम छापून निघाली, नंतर तेंडुलकरांनीं ' मयूर कवि ' या मासिक पुस्तकांत, कै० ज० बा० मोडक यांनीं काव्येतिहाससंग्रहांत, व वामनरावजी ओक यांनीं काव्यसंग्रहांत थोड्याबहुत फेरफारांनीं व थोडींबहुत प्रकरणें कमजास्त घालून ती पुन्हां छापली. अद्याप पंतांची पांच चार हजार कविता अप्रसिद्ध आहे व सुमारें दहा हजार कविता कायमची बुडल्यासारखी दिसते ! पंतांची कविता

---

*यानंतर दुसरीही एक टीका मला मिळाली आहे ( शके १८४२ )

छापण्याचें कामही विद्वान् लोकांनीं केलें आहे व पंतांचे भक्तही नामांकित विद्वान् मंडळींत होऊन गेले आहेत. हरिदासांनीं कीर्तनद्वारें पंतांच्या कवितेचा प्रसार लोकसमूहांत फार केला. दादोबा पांडुरंग, विठोबा आण्णा कऱ्हाडकर, परशुरामपंत तात्या गोडबोले, जनार्दन बाळाजी मोडक, शंकर पांडुरंग पंडित, विष्णुशास्त्री चिपळोणकर, बाळकृष्ण मल्हार हंस, हरि माधव पंडित, राजारामशास्त्री भागवत व वामनरावजी ओक असले भक्त ज्या मोरोपंतांच्या कवितेला मिळाले तिचे गुणही कांहीं तसेच असले पाहिजेत आणि ते तसे आहेतही. आज दीडशें वर्षांत मोरोपतांची कविता प्रेमानें व रसिकपणानें वाचणारे अनेक आर्यापंडित होऊन गेले, तेव्हां बाबा पाध्ये यांनीं भविष्य केल्याप्रमाणें पंतांच्या कवितेला वावरायला हें जगतीतल पुरेनासें झालें आहे व तिचा उत्कर्षही उत्तरोत्तर अधिक होणार आहे यांत तिळमात्र शंका नाहीं.

## २ पंतांच्या कवितेवरील आक्षेप व त्यांचें खंडण.

३. पंतांच्या कवितेचे दूषकही त्यांचेच वेळीं तयार झाले होते ! त्यांचा भक्त रामचंद्र बुडवे यानें ‘ कठिण ग्रंथ म्हणुनि या आर्यांतें निंदिती न सुकवि ते ’ याप्रमाणें या दूषकांच्या मुख्य आक्षेपाचा उल्लेख केला आहे. पंतांची कविता दुर्बोध आहे, व संस्कृत शब्दप्राचुर्यामुळें ती क्लिष्ट झाली आहे, हा पंतांच्या कवितेवर सर्व दूषकांचा मुख्य आक्षेप आहे. बाकीचे आक्षेप इंग्रजी झाल्यानंतरचे इंग्रजी कविता वाचणाऱ्या पंडितांचे आहेत. ते फारच विलक्षण आहेत ! मोरोपंत मुळीं कविच नव्हते इतकेंच काय पण तादृश रसिकही नव्हते; ते केवळ भाषांतरकार होते; ‘ कांहीं तरी लिहावें, मात्रा आणि यमक साधले म्हणजे झालें; किंबहुना मात्रा, यमक व अपरिचित शब्द यांतच कायतो रस आहे असें त्यांला वाटत असे; ’ त्यांनीं आपली कविता केवळ कीर्तीसाठीं रचिली, परमेश्वराच्या स्तुतीसाठीं नाहीं इतकेंच काय पण ईश्वरभक्ति त्यांचे मनांत असती तर ‘ राधाप्राप्त्यर्थ जसा ’ अशा आर्याच त्यांच्या तोंडून निघाल्या नसत्या; त्यांनीं फार गर्वोक्ति प्रकट केली आहे यावरूनही त्यांचे ठिकाणीं भक्ति दिसत नाहीं; त्यांनीं आपल्या यजमानाच्या स्तवनाप्रीत्यर्थ साऱ्या ४।५ शे आर्या

लिहिल्या आहेत यावरून त्यांचेठायीं कृतज्ञताही नव्हती; परमेश्वर व भक्त यांतलें महदंतर लक्षांत न घेतां त्यांनीं देवाशीं फार फाजील सलगी व लगट केली आहे वगैरे अनेक आक्षेपांचे भडिमार बिचाऱ्या कवीवर व त्याचे कवितेवर इंग्रजी पंडितांनीं केले.

४. यांपैकीं बरेच आक्षेप कालानें अपाप नाहींसे झाले आहेत, कांहीं आक्षेपांचें निबंधमालाकार व हंस यांनीं आपापल्या निबंधांत उत्कृष्ट खंडन केलें आहे व कांहीं आक्षेप पंतांची कविता वाचल्याबरोबर नाहींसे होणार आहेत. एक क्लिष्टतेचा आक्षेप मात्र अंशतः कबूल करावा लागणार आहे. मोरोपंत भाविक व प्रेमळ भगवद्भक्त होते ही गोष्ट त्यांची कविता व चरित्र यांची ज्याला अंमळ माहिती आहे त्याला सांगायला नकोच. त्यांनीं आपली कविता मुख्यतः 'वाङ्मन पूत कराया' केली आहे, 'तनुवाक्कर्ममनःपाप सर्वथा हरण' व्हावें, चित्तशुद्धि होऊन आपण भगवत्प्रसादाला पात्र व्हावें यासाठीं ईश्वरलीला वर्णन करण्यांत त्यांनीं आपली वाणी खर्चिली आहे. कीर्तीची त्यांना अपेक्षा नव्हती असें नाहीं. 'मद्ग्रंथ असावा बहुमत' असें त्यांनीं म्हटलेंच आहे. पण कीर्तीसाठीं ग्रंथ लिहिणें हा कांहीं मोठासा दोष होत नाहीं. मम्मटानें काव्यरचनेचे हेतु 'काव्यं यशसेऽर्थकृते' या श्लोकांत सांगितले आहेत, त्यांत यशःप्राप्तीची वांछा हा पहिला हेतु दिला आहे. वस्तुतः पंतांचा मुख्य हेतु यशःप्राप्तीचा नसून ईश्वरप्राप्तीचा होता. पंतांच्या रसिकतेबद्दल शंका घेणें वेडेपणाचेंच आहे. पंतांइतका रसिक कवि विरळाच सांपडेल. त्यांचीं काव्येंच त्यांच्या श्रेष्ठ रसिकत्वाची साक्ष देतील. पंत भाषांतरकार होते हाही आक्षेप असाच चमत्कारिक आहे. त्यांनीं रामायण, भारत व भागवत हे ग्रंथ मूळांस धरून केले आहेत, तरी ते स्वतंत्रबुद्धीनें रचल्यासारखे मनोवेधक व रसाळ उतरले आहेत. ठिकठिकाणचीं वर्णनें, कल्पना, अलंकार, अर्थांतरन्यास, विस्तारसंक्षेपकुशलतेनें मुख्य कथाभाग सरस होण्यासाठीं केलेलीं वर्णनें, वगैरे प्रकार अशा चातुर्यानें, सफाईनें व रसिकपणानें प्रस्तुत कवीनें प्रत्येक ग्रंथांत साधले आहेत कीं त्याला निव्वळ भाषांतर-

---

१ विविधज्ञानविस्तारकर्ते, कै० माधवराव रानडे, कृष्णशास्त्री चिपळोणकर इ०नीं.

कार म्हणणें म्हणजेच मोठें अरसिकपणाचें लक्षण होय ! कांहीं प्रसंगीं मूळ संस्कृत श्लोकांचीं निव्वळ भाषांतरेंही त्यांनीं वठविलीं आहेत खरीं, पण तींहि इतकीं उत्तम झालीं आहेत कीं भाषांतरकार यापुरताही पंतांचा मोठाच गुण वानिला पाहिजे असें मी म्हणतों. पंत देवाशीं सलगी करितात हा एक आक्षेप त्यांच्या भक्तिपर कवितेवर आहे. यासही उत्तर सोपेंच आहे. पंतांचे जे धर्मविचार होते तेच त्यांच्या काव्यांत उतरले आहेत, हें साहजिक आहे. पंतांचे धर्मविचार महाराष्ट्रांतल्या भागवत-धर्मास उर्फ भक्तिपंथास अगदीं धरून आहेत. ते रामोपासक होते तरी उपास्यामध्यें एकात्मता आहे अशी त्यांची श्रद्धा होती. राम, कृष्ण, विष्णु, शिव, विठ्ठल, व्यंकटेश, गणपति, देवी इ० कोणत्याही देवतेच्या नांवानें त्यांनीं स्तोत्रें व स्तवनें केलीं असलीं तरी तीं सर्व परब्रह्मालाच पावतात अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. पंत अद्वैतमतानुयायी सगुणोपासक होते; ते भागवतधर्मसांप्रदायी व कर्मनिष्ठ होते. तीर्थें, क्षेत्रें, संतमहंत, जयंत्यादि पर्वें, संध्यावैश्वदेवादि नित्यकर्में व श्राद्धपक्षादि नैमित्तिक कर्में यांवर त्यांचा पूर्ण विश्वास होता; हीं सर्व चित्तशुद्धीचीं साधनें म्हणून त्यांनीं या सर्वांचा जन्मभर आदर केला होता. पंतांचे धर्मसंबंधीं आचारविचार या प्रकारचे होते. एखाद्या वाचकाचे धर्मविचार याहून भिन्न असल्यास त्यानें पंतांचीं काव्यें वाचतांना ते तोंवर तरी दूरच ठेविले पाहिजेत, एरवीं त्यास त्यांच्या कवितेचें रहस्य कळणार नाहीं व रसानुभवही होणार नाहीं.

५. पंतांच्या कवितेवर आलेल्या दूषणांचें सविस्तर खंडण करण्याचें हें स्थळ नव्हे म्हणून त्याबद्दल येथें अधिक लिहीत नाहीं. फक्त दुर्बोधत्वाचा मात्र थोडा विचार करितों. ' माझ्या कवितेला प्राकृत म्हणून हंसणारे कांहीं अतज्ज्ञ पुरुष आहेत, ' असें पंत एकदां ह्मणतात; व ' ती संस्कृत-प्राकृतमिश्रित असल्यामुळें गीर्वाणशब्दमय कथा आहे असेंही म्हणणारे कांहीं पुरुष आहेत ' असें दुसऱ्यांदां म्हणतात. म्हणजे एकीकडे जुने संस्कृताभिमानी व प्राकृतविद्वेषी पंडित, व दुसरीकडे केवळ प्राकृताभिमानी अशा दोन प्रकारच्या लोकांचा पंतांवर कटाक्ष होता. पहिल्यां वर्गास जुन्या मराठी कवींप्रमाणें पंतांनीं उत्तर दिलें आहे; " गोक्षीर स्वर्णपात्रीं-

तून प्यालें काय, आणि पलाशद्रुमदलपटलांतून प्यालें काय, सारखेंच गोड लागतें; दिवा सुवर्णपात्रांत लावला काय, आणि विरूपशा खापरींत लावला काय, तो सारखाच प्रकाश देतो. ज्ञान, आनंद व परमार्थ कोणत्याही भाषेच्या द्वारें प्राप्त झाले तरी सारखेच. भाषाभिमान सोडून सुज्ञानें अर्थाकडे दृष्टि द्यावी." दुसऱ्या वर्गास पंतांनीं उत्तर दिलें आहे; "संस्कृतभाषेंत शब्दभांडार फार मोठें आहे. मराठी भाषा अद्याप तितकी संपन्न झाली नाहीं; मी नाइलाजानें संस्कृत शब्दांची योजना करीत आहें. माझ्या संस्कृतप्राकृतमिश्रित कवितेची तुम्ही गुणज्ञ हळू हळू गोडी घ्यायला लागलां म्हणजे कालांतरानें तुह्मांस तिचा परिचय होऊन ती कठीण वाटणार नाहीं व प्राकृत भाषाही येणेंकरून सर्वांगपुष्ट होईल." पंतांचीं हीं उत्तरें समर्पक नाहींत असें कोण ह्मणेल? पंतांची कविता अगदीं असंस्कृत मनुष्यास संस्कृतशब्दप्राचुर्यामुळें काठें कोठें क्लिष्ट वाटेल यांत संशय नाहीं. तथापि बेताबाताची व्युत्पत्ति, थोडेंसें संस्कृताचें ज्ञान, व खरी रसिकता अंगीं असल्यास पंतांच्या कवितेची गोडी कोणासही लागेल असें मला वाटतें. दूषकांनीं खालील गोष्टीचाही विचार करावा. भाषाभिवृद्धि जी होत असते ती भाषेंत आहेत एवढ्याच शब्दसमूहावर व रचनाविशेषांवर अवलंबून राहून होणार नाहीं. खजिन्याची वाढ होते ती त्यांत निरनिराळीं नाणीं, ठिकठिकाणचें जवाहीर, देशोदेशींच्या अमूल्य चिजा येऊन पडल्याशिवाय किंवा आणून टाकल्याशिवाय कशी होणार? नवीन नवीन वस्तु प्रथमदृष्टीला अपरिचित भासतात, पण नित्य परिचयानेंच त्यांचें परकीयत्व नाहींसें होतें. संस्कृतभाषा शेंकडों शतकांची कमावलेली भाषा होय! तिच्या मदतीनें ज्या मराठी कवींनीं मराठी भाषा संपन्न करण्याचा अचाट उद्योग केला त्यांच्या उपकारभाराखालीं आपण वांकून जावयाला पाहिजे, पण आपणच जेव्हां त्यांवर वसरतों तेव्हां आपल्या कृतज्ञताबुद्धीस काय म्हणावें? संस्कृत भाषेंतलें शब्दभांडार, अलंकार, नानावृत्तें, विविधरस विविधतऱ्हेनें वर्णन करण्याच्या तऱ्हा वगैरे प्रकार मराठींत आणून तिला अभियुक्त भाषेची योग्यता आणण्याचा उपक्रम वामनादि कवींनीं केलाच होता; हाच क्रम पुढें चालवून मो-

रोपंतांनीं मराठी भाषेला उत्तम प्रकारें सजवून तिची योग्यता अत्यंत वाढविली. संस्कृत शब्द, संस्कृत भाषाप्रकार, संस्कृतांतले अलंकार, वृत्तें, कथा व रस मराठींत आणण्याचा महदुद्योग करीत असतां कचित्प्रसंगीं पंतांच्या कवितेला क्लिष्टता आली आहे खरी; पण पंतांच्या कवितेंतला बहुतेक भाग अतिशय सोपा, सरळ व प्रासादिक आहे. पंत मोठे पंडित, मोठे रसिक व भगवद्भक्त असल्यामुळें पंडित, रसिक व भगवद्भक्त या तीनही प्रकारचे लोक त्यांच्या कवितेंत रमतील असा तिचा परिपाक उत्कृष्ट उतरला आहे. यमकानुप्रासांचे चमत्कार पाहून कित्येकांस असें वाटतें कीं, ‘ हा एवढा उपद्व्याप करायला पंतांना फार श्रम पडले असतील. व असे श्रम करून रचलेल्या काव्यांत प्रसाद कोठून येणार ? ’ पंतांना यमकरचना साधतांना प्रथम कदाचित् थोडेसे आयास पडले असतील, पण एकदा यमकरचनेची हातोटी साध्य झाल्यावर त्यांना या बाबतींत कांहीं श्रम पडत असतीलसें बिलकुल वाटत नाहीं. शिवाय त्यांचें विस्तृत वाचन, लेखन व अवलोकन हीं लक्षांत आणलीं ह्मणजे त्यांच्या यमकानुप्रासांच्या बाबतींत त्यांस जे श्रम पडले असतील ते ‘ हत्तीस आपल्या शुंडादंडावर पुष्पमाळा खेळविण्यास जितके पडतात त्याहून यत्किंचितही अधिक नसतील !’ प्रपंचांतल्या अनेक अडचणी संभाळून व आपलें नित्यकर्म आटोपून बैठकीला दोनदोनशें आर्या सहज रचणाऱ्या पंतांना काव्यरचना सुलभच असली पाहिजे. त्यांची बहुतेक कविता सहज “ लिहिली होती, तीहि लिहितां लिहितां क्षणांत योजूनी. ” काव्यरचनेस मांडी घालून बसल्यावर पंतांची लेखणी त्यांना प्रसंगीं अनावर होत असे ! पंत जाडे पंडित व स्मरणशक्तीचे मोठे धड असल्यामुळें त्यांना ज्या गोष्टी सहज लीलेनें साधत, त्या व्युत्पत्तिहीन व संस्कारविहीन पुरुषाला श्रमसाध्य वाटतात ! तानाजी मालुसऱ्याला मोठमोठाले जड पदार्थ जसे फुलांसारखे इकडून तिकडे ठेवतां येत, किंवा नानाफडणीसाला राज्यकारभारांतलीं अनेक लहान मोठीं कामें जातीनें पाहतांना बुद्धिबळें खेळणाऱ्या खेळाडूपेक्षां ज्यास्त त्रास घ्यावा लागत नसे, त्याप्रमाणें आमच्या भाषादेवीच्या राज्यांतल्या या कसलेल्या मल्लाला यमकानुप्रासांचे चमत्कार किंवा अष्टोत्तरशतरामा-

-यणांचे अद्भुत प्रकार हे नित्यपाठांत पडलेल्या कसरतीच्या सहज खेळा-सारखे परम सुकर होते. आक्षेपक आपल्या कुवतीवरून ठरवितो ' कीं संस्कृतशब्दप्रचुर, रसालंकारमय, विविधवृत्तघटित व शब्दचमत्कारवती अशी पंतांची कविता कवित्वाचा सहजोद्रेक नव्हे व जेथें श्रमसाध्यता आली तेथें प्रसाद कोठला ? रसिकत्व कोठलें ? व ती कविता तरी कसची ! '

## ३ प्रस्तुत ग्रंथाचें प्रयोजन.

६. पंतांच्या कवितेवर जीं दूषणें आलेलीं आहेत, तीं सर्व घालविण्याचा एक सुलभ उपाय आहे. हीं दूषणें बहुधा अज्ञानानें व गैर समजुतीनें आलेलीं आहेत. माझी अशी खात्री आहे कीं जे लोक पंतांच्या कवितेला नाक मुरडतात त्यांना तिच्यांतले सरस, सरळ व उत्तम भाग काढून दाखविले तर ते पंतांचे भक्त बनतील व परशुरामपंत गोडबोल्यांप्रमाणें पंतांची थोडी तरी कविता प्रत्यहीं वाचल्यावांचून त्यांच्याच्यानें राहवणार नाहीं ! पंतांच्या कवितेचे जे स्वभावगुण आहेत तेच त्यांचें चित्त वेधतील. गोल्डस्मिथ कवीनें आपल्या ग्रामस्थ धर्मोपदेशकांविषयीं म्हटलें आहे कीं ' जे त्याची टर उडवायला आले ते त्याचे स्तुतिपाठक बनले ' अशीच पंतांच्या कवितेविषयीं दुराग्रह बाळगणाऱ्यांची अवस्था होईल. तेव्हां पंतांच्या कविताकमलिनीवरचें दुराग्रहरूप अभ्रपटल काढून टाकायला व तिची निसर्गरम्यता प्रकट करायला तिच्या सुगुणसूर्याचा उदय झाला ह्मणजे बस्स झालें.

७. प्राय: कोणताही कवि घेतला तरी त्याची सर्वच कविता सारखीच उत्तम असते असें नाहीं. त्यांत कांहीं भाग अधिक सरस, सरळ व सुबोध असतात. मोठमोठालीं विविध काव्यें ज्यांनीं रचिलीं त्यांच्या काव्यांत तर अशी निवडानिवड करायला बरीच सवड असते. पंतांनीं एका पत्रांत आपल्या एका स्नेह्यास लिहिलें आहे. ' वर्षाकाल आला, आळस आला, काव्य राहिलें, वर्षाकाळीं असें बुद्धिमांद्य किंचित् येतें. ' यावरूनच कवीची प्रतिभा सर्वकाळ व सर्वप्रसंगीं सारखीच उज्ज्वल राहते असें दिसत नाहीं. अंध मिल्टन कवीची अशीच गोष्ट आहे. ज्यावेळेस त्याची

प्रतिभा उज्ज्वल होई त्यावेळेस तीं उपवनांत आपल्या मुलींस घेऊन जाई व मग त्यांचे तोंडून भराभर ज्या कविता येत त्या त्या लिहून घेत. तसेच जे प्रसंग किंवा ज्या व्यक्ति कवीला विशेष प्रिय असतात त्यांच्या गुणवर्णनप्रसंगीं त्याची लेखणी जलद चालते. रामगुणवर्णनाचा प्रसंग आला कीं, पंतांचें हृदय प्रेमानें भरून येई. तात्पर्य, मोठ्या कवीच्या काव्यांतले वेंचे काढायला सवड असतें. पंतांच्या काव्यांतले असे सुंदर वेंचे काढले तर त्यांचा कवित्वगुण अधिक प्रकट होईल, दूषकांचेंही चित्त त्यांकडे वेधेल, व त्यांच्या कवितेविषयींची लोकांची भक्ति अधिक वाढून तिचा प्रसार अधिक होईल, असें वाटूनच हें काम मीं अंगावर घेतलें आहे.

८. मोरोपंतांची पाऊण लाख कविता अनेक व्यवसायांमुळें व अनेक अडचणींमुळें विकत घेऊन वाचायची ज्यांना सवड नाहीं, पण ती थोडी-बहुत वाचायची हौस आहे, असे हजारों वाचक महाराष्ट्रांत आहेत. अशांच्या सोयीकरितां प्रस्तुतसारख्या ग्रंथाची अवश्यकता आहे. तरुण विद्यार्थ्यांच्या हातांत प्रस्तुत ग्रंथ पडला तर त्यांना धर्मनीतिव्यवहाराचा उपदेश मिळून रसिकपणें कविता वाचायची गोडी लागेल व ‘ नदीमुखेनैव समुद्रमाविशत् ’ या न्यायानें मराठी कवितार्णवांत संचार करण्याची प्रेरणा होईल. इंग्रजीकवितेचे इंग्लंडादि पाश्चात्य देशांत असे वेंचे काढून ते तरुणांच्या हातीं देण्याची चाल आहे. वर्ड्स्वर्थ, बायरन वगैरे कवींच्या कवितेचे असे वेंचे काढलेले आहेत. शेक्स्पीअरच्या कवितेंतलीं सुंदर स्थळें हें पुस्तक पुष्कळांच्या पाहण्यांत असेलच. वेंचे काढण्याचें काम बरेंच कठीण आहे. कमलवनांत शिरणारा रसिक सर्वच कमलें पाहून हर्षित होतो व त्यांतलीं कितीही कमलें घेतलीं तरी तीं थोडींच, असें त्यास होऊन जातें. तशीच स्थिति कांहीं अंशीं वेंचे काढणाराची होते. मोरोपंतांच्या कवितेंतले जे वेंचे मीं काढले आहेत त्याशिवायही त्यांत अनेक सुंदर स्थळें सांपडतील, पण कवीच्या वर्णनचातुर्याचे अनेक प्रकार वाचकांपुढें ठेवण्यासाठीं प्रत्येकाचे ठळक नमुने दिले आहेत. शिवाय पुस्तक फार विस्तृत होऊं नये व प्रत्येकाला तें घेतां यावें यासाठीं वेंचे बेताचेच

काढले आहेत. ' शितावरून भाताची परीक्षा, ' या न्यायानें या पुस्तकावरून मोरोपंतांच्या कवितेची योग्यता सर्वांच्या निदर्शनास येणार आहे. प्रस्तुत पुस्तकाची एकेक प्रत महाराष्ट्रांतील प्रत्येक कुटुंबांत असावी व स्त्रीपुरुषवृद्धबाल या सर्वांच्या ती वाचण्यांत यावी असा माझा फार हेतु आहे, तो सफल करणार भगवान् श्रीरामचंद्र समर्थ आहेत.

## ४ काव्यवाङ्मयाची थोरवी.

९. प्रस्तुत प्रसंगीं काव्यशास्त्राचा अंमळ स्वतंत्र विचार करणें जरूर दिसतें. मराठी भाषेंत काव्यशास्त्रावर कांहीं ग्रंथ झाले आहेत. काव्यशास्त्र फार सूक्ष्म विचाराचें व रसिकैकगम्य असल्यामुळें यांत हवें त्याला मत द्यायचा अर्थातच अधिकार नाहीं. या शास्त्राचा स्वतंत्रपणें विचार पुढें कधीं स्वतंत्र ग्रंथांत करण्याचें माझे मनांत आहे, प्रस्तुत या विषयासंबंधानें कांहीं स्थूल गोष्टी वाचकांस सांगणें अवश्य वाटतें. कवितेची महती, कवितेचें लक्षण, उत्कृष्ट कवीला अवश्य लागणारे गुण, कवितेचे वर्णनीय विषय, काव्यरचनेचे सर्वसाधारण हेतु वगैरे महत्त्वाच्या विषयांचा विहंगमदृष्टीनेंच मी येथें विचार करणार आहे.

१०. काव्य हा शब्द कानीं पडतांच मनुष्याच्या मनांत येतें कीं हा उत्कट भावनांचा विषय आहे. काव्य प्रसवणारा कवि व काव्यरसास्वाद घेणारा रसिक या दोघांच्याही हृदयवृत्ति अत्यंत प्रबळ असतात. सागरास भरती येतांच ज्याप्रमाणें त्याच्या पर्वतप्राय लाटा किनाऱ्यावर येऊन आदळतात, त्याप्रमाणें कवीच्या अंतर्वृत्ति उचंबळल्या कीं त्यांचा स्फोट होऊन त्या काव्यरूपानें बाहेर पडतात. क्रौञ्च–मिथुनाचा सुखभंग करणाऱ्या निषादास पाहतांच दया व क्रोध या वृत्तींच्या वादळानें खळबळून वाल्मीकीचा हृदयसागर उचंबळला व जगतास आदिकाव्याचा लाभ झाला ! महाकाव्यें हीं कविहृदयसागरांतलीं उत्तमोत्तम रत्नें आहेत व मानवजातीचा लाभकाळ आला कीं तीं तिला अनायासें प्राप्त होतात. हृदयवृत्ति प्रत्येक मनुष्यांत आहेत, पण कवि व रसिक हे अत्यंत दुर्मिळ आहेत. ' कवितारस मनांत झडकरि यावा । पुण्याचा ठेवा । ' हे रसिक कविवर रामजोशांचें म्हणणें खरें आहे. कवीश्वर बाह्य उपचारांनीं

बनत नसतो, तो जन्मावाच लागतो. कवि हा कवितेचा जनक होय. रसिक हा तिचा उपभोक्ता होय. ऐहिक वस्तूंवर किंवा क्षुद्र फायद्यांवर नजर ठेवून छंदोबद्ध कविता करणारे क्षुल्लक कवि शेंकडो असतात, पण बाह्य सृष्टीचा पूर्ण विसर पडून वर्ण्यविषयांशीं तादात्म्य पावणारे व आत्म-रंगीं रंगणारे कवीश्वर फारच विरळ असतात. काव्याला सर्व थोर पुरुष रस ह्मणतात, आणि खरोखरीच अशा नितांत मधुर रस मृत्युलोकीं दुसरा नाहीं. सारस्वताच्या सर्व शाखांत काव्य हें अति प्राचीन, अति उदात्त, अति मोहक आहे. काव्याचा खरा रसिक अत्यंत दुर्मिळ आहे. तरी काव्यांत अशी मोहनी आहे कीं अत्यंत श्रेष्ठ व अत्यंत नीच, अत्यंत बुद्धिमान् व अत्यंत जड, अत्यंत सुधारलेला व अत्यत रानटी—कसलाही मनुष्य असो—त्याला काव्यापासून आनंद हा होतोच. दारिद्र्यदुःख विसरून काव्यरसांत निमग्न होणारा भारवि जसा कमलपत्रासन्निध सायंप्रभेंत काव्य गुणगुणतो तसा गुराखीही शेतांत वेडीबोवडीं गाणीं गात तासचे तास आनंदांत घालवितो. जगांतल्या अनंत आपत्तींचें विस्मरण पाडण्याचें सामर्थ्य काव्यांत आहे. काव्य नित्य व्यवहारांतले श्रम हलके करितें. दळणवाल्या बायका पांहटेस जात्यावर गाणीं गातात; भाजीवाल्या माळणी डोक्यावर मोठमोठाले हारे घेऊन चार चार मैल गात नाचत जातात व त्यांचीं ओबडधोबड गाणीं त्यांचे श्रमपरिहार करितात इतकेंच काय, पण जाणाऱ्या येणाऱ्यांलाही तीं क्षणैक तल्लीन करितात. दुष्टाचा दुष्टपणा नाहींसा करण्याचें सामर्थ्य काव्यांत आहे. युरिपायडीज् नांवाचा एक विख्यात कवि ग्रीस देशांत होऊन गेला. सिसिलियन लोकांनीं अथेन्सच्या लोकांचा युद्धांत पराजय केल्यावर त्यांना फार क्रूरपणानें वागविलें व कित्येकांचें निरर्थक प्राणहि घेतले; पण युरिपायडीजच्या कवितेंतले कांहीं अत्यंत रमणीय भाग ज्यांना मुखोद्गत होते त्यांना मात्र त्यांनीं वांचविलें व आपल्या मुलांना शिक्षक वगैरे नेमून त्यांचा गौरवही केला ! राष्ट्रीय वैराग्नि शमविण्याचें असें अद्भुत सामर्थ्य कवितेंत आहे ! कवींची काव्यसंपत्ति ही साऱ्या जगाची आहे. वाल्मीकिव्यासांचे ग्रंथ खिस्ती राष्ट्रें व मुसलमान राष्ट्रेंही मोठ्या प्रे-

मानें वाचतात. शेक्स्पीअरचीं नाटकें आह्मी मोठ्या आदरानें वाचतों. ज्या राष्ट्रांत कवि जन्मतो त्यां राष्ट्राचाच त्यावर हक्क असतो असें नाहीं, तर सर्व मनुष्यजातीचा त्यावर हक्क असतो. कवितादेवीच्या राज्यांत अवघ्या मनुष्यजातीचें एक साम्राज्य समजलें जातें. उत्तम कवींचें मन देशकालादिकांनीं अपरिच्छिन्न असून ब्रह्मांडाएवढें विशाळ असतें. उत्तम काव्यें हीं महापुषांच्या बुद्धींत आविष्करून मनुष्यजातीच्या उन्नत्यर्थ जन्म घेतात. राष्ट्राला पडता काळ आला ह्मणजे संजीविनीमात्रा देऊन त्यांचें पुनरुज्जीवन कोण करितें ? कवीच्या प्रतिभासंपन्न वाणीशिवाय असें सामर्थ्य अन्यत्र कोठें आहे ? ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास यांच्या पवित्र वाणीनें महाराष्ट्रभूमि शुद्ध झाली होती ह्मणूनच शिवाजीराजाला तींत स्वातंत्र्यवृक्ष लावतां आला. महाभारतांतल्या वीरांच्या कथा ऐकूनच शिवरायाला श्रेष्ठकार्याची शुभ प्रेरणा झाली. बायरन् या इंग्रजी कवीची कतिता वाचूनच ग्रीस, इटाली वगैरे देश अनेक शतकांच्या महानिद्रेतून खडबडून जागे होऊन दास्यापासून मुक्त झाले. व्यवहार, राजकारण व परमार्थ या तीनही बाबतींत पंक्तिप्रपंच न करितां उत्तम शिक्षण सर्वकाळ देणारे मनुष्यजातीचे खरे पुढारी कवीच होत. धर्मनीतींचीं श्रेष्ठ तत्त्वें सोपपत्तिक व सोदाहरण गोड वाणीनें मानवांना शिकविण्याचें महत्कार्य कवींवांचून कोणांसही करितां येत नाहीं. तत्त्वज्ञानीही सत्य वस्तूचेंच प्रतिपादन करितो, पण त्याला सत्यामृताची गोडी एकांतांत एकट्यालाच चाखावी लागते. कवि हा सत्याशीं—जसा मित्राशीं तसा—खेळतो, बागडतो; त्याच्या संगसुखानें आत्मरंगांत रंगतो, व त्याचीं गाणीं ऐकायला लक्षावधि लोक त्याच्या सभोंवार जमतात. तत्त्वज्ञाला मोहक व रम्य वेष चढवून कवि जनांपुढें त्याला उभा करितो व जन त्याला भुलतात. तत्त्वज्ञाप्रमाणें सत्यप्रतिपादन हेंच कवीचें ब्रीद असतें, मात्र कडु औषध तूपसाखरेंत घोळून त्याची गोड गोळी करून बाळाच्या हातीं देणाऱ्या चतुर वैद्याप्रमाणें कवि सत्याला मोहक रूप देतो, कथावर्णनाच्या भरांत अलंकारांचा थाटमाट करितो, विविध रसवर्णनप्रसंगीं अद्भुत कल्पनाशक्तीनें व उज्वल प्रतिभाप्रभेनें सम्यक् व प्रेमळ शब्दरचनाकौशल्यानें अखिल जनांच्या

चित्तवृत्ति आपणाकडे आकर्षून घेतो. असें अद्भुत सामर्थ्य काव्यांशिवाय इतर ग्रंथांत नसतें. ह्मणून काव्यांइतकी लोकप्रियता व जगदुपकारित्व इतर ग्रन्थांत नसतात व्यक्तीची, समाजाची, राष्ट्राची व मनुष्यजातीची उन्नति काव्यांमुळें होते कवीच्या वाणींत जी जादू भरलेली असते; जें माधुर्य, जो आनंद, जो निश्चय, जी कार्यप्रवर्तकता, जो प्रसाद, जी प्रतिभा, जी ईश्वरी शक्ति असते, ती अन्य कोणत्याही प्रबंधांत नसते; व ह्मणूनच काव्यांचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. व्यास, वाल्मीकी, ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, रामदास, मुक्तेश्वर, मोरोपंत, तुळसीदास, शेक्सपीअर, डॉण्टी, व्हर्जिल, होमर, गेटी वगैरेंच्या काव्यग्रंथांनीं लक्षावधि लोकांना उन्नतपदीं नेऊन बसविलें आहे. स्वतः कवि काव्यरचनाप्रसंगीं तल्लीन होऊन जातात. इंग्रजी कवि कोलरिज् हा एक सामान्य प्रतीचा कवि, तरी आपली कविता प्रसिद्ध करितांना तो ह्मणतो कीं, " या काव्यांच्या प्रसिद्धीपासून मी द्रव्याची किंवा कीर्तीची अपेक्षा करीत नाहीं. दोन्ही मला मिळालीं नाहींत तरी माझ्या श्रमाचा मोबदला मला मिळाला असें मीं समजतों. काव्यरचनेच्या व्यवसायांतच माझ्या सर्व श्रमांचें चीज झालें, त्यामुळें माझीं दुःखें सुसह्य झालीं, माझें सुख व आनंद वाढलीं, मला एकांताची गोडी लागली, अंतर्बाह्य सृष्टींत जें जें म्हणून रम्य व उदात्त आहे त्याचा शोध करण्याची मला संवय लागली. " काव्यरचनेचा व्यासंग चित्तशुद्धीला अत्यंत पोषक आहे. " यांहीं माझें तनुवाक्कर्ममनःपाप सर्वथा हरलें" असें मोरोपंतांनीं म्हटलें आहे. काव्यवाचकांचीही अशीं उदात्त काव्यें वाचल्यापासून चित्तशुद्धि झाल्याशिवाय रहात नाहीं. कवींची व काव्यांची योग्यता अशा अनेक कारणामुळें फारच मोठी आहे. रामदास स्वामींनीं " कवि शब्दसृष्टीचे ईश्वर, कवि नानाकळांचें जीवन, कवि स्वधर्माचा आश्रय, कवि सृष्टीचा अळंकार " याप्रमाणें कवींचें यथार्थ वर्णन केलें आहे. समर्थ आणखी म्हणतातः—

कवि देवाचे रूपकर्ते । कवि ऋषींचें महत्त्व वर्णिते ॥
नाना शास्त्रांचे सामर्थ्यातें । कवि वाखाणिती ॥ १ ॥
कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसांच वोघ लोटले ॥

नाना सुखांचें उचंबळलें । सरोवर हें ॥ २ ॥
कीं हीं सुखाचीं तारवें लोटलीं । अक्षय आनंदें उतटलीं ॥
विश्वजनांशीं उपेगा आलीं । नाना प्रयोगाकारणें ॥ ३ ॥
नसता कवींचा व्यापार । तरी कैंचा असता जगदुद्धार ॥
ह्मणोनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ॥ ४ ॥

कवींची महती यापेक्षां अधिक चांगल्या तऱ्हेनें कोणांस वर्णितां येणार आहे ? सुंदर कविता ही ज्ञानानंदजलानें संतत वाहणारी एक महानदी आहे. कविता ही प्रापंचिक दुःखें सुसह्य करिते; दुर्विकार नाहींसे करून मनुष्याला धैर्य, बळ, व निश्चय देते; उदात्त नीतितत्त्वें त्याला शिकविते; हृदयांत उदात्त व प्रेमळ मनोवृत्ति जागृत करून यच्चयावत् जीवसृष्टीवर प्रेम करायला लावते, जडाजड वस्तूंच्या सौंदर्याची अद्भुत गोडी घ्यायला शिकविते; श्रेष्ठ पुरुषांच्या चरित्रांचीं रहस्यें सांगून कृतार्थ होण्याचा म्हणजे इहपरलोक साधायचा मार्ग दाखविते. कविता ही मनुष्याच्या वांट्याला आलेली अमृतसंजीविनी मात्रा आहे; ही अमृतवल्ली आहे; ही इहलोकीं अवतरलेली परमेश्वराची परमकृपा आहे. संसारातपतप्तांना ही कल्पवृक्षाची छाया आहे. 'सुकविता यद्यस्ति राज्येन किम्' असें जें भर्तृहरीनें ह्मटलें आहे तें किती खरें आहे ! सामान्य जनांच्या कल्पनेप्रमाणें सर्वसुखाचें आगर काय ते राज्य, व मोठा भाग्यवान् व सुखी म्हणजे काय तो राजा ! पण जगांतलीं सारीं सुखें जरी एकवटलीं तरी कवितारसानुभवापासून होणाऱ्या आनंदापुढें तीं तुच्छच आहेत असा वरील चरणाचा आशय आहे. काव्य हें परमानंदाचें साधन आहे, व ईश्वरदत्त रसिकता जर हृदयांत असेल तर रंकापासून रावापर्यंत हवें त्याला या परमानंदाची गोडी चाखतां येण्यासारखी आहे. खरी रसिकता अंगीं असली म्हणजे उदात्त, पावन व उत्कृष्ट वस्तु तेवढ्याच आवडतात. रसज्ञाला कविता भारलेल्या सृष्टींत नेते. तेथील सर्व वस्तु सौंदर्य व सत्य या गुणांनीं युक्त अशा दिसतात, व त्यांच्या दर्शनानें चित्ताला जो अनुपम आल्हाद होतो त्याची बरोबरी कसलींही पार्थिव सुखें करूं शकत नाहींत. कवितारसांत निमग्न असणाऱ्या भाग्यवंताला 'पूर आला आनंदाचा । लाटा उसळती माच्य ' या तुकोबांच्या उक्तीचा अनुभव पदोपदीं येतो.

## ५ काव्याचीं लक्षणें.

११ कवितेचें लक्षण काय ? अनेक साहित्यशास्त्रकारांनीं व कवींनीं काव्याचीं अनेक लक्षणें बांधलीं आहेत. ' गुणालंकारांनीं युक्त असे शब्दार्थ म्हणज काव्य ' असें वामनाचें मत आहे; ' रमणीयार्थप्रतिपादक शब्द म्हणजे काव्य ' असें जगन्नाथाचें मत आहे; ' अदोष असून सगुण असे शब्दार्थ म्हणजे काव्य ' असें मम्मटाचें मत आहे ( त्याच्या मतें अलंकार शब्दार्थांसह असतील वा नसतील ); ' रसादिमत् वाक्य म्हणजे काव्य ' असें शौद्धोदनीचें मत आहे; 'ध्वन्यात्मक वाक्य म्हणजे काव्य' असें महिमभट्टाचें मत आहे. याप्रमाणें संस्कृत साहित्यशास्त्रकारांपैकीं कांहीं प्रसिद्ध पंडितांनीं काव्याचीं लक्षणें बांधलीं आहेत; तथापि संस्कृत कवितेविषयीं विचार करितां ' रसात्मकं काव्यम् ' हीच व्याख्या बहुजनसंमत दिसते. रस हा कवितेचा प्राण आहे. छंद, गुण, दोष, अलंकार, वगैरे काव्यरूप देहाचे अवयव आहेत. शृंगारादि नवरसांपैकीं कोणताही एक प्रधान रस असून बाकीचे गौणरस तदंगभूत असले म्हणजे काव्य होतें असा संस्कृत साहित्यशास्त्रकाराचा आशय दिसतो. मराठींत साहित्यशास्त्रावर पूर्ण स्वतंत्र ग्रंथ नाहीं, तथापि मराठी कवितेचें एकंदर स्वरूप ध्यानांत आणून काव्याचें लक्षण मराठी काव्यानुरोधानें बसविणें कठीण आहे असें नाहीं. ' रूपीं जडलें लोचन । पायीं स्थिरावलें मन । देहभाव हरपला । तुज पाहतां विठ्ठला ' अशी सर्वकाळ ज्यांची स्वरूपस्थिति असते त्यांचे सहजोद्गार म्हणजे उत्तम ( प्रासादिक ) कविता होय अशी मराठी कवींची काव्यविषयक व्याख्या आहे.

वैभव कांता कांचन । जयासी वाटे हें वमन ।
अंतरीं लागलें ध्यान । सर्वोत्तमाचें ॥ १ ॥
जो भगवद्भजनेंवीण । जाऊं नेदी एक क्षण ।
सर्वकाळ अंत:करण । भक्तिरंगें रंगलें ॥ २ ॥

अशा प्रकारच्या पुरुषांचे ' भक्तीचें कौतुक ' म्हणजे उत्तम कविता असें कवितेचें लक्षण रामदासस्वामींनीं केलें आहे. ज्यांना 'राममय सृष्टी झाली' त्यांचे सहजोद्गार म्हणजे प्रासादिक कविता असें समर्थ म्हणतात. समर्थांनीं

कवींचे तीन वर्ग केले आहेत. **धीट कवि, पाठ कवि, व प्रासादिक कवि.** ' जें जें आपुल्या मनास आलें, दृष्टी पडलें तें शीघ्र वर्णिलें ' असे जे कवि ते धीटकवि; केवळ व्युत्पत्तीच्या जोरावर काव्य करणारे ते पाठकवि; हे दोनी प्रकारचे कवि ' कामिक, रसिक, शृंगारिक, वीर, हास्य, प्रास्ताविक, कौतुक, विनोद अनेक ' प्रकारचें वर्णन करणारे असतात, म्हणून यांना धीटपाठ कवि असें समर्थ म्हणतात. प्रासादिक कवि अर्थात् यांहून फार वरच्या पायरीचे.'भक्तिहीन जें कवित्व । या नांव ढोंगमत'असा समर्थांचा सिद्धांत आहे. परतत्वस्पर्शी झालेली कविता प्रासादिक होय असें ज्ञानेश्वरांचें मत आहे. काव्यग्रंथ ललितशब्दखचित असला तरि त्यांत हरियश वर्णिलें नसेल तर तें कावळ्यांचें तीर्थ ( विषयीजनांचें क्रीडास्थान ) होय, हंस ( ज्ञानी ) त्याकडे ढुंकूनही पाहात नाहींत, उलटपक्षीं काव्याची रचना अबद्ध असली तरी तें भगवत्पर असेल तर निष्पाप साधूंना प्रिय होतें असें श्रीमद्भागवताचेंही स्पष्ट सांगणें आहे. एकंदरींत " ईश्वरनिष्ठ स्वानुभवी सत्पुरुषांचे स्वैरालाप म्हणजे उत्तम प्रासादिक कविता होय " असें आपल्याकडील ज्ञात्यांचें एकमत आहे. आतां इंग्रजी कवि कवितेचें लक्षण कसें बांधतात तेंही पाहूं. शेक्स्पीअर यानें ' प्रतिभेच्या दिव्यतेजानें अदृष्ट वस्तूंचें चिंतन करितां करितां कवीनें त्यांना नांवरूप देऊन वर्णिलें कीं उत्तम काव्य होतें ' असें काव्यलक्षण केलें आहे. त्याच्या मतें प्रतिभावान् पुरुष म्हणजे कवि व प्रतिभाजन्य तें उत्तम काव्य. ' उत्शृंखल वा प्रबळ होणाऱ्या मनोवृत्तींचा सहज स्फोट म्हणजे काव्य ' असें वर्डस्वर्थ कवि यानें काव्यलक्षण केलें आहे. ' मनुष्य समाजाच्या मूळाशीं

---

1 As Imagination bodies forth
The forms of things unknown, the poet's pen
Turns them to shape and gives to airy nothing
A local habitation and a name.

—Shakespeare.

2 Poetry is the spontaneous overfeow of powerjul feelings. —Wordsworth.

असलेल्या नीतितत्त्वांचें उदाहरणांसह ज्यांत विवेचन केलें असतें तें काव्य असें लक्षण रसिक कवि आर्नोल्ड[3] यानें केलें आहे. 'थोर विभूतींच्या श्रेष्ठ व आनंदमय स्थितींतले उद्गार म्हणजे कविता' असें काव्यलक्षण शेलें[4] यानें केलें आहे. या चारही व्याख्यांचा विचार करितां शेक्सपीअरनें प्रतिभेला, बर्डस्वर्थनें प्रबळ मनोवृत्तींना, आर्नोल्डनें नीतिकल्पनांना, व शेलेनें खुद्द कवीच्या आनंदमय स्थितीला याप्रमाणें एकेकानें एकेका विशिष्ट गोष्टीला अधिक महत्त्व दिलें आहे.

१२. याप्रमाणें अनेकांनीं काव्याचीं अनेक लक्षणें आपापल्या मतें बांधलीं आहेत. पण वस्तुतः तीं सारीं खरीं आहेत. रसिक कवीच्या, भगवद्भक्ताच्या किंवा प्रतिभावान् पुरुषाच्या चित्तवृत्तींची मीमांसा करणें जर शक्य असेल तर काव्याचें खरें लक्षण देतां येईल. खरें पाहिलें तर कविता हा विषय शास्त्रीयविचिकित्सेचा नसून केवळ रसिकहृदयगम्य आहे. शब्दार्थालंकारांचे चमत्कार, रसवत्व, तन्मयत्व, प्रतिभावत्व हे सारे शब्द काव्याचें स्वरूप आपल्या मनांत आणतात; पण काव्याचें खरें लक्षण या सर्वांना व्यापून उरणारें आहे, तें अनिर्वचयीय आहे. 'लक्षणानें काव्याची मर्यादा संकुचित करूं पाहणें ह्मणजे आपल्या मनाचा संकुचितपणा दाखविणें आहे' असें डा. जॉन्सन यानें ह्मटलें आहे. काव्यदेवता ही सर्व काळीं व सर्व देशांत परिस्थित्यनुरूप वेष घेऊन क्रीडा करीत असते. ती कधीं होमर किंवा व्यास यांच्या हृदयांत संचार करून शस्त्रास्त्रांच्या खणखणाटांत चमकते; कधीं शेक्सपीअर, भवभूति किंवा मोरोपंत यांच्या बुद्धींत शिरून मनुष्यसमाजाचीं व व्यक्तींचीं भिन्न भिन्न रूपें पृथक्त्वानें वर्णिते; कधीं ज्ञानेश्वर, तुकाराम, तुळशीदास, इत्यादिकांच्या जिव्हाग्रावर बसून परमे-

---

3 Poetry is the criticism of life(i.e.of moral ideas)
—Mathew Arnold.

4 Poetry is the record of the best and happiest moments of the best and happiest minds.
—Shelley.

श्वराचे गुणानुवाद गाते; कधीं मनोरंजनपर व विनोदात्मक लघु काव्यें निर्माण करिते; कधीं कालिदास, मुक्तेश्वर, वर्डस्वर्थ यांच्या नेत्रांत बसून सृष्टिसौंदर्यानुभव घेते; कधीं जगन्नाथराय, रामजोशी व बायरन यांच्या चित्तांत शिरून रंगेलपणा दाखविते! होते! कवितादेवी फार स्वच्छंदी आहे. हव्या त्या देशांत शिरून हवा तो अवतार तिला धारण करितां येतो. तिचा जन्म प्रतिभावान् रसिक कवीच्या हृदयांत असतो. प्रत्येक देशांतल्या चालीरीती आचारविचार, धर्मकल्पना व एकंदर परिस्थिति ज्या प्रकारची असेल त्याप्रमाणें ती आपला वेष बदलते; पण सर्व काळीं, सर्व देशांत, कवितादेवीचा आत्मा एकरूपच असतो! ती कधीं हंसेल, कधीं रडेल, कधीं वीरश्री दाखवील, कधीं गंभीर होईल, कधीं विनोदी असेल, कधीं स्थितप्रज्ञ योग्याप्रमाणें समाधिस्थ राहून परमेश्वरस्वरूपीं तल्लीन होईल, तर कधीं सामान्य चंचलचित्त विषयी पुरुषाप्रमाणें नानाविध सुखविलास उपभोगील. कोणत्याही वेषांत व वृत्तींत ती असली, तरी एकदां तिचा दाट परिचय झाल्यावर, तिला कोठेंही ओळखतां येईल. प्रतिभायुक्त रसिकता ज्याच्याजवळ असेल त्याच्याशीं ती दोस्ती करील; मनाचा कोमलपणा, प्रेमळपणा व उदात्त कल्पना हे गुण ज्याच्या हृदयांत नाहींत त्याच्या ती वाऱ्यालाही उभी राहणारी नाहीं. ती मोठी मानी आहे. सहजगुणांस तेव्हांच भुलते, वरपंगी डामडौलाचा ती तिटकारा करिते. तिला आराधनेनें वश करून घेणें सोपें नाहीं, ती दुराराध्य आहे. कवितादेवीची उत्पत्ति मनुष्याच्या हृदयांत आहे व मनुष्याला जोंपर्यंत हृदय आहे तोंपर्यंत तिचा नाश होणें शक्य नाहीं. तिचें स्वरूप इतकें मोहक आहे, तिची वाणी इतकी चित्ताकर्षक आहे, तिचें वशीकरणसामर्थ्य इतकें अप्रतिहत आहे कीं, अनसूयेनें सीतेला दिलेला अंगराग जसा चिरकाळ ओला होता व तत्सौरभीं भ्रमरपंक्ति जशी सदैव लोला होती, त्याप्रमाणें तिचें माधुर्य चिरंतन टिकणारें आहे व तिला रसिकभक्तांची कधींहि उणीव पडणार नाहीं. देश जसजसा सुधारत जाईल, नानाविध कलांची त्यांत प्रगति होत जाईल, व आधिभौतिक शास्त्रांचा जसजसा उत्कर्ष होत जाईल तसतसा कवितेचा ऱ्हास होत जाईल हें मत मेकॉले साहेबांनीं

काढलें, व आमच्या निबंधमालाकारांनींही त्याचा मनःपूर्वक अनुवाद केला आहे. पण वस्तुतः असें होणें दुरापास्त आहे. कवितेचा ऱ्हास एकदांच होईल आणि तो मनुष्याच्या हृदयांतल्या उच्चतम मनोवृत्ति ज्यावेळीं नष्ट होतील, कल्पकता, प्रतिभा, रसवत्ता, वगैरे गुण जेव्हां स्मृतिशेष होतील, तेव्हांच कवितेचा लय होईल; पण मला वाटतें असा दुर्धर प्रसंग मनुष्यावर युगक्षयाचे वेळीं मात्र येईल; तेथपर्यंत कवितेचें मनुष्यमात्रावरचें साम्राज्य व सत्ता इतर कोणत्याही शास्त्राला केव्हांही मिळणार नाहीं !

## ६ प्रसाद, प्रतिभा व प्रेम.

१३ कवितेचे वर्णनीय विषय कोणते असावेत याविषयीं आतां विचार करूं. कित्येकांच्या मतें हा विषय ऊहापोह करण्यासारखाच नाहीं. कवीची कल्पना जिकडे धांवेल तिकडे ती काव्यच प्रसवेल, ब्रह्मांडांतली कोणतीहि वस्तु काव्यविषयक होऊं शकते, असें त्यांचें मत आहे. कवीची कल्पना स्वैरपणानें धांवेल तिकडे काव्यच प्रसवेल हें बव्हंशीं खरें आहे, पण काव्यविषय ज्या योग्यतेचें असतात त्या योग्यतेची ती कविता गणली जाते हेंही कांहीं खोटें नाहीं. " जें जें आपुल्या मनासि आलें । दृष्टी पडलें तें वर्णिलें " अशा कवींना समर्थ खालच्या पायरीचे समजतात, तें अगदीं रास्त आहे. खरें काव्य आणि साधें पद्य यांतला भेद नीट लक्षांत ठेविला पाहिजे. ' उष्टया पत्रावळी करूनियां गोळा ! कवित्वाची कळा दाखवीती ' ' मोडुनि संतांचीं वचनें ! करिती आपणां भूषणें ' ' बरोबरी झाले कवि ! नेणे प्रसादाची चवी ' इत्यादि अभंगपादांत तुकोबांनीं ज्यांचा उल्लेख केला आहे अशा क्षुद्र पद्यकारांना कवि ही श्रेष्ठ पदवी वस्तुतः शोभत नाहीं, त्यांना हवें तर पद्यकर्ते ह्मणावें. अशा पद्यकारांचा सर्वकाळीं सुकाळ असतो, व सामान्य जनांना काव्यांचें खरें मर्म कळत नसल्यामुळें त्यांचीं भिकार पद्यें कधीं कधीं सुज्ञ लोकही काव्यांत गणतात! ज्यांच्या बुद्धींत प्रतिभा नाहीं, ज्यांच्या वाणींत प्रसाद नाहीं, ज्यांच्या हृदयांत प्रेम नाहीं, त्यांना कवि ही संज्ञाच देऊं नये. प्रसाद, प्रतिभा व प्रेम या तीन लोकोत्तर गुणांनीं कवि होतो. कवीच्या अंगीं हे तीन गुण उपजत असतात, व ते अभ्यासानेंही वाढतात. पहिल्या प्रतीचे कवि

हे लोकोत्तर पंडित असतात, त्यांचें वाचन व अवलोकन अत्यंत व्यापक असतें. ( १ ) काव्यादर्शकार दण्डी यानें म्हटल्याप्रमाणें नैसर्गिकी प्रतिभा, बहुनिर्मल श्रुत व आनंदाभियोग या गुणसमुच्चयापासून काव्य होतें. मम्मट, विद्याधर वगैरे साहित्यशास्त्रकारांचेंही असेंच मत आहे. उत्कृष्ट कवीचें काव्यशास्त्राध्ययन व व्यवहारावलोकन अत्यंत विस्तृत असल्यामुळें या सर्व गुणांच्या मिश्रणापासून उत्कृष्ट काव्य निर्माण होतें. प्राचीन काव्यांत थोर कवीचें मन मुरलेलें असतें. पूर्वी झालेल्या कवींच्या सत्काव्यांशीं त्याचा दृढतम परिचय झालेला असतो, तीं काव्यें त्यानें ‘ विश्वासानें व आदरानें ’ वाचलेलीं असतात. उत्तम ग्रंथकार होण्यास प्राचीन वाङ्मयाचा निरंतर अभ्यास, सतत मनन व तदाकार वृत्ति हे गुण अवश्य पाहिजेत. प्राचीन वाङ्मयरूप पवित्रनदीच्या प्रवाहाबरोबर पुष्पासारखें ज्याचें मन वाहवत जातें त्याच्याच मनोबुद्धींत त्या वाङ्मयांतले गुण मुरतात व अशा प्रकारें त्याच्या वृत्तीला तन्मयता प्राप्त झाली कीं त्याच्या वाणींत प्रसाद येतो. उत्तम कविता ही सूर्यप्रकाशाप्रमाणें स्वच्छ म्ह. उत्तानार्थ असते. ती जाणत्यानेणत्या सकळांना वाचतां वाचतां कळत जाते. शब्द अर्थानुयायी असतो. शब्दसौंदर्य, पदलालित्य हे गुण प्रसादाला अवश्य नाहींत, पण त्यामुळें प्रसादाची हानी होते असेंही नाहीं. ज्यांच्या हृदयांत उदात्त मनोवृत्ति प्रबळ होतात व ज्यांच्या वाणीला अभ्यासानें संस्कार झालेले असतात त्यांच्या वाणींत प्रसाद येतोच. त्यांच्या मनांतील अर्थ अनुरूप शब्दांनींच प्रकट होत असतो. ‘वाचमर्थोनुधावति ’ या न्यायानें सत्कवीला आधीं वाणी फुटते व अर्थ मागें धांवत येतो; त्याच्या वाणींत यामुळेंच ‘ पाकस्तु रसोचितशब्दार्थनिबंधनम् ’ या व्याख्येप्रमाणें उत्तम परिपाक उतरतो० ( २ ) कवीचा दुसरा लोकोत्तर गुण म्हणजे प्रतिभा हा होय. नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा म्हणजे प्रतिभा होय. वर्षाऋतूंत भूमींतून नवे नवे कोंब जसे बाहेर येतात. तसे नवनवे उन्नत विचारतरंग प्रसविणारी बुद्धि म्हणजे प्रतिभा होये, शिवाजीसारख्या व्यापकबुद्धीच्या थोर पुरुषांनाही ही प्रतिभा असते. कवीचें कार्य एकट्या प्रतिभेनेच होत नाहीं. सत्कवीची प्रतिभा शुचि असायला पा-

२५३

हिजे. पवित्र सुंदर वस्तूंच्या उदात्त स्वरूपाला जी भुलते ती शुचि प्रतिभा. एखाद्या धनिकाची मर्जी संपादण्यासाठीं, वैर उगवण्यासाठीं, आत्मप्रौढीसाठीं, क्षुद्र विषयांचें क्षुद्र वर्णन ज्या काव्यांत केलेलें असतें तीं काव्यें शुचिप्रतिभेचीं फळें नव्हत ! सारे लौकिक विचार व मनाचे यच्चयावत् पार्थिव विकार यांपासून शुचि प्रतिभा फार दूर असते. शुचि प्रतिभा व्यासाच्या महामतीला आविष्करून भारतग्रंथ प्रसविते, वाल्मीकीच्या तपानें पावन झालेल्या दयार्द्र बुद्धींत शिरून श्रीरामलीला गाते; शुकाची ब्रह्मनिष्ठा, सीतेचें पातिव्रत्य, रामाचें सत्यव्रत, श्रीकृष्णाची भक्तवत्सलता, भीष्माचा करारीपणा, हरिश्चंद्राची सोशिकता, परमेश्वराच्या अनंत अवतारांचीं अनंत पुण्यकृत्यें शुचिप्रतिभेला वर्णावींशीं वाटतात. कुत्रीं, मांजरें, आगगाड्या, आगबोटी, केरसुणी, केश, नख, असले रुक्ष व क्षुद्र विषय शुचिप्रतिभावान् पुरुष वर्णीत नाहीं ! असल्या क्षुद्र विषयांवरच्या पद्यांत प्रसंगीं मनोहारित्व, कल्पनाचातुर्य व थोडेंसें कवित्वही असेल, पण हीं पद्यें पहिल्या वर्गांत घालण्याची कोणी हांव बांधणें योग्य होणार नाहीं. शुचि प्रतिभा ही अग्नीसारखी दैदीप्यमान असते, वायुसारखी वेगवान् असते, जलासारखी निर्मल असते, ब्रह्मांडाएवढी व्यापक असते, यामुळें दिव्य तेज, विलक्षण सामर्थ्य, पावनता व व्यापकता हे गुण तिच्यांत असतात. तिला दिव्य वस्तूंचेंच वर्णन करावेंसें वाटतें. प्रतिभावान् पुरुष लहान वस्तु तुच्छ मानतो असें नाहीं. पक्ष्यादि लहान प्राण्यांत व वस्तूंतही शुचित्व, सौंदर्य व मनोहारित्व असेल तर ती वस्तु सत्कवीला वर्णावीशी वाटतें. कोमल व मधुर फूल, व सुंदर आणि सुकुमार मूल यांचें गोड वर्णन कोण्या प्रतिभावान् कवीनें केलें नाहीं ? स्कॉटलंडांत बर्न्स नांवाचा एक लोकप्रिय कवि होऊन गेला. त्यानें ‘ डेसी ’ नांवाच्या फुलाचें सुंदर वर्णन केलें आहे. त्याच्या पानांत व पाकळ्यांत त्याला रत्नें दिसलीं, व त्या प्रेम व दया या सद्गुणांनीं व्याप्त आहेत असें त्याला वाटलें. सामान्य दृष्टीला नित्य परिचयामुळें जी वस्तु सामान्य दिसते त्याच वस्तूंत कविकल्पनेला अद्भुतपण दिसतें. अंतर्बाह्य सृष्टींतलें गुप्त सौंदर्य कविता प्रकट करिते. कवीच्या दृष्टीला अगोचर अशी वस्तु ब्रह्मांडांत नाहीं. ‘ जें न देखे रवी सो देखे कवी. ’ रंगनाथस्वामी म्हणतातः—

रवी दाखवी तें कवी पूर्ण जाणे । कवी दाखवी तें रवी तों न जाणे ।
कवी तोचि रे जो रवीत प्रकाशी । रवी लोपला पूर्ण ज्याचे प्रकाशीं ।। १ ।।

१४. हें जरी खरें आहे तरी कवि काव्यविषयाची जी निवड करितो तीवरून त्याच्या प्रतिभेची किंमत करितां येते असें मला वाटतें. कवि हा ग्रीक लोकांच्या व्याख्येप्रमाणें कर्ता—करणारा, रचणारा, निर्माण करणारा—आहे. हें निर्मातृत्व ज्याचे ठिकाणीं नाहीं त्याचें नांव कविमंडळांतून बेलाशक काढून टाकावें असें अरिस्टॉटल व ड्रायडन म्हणतात. कवि हा निःसंशय निर्माता होय. तसाच तो द्रष्टाही आहे. ईश्वर व जीव या दोन्ही अवस्था एकसमयावच्छेदेंकरून पहाणारा महापुरुष कविच होय. हें द्रष्टेपण ज्याच्या अंगीं आहे त्या शुचिप्रतिभावान् महाकवीची साम्यता सामान्य पद्यकारांनाच नव्हे तर बऱ्याच गाजलेल्या कवींनाही येणार नाहीं. प्रतिभा हा शब्द जितका व्यापक आहे तितका तो सामान्य कल्पनेच्या आटोक्याबाहेरचा आहे. (३) प्रसाद व प्रतिभा यांशिवाय तिसरा मोठा गुण सत्कवींजवळ असतो तो प्रेम होय. कविहृदय निरंतर प्रेमार्द्र असतें. परमेश्वराविषयीं उत्कट भक्ति; स्त्रीपुत्रबंधुजनांविषयीं प्रेम, जीवमात्रांविषयीं प्रेम; सौंदर्य, सौहार्द व सत्य या गुणांविषयीं नैसर्गिक आदर; सृष्टींतली रम्यता भोगण्याइतकी रसज्ञता; हीं सर्व प्रेमाचींच रूपें आहेत. ईश्वर, जीव व सृष्टि या तिघांविषयीं अतुल प्रेम सत्कवीच्या हृदयांत वागत असतें, व आमच्या वेदांतमताप्रमाणें जीव व सृष्टि यांचा अंतर्भाव ईश्वरांत होत असल्यामुळें ईश्वरीप्रेमाचा उत्कर्ष सत्कवीच्या हृदयांत झालेला असतो, यासाठींच भगवद्भक्त कवींची सर्व कवींत श्रेष्ठत्वानें गणना आहे. भगवद्भक्ताला सर्व जग ईश्वररूप भासत असल्यामुळें त्याला जीवाच्या आत्यंतिक हिताचा कळवळा येतो. तुकोबा म्हणतातः—

जग तरी आह्मां देव । परि हें निंदितो स्वभाव ।। १ ।।
येतो हिताचा कळवळा । पडती हातीं ह्मणोनि काळा ।। २ ।।

ढोंगी, लबाड, नीच माणसांवर प्रहार उडवितांना सुद्धां कवीचें हृदय त्यांविषयीं सकरुण सप्रेम असतें. कवीला सत्याची चाड असते, असत्याचा तिटकारा असतो. कवीला सद्गुण व सद्गुणी मनुष्यें यांजविषयीं सहजप्रेम

वाटतें. स्वदेश, स्वभाषा यांविषयीं अभिमान बाळगून तो जागृत ठेवणारे कवि मोठ्याच पदवीचे होत, पण ज्यांचा मानसार्णव देशकालादिकल्पनांनीं परिच्छिन्न नसतो ते कवि निःसंशय पहिल्या प्रतीचे होत. उत्तम कवि व्यवहार, राजकारण व परमार्थ चांगल्याप्रकारें जाणतोच, पण त्याचें मुख्य लक्षण हें कीं तो आत्मस्वरूपाविषयीं निरंतर जागृत असतो, व सर्व जीव असेच जागृत रहावेत अशाविषयीं त्याला उत्कंठा असते. स्वतः निरंतर जागृत राहून जीवांना जागृति देण्याच्या थोर हेतूनें काव्य गाणारा कवि पहिल्या प्रतीचा होय. व्यास, वाल्मीकि, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम, तुळशीदास हे अशा दृष्टीनें पहातां पहिल्या प्रतीचे कवि होत. संस्कृत भाषेंत कवि ह्म० ज्ञाता अशा अर्थ आहे व मराठींत कवि ह्म० संत असा सामान्य अर्थ होतो. आमचे बहुतेक वरचे कवि संतच आहेत.

## ७ काव्याचे विवर्णनीय विषय.

१५. असो. तर विमल प्रसाद, प्रतिभा व प्रेम हे तीन प्रधान गुण ज्या जागृत कवीच्या हृदयांत निरंतर वास करितात त्यालाच कविमंडळांत पहिल्या रांगेची योग्यता येते. सत्कवीच्या शुचिप्रतिभेला क्षुद्र व तुच्छ विषय प्रमुखत्वानें वर्णावेसे वाटत नाहींत ह्मणून वर सांगितलेंच आहे. मग काव्यविषय कोणते होत हा मुख्य प्रश्न उत्पन्न होतो. पंत म्हणतातः—"कवि म्हणति 'वाणि ! वर्णुनि देवां कीं सुज्ञ मानवां वेंच" ( द्रोण. अ. १२) सर्वलक्षणसंपन्न असा परमात्मा किंवा परमात्म्याचे उदार विमल गुण ज्यांत आहेत अशा महाविभूति हेच काव्याचे वर्णनीय विषय होत, असा पंतांचाच नव्हे,—सर्व हिंदुराष्ट्राचा—सिद्धांत आहे. मात्र महाविभूतींच्या वर्णनांत त्यांचे प्रतिपक्षीही येतात. राम ह्मटला कीं रावण आलाच. श्रीकृष्ण आणि कंस, पांडव आणि कौरव, मिल्टन कवीचा ईश्वर आणि सैतान अशा दिवस आणि रात्र याप्रमाणें नेहमीं जोड्या असायच्याच ! सत्पक्षाची महती वर्णीत असतांना असत्पक्षाचेही खरे गुण वर्णायला खऱ्या कवीची वाणी कचरत नाहीं. वाल्मीकीनें भगवान् श्रीरामाचें चरित्र गातांना रावणाचे अतुल सामर्थ्य, अनुपम शिवभक्ति, परगुणानुग्राहकता व निश्चय हे गुणही विमलबुद्धीनें वर्णिले आहेत. मिल्टन कवीनेंही आपल्या महाकाव्यांत ईश्वराच्या तोलाच-

गुण सैतानांत दाखविले आहेत; ( याबद्दल कित्येक टीकाकारांचा निष्कारण रोषही त्या उदार कवीवर झाला आहे. ) श्रीव्यासांनीं आपल्या महाभारतांत पांडवगुण यथार्थ वर्णिले आहेतच, पण दुर्योधनाचे करारीपणा, कर्णशल्यादि स्वपक्षीयांचें चित्त वेधण्याचें सामर्थ्य, दृढ मैत्री वगैरे श्रेष्ठ गुणही दाखविले आहेत. सत्पक्षाचे गुण वर्णायचें हा व्यासांचा मुख्य हेतु असूनही असत्पक्षाचे गुण व सत्पक्षाचे दोष हेही वर्णून त्यांनीं आपल्या मनाचें निष्पक्षत्व दाखविलें आहे. पांडवांचा सत्पक्ष होता. तरी असत्पक्षीय वीर जे भीष्म, द्रोण, कर्ण यांचे वध अन्यायानें, कपटानें व क्रूरपणानें झाले ही गोष्ट श्रीव्यासांनीं स्पष्ट सांगितली आहे. यावरून सदसत्पक्षांचे गुणदोष दाखविण्यापेक्षांही सत्यवर्णन उदार कवींना अधिक प्रिय असतें असें दिसतें ! त्यांचे ठायीं ईश्वरासारखें समचित्तत्व असतें. थोर विभूतींचीं चरित्रें गाण्यांत ईश्वरी सूत्रांचें अगर नियमांचें यथार्थ ज्ञान प्राणिमात्रांस करून द्यावें एवढाच सत्कवींचा हेतु असतो. एवंच परमेश्वर व पारमेश्वरी विभूति यांचीं उदारचरित्रें गाऊन स्वपरहित साधणें हा प्रधानहेतु मनांत धरून कवीश्वर काव्यरचना करितात.

१६. प्रत्येक देशाच्या कवितेचें कांहीं विशिष्टपण असतें. तें विशिष्टपण त्या देशांतील तत्त्वज्ञान, धर्मविचार, लोकाचार, लोकस्वभाव वगैरेच्या समुच्चयावरून बनत असतें. भारतीय सत्कवींच्या वर्णनांचे मुख्य विषय ईश्वर व ईश्वरी विभूती होत हें वर सांगितलेंच आहे. काव्यरचनेचे गुण काव्यांत कमी असले तरी चालतील, पण हरियशप्रधान काव्य पाहिजे असा आमच्या हिंदुराष्ट्राचा स्वभाव आहे. वामनपंडितांचें एखादें सदोष व गुणरहितहि काव्य रघुनाथपंडितांच्या सगुण व दोषरहित काव्यापेक्षां अधिक लोकप्रिय होतें याचें बीज हेंच आहे. अनंतकवि म्हणतो:—

... ... ... ...

---

१ जरि हरिगुणरत्नीं गुंफिली होय वाणी
तरि परमसुखाला काय हा त्यास वाणी ? ।
स्तवि इतर नरांतें जीभ ते दैन्यवाणी
मुठिहि भरि न देती पिष्ट संतुष्ट वाणी ॥ १ ॥

—वामनपंडित.

गोष्टी नावडती अनंत कविला त्या लौकिकी बार्गळा ।
गातां रामकथा निरंतर तुटे संसारमोहार्गळा ।। १ ।।

हा हिंदु राष्ट्राच्या कित्येक शतकांच्या संस्कृतीचा परिणाम होय. पौंश्चात्य कवितेंत ' मनुष्यप्राणी, त्याचा स्वभाव व सृष्टी ' हे कवीच्या वर्णनाचे सामान्यत: मुख्य विषय ठरले आहेत. ईश्वरी सूत्रांचें ज्ञान देण्यासाठीं मिल्टन कवीनें आपलें महाकाव्य रचिलें आहे व त्याच्या आणि कौपर, जॉर्ज हर्बर्ट, वर्डस्वर्थ वगैरे कांहीं कवींच्या काव्यांत ईश्वरविषयक वर्णनें किंवा कल्पना आहेत, पण इंग्रजी कवितेचें तें मुख्यांग दिसत नाहीं. शुचिप्रतिभेला ईश्वर व ईश्वरी विभूती यांशिवाय सृष्टि हाही एक तिसरा वर्णनीय विषय आहे. इंग्रजी पंडितांचा भारती कवितेवर एक मोठा आक्षेप आहे कीं तींत सृष्टिवर्णनें नाहींत. त्यांचें म्हणणें असें आहे कीं थॉम्सन, ग्रे, वर्डस्वर्थ या इंग्रजी कवींप्रमाणें भारती कवींनीं सृष्टिवर्णनें मुळींच केलीं नाहींत. हें म्हणणें सर्वांशीं खरें नाहीं. त्यांनीं ईश्वर व संत हे जरी काव्याचे दोनच विषय ठाम ठरविले आहेत तरी सृष्टि अगर निसर्ग हा विषय त्यांनीं अगदींच गाळला आहे असें नाहीं. रामायणांतलें अयोध्यावर्णन; कालिदासाचीं ऋतुवर्णनें व कुंमारसंभवांतलीं रम्य वर्णनें; कादंबरींतला जाबालीचा आश्रम, अच्छोदसरोवर, वगैरेंचीं वर्णनें; किरातार्जुनीयांतलीं सृष्टिवर्णनें; वगैरे पाहिलीं म्हणजे संस्कृत कवि सृष्टिवर्णनें कशीं करितात तें समजतें. मराठी कवि सुद्धां सृष्टिवर्णनें करण्यांत मोठे चतुर आहेत. बहुतेक मराठी कवि साधुवृत्त असल्यामुळें तीर्थयात्रोद्देशानें भरतखंडभर फिरत असत. समर्थांनीं म्हटल्याप्रमाणें: ' गिरीकंदरें देश नानापरीचे । तटाकें नद्या ओघ जाती नदींचे '—हे देखावे पाहून त्यांना उल्हास वाटे. निर्मनुष्य अशा भंडारा डोंगरावर ईश्वरचिंतन करीत हिंडणाऱ्या तुकोबांनीं म्हटल्याप्रमाणें ' वृक्षवल्ली आह्मां सोयरीं वनचरें । पक्षीही सुस्वरें आळवीती '—या पशुपक्ष्यांच्या सहजलीला पाहून त्यांना कौतुक वाटे. सृष्टींतली निसर्गरम्यता जाणण्याची शक्ति सर्व मराठी सत्कवींत होती. ज्ञानेश्वरमहाराजांनीं

---

२ On man, on nature and on human life.
—Wordsworth.

'शुचौ देशे' या गीताश्लोकावर टीका करितांना एकांतस्थानाचें जें बहारीचें वर्णन केलें आहे तें प्रत्येकानें एकवार वाचून पहावें. मुक्तेश्वराचीं सृष्टिवर्णनें जगांतल्या कोणत्याही कवीच्या वर्णनांशीं ताडून पाहिल्यास अतिसरस वठतील असा माझा अभिप्राय आहे. राजा, सभा, ऋषि, मल्लयुद्ध, शिकार, भोजनसमारंभ, विवाहप्रसंग, रात्रीची भयानकता, वनश्री वगैरे अनेक विषयांवर वर्णनें देण्यांत व मानवी स्वभावाचीं यथार्थ चित्रें रेखाटण्यांत मुक्तेश्वराचा हात धरणारा कवि विरळाच सांपडेल असें मला वाटतें. संस्कृत पद्धतीवर मनोहर उठलेलें मराठी काव्य पाहिजे असल्यास नलोपाख्यान हें एकच सुंदर काव्य साग्र वाचावें. वामनाची वेणुसुधा व राधाविलास, निरंजनमाधवाचें वर्षाऋतूचें वर्णन, होनाजीबाळाची प्रसिद्ध भूपाळी, पोवाड्यांत वर्णिलेले वीररसप्रसंग व लावण्यांतले शृंगारिक भाग—वगैरे प्रकार अवश्य वाचण्यालायख आहेत. मराठी कवितेंत भक्तिरसाच्या खालोखाल वीररसाला मान आहे. पंतांच्या भारती आख्यानांत व श्रीधराच्या कथांत वीररसाचीच कमाल झालेली आढळते. मराठी कवींनीं इंग्रजी कवींप्रमाणें सृष्टिवर्णन करायचें म्हणून मुद्दाम केलेलें नाहीं, कथोवांत तें सहज जेथें आलें तेथें तें त्यांनीं येऊं दिलें आहे एवढेंच. सृष्टिदेवतेच्या मूळाशीं जाण्यांत ज्यांना आनंद वाटे ते बाह्य जडसृष्टीचें वर्णन करावयाच्या भानगडींत फारसे पडले नाहींत हें साहजिक आहे. इंग्रजी कवींनीं सृष्टिवर्णन स्वतंत्रपणें ज्या पद्धतीनें व जसें केलें आहे तसें आमच्याकडे बहुधा कोणीं केलें नाहीं हें खरें आहे, पण आमच्या कवींनीं प्रसंगोपात्त जीं वर्णनें केलीं आहेत, तीं उत्तमांत गणण्याच्या लायखीचीं आहेत. तथापि या बाबतींत इंग्रजी कवींची तारीफ करायला पाहिजे. एकंदरींत कवितेचें वर्णनीय विषय परमेश्वर, पारमेश्वरी विभूती, व सृष्टि हे तीन आहेत व असावेत एवढें खरें आहे.

## ८ काव्यरचनेचे हेतु.

१७. कविता—रचनेचे हेतु अनेक आहेत. मम्मटानें हे हेतु पांच सहा प्रकारचे असतात ह्मणून सांगितलें आहे. कांहीं कवि कीर्तीसाठीं कविता करितात, कांहीं द्रव्यासाठीं करितात, कांहीं अमंगल टाळण्यासाठीं करि-

तात, कांहीं सद्य:परनिर्वृतीसाठीं म्हणजे काव्यरचनेपासून जो आनंदानुभव होतो त्यासाठीं करितात, कांहीं व्यवहार शिकविण्यासाठीं करितात, व कांहीं गोडसा उपदेश देण्यासाठीं करितात. द्रव्यादिकांची अपेक्षा धरून कविता करणारे कवि अगदींच कनिष्ठ दर्जाचे समजावे. वरच्या सहा हेतूंतही तीन हेतु चिंत्य दिसतात. १ मनोरंजन, २ कीर्तिलाभ व ३ व्यवहारनीतिशिक्षण. कविता रचतांना कवीला व वाचतांना रसिकाला आनंद होतो, त्यांचें मनोरंजन होतें, ही गोष्ट उघड आहे. कवीला आपलें व आपल्या वाचकांचें मनोरंजन करायचें असतें म्हणून तो सम्यगर्थवाहक शब्दांची निवड करितो; उत्कृष्ट उपमा, सरस दृष्टांत किंवा बहारीचा अर्थांतरन्यास योजून भाषेला डौल आणतो; व शब्दार्थांची समर्पक रचना करण्यांत आपलें चातुर्य खर्च करितो. तेव्हां मनोरंजन हा काव्याचा एक हेतु आहे, हें स्पष्ट आहे पण तो गौण आहे, अगदा मुख्य नाहीं. कीर्तीसाठीं बरेच कवि कविता करितात, पण हाही श्रेष्ठ कवींचीं चरित्रें व त्यांच्या कवितेचें एकंदर धोरण लक्षांत आणतां त्यांचा प्रधान हेतु दिसत नाहीं. लोकांना नानाप्रकारचें व्यवहारशिक्षण व धर्मनीतिशिक्षण देऊन त्यांना सन्मार्गवर्ती करणें, हा वरच्या तीनही हेतूंतला प्रधान हेतु दिसतो. श्रीव्यासांचें भारत किंवा समर्थांचा दासबोध असले ग्रंथ याच हेतूनें लिहिलेले असतात. बहुतेक मोठमोठे कवि हाच लोकशिक्षणाचा प्रधान हेतु मनांत धरून काव्यरचना करितात. इंग्रजी कवि बेनजान्सन हा म्हणतो कीं कवितेचा मुख्य हेतु मनुष्याला आपलें आयुष्य उत्तम प्रकारें घालवितां येईल अशा तऱ्हेचें शिक्षण देणें हा होय. बायरन कवीनें आपली पुष्कळ कविता स्वतःच्या उच्चनीच मनोवृत्ति प्रकट करून चित्त हलकें करण्यासाठीं रचली आहे; तरी काहीं काव्यें ग्रीस, इटाली वगैरे पुराणप्रसिद्ध राष्ट्रांचें पुनरुज्जीवन व्हावें व त्यांत नवी ज्योत उत्पन्न होऊन त्यांनीं स्वतंत्र व्हावें या उदात्त हेतूनें रचलीं आहेत. कालिदासादि कवींचीं काव्यें मुख्यतः स्वतःच्या व राजमंडळांच्या करमणुकीसाठीं, व कीर्तीसाठीं व सच्चारित्र्यवर्धनासाठीं रचलेलीं दिसतात. मराठी कवींपैकीं

---

1 'To inform men in the just reason of living.'

थोड्यांनीं मनोरंजनासाठीं, पण बहुतेकांनीं स्वतःच्या चित्तशुद्धीसाठीं व मुख्यतः धर्मप्रसारासाठीं काव्यरचना केली आहे. मराठी कवितेचा उगम व उत्कर्ष भागवतधर्माच्या प्रसारासाठीं झालेला उघड दिसतो. रघुनाथ पंडित, विठ्ठलादि शिवकालीन कांहीं कवि व सारे लावणीकार कवि यांच्या कवितेचा मुख्य हेतु जनमनोरंजन हाच आहे, बाकीच्या धर्म-धर्मपर कवींत कांहीं मोरोपंतासारखे चित्तशुद्धीसाठीं कविता करणारे कवि; कांहीं समाजांत नवा जोम येऊन धर्मव्यवहारराजकारण यांच्या शिक्षणानें राष्ट्र ऊर्जितावस्थेस यावें या हेतूनें रामदासमुक्तेश्वरादि समाजहितपर कविता करणारे कवि, व कांहीं केवळ जीवांचे प्रपंचबंध सुटून त्यांचें आत्यंतिक क्षेम व्हावें या शुद्ध धर्मपर बुद्धीनें कविता करणारे ज्ञानेश्वर-एकनाथतुकारामरामदासादि कवि, असे निरानिराळ्या कोटींतले कवि आहेत. पण एकंदर मराठी कवितेचें धोरण जीवांनीं विषयपराङ्मुख व्हावें; सर्वांनीं लौकिक भेदभाव विसरून जगदीश्वराचें अखंड भजन चालवावें; नामस्मरणानें, साधुसहवासानें, सद्गुरुसेवनानें व स्वधर्माचरणानें ईश्वरप्राप्ति करावी व इहपर साधून भवसागरांतून सर्वांसह तरून जावें हेंच आहे. 'धर्मरक्षावयासाठीं । करणें आटी आह्मांसी,' असें तुकाराम ह्मणतात. भक्तीचा डांगोरा पिटण्यासाठीं, भागवतधर्मप्रसारासाठीं मराठी कवितेचा अवतार आहे. इंग्रजी कविता मुख्यतः प्रवृत्तिपर आहे, मराठी कविता मुख्यतः निवृत्तिपर आहे. इंग्रजींत मिल्टन, वर्डस्वर्थ, ब्राउनिंग, काउपर असे कांहीं निवृत्तिमार्गाला अनुलक्षून कविता करणारे कवि आहेत, मराठी कवितेंतही रामदास, मुक्तेश्वर, पोवाडेवाले कवि यांसारखे कांहीं प्रवृत्तिपर कविता करणारे व व्यवहारराजकारणावर कविता करणारे कवि आहेत. पण सामान्य नियम असा कीं मराठी कविता निवृत्तिप्रधान आहे. एकंदरींत मनुष्यजातीच्या धार्मिक, राजकीय, सामाजिक, उन्नतीसाठीं कवितादेवीचा अवतार आहे. धर्मनीतिव्यवहारांचें मनुष्यजातीला शिक्षण देणें हा प्रत्येक सत्काव्याचा कमजास्त प्रमाणानें हेतु व प्रयत्न असतो.

## ९ पंतांच्या कवितेचे विशेष.

१८. येथवर कविताशास्त्राविषयीं सामान्यतः विचार झाला. कवितेचें

महत्त्व किती, कवितेचें लक्षण काय, काव्यरचनेला आवश्यक गुण कोणते, कवितेचे वर्णनीय विषय कोणते, व काव्यरचनेचे हेतु कोणते याविषयीं अगदीं संक्षेपानें ऊहापोह केला आहे. कवितेचें रहस्य समजायला माझ्या मतें कविताशास्त्राच्या मूल तत्त्वांचें स्थूल ज्ञान तरी असणें अवश्य आहे व याचसाठीं हा विस्तार केला आहे. अशा कविताशास्त्राच्या व्यापक दृष्टीनें मोरोपंतांच्या कवितेकडे पाहिलें म्हणजे सत्कविमालिकेंत पंतांना कोणतें स्थान मिळेल याचा निकाल होणार आहे. माझ्या मतें जगांतल्या थोर कवींत पंतांचा नंबर पुष्कळच वर लागेल व महाराष्ट्रकवींत एका दृष्टीनें पंत केवळ अद्वितीय आहेत. धर्म, नीति व व्यवहार यांपैकीं कोणत्याही विषयाची चर्चा चालली असतां पंतांची समर्पक आर्या सहज तोंडीं येते यावरून त्यांच्या बुद्धीची व्यापकता दिसून येते. धर्मनीतिपर सहस्रावधि अर्थांतरन्यास पाहिले म्हणजे राष्ट्राचें नीतिशिक्षक या नात्यानें पंतांची योग्यता केवढी मोठी आहे हें कळणार आहे. पंत स्वतः कित्ता घेण्यासारखे कुटुंबवत्सल गृहस्थाश्रमी असल्यामुळें कौटुंबिक नीतीचीं रहस्यें पंतांप्रमाणें उत्तम प्रकारें स्पष्ट करून दाखविणारे कवि फारच थोडे सांपडतील. कौटुंबिक नीति व समाजनीति पंतांनीं आपल्या कवितेंत उत्तम व्यक्त करून दाखविली आहे. माता, पिता, गुरु, बंधु, पति, पत्नी, राजा, प्रजा इत्यादिकांचीं श्रेष्ठ कर्तव्यें त्यांनीं स्पष्ट सांगितलीं आहेत, साचार भक्ति व उत्तम कुटुंबसमाजनीति यांचा प्रसार कर्तव्य असेल तर पंतांच्या कवितेचें या कामीं फार साहाय्य होणार आहे! पंतांची कविता भक्तिप्रेमरसानें थबथबलेली आहे. त्यांची शब्दशास्त्रनिपुणता त्यांच्या प्रतिभेच्या आड येत नाहीं. भवभूतीनें ह्मटलें आहे:—

शास्त्रे प्रतिष्ठा सहजश्च बोधः प्रागल्भ्यमभ्यस्तगुणा च वाणी ।
कालावबोधः प्रतिभानवत्वमेते गुणाः कामदुघाः क्रियासु ॥१॥

हे सारे गुण पंतांच्या अंगीं होते व हे त्यांच्या कवितेंत प्रतिबिंबित झाले आहेत. पंतांच्या कवितेचें जें हें स्तोत्र गायिलें आहे त्याची सत्यता ज्याला पहावयाची असेल त्यानें पुढील वेंचे लक्षपूर्वक वाचावेत.

———

# महत्त्वाच्या सूचना.

( १ ) आजवर अप्रसिद्ध अशी पंतांची कविता अद्याप बरीच आहे. ती लवकर छापावयाची सोय होईलच, परंतु प्रस्तुत पुस्तकांतही मुळांतून **अप्रसिद्ध काव्यांतले कांहीं उतारे** घेतले आहेत. आर्याकेकावलीच्या ६१ च आर्या आजवर छापल्या आहेत, पण पंतगृहीं मूळ प्रतींत त्या १७४ आर्या आहेत. श्लोककेकावलीच्या तोलाचें, पण अधिक सोपें व मनोहर, असें हें लहानसें स्तोत्र आहे. आशंसाष्टक, स्मरणी, आरती, पदें, अभंग, निंदक, रामाच्या बाललीला, अयोध्येचा विलाप व चक्रीरामायणांतले कांहीं श्लोक **हीं प्रकरणें अगदीं प्रथमच प्रसिद्ध होत आहेत.**

( २ ) या पुस्तकांत बहुतेक टीपा मींच दिल्या आहेत; तथापि कोठें कोठें ' पंतांची टीप ' दिली आहे. **संशयरत्नमाला या चटकदार काव्यावरच्या सर्व टीपा खुद्द पंतांच्या हातच्या आहेत.**

( ३ ) पंतांच्या लेखनपद्धतीची वाचकांस माहिती व्हावी म्हणून **मूळ हस्तलिखित प्रतींशीं ताडून पाहून कांहीं प्रकरणें लिहिलीं आहेत.**

( ४ ) **पंतांची बरीचशी कविता आर्येतरवृत्तांतही** आहे हें या पुस्तकांतल्या अनेक उताऱ्यांवरून व मुख्यतः चक्रीरामायणावरून लक्षांत येईल.

( ५ ) या पुस्तकांतल्या कांहीं उताऱ्यांतले श्लोक एकाच प्रकरणांतले आहेत असें नाहींत. उपरिनिर्दिष्ट विषयावर पंतांच्या काव्यांत जेथें जेथें ज्या ज्या आर्या किंवा श्लोक सांपडले ते ते विषयपूर्तीसाठीं एकत्र केले आहेत. जसें, निंदक या प्रकरणांतलीं ९।१० पद्यें आर्या पांच काव्यांतलीं आहेत ! रामराज्य, सामान्यनीति, आर्यावृत्त, वगैरे दहापंधरा प्रकरणें अशाच प्रकारचीं आहेत. वेंचे काढण्यांत, प्रस्तावनेंत किंवा टीपा देण्यांत कोठें प्रमाद झाले असतील तर शुद्ध करून वाचावें. या दिशेचा हा मराठी भाषेंत पहिलाच प्रयत्न आहे हें लक्षांत आणून वाचकांनीं क्षमा करावी अशी मी त्यांची सविनय प्रार्थना करितों, व पुनः एकवार पंतांच्याच शब्दांनीं त्यांना विनंति करितों कीं:—

पुरुषाचा धर्म भ्रम म्हणउनि कांहीं पडेल येथ उणें ।<br>
पूर्ण करावें शोधुनि भगवत्प्रीत्यर्थ सज्जनें निपुणें ॥ १ ॥

पुणें, शनिवार ५०३,<br>
नागपञ्चमी शके १८२७. } **लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.**

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

' मोरोपंती वेंचे ' ह्या पुस्तकाची पहिली आवृत्ति मीं इ. स. १९०५ मध्यें छापून प्रसिद्ध केली व १६ वर्षांनंतर रामकृपेनें आज दुसरी आवृत्ति काढण्याचा योग आला आहे. अलीकडे ५।६ वर्षें या पुस्तकाची प्रत शिल्लक नव्हती म्हणून व मराठी भाषेच्या अभ्यासाकडे लोकांचें लक्ष अधिकाधिक वेधलें जावें म्हणून ही द्वितीयावृत्ति काढीत आहें. ह्या आवृत्तींत पांच सात प्रकरणें ज्यास्त घातलीं असून टीपाही सुधारून वाढविल्या आहेत, व बहुतेक प्रकरणें पुन्हा मूळावरून तपासलीं आहेत. पुढील ' त्रोटक चरित्र ' या आवृत्तीला प्रथमतः जोडलें जात आहे.

मीं ' मोरोपंती वेंचे' १९०५ मध्यें प्रसिद्ध केले व ' मोरोपंतांचें चरित्र व काव्यविवेचन' हा ६२५ पृष्ठांचा मोठा ग्रंथ १९०८ मध्यें प्रसिद्ध केला. ह्या कार्यास प्रारंभ १९०० मध्यें केला म्हणजे दोन्ही कार्यांस मिळून आठ वर्षे लागलीं. पंतांचा मूळ हस्तलिखित कवितासंग्रह पंढरीस त्यांच्या वंशजांकडे असल्यामुळें पंतांची कविता मूळांत पाहण्याचा व त्यांच्या चरित्रांचीं साधनें जुळविण्याचा संकल्प करून मी १९०० च्या जूनपासून पांच वर्षें श्रीक्षेत्र पंढरपूर येथें राहिलों. तेथें पंतांची कविता मला मूळांत पहाण्यास मिळाली, व अनेक ठिकाणीं प्रवास करून मी पोथ्या व कागदपत्रें शोधलीं. मोरोपंतांविषयीं जसजशी माहिती लागत गेली तसतशीं केसरी पत्रांत मी पत्रें प्रसिद्ध करीत गेलों व इ. स. १९०० ते १९०४ पर्यंत केसरींत माझीं मोरोपंतांविषयीं सुमारें २५ पत्रें प्रसिद्ध झालीं. माझीं गांवोगांवचीं व्याख्यानें व केसरींतले लेख यामुळें महाराष्ट्राच्या पंतभक्तीला पुन्हा भरती आली व मोरोपंती वेंचे (१९०५) व चरित्र आणि काव्यविवेचन (१९०८) हे माझे ग्रंथ प्रसिद्ध झाले. मोरोपंतांची सर्व कविता मूळाबरहुकूम छापली जावी असें माझ्याप्रमाणें इतर पुष्कळांना वाटूं लागलें. पंतांच्या घरची मोरोपंतांची समग्र कविता व्यवस्थित रीतीनें

त्यांचेच घरीं एकत्र ठेवली जावी म्हणून केसरीच्या द्वारें मीं एक लहानसा फंड उभारून मुंबईहून सुंदर पितळी पत्र्याचें कपाट आणविलें, नवीन फळ्या तयार करून व नवीन १२ बासनें तयार करवून त्या बासनांत ती सर्व कविता व्यवस्थितपणें ठेवली व त्याबरोबर निबंधमाला, हंसकूल पंता-वरील निबंध व काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झालेले मोरोपंती ग्रंथही आणून ठेवले. लोकांची मूळकविता मिळण्याची लालसा व पंत कवितेची ही झालेली व्यवस्था यांची सफळता होण्याचाही योग लवकरच आला. पंतांचे वंशजापैकीं एक तरुण रामकृष्णपंत पराडकर हे १९०८ सालींच मज-कडे आले व मुमुक्षूचे मॅनेजर म्हणून दीड वर्ष माझे घरींच घरच्यासारखे मोकळ्या मनानें राहिले. त्यांच्या मनांत पंतकविता समग्र मूळाप्रमाणें छापण्याची कल्पना दृढ झाली व त्यांनीं मोठ्या चिकाटीनें ती कल्पना दृश्यांत आणून १९१२ पासून ‘ पंतांची समग्र कविता ’ छापण्यास प्रारंभ केला व आतांपर्यंत पाऊण कविता छापूनही निघाली आहे. असो. त्यांच्या खंडांचाही ही दुसरी आवृत्ति काढतांना शुद्ध पाठ तपासण्यांत मला थोडासा उपयोग झाला आहे.

‘ मोरोपंती वेंचे ’ हें पुस्तक हैद्राबादच्या उस्मानिया युनिव्हर्सिटीनें बी. ए. च्या अभ्यासक्रमांत नेमलें आहे, व महाराष्ट्रांतील राष्ट्रीय विद्या-लयांनींही त्याचा अंगिकार केला आहे.

पुणें, मुमुक्षु कचेरी,
अक्षय्य तृतीया शके १८४३ } लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.

———

# पंतांचें त्रोटक चरित्र.

१ विक्रमादित्याच्या दरबारीं कालिदासादि नवरत्नें होतीं असें ह्मणतात. आमच्या परमार्थप्रवण महाराष्ट्र शारदेच्या दरबारींही अशींच नवरत्नें आहेत. हीं सर्व आपल्या अंगच्या भक्तिज्ञानवैराग्यादि दिव्य गुणांनीं प्रकाशणारीं आहेत. अध्यात्मज्ञानामृताची व सगुणभक्तिप्रेमाची महाराष्ट्रावर अखंड वृष्टि करणाऱ्यांत ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास व तुकाराम हे अग्रगण्य होत. रामायणभारतभागवतांतील वीरकथा व भक्तकथा विविधवृत्तांत व सुललित भाषेत गाणाऱ्या कवींत मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत व श्रीधर हे प्रमुख होत. हे आठ व अर्वाचीन संतांचीं चरित्रें प्रेमळ वाणीनें गाणारे महिपति, हे नऊ कवि महाराष्ट्र शारदेचीं दिव्य नवरत्नें होत. हीं पद्यशाखा येथें पूर्ण झालेली आहे. गद्यशाखा नुक्ती वाढीस लागली असून तिच्या सुरवातीसच निबंधमालाकार विष्णुशास्त्री व रहस्यकार लो० टिळक हीं दोन रत्नें तिला लाभलीं आहेत. हिला अजून सात रत्नें लाभावयाचीं आहेत. ह्या दोन्ही माला पूर्ण तयार झाल्या म्हणजे महाराष्ट्र शारदेचें ऐश्वर्य पूर्णतेस पावेल ! अस्तु. पद्यशाखेचाच येथें विचार करूं. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी व अमृतानुभव, नाथांचें एकनाथी भागवत व अभंगादि स्फुट कविता, नामदेवतुकोबांचे अभंग, समर्थांचा दासबोध व मनोबोध, वामनांची यथार्थदीपिका व रसपूर्ण स्फुट प्रकरणें, मुक्तेश्वरी भारत, श्रीधराचे पांडवप्रताप, रामविजय व हरिविजय, व मोरोपंतांचे भारत, मंत्रभागवत, मंत्ररामायण, केकावल्यादि स्फुट प्रकरणें व महिपतींचीं संतचरित्रें यांत मराठी वाङ्मयाचा अर्क उतरला आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. रुचिभेदानें किंवा परंपरेमुळें तरतमभाव कोणांत उत्पन्न होईल तो भाग वेगळा. याशिवायही कित्येक लहान मोठीं प्रकरणें आहेत व अनेक संत व कवि झाले आहेत, पण वरील नवरत्नांच्या प्रकाशांत ते सर्व समाविष्ट झाले आहेत असें समजावें. मराठी भाषेचीं मूळ वृत्तें दोन—ओवी व

अभंग. दिंडी, साकी, लावणी व पोवाडे हे प्रकार मागून आले. संस्कृत भाषेंतलीं विविध वृत्तें मराठींत आणलीं मुख्यतः वामनमोरोपंतांनीं; या दृष्टीनें वामन हे मोरोपंतांना गुरुस्थानीं आहेत; पण एकंदरींत शिष्यानें गुरूवरही ताण केली आहे असें म्हणावेसें वाटतें व हें उभयतांनाही भूषणास्पद आहे. मराठी भाषेचा आद्य, सर्वमान्य व सर्वांगसुंदर ग्रंथ ज्ञानेश्वरी हा शके १२१२ त प्रकट झाला. यानंतर सुमारें २५० वर्षांनीं पैठणकर एकनाथ आले. त्यांचा भागवतग्रंथ शके १४९५ मध्यें लोकांना मिळाला. नाथ फार थोर धर्मकार्य करून शके १५२० मध्ये समाधिस्थ झाले व नंतर शके १५३० ते १६३० पर्यंतच्या शंभर वर्षांत मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास, वामन व श्रीधर हे बहुधा याच क्रमानें प्रगट झाले. याच काळांत विजयवीर्यशाली शिवछत्रपति व त्यांचे साह्यकारी वीरमंडळ यांनीं स्वराज्यस्थापनेचें पुण्यकार्य सिद्धीस नेलें. महाराष्ट्राच्या इतिहासांत हा शंभर वर्षांचा काळ अत्यंत ओजस्वी आहे. स्वदेशस्वधर्मस्वभाषादिकांच्या उत्कर्षाचा हा काळ होय. वामन आणि मोरोपंत यांच्यामधली सांखळी म० श्रीधर होय. वामनांचे ग्रंथ शके १५९५ च्या आंतबाहेर झालेले आहेत. श्रीधरांची ग्रन्थरचना बहुतेक शके १६२४ ते शके १६४० या काळांतली आहे. आपली बहुतेक ग्रन्थरचना १६ वर्षांत आटपून श्रीधर शके १६५१ मध्यें समाधिस्थ झाले व त्याच सालीं मोरोपंतांचा जन्म झाला! मोरोपंत व महिपति हे दोघेही पेशवाई काळांतले कवि. महिपति ( शके १६३७–१७१२ ) व मोरोपंत ( शके १६५१–१७१६). महिपतबावांचीं संतचरित्रें बहुतेक १६८४ ते १६९६ या काळांत झालेलीं आहेत. मोरोपंतांची काव्यरचनाही याच काळांतली असून आधीं आठ व पुढें सोळा मिळून २६ वर्षे एकसारखी होत होती. पानपतच्या लढाईपासून खर्ड्याच्या लढाईपर्यंतच्या काळांत पुण्यांतले व इतर प्रांतांतले महाराष्ट्रीय वीर व मुत्सद्दी राजकारणाच्या खणखणाटांत दंग झाले असतां, मोरोपंत बारामतीस ब्रह्मकमंडलू ऊर्फ कऱ्हा नदीच्या तीरीं बारामतकरांच्या आश्रयाला राहून श्रीरामसन्निध एकांतांत मराठी भाषेची एकनिष्ठ सेवा करण्यांत गुंग झाले होते! या काळांत त्यांनीं सुमारें पाऊणलाख

कविता निर्माण करून मराठी भाषेचें वैभव अपार वाढविलें. ही त्यांची कामगिरी चिरस्मरणीय आहे. मोरोपंतांची प्रकृति सात्त्विक व सौम्य असून ते आपल्या उपासनेंत व उपास्यप्रीत्यर्थ कविता रचण्यांत गढून गेले असल्यामुळें त्यांचें इतर उलाढालींकडे तादृश लक्ष नव्हतें. त्यांचा स्वभाव तसा चळवळ्या असता तर त्यांच्या हातून वाङ्मयाची जी एकचित्तानें एकनिष्ठ सेवा झाली आहे ती झालीच नसती ! असो. वरील विवेचनावरून मोरोपंत महाराष्ट्रशारदेच्या नवरत्नांपैकीं शेवटचें रत्न आहे हें आपणांस कळून आलें. इतर मराठी संतकवींचा त्यांच्या चरित्रावर, भाषेवर व विचारांवर अत्यंत परिणाम झालेला असल्यामुळें त्यांची पूर्वपीठिका दाखविण्यासाठीं हा विस्तार केला आहे. पंतांनीं या आपल्या पूर्वजांचें ऋण किती कृतज्ञतेनें फेडलें आहे हें त्यांनीं त्यांच्या स्तवनावर ज्या आर्या केल्या आहेत त्यावरून वाचकांचे लक्ष्यांत येईल ( पृ० ४४–५० ). पंतांच्या चरित्रावर व कवितेवर महाराष्ट्राच्या भागवतधर्मीय संतकवींचा जसा संस्कार झाला आहे तसाच संस्कृत कवींचाही झाला आहे.

२. पंतांचा जन्म पराडकरउपनामक कऱ्हाडे ब्राह्मणांच्या घराण्यांत झाला. त्यांचें गोत्र जामदग्न्य. रामाजीपंत ऊर्फ बापूजीपंत पराडकर यांस पुत्र तीन. सोनोपंत, मोरोपंत व आबाजीपंत; यांतले दुसरे मोरोपंत आपले चरित्रनायक होत.

लक्ष्मीरामात्मजनुषा स्वर्णदेवानुजन्मना ।
मयूरेश्वरपंतेन लिखितं द्रुतमादरात् ।।

असा श्लोक पंतलिखित एका संस्कृत पोथीच्या शेवटीं आहे. लक्ष्मीबाई हें पंतांच्या आईचें नांव, रामाजीपंत बापाचें नांव व स्वर्णदेव ह्म० सोनोपंत हे त्यांच्या वडील भावाचें नांव. पंत स्वरचित काव्यांत आपणास ‘ रामात्मज, रामनंदन, रामसुत ’ असें ह्मणतात, कोठें ‘ लक्ष्मीतनुज, लक्ष्मीकुक्षिभव ’ असें ह्मणतांत व कोठें ‘ लक्ष्मीरामतनुज ’ असेंही ह्मणतात. एके ठिकाणीं ‘ रामात्मलब्धसज्जन्म ’ असें विशेषण त्यांनीं स्वतःस लावलें आहे त्यावरून व १२ व्या केकेंतील ‘ पटुत्व, सकलेंद्रियीं, मनुजता, सुवंशीं जनी ’ या उद्गारांवरून आपल्या सत्कुलजत्वाचा त्यांना

अभिमान वाटत होता असें दिसतें. पंतांचा जन्म कोल्हापुरकरांची त्या वेळची राजधानी जो पन्हाळगड किल्ला येथें झाला व आपल्या वयाचीं पहिलीं २४ वर्षें त्यांनीं तेथेंच काढिलीं. पन्हाळगडचें हवापाणी आरोग्यकारक आहे. वरचा देखावा अत्यंत रमणीय आहे. वर कडे तुटलेले मोठाले खडक व खडकांत कोरलेल्या गुहा व लेणीं आहेत. गडावर पराशरमुनींची गुहा असल्यामुळें याला पराशर क्षेत्र ह्मणतात, किंवा पन्नगालय ऊर्फ पन्हाळा ह्मणतात. तेथें सर्पविषाची बाधा होत नाहीं असा लोकप्रवाद आहे. वर कगडी तलाव, विहिरी व जुन्या इमारती बऱ्याच आहेत. गडावर पाऊस व थंडी पुष्कळ असते. अशा निसर्गरमणीय स्थळीं विद्वान्, शुचिर्भूत व कर्मनिष्ठ गुरूंपाशीं पंतांचें संस्कृत अध्ययन झालें व पराशरसुत जे व्यास त्यांच्या कृपेनें त्यांच्या प्रतिभेचा उदय झाला.

३ उपाध्याय उर्फ पाध्ये यांच्या विद्वान् घराण्यापैकीं गणेश पाध्ये व केशव पाध्ये हे बंधु गडावर रहात व यांच्याचपाशीं पंत संस्कृतविद्या शिकले. हे उभयबंधु धर्मशास्त्र, काव्य, मीमांसा, न्यायशास्त्र व वेदांत यांत निष्णात होते व शेंकडो विद्यार्थी त्यांजपाशीं राहून विद्या शिकून गेले! पण या पाध्यांचीं नांवें आज जीं मिरवतात तीं तिहीं लोकीं सत्कीर्तीचा झेंडा फडकवणारा मोरोपंतासारखा एक सच्छिष्य त्यांनीं तयार केला त्यामुळेंच होत. मोरोबा बारावर्षांचा झाला असतांना एके दिवशीं पाध्यांकडे द्वादशीचा ब्राह्मण ह्मणून जेवायला गेला होता. पानें वाढायला अवकाश आहे हें पाहून मनाशीं श्लोक गुणगुणायची संवय असलेल्या मोरोबानें एक श्लोक रचून भिंतीवर लिहिला! तो केशव पाध्ये यांच्या नजरेस पडला. तेव्हां त्यांनीं बापापासून मोरोबाला विद्याभ्यासार्थ मागून घेतलें! असला सुबुद्ध व तरतरीत विद्यार्थी कोणत्या गुरूला आवडणार नाहीं! श्रमसातत्य, विनयमधुरस्वभाव, मितभाषण, आज्ञाधारकत्व व ज्ञानाचा जिव्हाळा या गुणांमुळें मोरोबा लवकरच उभय गुरूंना प्रिय झाला. त्याला केशव पाध्ये यांनीं रघुकिरातादि पंचमहाकाव्यें पढविलीं, व पुढें साहित्यशास्त्र, छंदशास्त्र ते गणेश पाध्ये यांजजवळ शिकले. पंत २४ वे वर्षीं पन्हाळगड सोडून बारामतीस गेले व तेथेंच बारामतकरां-

पाशीं पुराणिक या नात्यानें 'तनुनिर्वाहापुरता संग' धरून आजन्म राहिले. ते प्रथम मधूनमधून गुरुभेटीसाठीं गडावर येत. गुरु होते तोंवर ही त्यांची 'ये जा' चालू होती. केशव पाध्ये यांच्या हातची एक पोथी मीं गडावर पाहिली त्यावरून पंतांना रामोपासनेची गोडी त्यांजपासूनच लागली असें मला वाटलें. त्यांच्या अक्षराचें वळणही पंतांना लागल्याचें दिसून आलें. पंतांचे गुरु अत्यंत श्रद्धावंत, निस्पृह व न्यायनिष्ठुर होते, तोच कित्ता पंतांनीं गिरविला. गडावर पराशरांची चिंचोळी गुहा आहे, त्या गुहेंत अल्पकाळ बसतांना पंत या निवांतस्थळीं अनेकवार अध्ययनार्थ बसले असतील असें माझ्या मनांत आलें! पंतांच्या हातचे जे संस्कृत ग्रंथ पंढरीस आहेत त्यांची शकवार यादी मीं थोरल्या चरित्रग्रंथांत दिली आहे:—रघुवंश ( शके १६७२ ), नैषध, अनर्घ्यराघव व मुरारि नाटक ( १६७४ ), विष्णुभक्तिकल्पलता ( १६७६ ) वाणीभूषण ( १६७८ ), प्रबोधचंद्रोदय ( १६८० ), रसमंजरी, रसतरंगिणी, राघवपांडवीय, व पंचदशी ( १६८२ ), षट्पदीटीका आणि कुवलयानंद ( १६८३ ), विक्रमोर्वशीय ( १६८७ ), काव्यप्रकाश व पार्वतीपरिणय ( १६८९ ), मालविकाग्निमित्र ( १७०० ), अपरोक्षानुभूति ( १७०३ ). याशिवाय पंतांनीं स्वहस्तानें पुढील ग्रंथ लिहिले आहेत, मात्र त्यांवर शक नाहीं:—रामकृष्णकाव्य, हनूमन्नाटक, मत्स्यनीति, विश्वप्रकाश कोश, नागानंदशाकुंतल इ० नाटकें, बृहदारण्यक भाष्य, पातंजल योगशास्त्रवृत्ति, विवेकसिंधुभाष्य, चंपूभारत, सप्तशतीदीपन, अश्वधाटी, नरहरिकृत मराठी समश्लोकी इ० इ०. याशिवाय ज्ञानेश्वरी, भामिनीविलास, भट्टीकाव्य, कुमारसंभव इ० ग्रंथ त्यांनीं दुसऱ्याकडून लिहवून घेतले आहेत. हे जे ग्रंथ सांगितले यांशिवाय त्यांनीं आणखी किती तरी ग्रंथ पाहिले व संग्रहिलेही असतील. रामायण, भारत, व भागवत यांवर त्यांनीं जी कविता स्वतः रचली आहे ती पाहतां मूळ ग्रंथ व त्यांवरील टीका यांचा पंतांनीं चांगलाच अभ्यास केला होता हें कोणासही कबूल करावें लागेल. ज्ञानेश्वरांपासून तों समकालीन महिपतीपर्यंत जे मराठी संत व कवि झाले त्यांची कविता व चरित्रें पंतांना पूर्ण अव-

गत होतींच. स्वलिखित ग्रंथांचे शेवटीं त्यांनीं कोठेंकोठें जे श्लोक स्वतः रचून लिहिले आहेत त्यांपैकीं दोनच सुंदर श्लोक देतों. रसमंजरीचे अखेरीसः—

श्रीमद्रामसुतो गणेशचरणांभोजद्विरेफायितो
लक्ष्मीकुक्षिभवोऽतिसत्कविसखःप्राज्ञो मयूरेश्वरः ।
स प्रीत्या व्यलिखद्रसज्ञजनताकर्णावतंसायिता—
मत्यच्छां रसमंजरीं निजमुदेऽब्दे विक्रमे माधवे ॥

कुवलयानंदाच्या अखेरीसः—

मयूरेश्वरपंतेन ग्रंथसंग्रहकारिणा ।
स्वयं कुवलयानंदो लिखितोऽखिलतोषकृत ॥

यांत पंतांनीं स्वतःस ' सत्कविसख, प्राज्ञ, ग्रंथसंग्रहकारी ' हीं जीं विशेषणें लाविलीं आहेत तीं विशेष चिंत्य आहेत. पंतांना ग्रंथांचें जबर वेड होतें. त्यांच्या पत्रव्यवहारावरूनही दिसतें कीं आपल्या लांबलांबच्या मित्रांकडून ग्रंथ आणविण्याचा, ते परत पोंचविण्याचा व रसिकांकडे स्वतःचीं नवनवीं काव्यें पाठविण्याचा धूम धडाका जन्मभर चालला होता !

४ पंत याप्रमाणें यावज्जीव आदर्श विद्यार्थी होते. विद्या संपादून पंतानीं आपल्या आयुष्याचें ध्येय कोणतें ठरविलें होतें ? त्यांनीं आपल्या वयाच्या २९ वे वर्षी श० ( १६८० ) ' प्रल्हादविजय ' म्हणून एक ग्रंथ रचला आहे त्यांत ते वरील प्रश्नास उत्तर देतातः—

हरिपादयुगस्मरणप्रवणें । भगवज्जनदिव्यकथाश्रवणें ।
चतुरें रसिकें समय क्रमणें । सुख अन्य नसेचि भवभ्रमणें ॥

हरिचरणस्मरण व संतकथाश्रवणगायन यांतच चतुर रसिकानें आपलें आयुष्य वेंचावें, हें ध्येय पंतांनीं आजन्म संभाळलें. उदात्त ध्येय पुढें ठेवून तत्सिद्ध्यर्थ तनमनधनानें जन्मभर झिजणें ही गोष्ट सामान्य नाहीं.

हरिध्यानासक्त प्रकृतिविषयप्राप्तविकृती
कृती लक्ष्मीरामात्मजभव मयूरेश सुकृती ।

अशा आत्मविश्वासानें पंतांनीं काव्यरचनेस हात घातला. आचार, उच्चार व विचार हीं शिक्षणाचीं तीन प्रधान अंगें होत. पंत या तीनहीं अंगांनीं पूर्ण होते. संस्कृत काव्यनाटकादि ललितवाङ्मय, रामायण,

भारतभागवतादि उच्च प्रतीचें धर्मवाङ्मय व महाराष्ट्रीय संतकवींचें ज्ञानभक्तिप्रधान वाङ्मय या तीनही प्रकारचें वाङ्मय त्यांनीं आपलेंसें केलें व त्यांचा सामुदायिक संस्कार त्यांच्या मनावर झाल्यामुळें त्यांची कविता विद्वान्, रसिक व भाविक या तीनही प्रकारच्या लोकांना आवडावी असा तिचा परिपाक उत्कृष्ट उतरला आहे. यांतच त्यांच्या चरित्राचें व कवितेचें रहस्य सांठवलें आहे.

५ पंतांचे यजमान बाबूजी नाईक बारामतीकर हे पेशव्यांचे आप्त व प्रतिस्पर्धी होते. (पृ० १८८।९ टीप पहा.) पंतांचा स्वभाव उलाढाली नसल्यामुळें समोर घडणाऱ्या राजकीय चळवळी त्यांच्या कुशाग्र बुद्धीला कळत नव्हत्या असें नाहीं, पण आपल्या आयुष्याचें ध्येय मुक्रर केल्यावर त्याच्या चकाशी बाहेर न जाण्याचा बाणा त्यांनीं जन्मभर पाळला. पंतांचे वडील रामाजीपंत हे जरा रागीट होते. त्यांनीं पन्हाळगडीं एका नौकरास कडक शिक्षा केल्यामुळें त्यांना तेथून निघावें लागलें, तों ते बारामतीस आले व नाइकांनीं त्यांस कोठवळ्याच्या कामावर नेमलें. त्यामुळें मोरोबांचेंही गुरुगृह सुटलें. कांहीं दिवस तेही बाबूजी नाइकांच्या पंक्तीला जेवत होते, पण आपल्या बुद्धीची प्रभा यजमानास दाखवून त्यांचें लक्ष वेधण्याची त्यांनीं एक युक्ति योजिली ! नाइकांच्या घरच्या मुलीसुना झोपाळ्यावर बसून गाणीं ह्मणत. मोरोबांनीं सीतागीत, रुक्मिणीगीत व सावित्रीगीत हीं तीन गीतें तयार करून त्यांना पाठ करण्यास दिलीं व मुलींना हीं गीतें पाठ झालीं. एकदा बाबूजी नाइकांच्या कानांवर सहज त्यांतील कांहीं चरण पडले. ते त्यांना फार आवडले. त्यांनीं मुलींकडून तीं तीनही गीतें ह्मणून घेतलीं व चौकशी केली तेव्हां कळलें कीं हीं सुंदर गीतें रचणारा कवि आपल्याच घरांत असून आपल्या रामाजीपंत कोठवळ्याचा मुलगा मोरोबा हाच तो कवि होय ! त्यांनीं रात्रीं मोरोबाला आपल्या जवळच्या पाटावर भोजनप्रसंगीं बोलावलें, पण मोरोबा आपला तळचा नंबर सोडून उठेनात ! शेवटीं यजमानांच्या खालच्या पाटावर रामाजीपंतांला बसविलें तेव्हांच मोरोबा त्याच्या खालच्या पाटावर बसले. गुरुजनांचा अतिक्रम न व्हावा ह्मणून कोण ही दक्षता ! असो. बाबाजी नाई-

कांनीं ५०० रुपये सालीना देवून मोरोबास चतुर्मास पुराण सांगण्यास ठेवलें. मोरोबांस पुढें दुसरे बाजीराव पेशवे पुण्यास आश्रयार्थ बोलावीत असतां ते पुण्यास गेले नाहींत, इतकेंच काय पण सती अहल्याबाई महेश्वरी इतमामानें ठेवून घेत असतांही त्यांनीं तें पत्करलें नाहीं ! मोरोपंत असे निर्लोभ, निःस्वार्थ होते.

६ मोरोपंतांचें स्वकीयांशीं, आप्तेष्टांशीं, मित्रांशीं व वहात्यांशीं वागणें अत्यंत प्रेमळपणाचें होतें. या पुस्तकाचें शेवटचें प्रकरण अवश्य पहावें. आपले गुरु, इष्टमित्र, यजमान व त्यांच्या घरची मंडळी, भाऊभावजय, भार्यामुलें, बारामतींतले मित्र, बारामतींत त्यांजवर प्रेम करणारे शिंपी, तेली, न्हावी, परीट, महार, पालखी वाहणारे इ० सर्व लोक यांविषयीं त्यांचें अंतःकरण अत्यंत स्नेहार्द्र होतें. पंतांचे मित्रही सज्जन व भगवद्भक्त असेच होते. पंढरपूरचे धर्मसिंधुकार बाबापाध्ये हे पंतांचे मित्र होते व पुढें व्याही झाले. बाबांची मुलगी पंतांच्या थोरल्या मुलास दिली होती. त्याशिवाय विठोबादादा चातुर्मासे, त्यांचे पुत्र हरिदास मैराळ, विठोबादादा ताहराबादकर म्ह० महिपतींचे पुत्र, कोल्हापुरचे दाजीबा पुजारी, पंढरीचे रामचंद्र बडवे, बाळंभट काजळे व पूर्ववयीं रंगेल असून पंतांच्या आर्यासंगतीनें निवळलेले प्रसिद्ध कवि रामजोशी हे सर्व पंतांचे मित्र होत. ‘ प्रेमें सिंचित होते या कवना ते सखे जसे वेला ’ या प्रकारचे त्याचें प्रोत्साहक मित्र होते. ‘ मी जरि अशक्त निर्धन कोपी, तरि बहु भली रमा भार्या ’ याप्रमाणें त्यांनीं आपल्या साध्वी स्त्रीचाही सप्रेम उल्लेख केला आहे. तात्पर्य पंतांचा प्रेमळपणा एकांतांत रामापाशीं प्रगट होत असे व त्यांच्या काव्यांत प्रतिबिंबित झाला आहे तसाच तो सर्वांशीं वागण्यांतही प्रगट झाला आहे ! अन्वयाचें वागणें मुरलेल्या सत्पुरुषांशिवाय दुसऱ्या कोणासही साधणें नाहीं. पंतांचें घर मुलांमुलींनीं गजबजलेलें असे व गृहस्थाश्रमाचें सुख त्यांना श्रीरामानें चांगलेंच दिलें होतें. असो. सारा जन्म प्रेमळपणांत व रामभक्तीच्या सुखभोगांत घालवून हे पुण्यशील सत्कवि शके १७१६ च्या चैत्री पौर्णिमेला रामरूप झाले. भाविक हिंदु गृहस्थाची अंत्यसमयीं काय भावना असते ती पृ० ३६ वर पहावी.

---

# अनुक्रमणिका.

## १ ईश्वरविषयक कविता.


| | पृष्ठ. |
|---|---|
| १ आर्याकेकावली | १ |
| २ श्रीविठ्ठलस्तोत्र | ५ |
| ३ आशंसाष्टक | ६ |
| ४ साधुसंतांची महती | ७ |
| ५ महाजनप्रार्थना | ११ |
| ६ पंढरीमाहात्म्य | १३ |
| ७ गंगेची प्रार्थना | १५ |
| ८ रामस्तव... | १७ |
| ९ वाङ्मनःप्रार्थना | १८ |
| १० सद्गुरूची महती | १९ |
| ११ गुरुशिष्यसंवाद | २१ |
| १२ नाममाहात्म्य | २२ |
| १३ संशयरत्नमाला | २५ |
| १४ सन्मनोरथराजि | २८ |
| १५ श्लोककेकावली | ३१ |
| १६ शेवटची प्रार्थना | ३६ |
| १७ आरती, अभंग, पदें | ३६ |


## २ कविता आणि कवि.


| | |
|---|---|
| कविता व कवितारसज्ञ | ४१ |
| १ संस्कृत कवि | ४२ |
| २ मराठी कवि | ४४ |

३ हिंदुस्थानी कवि ... ... ... ... ५०
४ भगवद्गीता व तिचे टीकाकार ... ... ... ५१
५ आर्यावृत्त ... ... ... ... ५२
६ मोरोपंतांचे आपल्या काव्यांविषयीं विचार ... ... ५३

---

## ३ उपदेशपर कविता.

१ तरुण राजपुत्रास बोध ... ... ... ... ५८
२ स्त्रीधर्म ... ... ... ... ... ६०
३ प्रल्हादाचा असुरपुत्रांस उपदेश ... ... ... ६०
४ वधूवरांस बोध ... ... ... ... ६१
५ गांधारीचा दुर्योधनास बोध ... ... ... ६२
६ निंदक ... ... ... ... ... ६३
७वीरमातेचा वीरपुत्रांस निरोप ... ... ... ६५
८ शाहणा राजा ... ... ... ... ६८
९ श्रीकृष्णाचा उद्धवास वेदांतोपदेश ... ... ... ६८
१० पिता माता व देव ... ... ... ... ७२
११ अंगदशिष्टाई ... ... ... ... ७३
१२ पतिवशीकरण ... ... ... ... ७५
१३ सामान्यनीति ... ... ... ... ७६

---

## ४ वर्णनपर कविता.

१ अंबरीष राजा ... ... ... ... ८०
२ अर्जुनाचा पुत्रशोक ... ... ... ... ८१
३ श्रीकृष्णाचा गुरुगृहवास ... ... ... ८३
४ सावित्रीची दिनचर्या ... ... ... ... ८५
५ कुंभकर्णी झोंप ... ... ... ... ८५
६ काळ ... ... ... ... ... ८६

७ द्रौपदी ... ... ... ... ... ८७
८ रामास वनांत धाडल्यामुळे भरत आईवर रागावतो ... ८७
९ रामराज्याचें वर्णन ... ... ... ... ८८
१० कुशलवांचें लक्ष्मणाशीं युद्ध ... ... ... ८९
११ रामेश्वराचा सेतु ... ... ... ... ९०
१२ भीम आणि दुःशासन... ... ... ... ९१
१३ गायींची वत्सलता ... ... ... ... ९३
१४ श्रीकृष्ण, गोपी आणि मुरली ... ... ... ९४
१५ रामाच्या बाललीला ... ... ... ... ९६
१६ मद्यपी आणि भगवद्भक्त ... ... ... ९७
१७ राम वनवासास निघाले तेव्हांचा अयोध्येंतला विलाप ... ९८
१८ भाषादेवीच्या राज्यांतला अद्भुत चमत्कार ... ... १०१
१९ रंगभूमि ... ... ... ... ... १०३
२० रावण व रामवानर यांचें युद्ध ... ... ... १०३
२१ भारती युद्धानंतरचा रणभूमीवरचा शोकप्रद देखावा ... १०४
२२ रामाचा सीतेसाठीं शोक ... ... ... ११०
२३ मातृभक्त कुश ... ... ... ... ११२
२४ राजाचें प्रजेवरील प्रेम ... ... ... ... ११२
२५ मारुतीची योग्यता ... ... ... ... ११३

---

## ५ कथानकपर कविता.

१ सुभद्राहरण ... ... ... ... ११४
२ रुक्मिणीचें स्वविवाहवृत्तकथन ... ... ... ११६
३ कोल्ह्याचें शहाणपण ... ... ... ... १२०
४ हंस व काक यांची स्पर्धा ... ... ... १२१
५ ब्रह्मदत्त राजा व चिमणी यांची गोष्ट ... ... १२५
६ आस्तीक जन्म ... ... ... ... १२७
७ बळीचें औदार्य ... ... ... ... १२९

८ उषा व अनिरुद्ध ... ... ... ... १३४
९ एका कुटुंबावरची पाळी ... ... ... १३७
१० परांगनाधर्षणाचा परिणाम ... ... ... १४०

---

## ६ चक्रीरामायण.

## ७ विविधविषयपर कविता.

१ द्रौपदीचें सत्व ... ... ... ... १६४
२ श्रीकृष्णाचा रुक्मिणीशीं विनोद ... ... ... १६७
३ लक्ष्मीचें स्वयंवर किंवा पतिशोध... ... ... १६८
४ कुलीन सासरा ( सुनेचें गौरव )... ... ... १७०
५ सीतात्याग ... ... ... ... १७१
६ सूड कां क्षमा ... ... ... ... १७२
७ कर्णाचा थोरपणा ... ... ... ... १७५
८ राजकन्या व गुरुकन्या यांचें भांडण ... ... १७७
९ भीष्माचा निर्वाणसमय ... ... ... १७९
१० कांहीं निवडक आर्या ... ... ... १८१
११ सुंदर लोकोक्ति ... ... ... १८५
१२ पंतांचे आप्त, इष्ट, व समकालीन राजकीय पुरुष ... १८६

---

## विनंति.

छपाईच्या चुका कोठें कोठें आढळतील त्या रसिकांनीं कथासंदर्भ लक्ष्यांत घेऊन दुरुस्त कराव्या अशी विनंति करणें भाग झालें आहे! प्रस्तावना पृ० २३ पहा '७ काव्याचे विवर्णनीय विषय' असें झालें आहे तेथें 'वर्णनीय' समजावें. पृ० ४ आर्या ३६ 'स्वामा' बद्दल 'स्वामी'; पृ० ५ आर्या ४७ 'राववा' बद्दल 'राघवा' व आर्या ५२ 'यावेगळ' बद्दल 'यावेगळे'; पृ० ६ श्लोक ८ 'षहा' बद्दल 'पहा;' पृ० १२ आर्या १० 'प्रसुपुत्रातें' पाहिजे, आर्या २१ 'हे कीर्ति' पाहिजे; पृ० १४ आर्या ८ 'गेली' आर्या ११ 'उद्धरायाचें', इ० इ० पहिल्या व पांचव्या प्रकरणांतील आंकडे दुरुस्त करावे.

# ईश्वरविषयक कविता.

## १. आर्या–केकावली.

श्रीरामा ! तू स्वामी असती माज्या शिरावरी जागा ।
आह्मांसि तुज्या पायांवांचुनि निर्भय नसे दुजा जागा ॥ १ ॥
बहु जन्म विसरलों तुज परि तूं आह्मांसि विसरला नससी ।
अंतर्बाह्य, कृपाळा ! सर्वां जीवांसि वेष्टुनी असती ॥ २ ॥
कल्पद्रुम तूं रामा ! ज्याची जासि भावना, तसा फळसी ।
भोगिति दुःखें जीव स्वगुणें तू निर्दयत्व नातळसी ॥ ३ ॥
आतां प्रभो ! दयाळा ! मज दीनावरि करूनियां करुणा, ।
स्वपदाब्जीं मन्मानसभृंग रमो; उगवुं दे कृपाअरुणा ॥ ४ ॥
अपराध फार केले परि आतां हात जोडिले स्वामी ! ।
करुनि दया तारावें आवडि वाढो सदा तुज्या नामीं ॥ ५ ॥
सेवक तुजा म्हणवितों श्रीरामा ! राघवा ! सख्या ! म्हणतों ।
होसी उदास तरि हो, होत नसें मी उदास आपण तों ॥ ६ ॥
'संसारसागरीं तूं तारक' ऐसेंचि संत वदतात ।
वदतां तदीय नामें देतो दासास तो स्वपद तात ॥ ७ ॥
ऐसें औदार्य तुजें प्रभुत्व करुणाकरत्व ऐकोनी ।
आलों शरण स्वामी ! जोडुनियां हस्त मस्तकीं दोनी ॥ ८ ॥
पायें मज दीनाला रामा ! लोटूं नकोंचि बा दूर ।
उद्धरिले बहु पापी, याविषयीं तूं रघूत्तमा ! शूर ॥ ९ ॥
केवळ भजनाचिकडे जरि ठेविसि दृष्टि तरि नसे थारा ।
आपलिया थोरपणावरि ठेवुनि दृष्टि दीन हा तारा ॥ १० ॥
धांव समर्था ! सदया ! भवपंकामाजि बुडतसे गाय ।

---

१ या ठिकाणीं संधि करणें अवश्य असून मूळांत कवीनें तो केला नाहीं.

निकट[1]स्था ! धर्मज्ञा ! कौतुक अद्यापि पाहसी काय ॥ ११ ॥
करुणाघन तूं माथां, जाळितसे मज मृगास भववणवा ।
वृष्टि न करितां होतों उदास हें योग्य तूज न सकणवा[2] ॥ १२ ॥
संकट वारुनि रामा ! निजगुणकीर्तन करावया योजीं ।
आपलिया थोरपणें रामा ! मजला स्वकिंकरीं मोजीं ॥ १३ ॥
तूं जरि न पावसी तरि पाचारूं संकटांत मी कवणा ।
श्रवणारूढ करुनि हे विनती, रक्षीं मला पद[3]प्रवणा ॥ १४ ॥
सीतापते, रघुपते, विश्वपते, भूपते, वदा[4]न्यपते, ।
इंद्रादिकीर्ति, तुझिया किर्तिपुढें तुच्छ, सर्वदा लपते ॥ १५ ॥
त्वद्भक्त शुद्धकर्मा बिभीषण प्राज्ञ रावणें छळिला ।
येतां शरण तुला त्वां हृदयीं स्वभुजीं धरूनि आवळिला ॥ १६ ॥
चरणविलोकनतत्पर वानर आप्तांत राघवा ! गणिले ।
साधुद्वेषी जे जे कुळ त्यांचें त्वां समूलही खणिलें ॥ १७ ॥
तूं बाप माय बंधू धणी सुहृन्मित्र जानकीज्या[5]ने ! ।
करुनि दया विलयाला अतिसत्वर संकटास माज्या ने ॥ १८ ॥
श्रीरामा ! सुखधामा ! पावननामा ! स्वभक्तविश्रामा ! ।
कामा[6]रिगीतकीर्ते ! करुणामूर्ते ! नको त्यजूं आह्मां ॥ १९ ॥
रामा ! धांव, रघुपते ! धांव, विभो ! धांव, राघवा ! धांव; ।
कौतुक काय पहासी ? आळवितां यापरी तुझें नांव ॥ २० ॥
नांव तुझें नावाचि या संसारांभोधिला तरायासी ।
तें हृदयीं धरुनीही मी कां अद्यापि सांग आयासी ? ॥ २१ ॥
दीनानें किति सद्गुणहीनानें विनविलें तुला आजी ? ।
बा जीवदान दे गा ! प्रभो ! उपेक्षा करूं नको माजी ॥ २२ ॥
हृद्गत तुजला कळतें हृदयस्था राघवा, जगज्जनका ! ।

---

१ 'ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति' या गीतावचनाप्रमाणें.' २ सदया. ३ पदलीना मला. ४ दात्यांत श्रेष्ठतम अशा. ५ जानकीजानि ह्म० जानकी आहे जाया ज्याची तो राम. 'जा' च्या ठिकाणीं मूळांत 'ज्या' ओहे. ६ शंकर ह्मीं ज्याचे गुण गातात अशा.

जन काय तत्त्व जाणे ? प्रभो उपेक्षा करूंचि आज नका ।।२३।।
सर्वां लाभांहुनि बहु लाभ असे त्वत्पदांबुरुहभजनीं ।
मज नीतिज्ञा ! भजतां संकट न पडों दिजेचि अशुभ जनीं ।।२४।।
एकांतीं त्वन्नामें गायिन मधुरस्वरें स्थिरस्वांतें[1] ।
संकट वारुनि द्यावें हें मज वरदान जानकीकांतें ।। २५ ।।
या संकटाबरोबर वारीं लोकेषणादि[2] अनिवार्य !
म्हणजे हा दास तुजा जाला लोकत्रयांत कृतकार्य ।। २६ ।।
अन्नाच्छादन देतें दुसरें बा ! कोण सांग विश्वास ।
म्हणताति ‘ आयुरन्नं प्रयच्छति ’ प्राज्ञ तेथ विश्वास ।। २७ ।।
त्वद्गुणकीर्तन करितां लज्जा[3] हे पापिणी धरूं न गळा ।
हे ताटकांतका ! हा परमार्थ इणेंच बुडविला सगळा ।। २८ ।।
खळ हांसतील तेंही सोसाया सहनशीलता द्यावी ।
लावीन मस्तक तुज्या पदीं तुजी भक्ति आत्मविद्या[4] वी ।। २९ ।।
केले म्यां मनुजांचे आर्जव बहु चाटुकार[5]ही जालों ।
परि तेथ ताप पाउनि पुनरपि तुजलागिं शरण मी आलों ।।३०।।
त्वद्गुणकीर्तन करितां स्तंभादिक अष्ट भाव उपजावे ।
जावे अनात्मधर्म[6] क्रोधादि मनोविकार वरजावे[7] ।। ३१ ।।
हा काम रामराया ! पुरवावा कल्पवृक्ष तूं साचा ।
ज्ञाता, सर्वगत, प्रभु, आत्मा, प्रिय निर्निमित्त[8] दासाचा ।। ३२ ।।
मन हेंचि फार इच्छी कीं आतां सेवणें तुझे पाय ।
तुजवांचुनि इतरांच्या भजनीं मजलागिं होय फळ काय ।।३३।।
शरण तरी तुज यावें नमन करावें तुलाचि सुज्ञानें ।

---

१ स्थिरचित्तानें. २ मोठेपणाची आवड. पुत्रेषणा, लोकेषणा, वित्तेषणा अशा तीन मुख्य ईषणा ह्म. इच्छा सर्व प्राण्यांच्या मागें लागलेल्या आहेत. ३ लज्जा या राक्षसीला तूं ताटकेला मारलेंस तसें मार. ही परमार्थाला विघ्न करणारी आहे. तुकोबाही संतांना स्वचरित्र सांगतांना ‘लाज नाहीं मनीं येऊं दिली ’ असें सांगतात. ४ तुझी भक्ति आत्मज्ञान प्रसवते. जनाबाई, चोखामेळा वगैरेंना तुझ्या भक्तीनेंच आत्मज्ञान झालें. ५ तोंडपुजा. ६ आत्मा–चैतन्य, अनात्मा चैतन्यव्यतिरिक्त जी प्रकृति तिचे धर्म, देहेंद्रियांचे धर्म. ७ त्यागावे. ८ कारणावांचून.

गावे तुजेचि गुण वा सेवावें तुजचि मादृगज्ञानें ।। ३४ ।।
म्हणवुनि तुमचें नामचि 'राम' असें हें मुखीं सदा राहो ।
हा ज्ञानहीन दीन प्रसन्न होवूनि शीघ्र तारा हो ।। ३५ ।।
पाळक तूं विश्वाचा बाळकसा तोंड पसरितों बा ! मी ।
व्याळकराळकठिणतर काळ कसा वारिसी न हा स्वामी ! ।।३६।।
ज्ञाता तूं, दाता तूं, त्राता तूं, वीर धीर भर्ता तूं ।
जनपीडाहर्ता तूं, श्रीरामा मुख्य विश्वकर्ता तूं ।। ३७ ।।
स्तुति करुनि तुजी तुजला आम्हीं अज्ञान काय बा रिझवूं ? ।
गाउनि अमृतगुणांतें हृदयींचे ताप आपले विझवूं ।। ३८ ।।
परि भावें गुण गातां प्रसन्न होतोसि तूं असें ठावें ।
जालें सज्जनसंगें, प्रेम कसें तें मनांत सांठावें ।। ३९ ।।
संतांच्या वदनें मीं आयकिलीं बा तुजीं जयीं चरितें ।
त्यजुनि विषय मन केलें भरावया गुणसुधा तयींच रितें ।। ४० ।।
चापशरधरा ! धीरा ! आपद्ग्रस्तासि मज नको विसरूं ।
या परम संकटीं मीं बा ! पदर तुज्यापुढें किती पसरूं ।। ४१ ।।
विश्व तुज्या ठायीं, तूं नामीं, तें नाम साधुच्याचि मुखीं ।
तत्संग दे मला मग गुंतेना मीं कदापि तुच्छ सुखीं ।। ४२ ।।
संग धरुनि विषयांचा भंगाचि मन पावलें परी व विटे ।
साधुसमागम भेषज साधुनि देशील तरिच मोह फिटे ।। ४३ ।।
चित्त अनावर रामा ! वित्तस्त्रीपुत्रचिंतनींचि रते ।
मधुलिप्तक्षुरधारा चाटी, ते जीभ तत्क्षणीं चिरते ।। ४४ ।।
तनुनिर्वाहापुरता संग धरुनिहि अनर्थ मज घडला ।
सावध तरी निसरड्या मार्गीं, विचकूनी दांत मुख पडला ।।४५।।
मन हें घातक, वेडें, विषयव्याळासवें करी क्रीडा ।
पीडाहि पावतें परि सावध नोहे, न तें धरी व्रीडा ।। ४६ ।।
या कोडग्या मनाला विषयांची काय वाटती गोडी ! ।

---

१ माझ्यासारख्या जड जीवानें. २ भयंकर सर्पापेक्षांही जास्त क्रूर असा. ३ औषध. ४ मधानें भरलेल्या शस्त्राची धार.

खोडी तुझ्या प्रतापावांचुनियां राघवा ! न हें सोडी ॥ ४७ ॥
दे अभयदान देवा ! सेवारत मी तुझा विभो भाट ।
त्यजितां अनादरानें करीन लोकांत फार बोभाट ॥ ४८ ॥
आहे प्रसाद मजवरि, म्हणुनिच वदनासि येतसे नाम ।
हें जरि मुखा न येतें, होता कैंचा मनासि विश्राम ? ॥ ४९ ॥
हें सर्व सत्य तोंवरि जोंवरि तुज शरण पातलों नाहीं ।
आतां थोरपणासाचि आपुलिया मात्र राघवा ! पाहीं ॥ ५० ॥
तूं करुणाघन रामा ! भक्तमयूरासि तूंचि सुख देसी ।
संनिध असोनि बापा ! न करीं या किंकरासि परदेशी ॥ ५१ ॥
बहु गोड गुण तुझे ते ऐकावे आदरें, स्वयें गावे, ।
यावेगळ मनोरथ नसती, ते तूज काय सांगावे ! ॥ ५२ ॥
संत भगवंत साचे परि भगवंतापरीस हे थोर ।
हे आंगें अंधाची यष्टी होताति थोर बहु थोर ॥ ५३ ॥
ऐसे भगवत्तत्पर सदय हृदय संत पंत भेटावे ।
ते सच्छिक्षादाते मुमुक्षुबुद्धीसि होति नेटावे ॥ ५४ ॥
हे भरत ! सुमित्रात्मज ! हे सीते माय ! आयका विनती ।
सिकवा साधुजनाला, कैशी शरणागतें करावि नती ॥ ५५ ॥
श्रीरामचंद्र ! राघव ! रघुवीर ! असेंचि आळविन तुजला ।
संकट वारुनि घडवी माझ्या हातून या महाक्रतुला ॥ ५६ ॥
भक्तमयूर दयाघन तूं रामा ! भवदवार्तविश्रामा ! ।
साष्टांग नमन तुजला भुजलालितनिजजना गुणग्रामा ॥ ५७ ॥

---

## २. श्रीविठ्ठलस्तोत्र.

तुझें पादपद्मद्वयध्यान कांहीं । न केलें क्षणार्धार्धहीं येथ पाहीं ॥
कधींही नसें पावलों साधुसंगा । मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरंगा ! ॥१॥
करावी तुझी मोक्षदा शुद्ध भक्ति । गृह-स्त्री-धनींही असावी विरक्ति ॥

---

१ संत हे चांगली शिक्षा ( वळण ) लावणारे आहेत व म्हणून मुमुक्षूची बुद्धि परमार्थांत स्थिर करावयाला साह्य करितात, २ मोठ्या यज्ञाला, वाग्यज्ञ ( ? )

असें हें ठसी[1] सर्वदा अंतरंगा; । मला रक्ष रक्ष प्रभो! पांडुरंगा! ।। २ ।।
तुझें नाम निर्लज्ज होऊनि गावें, । प्रपंचांतुनी शीघ्र वाटे निवावें; ।।
करीती परंतु स्मरक्रोध दंगा । मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरगा ! ।। ३ ।।
न जाणोनि माहात्म्यही आननाशी । तुझें नाम येतां, महापाप नाशी ।।
स्वमार्गच्युताजामिलाघौघभंगा[2] ! मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरंगा ! ।। ४ ।।
गजेंद्रासि नक्रें धरीतां जळांत । तुला आठवितां स्वयें त्वां पळांत ।।
तया रक्षिलें सन्मनाच्या पलंगा[3] । मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरंगा ! ।।५।।
तुज्या वामनत्वीं[4] पदातें विधीनें । जयीं क्षाळिलें भक्तिपूजाविधीनें, ।।
जगद्दोषहंत्री[5] तधींहूनि गंगा । मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरंगा ! ।। ६ ।।
जरी लाविला तूजशीं नित्यदावा, । तयां तारिलें त्वां भवारण्यदावा ।
स्वभक्ताचिया खाजवीलें तुरंगा । मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरंगा ! ।।७।।
खगेंद्रध्वजा ! क्रूरकर्मा सदर्प । गिळीतो महाभीम संसारसर्प ! ।।
पहा लागल्या वेदना लक्ष अंगा ! मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरंगा ! ।।८।।

---

## ३ आशंसाष्टक[6].

तव पादरोरुहीं स्वचित्तभ्रमरातें रस चाखवूनि गोवूं ।
तुज भक्त तुजे सदैव गाती मृग आम्हीं गुणगीतसक्त होवूं ।। १ ।।
मज वाटतसे सभाग्य मोठें, भगवद्भक्त तयांत म्यां जुडावें ।
तदधीन तुज्या यशःसुधेचा ऱ्हद गंभीर तयामधें बुडावें ।। २ ।।
तुज वर्णिति संत संगमुक्त प्रकृति—प्रेमळ तद्गणीं शिरावें ।
तुझिया गुणसागरांत माजें मन हें सैंधव माधवा ! विरावें ।। ३ ।।
गमतें भगवज्जनप्रसंगें मज टाकूनि गृहादि लोभ जावें ।
करुणावरुणालया ! मुकुंदा ! तुजला सादर सर्वदा भजावें ।।४।।

---

१ ठसीव; मनांत बिंबीव. २ आत्मप्राप्तीच्या उपायापासून चुकलेला जो अजामीळ त्याचें पापभंग करणाऱ्या ! ३ साधूंच्या मनाच्या आधारा(विसाव्या)! ४ वामनावतारीं. ५ जगाचें पाप क्षालन करणारी. ६ या अष्टकांत कवीनें आपल्या आशंसा म्ह० इच्छा काय आहेत त्या सांगितल्या आहेत. हें प्रकरण आजवर कोठेंही छापलेलें नाहीं. हें पंतांच्या दसरीं पंतलिखित सांपडलें, तसेंच हुबेहूब वर दिलें आहे.

तुजला रघुनाथ, रामचंद्र, प्रभुजी ! यापरि नित्य आळवावें ।
मन चंचळ हें त्वदंघ्रिपद्मीं जडतां न क्षणमात्र चाळवावें ॥ ५ ॥
मन हें विषयीं उडीच घाली, धिष हें जाणुनि यावरी विटावें ।
तव कीर्ति उदार कामधेनू तिस मीं होउनि वासरूं चिटावें ॥६॥
तुज एक अनेक भूतभेदीं घटतोयार्क अशेपरी पहावें ।
भजकार्पितभुक्तपादराजतुलसीदाम शिरीं सदा वहावें ॥ ७ ॥
त्रिजगन्नयनप्रमोदहेतु त्वदुदारांघ्रिसरोज म्यां नमावें ।
मधुपत्व धरूनियां रमावें स्वसुखें त्या भुवनत्रयीं नमावें ॥ ८ ॥

---

## ४. साधुसंतांची महति.

### संतांची योग्यता.

#### अभंग.

संतांची शाश्वतधर्मीं चित्तवृत्ती । अधर्मीं प्रवृत्ती स्वप्नीं नसे ॥ १ ॥
संतांची संसारनदीनौका कथा । त्या संतांसी व्यथा कायसाची ? ॥ २ ॥
साधुसंत गंगायमुनांचे ओघ । हा संगम मोघ कधीं नाहीं ॥ ३ ॥
संतांपासुनीयां संतां भय झालें । असे कानां आलें नाहीं कधीं ॥ ४ ॥
संत चालवति सत्यें तरणीतें । तपें धरणीतें धरिताती ॥ ५ ॥
किंबहुना संत सर्वांचीही गती । संत मुक्तिपती संत ज्ञान ॥ ६ ॥
व्रत चालवीते एक संतराय । नामें अंतराय जाती दूर ॥ ७ ॥
प्रसाद शाश्वत, अर्थ बहुमान । यांचें मूळस्थान संत तुम्ही ॥८॥

—सावित्रीगीत.

---

### सत्संगमाहात्म्य.

सत्संगति करिताहे लीलालेशें करूनि जेंवि हित ।
न तसें माता जाणे संसारामाजि मात्र जें विहित ॥ १ ॥
सत्संगचि हित, इतरीं दिसतो प्रेमा, परंतु पातळ तो ।
जोंवरि कार्या येतो जन त्यातें तोंवरीच आतळतो ! ॥ २ ॥

सत्संग असें ह्मणतो कीं ' जें बालक करील आ म्यां तें ।
द्यावें अमृत–प्राशुनि जें न पुन्हां आदरील आंम्यातें ' ॥ ३ ॥
सत्संगतिप्रसादें बहु भगवद्भक्तिच्या भरीं भरले ।
सरले दोष; सकल जन न तरावे जे कधींहि ते तरले ॥ ४ ॥
जीं हरिहरप्रसादीं कल्याणें वसति साधुसंगीं तीं ।
अघ शमतें, सुख गमतें, मन रमतें, जेंवि दिव्य संगीतीं ॥ ५ ॥
सत्संगमींच नानादुःखार्त तथापि चित्त रंगतसे ।
जलनिधितरंग वातें सत्संगें उठति चित्तरंग तसे ॥ ६ ॥
स्पर्शमणि सुवर्ण करी दे स्पर्शमणित्व तो न लोहातें ।
हा साधुसंग करितो साधु असाधुसि हरूनि मोहातें ॥ ७ ॥
अघ तीर्थविशेष हरी तो साधूंचाचि होय बा चेला ।
ह्या चेला जळ जैसें करितो सत्संग शुद्ध वाचेला ॥ ८ ॥
जलद बलद सस्याला हरिभजना साधुसंग हा बळद ।
मुक्तिस मुमुक्षुस करें आपण सत्संग लावितो हळद ॥ ९ ॥
परमार्थव्यवहारीं करितो पटु साधुसंग हा पंत ।
अंत करुनि जाड्याचा येणें केलेचि सर्वही संत ॥ १० ॥
प्रभुसि जडोद्धृति, पसरुनि सत्संगति माउली करा, याची ।
हे स्वप्रसादपदरें तमावरि साउली करायाची ॥ ११ ॥

---

## साधूंचीं लक्षणें.

अनता अपवित्राही साधु हित जसा नता पवित्रास ।
साधु सुहृद् सर्वांचा, कोणासहि दे न ताप, वित्रास ॥ १२ ॥
खळ निंदी साधु रडे, पुसतां ' यास्तवचि मी ' ह्मणे ' रडलों ।
नरकीं पचेल निंदक, या दुःसह दुःखसागरीं पडलों ! ' ॥ १३ ॥
निःसीम छळ सोसी पोसी सत्वासि संकटीं धीट ।
साधु म्हणे, ' याचक हा जन्मोजन्मीं असो, नसो वीट ' ॥ १४ ॥
मातेचे पाय जसे छळ करित्याचे तसेचि जो पाहे ।

---

१ जैं मोक्षरूप अमृत प्राशन केलें असतां आईचें दूध पुन्हां प्यावें लागणार नाहीं.

साधु निवे, नच कोपे, न दुरुक्तक्षोभ मानसीं राहे ।। १५ ।।
वाडवि अन्यांगुणा साधु सदा वायु जेंवि फुणगीतें ।
सुयशानें जरि साजे लाजे परि फार आत्मगुणगीतें ।। १६ ।।
ज्यासह घडतें दैवें सहज पथीं चालणें पदें सात ।
त्या ' मित्र ' साधु म्हणती देतीच व्यसनसागरीं हात ।। १७ ।।
प्रणत जनाचें जाया सिद्धिप्रति सर्व योजिलें कार्य ।
साधु मरण पथकरिती[1] ऐसी सद्रीति वर्णिती आर्य ।। १८ ।।
साधु प्राणी पाहुनि संसारीं तापले असुख पावे ।
' व्हावें जग मुदित ' म्हणे ' तद्दुःखें आपुले असु खपावे ' ।।१९।।
निंदा शापहि घ्यावा परि ' हरिस भजा ' असेंचि सांगावें ।
हें सच्छील त्यागुनि कुशलें तीर्थादि अन्य कां गावें ? ।। २० ।।

---

## साधूंची प्रार्थना

व्हा सुप्रसन्नमानस मज दीनावरि वळाचि सज्जन हो ।
दीनोद्धारींच हृदय तुमचें, इतरीं कदापि सज्ज न हो ।। २१ ।।
हरितां दर्शनमात्रें सर्वांच्या पापतापदैन्यातें ।
भयद तुह्मी घडरीतें रामशर जसे पलाशसैन्यातें ।। २२ ।।
तारावें दीनांतें वारुनि उग्राहि अंतरायांतें ।
श्रीरामातें ठावें कीं एक तुम्हांचि संतरायांतें ।। २३ ।।
सर्वार्थपूरणव्रत तों चालविलें तुम्हींच संतांनीं ।
औदार्यसत्व चिंतामण्युपळीं[2] काय ? काय संतांनीं ? ।। २४ ।।
भगवंत भगवदनुगां आम्हां तों संत सदनुगां ठावे ।
बाळें प्रथम वयेंचे बापाचे चरण तदनु गांठावे ।। २५ ।।
आम्हां बाळांसि बळें स्वहित तुम्हीं संत पंत पढवीतां ।
आत्मपदीं कर धरुनी प्रेमें आग्रह करुनि चढवीतां ।। २६ ।।
सुटले सत्संगेंचि व्यसनापासूनि जीव, साधूंनीं ।

---

१ पत्करितात. २ कल्पवृक्षाच्या ठिकाणीं.

दिधलें रंकासहि निजपद धरितां, मुक्तिपदहि साधूनी ।। २७ ।।
देती फळ बहु दिवसां देव शिळाकाष्ठमृण्मय प्रणतां ।
जळमय तीर्थेंहि तसीं, संतचि फळती 'नमोस्तु ते' म्हणतां ।।२८।।
यष्टि जसी अंधाला, जीवाला साधु साधुगति हेतू ।
आश्रय इतर प्लव भवजलधींत, तुम्हींच संत दृढ सेतू ।। २९ ।।

---

## ४. स्मरणी.

श्रीविठ्ठला ! साधुवृंदांत दे वास हें मागतों बा तुला देवदेवास ।
यावें मुखाला सदाही तुजें नाम चित्तीं नसो पांडुरंगा दुजा काम।। १।।
श्रीज्ञानदेवा ! तुज्या सर्व ओवीस गातों, म्हणे तूंचि विश्वास होवीस[१] ।
जैसी कृति स्पष्ट तैसी तुजी उक्ति देती समस्ता जडालाहि हे मुक्ति।। २ ।।
बा नामदेवा ! तुजे साजिरे बोल वित्तेश संपत्ति यांचें नव्हे मोल ।
येतोचि हें ऐकतां विठ्ठला डोल सद्वृंद होतेंचि सेवावया लोल[४] ।। ३ ।।
बापा तुकोबा ! अभंगीं तुज्या भक्ति वैराग्य, अन्यत्र ऐसी नसे शक्ति ।
केली समस्तीं जनीं त्वां दया फार दावी मलाही भवांभोधिचा पार ।।४।।
बा एकनाथा ! दयाळूंत तूं थोर दीना जनांचाचि भारी तुला घोर ।
त्वां अंत्यजाचें कडे घेतलें पोर तारी जसे कोटि तैसाचि हा मोर ।। ५ ।।
दत्ता ! तुझी कीर्ति गाईन मी गोड सत्ता करी सत्य मत्ताप हा खोड ।
मत्तारि षड्वर्ग बा एकदा मोड लत्ता हरी कालियाची कसी खोड ! ।।६।।
श्रीपुंडरीका ! जगीं एक तूं धन्य भक्तांत न त्वत्सम श्रेष्ठ बा अन्य ।
केला उभा देव तारावया अज्ञ या त्वत्प्रतापासि गाती महायज्ञ ।। ७ ।।
बा नारदा ! फार दास स्वयें मुक्त केले तुवां, मान्य देवा तुजें उक्त ।
ते नावडावे मना भोग जे भुक्त तारी दयाब्धे ! मला हें तुला युक्त ।।८।।
बा मारुते ! प्रेम रामीं तुजें फार सीतेसि शोकाब्धिचा दाविला पार ।

---

१पहिल्या २६ आर्या संतस्तवन प्रकरणांतल्या व २ मंत्र भागवत स्कंध १० यांतील आहेतस. ३ हें प्रकरण पंतांच्या दप्तरीं मिळालें आजवर अप्रसिद्ध आहे. पंतांनीं आपल्या कंठीं कोणती 'जपमाळ' धारण केली होती हें यावरून समजेल. ३ पाहिजेस. ४ उत्सुक.

माहात्म्य रामायणीं वर्णिलें सार ऐकोनियां प्रार्थितों दीन हा तार ।। ९ ।।
श्रीरामनामा ! तुजा अद्भुत व्याप आम्हां अनाथासि तूं माय तूं बाप ।
कर्णींहि येवोनि संहारिसी पाप बाधो न देशी कधीं लेशही ताप ।। १० ।।
श्रीसाधुहो ! द्या यशोवर्णनीं धीर हा बोलवावा दयेनें जसा कीर ।
याला म्हणा ' आत्मदासांत ये सीर ' पावो पर क्षिप्र मोहाब्धिचें तीर ।। ११ ।।
बा सद्गुरो ! इष्टदात्यांत तूं शूर राहो न दे तात मातें जसा सूर ।
गातां भवभ्रांतितें घालिसी दूर वाहो मयूरावरी त्वद्दयापूर ।। १२ ।।
श्रीरामाचे करिती जैसे अहितांसि भल्ल भस्म रणीं ।
श्लोक तसे तेरा हे धरुत रसिक विष्णुवल्लभ स्मरणीं ।। १३ ।।

---

## ५. महाजनप्रार्थना.

श्रीरामभरतलक्ष्मणशत्रुघ्न महादयाळु हो ! पावा ।
ओपावा अभयवर प्रणतीं, दानीं न सुज्ञ कोपावा ।। १ ।।
तारावें दीनातें हें सदया मारुते ! मनावरि घे ।
काय जडाहि प्रेरिलि ताराया सागरीं न नाव रिघे ? ।। २ ।।
तूतें स्वसमसमर्थ प्रख्यात सकृप म्हणोनि आर्यातें ।
चिरजीवी करुनि प्रभु गेला ठेवूनि याचि कार्यातें ।। ३ ।।
बा पाव जामदग्न्या[१] ! रामा ! तूं शत्रुमृगकुळीं हरिसा ।
मज तव गोत्रोत्पन्ना पीडिति कामादि नित्य हे अरि सा[२] ।। ४ ।।
माते अरुंधति ! तुवां मद्विषयीं एकदांचि बोलावें ।
गुरुचें, गुरुपत्नीचें वचन सुशिष्यें समान तोलावें ।। ५ ।।
भक्त श्रीरामाचा मी, हा झाला जगांत बोभाट ।
ज्या प्रभुतें जो वर्णी सत्कार्य प्राकृताहि तो भाट ।। ६ ।।
गुण पुससिल, तरि पढला शास्त्रासि न मंद हा न वेदास ।
येतें नामाचि; सर्वश्रेष्ठ म्हणुनि ज्यास मानवे दास ।। ७ ।।
मज भागवतांचा, कीं नामाचा भरंवसा, न इतरांचा ।
बा ! अकलंका ! लंकानाथा ! बाळासि जेंवि पितरांचा ।। ८ ।।

---

१ पराडकरांचें गोत्र जामदग्न्य होय. २ सहा.

आदिकवे ! प्रभुचरितीं सुज्ञ, जडहि, पावतो हुरुप, रमतो ।
श्रीरामचरणकमळीं लाविल जीवांसि जो गुरु परम तो ॥ ९ ॥
झालासि पढविता प्रभुपुत्र तें रचुनि तूं सुकाव्यास ।
देवर्षिवरें जैसें निववाया भागवत शुका व्यास ॥ १० ॥
प्रभुसि कथुनि मज तारीं; विश्व तुजें यश महाकवे ! गाय ।
धर्मज्ञा वाल्मीके ! आली तृषिता न हाकवे गाय ॥ ११ ॥
बोलाना, भेटाना, भ्यालां पापासि नारदस्वामी ! ।
काय म्हणेल तुह्मां ? जो म्हणतो 'भवसिंधुपारद स्वों मी' ॥१२॥
बा ! पापिजनोद्धारीं तुजाचि सदा परम हर्ष देवर्षे ।
देसी प्रणतासि जसा मेघ मयूरासि हर्ष दे वर्षे ॥ १३ ॥
फिरासि सदा उद्धरिसी प्राणी संसारसंकटीं पडला ।
अडला नुपेक्षिला त्वां, दीनजनोद्धार बहु तुला घडला ॥ १४ ॥
प्र्हादा ! गुरुसि रुचे जी बोले परम लाडिका वाणी ।
मुनितें विनवुनि चिकटिव तच्चरणीं पर सला डिकावाणी ॥१५॥
बा बळि ! उद्धरिव कसा, सांगुनि सद्वा[1]रपाळका मातें ।
कार्य निरोपेंचि करिल; न चुके सद्द्वारपाळ कामातें ॥ १६ ॥
पाणी एकोपंत द्रवुनि विकळ तृषित रासभा पाजी ।
तें लक्षविप्रभोजनसम झालें म्हणति साधु बापा ! जी ! ॥ १७ ॥
व्यासा बा ! साक्षात् तूं नारायण, जडजनासि ताराया ।
अवतरलासि दयार्णव बोधें अज्ञान सर्व साराया ॥ १८ ॥
पळही जसें स्वरूपा ज्ञाते विसरति न विप्र भागवता ।
ग्रंथ असा न पर; न दे दर्भत्व वरुनि नवि प्रभा गवता ॥१९॥
करुनि कृपात्व नृपापरि तारावें तूंचि बा शुका ! मातें ।
पुरवी साधु नताच्या न तसा कल्पद्रु आशु कामातें ॥ २० ॥
कथिलें भागवत तुवां इंद्रप्रस्थाकडील विप्रासी ।
कीर्ति 'भक्तमाला' कथिती, जिस सर्व सत्कवि प्रासी ॥२१॥

---

१ आपल्या भक्तांस. २ संतांच्या समुदायाचा रक्षक जो श्रीविष्णु त्यास. ३ प्रभा गवता वरुनि दर्भत्व न दे.

हो सकृप पुंडरीका ! ज्ञानेशा ! पाव नामदेवा ! हूं।
सांग तुकोबा ! प्रभुच्या चरणीं मन आठ याम दे वाहूं ॥ २२ ॥
नामें चोखामेळा वाटे बहु धन्य तो महार[१] मला।
कीं भगवद्भजनींच, त्यजुनि सकळ धामकाम, हा रमला ॥ २३ ॥
ज्ञानें काय हरिजना म्हणतात महार, यवन कुणबी, जीं ?।
उमटे तोचि तरुफळीं, असतो जो काय गुप्त गुण बीजीं ॥२४॥
दामाजीचा होउनि हरि पाडेवार बेदरा गेला।
पंडित रागेले, परि नच तत्प्रेमज्ञ बेदें[२] रागेला ॥ २५ ॥
एक जनी हरिभक्ता शिंप्याची, 'हरिहरी' म्हणे बटिक।
तीस दळाया लागे भगवान्; वदतील साधु कां लटिक ? ॥२६॥
कोठें उष्टीं काढी, कोठें खटपट करी, भरी पाणी।
त्याचा होय गुमास्ता, श्रीरामानंदाशिष्य जो वाणी ॥ २७ ॥
तुमची भक्ति श्रीहुनि वन्यांहुनि जेंवि नागरी बरवी।
भक्तिप्रताप कोठें ? कोठें हा अतिमा गरीब रवी ? ॥ २८ ॥
मागें झाले, असती आतां, होणार जे पुढें काय।
त्या भागवतांचे म्यां भावें साष्टांग वंदिले पाय ॥ २९ ॥

—महद्विज्ञापना.

---

## ६ पंढरीमाहात्म्य.

पंढरि ! तुजमाजि सदा भगवत्कीर्तन महोत्सव व्यक्त।
भक्त स्त्री शूद्रजनहि बहु अंत्यज यवनही तदासक्त[३] ॥ १ ॥
अवशीं, रात्रिं, पहांटे, प्रातःकाळीं, दिसा, सदा सांजे।
नवविध भक्तिरस करिति तृप्त निववुनी कधीं न दासां जे ॥ २ ॥
जिकडे तिकडे हरिहरनामांचा सर्वदा असे गजर।
पंढरि ! करिती नृत्य प्रेमळ जन सजरही जसे अजर[४] ॥ ३ ॥
वीणातालमृदंगध्वनि विठ्ठल रामकृष्ण हा घोष।

---

१ महार. २ वेद. ३ त्या कीर्तनमहोत्सवांत आसक्त. ४ वृद्धही तरुणासारखे प्रेमभरानें नाचतात.

तोष श्रवणीं देशी, श्री पंढरि ! हरिसि सर्वही दोष ॥ ४ ॥
पंढरि ! माय ! तुज्या जो वारकरी दुरित दर्शनीं हरितो ।
करितो धन्य प्रणता; मर्त्य नव्हे होय सर्वथा हरि तो ! ॥ ५ ॥
तुज सुकृतीजन पावे, इतरांचे तों न वाहती पाय ।
लोक प्रसिद्ध म्हणती, हें कीं, 'पाप्यासि पंढरी काय ?' ॥ ६ ॥
सेविसि कथासुधा बहु पंढरि ! तूं धरुनि मौन कानांहीं ।
वाटे श्रवणसुख तुला बहु, ऐसें त्याहि शौनका नाहीं ॥ ७ ॥
प्रेमळ, भोळे, भावुक, यांच्या पंढरि ! कथा तुला रुचती ।
देवहि उभाचि आजुन, नच गेलें बहुसमाशतें सुचती ॥ ८ ॥
पंढरि ! कथा यथामति करि त्या दंडीही जोडिती पाणी ।
खळही तुज्या प्रसादें बहु नयनांतूनि सोडिती पाणी ॥ ९ ॥
पुंडलिकानें केला ऐसा कोणीहि धर्म नय नाहीं ।
कीं दीनबंधु घेती भेटुनि पाहोनि शर्म[1] नयनांहीं ॥ १० ॥
श्रीराम अहल्येतें तारी, यश त्याहि शुद्ध रायाचें ।
परि अत्यद्भुत याचें कलिजडजनतेसि द्धरायाचें ॥ ११ ॥
शिंपी, माळी, वाणी, कुंभार, महार, यवन, चांभार ।
बहु जड तरले, व्हावा मग शेषाचा उणा न कां भार ? ॥१२॥
भक्तिसुखनि[2] पंढरि तूं ! साधुसभेचें सभाग्य माहेर ।
बाहेर प्रेम जया, त्याच्या दैवीं सदैव आहे 'रें[3]' ॥ १३ ॥
भक्तवश त्यक्तप्रभुभाव नव्हे पांडुरंग देव कसा ।
बारा वर्षे वसला एकोबाच्या गृहांत सेवकसा ॥ १४ ॥
न बहातांही धांवे त्या नाम्याच्या स्वयेंचि बटकीला ।
लागे देव दळाया, काय जनीनें तदर्थ हटकीला ? ॥ १५ ॥
जरि बोबडें पित्याचें मोहावें मन तथापि तोकानें ।
प्रभु साळ्याभोळ्याची वात्सल्यकथा तथा पितो कानें ॥ १६ ॥
भक्तयशःस्वयशातें गात्याच्या ठाकतो पुढें मागें ।
डोलतसे परमसुखें डोलावें सुस्वरें जसें नागें ॥ १७ ॥

---

१ कल्याण. २ भक्तीची उत्तम खाण. ३ रड.

दासें समर्पिलें जें, भक्तिरसें, पत्र पुष्प फळ तोय ।
या पुंडलीकवरदा तें परम प्रीतिकर सदा होय ॥ १८ ॥
वीणा, ताल, मृदंग, प्रेमें जन जे कथेंत वाजविती ।
विठ्ठलदृष्टि, तयातें आलिंगुनि, योगियासि लाजविती ॥ १९ ॥
स्मरणें, नमनें, स्वयशःश्रवणें निःशेष दोष वारावे ।
हा पांडुरंगदंडक, जीव जड प्राज्ञ सर्व तारावे ॥ २० ॥

---

## ७ गंगेची प्रार्थना.

पुरुषार्थांची शुद्धा गंगे ! तूं सद्रसा धुनी राजी; ।
तुज पंचप्राणांही, पावुनि बहु भद्र, साधु नीराजी ॥ १ ॥
श्रीकृष्णमूर्ति यमुना, गंगे ! श्रीशंभुमूर्ति तूं धवळा; ।
ब्रह्मसुखाचा देतां, द्रवुनि तुह्मी माय मावसी कवळा ॥ २ ॥
वाटे अश्वासि, तसें लोळावें कविजना तुज्या पुलिनीं ।
क्रीडावें मुक्तींनीं माहेरीं जेंवि लाडक्या मुलिंनीं ॥ ३ ॥
गमनें, नमनें, स्वैवनें, पवनें स्तवनेंहि न व्यथा राहे ।
ऐसे अत्यद्भुत जे त्वद्गुण, विश्वासि भव्य थारा हे ॥ ४ ॥
देवि ! दयावति ! दवडिसि दासाची दुःख दुर्दशा दूर ।
पापातें पळवितसे परमपवित्रे ! तुझा पयःपूर ॥ ५ ॥
मंदाकिनी नभीं, नरलोकीं भागीरथी, स्वयें अससी ।
गंगे ! भुजंगलोकीं, भोगवती नाम धरुनि तूं वससी ॥ ६ ॥
माते ! गंगे ! बुडतो जो तुझिया परमपूत तोयांत ।
हा भवजलधि सुदुस्तर जरि, तरि न बुडे कदापि तो यांत ॥७॥
वारी हिमाद्रिचा, तवसंबंधें सर्व ताप, परि सैर तो ।
भोग, तव जना गरुडा पाहुनि, अत्युग्र साप परि, सरतो ॥ ८ ॥
न उपासावें, गंगे ! देवि ! तुला अतरोनि, पायसदा ।
तुकडा शिळाहि खावा; जवळ करावें तुजेचि पाय सदा ॥ ९ ॥

---

१ न्याय, नियम. २ नदी. ३ कल्याण. ४ निरांजनविधीनें ओंवाळी. ५ आपल्या उदकानें. ६ सभोंवताल वा भाग. ७ खीर देणाऱ्या ( तुला ).

तुवां मत्पत्रीला जननि ! दिधला मान, कळलें
तुजें, कारुण्यार्द्रे ! मन मजकडे स्पष्ट वळलें ।
सुखें येणें झालें, सकळहि पथीं विघ्न टळलें
प्रसू प्रक्षाळील त्वरित न कशी बाळ मळलें ? ॥ १० ॥
वदे ज्ञाता, ' मुक्त त्वरित तुज गंगा करिल गा ! '
मला नाहीं संतांहुनि इतर या भूवरि लगा[1] ।
तुला आलों आहें जननि ! कर जोडुनि शरण
स्वतीरीं त्वां द्यावें द्रवुनि मज काशींत मरण ॥ ११ ॥
गळावा त्वत्तीरीं भगवति ! न हा देह सदनीं
पडो गंगे ! तुजें मरणसमयीं, तोय वदनीं ।
विवेकीं यावें, जें धवलपण हेरंबरदनीं[3]
भवीं हो त्वन्नेत्र, प्रभुनयन तें जेंवि मदनीं ॥ १२ ॥
पहातां दीनातें, सकरुण खरा तो कळकळे
द्रवेना तत्प्रेमा भगवति ! मना पोकळ कळे ।
तव स्नेहा नाहीं जननि ! उपमा, तापलि कडे
मुला घे जी साची, ढकलि उपमाता पलिकडे ॥ १३ ॥
तुज्या तीरीं नीरीं हृदय रमतें, दुःख शमतें
यशोगानें पानें कुमत गळतें, विघ्न टळतें ।
कळीं भंगे गंगे ! षडरि झुरती दोष नुरती
दिली रामें, नामें तशिच जगताला निजगती[4] ॥ १४ ॥
द्रवावें त्वां गंगे ! द्रवुनि भगवत्कीर्ति वळली
कृपा केली जी, ती बहु म्हणुनि सर्वत्र कळली ।
म्हणें प्रेमें सेवीं प्रमुदित रहा मी नर मला
न कां द्यावें ? ओघीं तव मकर हा मीन रमला ॥ १५ ॥
अनेक शत पाळिसी अकृप जंतु जे घातकी

---

१ ही प्रार्थना काशीस गंगेपुढें बसून केली. तेथें जाण्यापूर्वीं त्यांनीं गंगेस एक विज्ञप्तिपत्र पाठविलें होतें. २आधार. ३ गजाननाच्या दंताप्रमाणें माझा विवेक धवल असो व शंकराच्या नेत्रानें मदनास जाळिलें तसें तुझा नेत्र भव(संसार)निरसो. ४मोक्ष

समुद्धरिसि जान्हवि ! त्रिपथगे ! महापातकी ।
नसे जड मयूर हा द्रवुनि यासि दे आसरा
करील सुरभी सुखी, जवळ आलिया वासरा ॥ १६ ॥
श्रीभागीरथि ! शेवटीं निजतटीं दे वास या, हा किती ?
कोणीही शरणागता, सदय जे ज्ञाते, न ते हाकिती ।
माता, धांवुनि आलिया स्वनिकट, ग्रीष्मातपीं तापल्या
आधीं कीं कुरवाळिती, निववि‌ती, स्नेहें, मुला आपल्या ! ॥ १७ ॥

---

## ८. रामस्तव.

### ( अनुष्टुभ् वृत्त )

श्रीरामा ! नीरदश्यामा ! सुखधामा ! रघूत्तमा ! ।
त्वत्पादनखचंद्राची ज्योत्स्ना माझ्या हरू तमा ॥ १ ॥
ज्यास्तव स्मरतों नित्य स्वामी ! तुज दयाकरा ।
तापापासूनि हा दीन मुक्त होय असें करा ॥ २ ॥
सेवा करावया लावा देवा ! हा योग्य चाकर ।
या तताच्य[१] शिरीं आतपत्रं हो तुमचा कर ॥ ३ ॥
शरणागतसंत्राणीं रामा ! तूं बहु सादर ।
ऐसें असोनियां, दीन पावतो हा कसा दर ! ॥ ४ ॥
मायानदींत श्रीरामा ! तुझे चरण सांगडी ।
बहु आवडले हेची साधूंच्या मानसां गडी ॥ ५ ॥
मीनांचें जीवन जळ, दीनांचें तूंचि केवळ ।
मी नाथा ! तापलों यत्नहीनाचें मुख्य तूं बळ ॥ ६ ॥
आला शरण्या[२] ! तुजला शरणागत पातकी ।
न होसि तूं दीनबंधो ! शरणागतघातकी ॥ ७ ॥
विश्वास विश्वास तुझा कीं तूं दीनासि रक्षिसी ।
कशाही संकटीं ' धांव ' म्हणतां न उपेक्षिसी ॥ ८ ॥
तुझ्या प्रतापें आम्हांतें या काळीं जरि पाळिलें ।

---

१ छत्र, उष्णता ( ताप ) नाहींसा करणारा. २ शरणागतांचा आधार, पालक.

तरी सांभाळिलें सर्व; यश नातरि वाळिलें ।। ९ ।।
गाय पंकांत रुतली राय तो तीस उद्धरी ।
पाय दीनासि रक्षीना काय श्रेष्ठत्व तें तरी ? ।। १० ।।

---

## ९. वाङ्मनःप्रार्थना.

श्रीरामनाम जपतां तरशील लाटीं हूं, काय पाहसि? असो भलतें ललाटीं।
राहें घरींच, न शिरेंहि कडेकपाटीं; तें बैसवील तुज मुक्तिशिं एकपाटीं[3]।।१।।
नैकार्घकोटि नग नाम पवि; त्रपा हें तीर्थासि दे, परम नाम पवित्र पाहें ।
श्रीरामनाम गुरु संतत पावनांत त्यागूनियां, न करि संत तपा वनांत ।।२।।
चित्ता ! धरीं न दुसरी तिळ आस, राहें, श्रीरामनामचि करीं दृढ आसरा हें ।
रक्षील पूरवुनि कामहि, मान गानीं स्वर्गीं किंनर,परि फिका महिमा, नगांनीं।। ३
नासाव्या स्मरणिं मानस खेद येतें; नामापरी न करितीच सखे दयेतें ।
हे सत्सुधांबुनिधिची भजकास वीची; ते न्यून दृष्टि गमते मज कासवीची।।४।।
नामींच, सांडुनि दुजा पथ, वावरावें; रामायणादिकृतिला अथवा वरावें ।
हे सूपदेश मनिं भव्य वहा रसाचे; त्याहूनियां इतर न व्यवहार साचे ।। ५ ।।
घालीं भवांत रघुनायकनावनौके; गेले तरोनि सहजेंचि मना ! वनौके[6] ।
तारी क्षणांताचि, न तें करवि प्रयास; साक्षी पुरातन दयाकर विप्र यास।। ६।।
श्रीरामनाम तरि अद्भुत; आढळेना ऐशी दुजी, स्वपद सोडुनियां ढळेना।
दावी सदा सुगति, होचि नमज्जनातें दे; पावली बहु भरेंहि न मज्जनातें।।७।।
वर्तों प्रपंचविषयांत अवासवौ ही; भी नामनिष्ठ न नृपास न वासवा ही।
यावांचुनि श्रम सुनिष्फळ तापसांचे; तापक्षयार्थ तपतां मनिं ताप सांचे।।८।।
ज्या रामनाम अमृतोत्तम नाचवीतें तो जाणतो शिवचि एक मना! चवीतें।
तैसेचि त रसिक सेविति या रसा जे लोभी; रसज्ञपण त्यांसिच फार साजे।। ९।।
मूढासि नामचि, तदन्य अपाय साचे; बाळासि दे अशन पुष्टि न पायसांचें ।

---

१ वाचा व मन यांची प्रार्थना. २ लहर, लाट, प्रपंचलहरींत. ३ एका पाटावर बसवील, मुक्तीशीं तुझें लग्न लावील. ४ अनेक पापांचे काश्यवाध ( पर्वत ) ५ लज्जा. ६ वनांत राहणारे मुनी. ७ नारद. ८ नौका. ९ यथेष्ट. १० दूधसाखरेंतल्या भाताचें.

दुग्धें जेंमे शिशु; न तो नवनीतपानें; नामें तरे जन, तसा न वनीं बपानें ॥ १० ॥
यामाष्टकांतहि पळार्धहि आळसानें माता जसें न विसरे निज बाळ सानें।
तैसेचि नामजननी बहु वत्सला हे; आनंद या सुरभिचा बहु वत्स लाहे ॥ ११ ॥
नामामृत, त्यजुनि साखर, ओरपीती; मानूनि दुर्लभ सुधाधिक थोर पीती।
स्त्री हाणिती जरि शिरींहि सकोप टांचा, लागे तथापि रस गोडचि खोपटाचा १२
ध्याया पलाशपतिच्या अरिलों जगावें; त्याचें यश, त्यजुनियां वरि लाज, गावें।
ऐकें मना! परिस तूंहि जिभे! कशाला व्यर्थोंदितें करिसि हें मुख भेकशाला ? १३
हो स्तोत्रपात्र, रसने! प्रभुनाम गा गे! मान्या शुनो न, जरि आठाहि याम गागे।
दे मान्य, पुण्य, पुरुषार्थ सुखादि; सोपी मुक्ती हि; नामरस दुर्बळसा दिसो, पी १४
संतांसि वेड हरिनामनवासवाचें पीयूष तैंवि हरिना मन वासवाचें।
कीं तो तदन्य विषयांत रमे; न केला वेडा; भजे परम सादर मेनकेला ! १५
ऐकोनि पाठ करिं दोनच वर्ण वाचे ! जे राम हे, प्लव महाविपदर्णवाचे।
जो सच्चकोरहित राघव इंदु बा ! हे जें सद्दयामृत तदीय सुबिंदु वाहे ॥ १६ ॥

मोहीं श्रीरामनामा ! निज मधुर गुणें सर्वदा या जिभेला।
माशीला शर्करेचा स्ववश करि जसा चाखण्यामाजि भेला ॥
गुंतो ही जीभ जैसी नव मधुसि जसी धांव घेउनि भुंगी।
राहो गुंतोनि लोभें त्यजुनि मरणभी विस्मृतज्ञाति मुंगी ॥ १७

---

## १०. सद्गुरूची महति.

श्रीगुरुचें चरणांबुजरज जें, तें मुख्य होय मंगल गा !।
अंगलगों सिद्धि सदा याच्या; याचाचि धरिति संगलगों ॥ १ ॥
श्रीगुरुकडे भवमहाव्यसनीं गुरुभक्त चित्त पाठवुनी।
होय सुखी हेमंतीं देउनि शीतार्त जेंवि पाठ उनीं ॥ २ ॥
श्रीगुरुनें लीलेनें सर्व श्रुतिशास्त्र सार पढवीलें।
ध्रुवबहुमत परमपदीं रंकातें कर धरूनि चढवीलें ॥ ३ ॥

---

१ पुष्ट होई. २ राक्षसशत्रूला, रामाला. ३ हरिनामरूप नवमद्याचें. ४ अंगास लागलेल्या, चिकटलेल्या. ५ आश्रय.

श्रीगुरुच्या सोडावें न नता प्रेसें, जसें नभा वातें ।
इष्टा मित्रा सुहृदा आप्ता सख्याहि ये न भावा तें ॥ ४ ॥
श्रीगुरुचे जे, त्यांच्या कामाद्युग्रारि साहती लत्ता ।
गुरुभक्ताची चाले त्या काळावरिहि सर्वदा सत्ता ॥ ५ ॥
श्रीगुरु हा चतुरानन, चतुरासि नव्या नव्याचि सृष्टींत ।
किति न चमत्कृति दावी ? प्रकटाया प्रेमबाष्प दृष्टींत ॥ ६ ॥
श्रीगुरु शंकर, येणें सुदृढस्वानुभवभव्यचापधरें ।
भस्म क्षणांत केलें देहपुरत्रय सुतीक्ष्णबोधशरें ॥ ७ ॥
श्रीगुरु माय, श्रीगुरु तात, श्रीगुरु धणी–परित्राण ।
श्रीगुरु वित्त, श्रीगुरु विद्या, श्रीगुरुचि जीवनप्राण ॥ ८ ॥
श्रीगुरुचें व्हावें जें लोड, उशी, दार, सुत, पलंग, डबा ।
'सांनिध्यार्थ चरण घे मोडूनि' म्हणेल सुतप 'लंगड बा !'॥९॥
श्रीगुरुचे जो भगवद्गुणसे प्रेमें द्रवोनि गुण गातो ।
श्रीचा, सुकीर्तिचा किंबहुना सन्मुक्तिचाहि कुणगा तो ॥ १० ॥
श्रीगुरुच्या भजनसुखें क्षण देहाचा जया पडे विसर ।
त्याच्या षडरातींचा हा ! हा ! हा ! हा ! म्हणे, रडे विसर ॥११॥
श्रीगुरुवचनासि, जसा चातक मेघोदकासि, आ पसरी ।
न करील तद्यशाची त्या श्रीसुरसिंधुचेहि आप सरी ॥ १२ ॥
श्रीगुरु पाहे, नुरवुनि तिळभरिही भेद, सारखे दास ।
प्रणतांच्या शमवि श्रीगुरुचें वच वेदसार खेदास ॥ १३ ॥
श्रीगुरुपदप्रसादें ध्रुवबाळें सुपद जोडिलें अढळ ।
इच्छितपदार्थदानीं कोणाचा हात बा ! असा सढळ ? ॥ १४ ॥
श्रीगुरुवांचुनि वाचुनि विफळ जिणें, यांत वांकडें काय ? ।
शुक सांगे भागविला कृष्णें, वाहूनि लांकडें, काय ॥ १५ ॥
श्रीगुरु ज्यातें तारी संसाराब्धींत, संत तोचि तरे ।
श्रीगुरुसि शरण जावें चित्ता ! हें होय संततोचित रे ! ॥ १६ ॥

---

१ कामक्रोधादि सहा उग्र शत्रु. २ स्थूल सूक्ष्म व कारण हे तीन देह हेच कोणी त्रिपुर यांचें दहन करणारा गुरु हाच शंकर. ३ समुदाय(संबंध षड्रिपूंकडे ). ४बरोबरी.

श्रीगुरुच्या शाश्वत सुखरूपी चरणींच, जेंवि पंगु, रहा ।
चित्ता ! भवविभवातें न मुले अत्यल्प काळ भंगुर हा ॥ १७ ॥
श्रीगुरुदेवा ! सेवा घे वात्सल्येंकरूनि अनवरत ।
मन वर तव दासाचें हा पावुनि हो जसेंचि अनव रत ॥ १८ ॥
श्रीगुरुवर्या ! दे तें, मर्यादेतें न शील जें मोडी ।
थोडीही मनें विष या विषया जाणुनि धरूं नये गोडी ॥ १९ ॥
श्रीगुरुराया ! शुद्ध ब्रह्मचि तूं नर न, दिससि जरि नरसा ।
तक्र तसें दुग्ध दिसे, दोहींच्या किमपि साम्य परि न रसा ॥ २० ॥
श्रीगुरुनाथा ! माथा लववुनि, हा दास बोलतो कांहीं ।
बोलावेंचि शिकविले, हृदयाविनोदार्थ, बोल तोकांहीं ॥ २१ ॥
श्रीगुरुराया ! अंतर्बाह्य न अन्यत्र सर्वथा नातें ।
आया बाया माया दाविति देती न सर्व थानातें ॥ २२ ॥
श्रीगुरुराया ! जाया आयासा या स्वजन्ममरणाच्या ।
स्मरणाच्या कासेला लागावें बा ! बुज्याचि चरणाच्या ॥ २३ ॥
श्रीगुरुराया ! प्रेमें सेवावे म्यां तुजे सदा चरण ।
हे मात्र न सोडावे, जोडावें निश्चयें सदाचरण ॥ २४ ॥
श्रीगुरुराया ! ज्या या जायासुतवित्तसंपदा, साच्या ।
कृत्याशा अत्युग्रा देती हृदयासि कंप दासाच्या ॥ २५ ॥

गुरुस्तुतिसुमांजलि.

---

## ११. गुरुशिष्यसंवाद.

' स्वामि ! काय ग्राह्य ! स्वमुखें सांगा, करा दया पूर्ण ' ।
' शिष्या ! स्वीकारावें गुरुवचन प्रणतिपूर्व अतितूर्ण ' ॥ १ ॥
' काय त्यागावें ? तें स्वामी ! सांगा अजाणत्यास मज ' ।
' शिष्या ! अकार्य सारें टाकावें, हें मनीं बरें समज ' ॥ २ ॥
' सत्वर काय करावें ? स्वामी तुमचाचि बोल मज वेद ' ।
' वत्सा ! शीघ्र करावा ज्ञानें संसारसंततिच्छेद ' ॥ ३ ॥
' स्वामी ! वैरी कोण ? ' ' छात्रा ! तो शत्रु जो अनुद्योग ।

‘ ज्या उद्योगाभावें पावति विलयासि सर्व सुखभोग ’ ॥ ४ ॥
‘ स्वामी शूर म्हणावें कोणाला ? हें मला तुम्ही बोधा ’ ।
‘ शिष्या ! स्त्रीनेत्रशरें पावेना जो व्यथेसि, तो योधा ! ’ ॥ ५ ॥
‘ गुरुतेचें मूळ मला स्वामी ! कांहींच ठाउकें नाहीं ’ ।
‘ शिष्या ! न मागणें हें गौरवबीज स्वमानसीं पाही ’ ॥ ६ ॥
‘ दारिद्य कोण सांगा ? बहु पुसतों, कीं तुम्हां नसे रोष ’ ।
‘ शिष्या ! बरवें पुशिलें; दरिद्रपण तेंचि जो असंतोष ’ ॥ ७ ॥
‘ जाड्य कशास म्हणावें ! हें सांगाजी ! मला सुदासास ’ ।
‘ शिष्या ! जो कौशल्यप्राप्तिसाठीं नसेचि अभ्यास ’ ॥ ८ ॥
‘ स्वामी ! कोण सदुःसह सर्वा नरकांपरीसही नरक ! ’ ।
‘ परवशताचि निरय, हें जाणुनि, तूं संग सोडुनी सरक ’ ॥ ९ ॥
‘ स्वामी ! जे जे प्राणी, त्यांचें प्रिय वस्तु मुख्य तें काय ? ’ ।
‘ शिष्या ! पंचप्राणचि लोकांचा प्रियपदार्थसमुदाय ’ ॥ १० ॥
‘ मित्र कवण ? हें सांगा, संशय न तुम्हांविना दुजा छेदी ! ’ ।
‘ तो मित्र होय बापा ! पापाचारांत जो बुडों नेदी ’ ॥ ११ ॥
‘ शल्य असे कोण ? गुरो ! मरणापर्यंत ज्यामुळें ताप ’ ।
‘ तें शल्य, नेत्र झांकुनि, केलें असतें सुगुप्त जें पाप ’ ॥ १२ ॥
‘ यत्न करावा कोठें ? हें सांगा जी ! तुम्हीं महा ज्ञानी ’ ।
‘ शिष्या ! यत्न करावा विद्याभ्यासीं, सदौषधीं, दानीं ’ ॥ १३ ॥
‘ कोण प्रिया करावी? स्वामी ! करुणामृतद्रवद्धृदया ! ’ ॥
‘ वत्सा ! प्रिया करावी सन्मैत्री, दक्षता, तशीच दया ’ ॥ १४ ॥

**प्रश्नोत्तररत्नमाला.**

---

## १२. नाममाहात्म्य.

भागवतांच्या सुहृदा ! नामा ! तूं हरिसि सर्व पापदर ।
यास्तव सदया ! वरदा ! दीनें म्यां पसरिला तुला पदर ॥ १ ॥
दैवें तुजशीं सत्सहवासांत नवीच ओळखी पडली ।
तूझ्या मधुरतरगुणी अतिचंचल चित्तवृत्तिही जडली ॥ २ ॥

नारदवाल्मीकिशुकव्यासादि सखे तुजे तुला भजती ।
मित्र तुजें म्हणवाया, कैंची दीनासि योग्यता मज ती !॥ ३ ॥
सर्वत्र स्नेह तुझा सम, समयीं संकटीं पुढें होसी, ।
परमपदीं बैसविसी एकहि, देउनि सुलग्न[1] तूं जोशी ॥ ४ ॥
तूं मात्र रामनामा ! कामा येसी न पाहसी दोष ।
दुसरे सखे सखेद त्यजती करिती नयच्युतीं[2] रोष ॥ ५ ॥
रामें निजप्रजांतें बहु सुख दिधलें तसेंचि तद्राज्य ।
नामा ! त्या मागें त्वां विश्वाला दाविलें सुख प्राज्य ॥ ६ ॥
नामा ! या[3] मातांनीं तीनीं[4] थानींहि लाविलीं मरती ।
त्वदपत्यें दुस्तर भवसिंधूंत जडासि तारिती तरती ॥ ७ ॥
नामा ! रामाहुनि तूं सदय; स्तुतिवाक्य हें न दासाचें ।
न म्हणें सत्य म्हणों मन बापा ! करुणासुधानदा ! साचें ॥ ८ ॥
एक अयोध्या नेली तरि मागें पुष्कळ प्रजा उरली ।
तीची तवप्रसादें अमृतरसास्वादनस्पृहा पुरली ॥ ९ ॥
रामें तात त्यजिला शोकीं याहूनि कोण अत्यांग ? ।
नामें त्वां तद्धर्मावन[5] केलें, न करितांचि तत्त्याग ॥ १० ॥
श्रीरामें क्षत्रियकुलकाल, तुवां जिंकिला जगत्काळ ।
तो भवचापचि खंडी, तूं भवभवपाशजाळ[6] तात्काळ ॥ ११ ॥
श्रीरामाच्या कंठीं घाली जनकाख्यनृपतिची बाळा; ।
तुझिया गळां सुरासुरनरवरसद्वृत्ति घालिती माळा ॥ १२ ॥
विश्वस्तप्रातिपालन, दुर्जनचित्तप्रसादन स्वैर ।
केलें, आणि न केलें पुण्यर्जनेश्वरकुळीं तुवां वैर ॥ १३ ॥
खलकृतदोषारोपें जरि तवपदसेवनासि अंतरती ।
प्राणसख्या ! नामा ! मग साध्वी सन्मंडळी कशी तरती ?॥१४॥
त्वत्पदवियोगघटिका युगशतगुर्वी तवाश्रितां होय !
श्रीरामवानरांचें नाम नरापारसि धैर्य बहु होय ॥१५॥

---

१ शूभमुहूत. २ नीतिच्युत पुरुषाचे ठिकाणीं. ३ जगांतील सामान्य माता. ४ तान्हीं. ५ अति अपराध, पाप. ६ त्या दशरथाचें रक्षण. ७ शंकराचें संसारपाशाचें जाळें. ८ रामानें रावणकुलीं वैर केलें तसें त्वां केलें नाहीं. 'पुण्यजना' वर श्लेष आहे. पुण्यजन म्हणजे राक्षस असाही अर्थ आहे

नामा ! सामात्य प्रभु गेला स्वपदांतरासि ज्या काळीं ।
दे अधिकार तुज निजप्रतिनिधिला कीं, सुखें प्रजा पाळीं।। १६ ।।
नामा ! जामाता तूं करिसी निजदास, आत्मजा मुक्ती ।
देसि, म्हणूनाचि पुष्कळ गौरविसी; सूचली भली युक्ती ।। १७ ।।
तृष्णानदींत अधना तारिसि तूं नामराज नावाडी ।
तोचि उदार, सदन्नें जो क्षुधिता पामरा जना वाडी ।। १८ ।।
नामा ! बा ! माहेरा[1] न्याया आलासि काय तूं मूळ ।
न सुचेचि कामधाम, प्रकट स्वांतासि[2] लाविलें खूळ ।। १९ ।।
प्रभुपदिं भवसिंधूध्दृत मुक्तांची नित्य एक लाखोली ।
वाहसि जाणसि कुशला ! भवाब्धिची तूंचि एकला खोली ।।२०।।
तूं अमृतशालि नामा ! भगवज्जनवदनपद्म तें चौंडें ।
प्रेमळजनसुक्षेत्रें, भरिसि पिकें, मिळसि आपुल्या पाडें ।। २१ ।।
कळिकाळीं मंत्रांचें तेज प्रतिवासर क्षया जाय ।
तेज चंढ तुज नामा ! बहु माने काळ हा तुला काय ? ।। २२ ।।
नामा ! मामाकाकादादाबाबादि आप्त जन्मार्त ।
स्नेही तेही तूंही; त्वत्स्नेहें परि जगत्त्रय व्याप्त ।। २३ ।।
दुष्टा कलिवांचुनि, तूं आवडसी फार साधुचित्तास ।
तुज जपति परमहंसहि नित्य, जसे कृपण लोक वित्तास ।। २४ ।।
षड्रसनाग्रीं नाचसि तूं होउनि सुप्रसन्न नटसा रे ! ।
नाचों लागति त्याचे भवपाशविमुक्त पितर चट सारे ।। २५ ।।
नामा स्वामात्या तुज, राज्यभरोद्वहनयोग्यशक्तीस ।
निजजनधनभवनपरित्राणाधिकृतिहि विशुद्ध भक्तीस ।। २६ ।।
त्रिभुवनराज्य प्रभुचें प्रतिनिधिनें त्वां स्वहस्तगत केलें ।
भोळ्या दिगंबराचें आक्रमिलें वतन, जळ जसें तैलें ! ।। २७ ।।
या काळांत भरभर स्वामी ! तूझीच, कीं धणी हातीं; ।
घेसी आश्रितकामें ऐकामें करुनि नुलवती पातीं ।। २८ ।।

---

१ आत्मस्वरूपस्थिति. २ चित्त, मन. ३ बीं परतांना ज्यांतून शेतांत पडतें तें. ४ जन्मापासून जडलेले. ५ एकसरा, डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच.

सर्वाभीष्टपदार्थांमध्यें तूं फार मिष्ट नामरसा ! ।
पामर, साच्युत सांबहि तुज सेविति, जेंवि भृंग तामरसा ॥ २९ ॥
सनकादि बंधु चवघे, नारद, शुक, शंभु, मारुती, चेले ।
नेले भुलवुनि, गेळे संसारांतूनि, फार वश केले ॥ ३० ॥
भगवन्नामोच्चारें सकळेंहि अघें सवासनें जळती ।
मळती न नामधारक, पळती यमदूत विघ्नही टळती ॥ ३१ ॥
तुजें कुशळ नाम बा ! हळुहळू मना आकळी
दुरत्यय असा महा खळहि त्यास भी हा कळी ।
हरि व्यसन पाप हें; बहु कशास ? कायांधवा-
परि त्वरित भेटवी तुजहि योगमायाधवा ! ॥ ३२ ॥
तुम्हांसमचि हें गुणें; अणु उणें नसे नाम, हा
दिसे अधिकेंही, तसा गुण तुला असेना महा ।
सदैव भलत्यासही सुलभ, आणखी गायका
छळी न, न अधोगति क्षणहि दे जगन्नायका ॥ ३३ ॥

---

## १३. संशयरत्नमाला.

(संसारसागरांत बुडत असतां परमेश्वरानें आपणास तारावें ह्मणून कवीनें देवाचा धावा केला. भक्ताविषयीं कनवाळू देव लवकर कां येईना म्हणून कवीनें अनेक संशय घेतले ते या रत्नमालेंत गुंफले आहेत. खलीं दिलेल्या टीपा पंतांनीं स्वलिखित प्रतींत स्वहस्तानें समासांत जशा दिल्या आहेत तशाच घेतल्या आहेत.)

उठतां बहु त्वरेनें ' कोठें जातां ? ' असें तुम्हां देवी ।
पुसती झाली, जाणों पुसतां, ज्ञाता पुढें न पद ठेवी ॥ १ ॥
किंवा नारद आला आलपीत स्वकीय सच्चरितें ।
प्रेमळ गीत तुम्हांला हरि ! हरिणापरिस बहुत वश करितें ॥ २ ॥
कीं माझें दुर्दैवं प्रभुच्या मार्गांत आडवें पडलें ।
शरणागतभयशमना ! यास्तव येणें तुजें नसे घडलें ? ॥ ३ ॥

---

१प्रल्हाद. २उत्तरार्धांत नामाचें रामाहूनही श्रेष्ठत्व कसें हें दाखविलें आहे. राम भक्तांना मात्र सुलभ आहे; नाम जडमूढपतितांसुद्धां सर्वांना आहे. ३ बळीला देवानें छळलें व पाताळ दाखविलें. ४ र्यिकावरून. ५ पुसल्यावर गेल्यास कार्यसिद्धि नाहीं असें जाणून. ६ गीतश्रवणीं कांहींच भान नसतें. ७आपला समूळोच्छेद न व्हावा म्हणोन

किंवा मजहुनि दुसरा कोणी बहु दीन[1] दास आढळला ।
तत्शुभदैवसमीरें त्यावरि करुणाघन प्रभू वळला ॥ ४ ॥
बहुधा बळिचें द्वार क्षणभरिही सोडितां नये देवा ।
न चुकावी छलपापप्रायश्चित्तार्थ साधुची[2] सेवा ॥ ५ ॥
प्रायः सुमुहूर्ताचा[3] शोध करायासि लागला वेळ ।
होय महत्कार्य[4] परी प्रभुचा तों नित्य सहज हा खेळँ ॥ ६ ॥
किंवा तुज एकाकी पाहुनि, खळ दैत्य आडवे आले ।
फुटतां सागर सिकतासेतूचें काय त्यापुढें चाले ? ॥ ७ ॥
किंवा तुज गुंतविलें भजकीं परि ते दयार्द्र या रंकीं ।
उद्धरित्यासि न सज्जन गुतविती, गाय कष्टतां पंकीं ॥ ८ ॥
किंवा चुकतें कांहीं स्तवनीं, तेणेंचि मागुता बससी ? ।
तरि हें मन्मूँर्खत्व, प्रभु तूं दोषज्ञही तसा नससी ॥ ९ ॥
हरिहेर म्हणतो यावें कोणें ? यद्दास्य पथकरहि तो घे ।
जंपतों, अन्योन्याच्या कार्या जपतां जसे तुम्ही दोघे ॥ १० ॥
केली[11] असेल निद्रा, कानीं गेली नसेल ही हाक; ।
तो समय होय हो भवदन्यप्रभुकोपजिष्णुचा नाक ॥ ११ ॥
' मीं द्विजराज[12] मयूरत्राण न केलें ' अशी धरो लाज ।
प्रस्थानीं परि गरुडें सिद्ध असावेंचि, लागतां काज[13] ॥ १२ ॥
देवर्षिपितृमनुष्याद्यमितांचें ऋण; न फेडिली कवडी ।
हें सत्य परि प्रभु अभिमानें सवदा न हातिंचा दवडी ॥ १३ ॥
कीं ' भीतो भ्रांत वृथा, मृगजलमग्नासि काय तारावें ? ' ।

---

१परमार्ताकडे आधीं जावें हें उचित. २सज्जन सेवेनें प्रसन्न होतो, अपराध क्षमा करितो. ३ शुभलग्नीं समर्थ महत्कार्य सुहृद्दर्शनादि करितात. ४ आमच्या दृष्टीनें. ५ खेळास मुहूर्त पाहणें नलगे. ६ ते तुजपुढें तुच्छ. ७ मत्संदेह वृथा. ८ दोषग्राहक नव्हेस, गुणग्राहक आहेस. ९ एकाचा भक्त नव्हे. तुह्मां दोघांत भेद नाहीं म्हणोन दोघांसही भजतों. १० जो धणी तो जपतो असें जरि म्हणाल. ११ निद्राभंगें प्राकृत कोपतात, तूं न तसा. १२ राजानें प्रजा न रक्षिली तरी लज्जा पावावी. १३ कांहीं असो; सेवकें स्वधर्म सर्वथा चालवावा. १४ थोरपणास बहु मूल्य देऊन घेणें तें घ्यावेंच हें प्रभूचित

म्हणतां असें कसें ? शिशुभय जाया बागुलांसि मारावें ॥ १४ ॥
कीं कांहीं व्रतनियमीं बोलों चालों नये असें झालें ।
तरि दीनरक्षणाहुनि अधिकफल व्रत कधीं मना आलें ? ॥१५॥
कीं न श्रवणीं गेली ही माझी हाक, हा कसा तर्क ? ।
कैशि गुरुजनीं सतीची ? शिवला ज्या कुमुदिनीस असें दर्क॥१६॥
कीं हाक ऐकतांचि, प्रभुला हा रक्षणार्हसें वाटे ।
वाटें या दुःशीलग्रीष्मीं नवनव दयानदी आटे ॥१७॥
कीं पावावें समयीं सदय मनांतूनि योजिलें जरि तें ।
तरि जेंवि रुक्मिणीचे चित्ता, माझें अधीर मन करितें ॥ १८ ॥
किंवा पुराणपुरुषा ! संप्रति बहु भागलासि या कामीं ।
तुज नीज लागली तों सजलों मारावयासि हाका मी ॥ १९ ॥
किंवा बरी परीक्षा केल्यावांचूनि न प्रसाद करा ।
तरि वरि तसाचि आंतहि उगाळितां कोळसा प्रयास करा ॥२०॥
कीं आर्जविला नामप्रतिनिधि, हा अमृत उधळितो स्वैर ।
न पुसे, न भी, न ऐके; यास्तव दोघांत लागलें वैर ॥ २१ ॥
किंवा म्हणसि ‘ समर्थोहं कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् ’ ।
दीनावनाविणें क्षण देइल दयितोदया कशीं वर्तूं ॥ २२ ॥
कीं वैकुंठीं पुष्कळ भक्त, तिळ स्थळ नसे, नसोंवेंची ।
वसवा पुरें ‘ पुरें ’ कां म्हणतां ! धनवंत कण कसा वेंची!॥२३॥

---

१ लटक्याही भयास तात वारितो तसें करावें. २पूर्वीं तों अत्युत्तम ह्मणन धरिलें होतें तें कधीं टाकिलें ? ३ गुरुसमीप सभेंत अस्पृश सती राजसुता पतिसमक्ष वस्त्रमोक्षणीं मोठी हाक कशी मारील?तशी ऐकिली माझी कां न ऐका?४कुमुदिनी अर्क म्हणतां मृदुत्व उग्रत्व दिसतें तेणें व्याकुळ. ५ प्रतिक्षणीं स्वनामोच्चारध्वनिश्रवणीं दया करावीसें ह्मणतां परंतु दुराचार सुटनात ह्मणोन दया करितां करतां राहतां. ग्रीष्मांत नदी वाटेंतच आटती तशी मजकडे येतां दया सरते. ६ निद्रामुखीं प्रबोध दुष्कर. ७ श्रम मात्र, लाभ नाहीं. ८ बद्धमूळ प्रधान स्वामीसमानीत नाहीं. ९ स्वाधीन पतिका स्त्री वर्तविती तसें पति वर्ततो. १० भरलें असेल भरावें हेंच उत्तम. शाखानगरें रचावीं तेथें भक्त ठवावें. स्थळसंकोचें धनत्याग नीतिविरुद्ध. ११ मोठा साहुकारही धान्यकणातें लघात नाहीं. मस्तकीं उचलून ठेवितो, तुच्छ ह्मणत नाहीं, तेणें कल्याणच होतें.

कीं याचकांसि देतां सरलें चारीहि मुक्तिधनराशी ।
भक्तिच मज द्या, द्यावें देवाला अमृत योग्य न नरांसि ॥ २४ ॥
कीं हो कळां[२]निधि द्विजराज नको, ज्यासि लागला डाग ।
तरि काय प्रभुवर्या ! चुकला तुमचा गुरू महाभाग ! ॥ २५ ॥
कीं वाटलें खळाला मुक्ति न द्यावी, जशी सुधा सर्पा ।
तरि घ्या अ[३]घादिकांच्या, द्या सुवरा, भक्तिमात्र मज अर्पा ॥ २६ ॥
[४]कीं गमलें जरि आधीं म्हणतो दावा स्वपाद; या लोभी ।
जातां वांछिल जें जें तें द्यावें हे सुधा दयाळो ! भीं ॥ २७ ॥
कीं भेटि बहु दिसा, भय भेटाया दीनबंधुला वाटे ।
तरि भेटा[५]वें विधिनें, गेलें जातांति साधु ज्या वाटे ॥ २८ ॥
कीं भीसी मज एका उद्धरितां, लागतील फार झटे ।
तरि, कोण हि न कळतां, न्यावा झांकोनि दास पीतपटें ॥ २९ ॥
कीं एक मींच उरलों पापी; हें बीज ठेविलें जतन ।
वतन[६] स्वकीय मज कां करितें त्वन्नाम मंगलायतन ॥ ३० ॥
कीं मागें गुप्त उभा असशी, प्रेमें उभारुनी बाहे ।
तरि काय बाळकाचें तूं सादर बोल ऐकसी बा हे ॥ ३१ ॥

## १४ सन्मनोरथराजि[७].

श्रीरामासि भजावें भक्तें म्यां जेंवि तेंवि संतातें ।
राजासे उपासावें, तैसेंचि जनें प्रधान[८]पंतातें ॥ १ ॥

---

१ जें ज्याला योग्य तें त्याला द्यावें. २ चंद्र व मोरोपंत. शशिशेखर. ३ अघादिकांच्या घ्या; ( अघासुरादि जें पापी त्यांच्या ) दिली कन्या फिरून घेऊं नये दुसरियास देऊं नये. ४ चरण दाखवायास या म्हणतो पण लोभी आहे. काय मागेल तें कळेना. गेल्यावर न देतां थोरपणास शब्द म्हणोन भीत असाल. तरि भय लटिकें धरूं नका. भेटी मात्र पाहिजे तीच द्यावी. लटिका भय धरितो खरा भय धरीना. भीतोसि तरि सुधा दया लोभी—योग्यच आहे इति कोपोक्ति. ५ बहुकाळें भाऊ भावास भेटला तरि नाश होतो. विधीनें भेटतां नाश नाहीं. उभयत्रही बरें. ६ निजवृत्ति स्थळ. ७ 'सज्जनांच्या मनोरथांची माला.' या काव्यांत सज्जनांना काय काय गोष्टी आवडतात,हें प्रतिचरणांत किंवा प्रत्यार्येत एखादी घरगुती साधी उपमा योजून दाखविलें आहे. ८ दिवाण, मुख्यकारभारी, कवीच्या वेळीं 'प्रधानपंत' असें पेशव्यांस म्हणत.

कर्णयुगांत भरावें हें हरि ! हरिजनयश प्रचुर म्यां तें, ।
जैसा दोंदीं कोंदी गुर्जरदेशस्थ विप्र चुरम्यातें ॥ २ ॥
हा हो सुतृप्त राघवनामें, सारेंचि जेंवि तेलिंगा ।
शीला जपो, वहु जपति जैसे अय्याख्य साधु ते लिंगा ॥ ३ ॥
मतिची पडो हारगुणीं, पतिकंठीं मिठि जशी सुदारांची ।
नुच्चारू परमर्मा, जीभ नकारा जशी उदारांची ॥ ४ ॥
सत्संगतीं असावा प्रेमा, ग्रीष्मीं जसा असे व्यजनीं, ।
रम्यहि अभक्त हो मज, मधुपा चंपक तसा, असेव्य जनीं ॥ ५ ॥
काव्य करावें म्यां, नच वचकावें दूषिती परि लचूस ।
न करावें काय सदन कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस ? ॥ ३ ॥
गुरुभक्ति ते स्वमाता, भाऊ सत्संग, विषय तो बाऊ ।
भावू माझें मानसबाल श्रीरामकीर्तिनें खाऊ ॥ ७ ॥
कांपावें मन कुजनीं, वृद्धपणीं कांपतें जसें शिर तें ।
सत्संगींच शिरावें, बाळ जनन्यंचळीं जसें शिरतें ॥ ८ ॥
नच सोडावें नारायणनामानें कदापि हें वदन ।
मेल्याही लोभ्याच्या चित्तें सोडूं नये जसें सदन ॥ ९ ॥
सद्भजन न त्यजावें, बहुकष्टीं संकटीं जसें वतन ।
सूक्त करावें तैसें जैसें तपकीरतत्परें जतन ॥ १० ॥
भाग्यवतीला दुर्बळ कन्यासी सत्सभेसी हें उक्ति, ।
व्हावी परिपाल्या, कीं घेती शिशुचोहि जाणते युक्ति ॥ ११ ॥
प्रेमें नवीं नवीं तीं माझ्या रसनेसि सुकाविकुलगीतें ।
गीतें यावीं, येती माहेरीं जेंवि बहुत मुलगीतें ॥ १२ ॥

---

१ या व पुढाल आर्यंत गुजराथ्यांचें चुरम्यावरचें प्रम, तेलंग ब्राह्मणांचें सारावरचें प्रेम व्यक्त केलें आहे व लिंगाइत लिंगाला किती जपतात हें दाखविलें आहे. या चिमुकल्या काव्यांत देशाचार, स्त्रियादिकांचे आचार व आवडी, व नित्य प्रतिगृहीं दिसणाऱ्या सामान्य गोष्टी उपमानांत योजून कवीनें आपली मार्मिक व सूक्ष्म दृष्टि व्यक्त केली आहे २ आईच्या चोळींत ( स्तनपानासाठीं ). ३ सूक्त शब्द येथें श्लिष्ट आहे. ( १ ) सुजनांची आज्ञा ( २ ) तपकीर ठेवण्यासाठीं कोंकणप्रांतीं केळीचें वाळलेलें सोप घेतात तें.

हो सत्करप्रसादें कुब्जा तैसी मदीय मति सरळी, ।
खळकृतानिंदा सुखदा हो श्यालकृता जसीच मतिस र[1]ळी ॥ १३ ॥
निश्चय करुनि, न मागें तिळही ठेवी पतिव्रता चरण ।
भगवद्भजनीं माजी तैसीच करूं मति व्रताचरण ॥ १४ ॥
हरिकीर्तिगीति जी म्यां देवा ! व्हावें कुरंग रे ! तींत, ।
लोळावा हा सत्पदधूळींत जसा तुरंग रेतींत ॥ १५ ॥
बहु साधूक्त रुचावें, लोभिप्रमुला चसें जहाडाचें ।
मज अन्यकलत्राचें स्पर्श न विटवूं जसेंच हाडाचें ॥ १६ ॥
वत्स जसा स्तन्या[2]तें सादर पीतो धरूनि आम्यातें, ।
जें साधुमुखोद्गत यश तैसें प्यावें करूनि आ म्यां तें ! ॥ १७ ॥
हरिकीर्तनीं शिरावें, धनिकगृहीं जेंवि जपुनि चोरानें, ।
न उठावें बहुकार्ये, बहुभारें जेंविं कुचर ढोरानें ॥ १८ ॥
निजदेहगेहभान प्रभुभक्तांच्या कधींहि मेळांत ।
मज कीर्तनीं नसावें जैसें शिरतां मुलांस खेळांत ॥ १९ ॥
म्यां कीर्तना टपावें, मार्जारें सर्वदा जसें दुग्धा, ।
मन्मति विनयादिगुणां वाहो, प्रेमें नगा जसी मुग्धा ॥ २० ॥
प्रिय हरिजन हो जैसा आला माहेरचा बहायाला ।
स्त्रीजन जसा विवाहा, जावें म्यां सज्जना पहायाला ॥ २१ ॥
हृदय हरिजना कांता मतिनें उघडें करूनि ओपावें, ।
सद्विरहीं बहुदेहीं गोपीचित्तें तसेंचि कोपावें ॥ २२ ॥
उ[3]लटा आंत स्पष्ट व्यवहार दहांत दाखवी सुलटा, ।
मन्मति हो तैसी परपुरुषासक्ता सदा जशी कुलटा ॥ २३ ॥
जैसे अंधें वृद्धें नसतां गतिहेतु हस्तकीं यष्टी, ।
तैसें व्हावें सज्जनसंगतिवांचुनि उदंड म्यां कष्टी ॥ २४ ॥

---

१ मेव्हण्यानें केलेली रळी( थटा )जसी तरुणास आनंदविते तशी परकृत मन्निंदा मला सुखवो ! २ दूध. ३ ह्या आर्यैतला श्लेष फार मजेदार आहे. व्याभिचारिणी जशी पर( अन्य )पुरुषासक्त होऊन आंत निंद्य आचरण करून बाहेर पतिव्रतेचा डौल मिरविते, त्याप्रमाणें माझी मति पर( श्रेष्ठ )पुरुषसक्त होऊन आंत ब्रह्मनिष्ठ होऊन बाहेरून लोकाचार पाळीत चारचौघांसारखी दिसावी

आवड असो कथेची, जसि बाळा फाल्गुनांत पुनवेची, ।
संतीं वेंचावें धन, तापसजन तप जसें तपुनि वेंची ।। २५ ।।
रंगावें सद्वचनें मतिनें, चूर्णें जसेंचि हळदीनें, ।
भजन न सोडावें म्यां, जेंवि कधीं कर्षकें[1] न हळ दीनें[2] ।। २६ ।।
हळु हळु झडो अहंता सन्नमनीं, वार्धकीं जशी शेंडी ।
केंडू विवेक विषया, निस्पृह जन वस्तुनें जसा केंडी ।। २७ ।।
वरि संकोच असावा, आंत बहुत कृष्णकीर्तनीं काम; ।
गुरुजनसमक्ष पतिचें घेतां आर्याग्रहें जसें नाम ।। २८ ।।
सत्पदरजाहुनि अधिक मज चिंतामणि सुरद्रु न गमावे ।
सन्नतमातिमहिलागीं नवनव सेवाधिकार न गमावे ।। २९ ।।
ताप शमाया अलिनीं नलिनीं म्यां सत्पदींच लोळावें ।
पोळावें चातकमन न दवीं जलदें द्रवोनि ओळावें ।। ३० ।।

## १५ श्लोक-केकावलि.

सदाश्रितपदा ! सदाशिवमनोविनोदास्पदा !
स्वदासवशमानसा ! कलिमलांतका ! कामदा ! ।
वदान्यजनसद्गुरो ! प्रशमितामितासन्मदा !
[3]गदारिदरनंदकांबुजधरा ! नमस्ते सदा ।। १ ।।
पदाब्जरज जें तुझें सकलपावनाधार तें
अघाचलहि[4] तारिले बहु तुवांचि राधारतें ।
अजामिळ, अघासुर, व्रजवधू, बकी, पिंगळा
अशां गति दिली; उरे न तृण भेटतां इंगळा ।। २ ।।

---

१ शेतकरी. २ निंदो, त्यागो. ३ कौमोदकी नामक गदा, सुदर्शन चक्र, पांचजन्य शंख, नंदक नांवाचें खड्ग व कमल हीं धारण करणारा श्रीविष्णु. यावर चतुर्भुज विष्णूच्या हातांत पांच वस्तु कशा आल्या अशी शंका येते. कोणी ह्मणतात खड्ग कमरेस बांधेल, कोणी म्हणतात एकाच वेळां पांचही वस्तु हातीं घेतल्या असें मानण्याचें कारण नाहीं. कद्राचित् नंदक ( आनंददायक ) कमल असाही अर्थ घेतां येईल. ४ येथें 'राधारत या विरुद्ध कारणापासून 'अघाचल तारिले' हें कार्य झालें म्हणून विभावनालंकार झाला आहे.

तसाचि उरलों कसा ? पतित मी नसे काय ! कीं
कृपाचि सरली ! असेंहि न घडे जगन्नायकीं ।
नसेन दिसलों कसा ? नयन सर्वसाक्षी रवी
विषाद धरिला म्हणों ? न सुरभी विषक्षीर वी ॥ ३ ॥
नतावनधृतव्रत ! ज्वलन तूंचि बा[1]धावनीं;
पदप्रणतसंकटीं प्रजव तूंचि बा ! धावनीं; ।
दया प्रकट दाखवी कवण सांग त्या वा[2]रणीं ?
[3]सतीव्यसनवारणीं ? जय[4]जयार्थ त्या वा रणीं ? ॥ ४ ॥
‘ अगा ! प्रणतवत्सला ! ’ म्हणति त्या जनां पावलां,
म्हणोन तुमच्याच मी स्मरतसें सदा पावलां, ।
‘ करूं बरि कृपा, हरूं व्यसन, दीन हा तापला
असें मनिं धरा—खरा भरंवसा मला आपला ! ॥ ५ ॥
कळी करि सुनिर्मळीं परम उग्र दावा नळीं
तयांत अविशुद्ध मी, शलभ जेंवि दावानळीं ।
व्रणार्त पशुच्या शिरावरि वनीं उभे काकसे
स्मरादि रिपु मन्मनीं ! अहि न काळ भेका कसे ? ॥ ६ ॥
तुझ्या गुणकथा महासुरभि त्यांत ही रासभी ।
शिरे विषयवासना; जसि शुका अहीरास भी ।
तसी न इतरांस भी; इस सँदडही हाकिती
तथापि बहु लाथळी मग अदंड मी हा किती ? ॥ ७ ॥
खरासुर जसा, तसी विषयवासना हे खरी
हिचा वध करावया तुजाचि शक्ति आहे खरी ।
बकी सुमति, ताटका लघु, न हे भली; लाजसी
उगाचि; तसि एक ही व्रजवनांत लीला जसी ॥ ८ ॥
‘ अतर्क्य महिमा तुझा, गुणहि फार, बा ! हे, विधी
श्रुतिशहि म्हणे सदा, स्तविल आमची केंवि धी ? ।

---

१ त्रिविध तापरूप वनांत. २ गजेंद्र ३ द्रौपदी ४ अर्जुन ५ श्लिष्टशब्द—दंडधारी व संन्यासी

तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ॥ ९ ॥
प्रभो ! शरण आलियावरि नव्हां कधीं वांकडे
म्हणोनि इतुकेंचि हें स्वहितकृत्य जीवांकडे; ।
प्रसाद करितां नसे पळ विलंब बापा ! खरें;
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें ॥ १० ॥
शिवे न तुझिया पदा अदयताख्य दोष क्षण;
प्रभो ! चुकतसों, तरि करिसि तूंचि संरक्षण ।
नसेचि शरणागती घडलि सत्य अद्यापि ती;
रुचे विषय, ज्यां मिळे अमृत, ते न मद्या पिती ॥ ११ ॥
म्हणा मज उताविळा; गुणचि घेतला, घाबरें
असो मन असेंचि बा ! भजकबर्हिमेघा ! बरें ।
दिसे क्षणिक सर्व हें ! भरंवसा घडीचा कसें
धरील मन ? ओधिनें बहु परिभ्रमे चाकसें ॥ १२ ॥
कृतांत कटकामलध्वजजरा दिसों लागली;
पुरःसरगदासवें झगडतां तनू भागली ।
सहाय दुसरा नव्हे तुजविणें बळें आगळा
न हों जरि उताविळा स्वरिपु कापितो हा गळा ॥ १३ ॥
अवश्य करणें खरें प्रणतरक्षण स्वोचित;
उशीर मग कां ? बसों कृपण मीहि कां शोचित ? ।
नव्हे प्रभुवरा ! तुम्हां उचित एकटें धांवणें
कृतांत शिवला नसे तंव, दिसे बरें पावणें ॥ १४ ॥
ध्रुव स्तवानिं आवडी धरि, म्हणोनि अत्यादरें
तुम्हीं करुनि दाविली, शिवुनि गल्ल सत्या दरें; ।
तसें मज करा, करांबुज धरा शिरीं, मावरा !
वराभयपरा ! पराक्रमपटो ! मना आंवरा ॥ १५ ॥

---

१ चिंता, देहपतन होण्यापूर्वी आपणास ईश्वरप्राप्ति कशी होईल ही चिंता. २ रोग.

करांबुज असो; नसें उचित त्यास मी पामर;
प्रणाम करिती पदाप्रतिहि सन्मुनी सामर ।
पदाब्जरजही जगत्त्रयनमस्क्रियाभाजन;
प्रसादचतुरा ! कसा तरि करा बरा हा जन ॥ १६ ॥
तुम्हीं करुनि दाविला ध्रुव कृतार्थ जैसा दरें
तसेंचि जरि योजिलें तुमचिया मनें सादरें, ।
असो; विहित तें करा; परि बरोबरी त्यासवें
नसे उचित; तो महाप्रबळ, वंदिजे वासवें ! ॥ १७ ॥
किती वय ? कसें तप प्रखर ? काय विश्वास तो ?
ध्रुव ध्रुव खरा; स्तवा उचित होय विश्वास तो,
कशी तुळितसां तुम्ही प्रकट मेरुशीं मोहरी ?
प्रसाद करितां उणें अधिक नाठवा हो ! हरी ! ॥ १८ ॥
प्रभुत्व तरि हेंच कीं करुनि दे कृपा दान तें,
स्वसाम्य यदुपार्जनें मिरविजे स्वपादानतें ! ।
प्रसाद मग काय तो, जरि निवारिना लाववा ?
कसें दशमुखानुजा विसरलां ? अहो राघवा ! ॥ १९ ॥
तुम्हींहि बळि बांधिला, म्हणुनि आमुची माय जी,
मनांत सहजा दया निपट टाकिली काय ? जी ! ।
सकोप दिसती गुरु क्षणभरीच; जें तापलें
जल ज्वलनसंगमें, त्यजि न शैत्य तें आपलें ॥ २० ॥
असंख्य खळ संगरीं निजकरीं तुवां मारिले;
न निष्ठुरपणें, कृपा करुनि ते भवीं तारिले ।
जगज्जनक तूं, मुलें सकळ जीव, यां भांतुकें
दटावुनिहि देशि बा ! अमृत नेदिजे घातुकें ॥ २१ ॥
कृपाचि जननी तुझी, सकल जीव दायाद; या
तिणेंचि उपदेशिल्या करिति सर्व दाया दया; ।
असें उमजतां भले न गुरुभाव तो टाकिती
मता तुजहि गोपिका, मग जनास तोटा किती ? ॥ २२ ॥

१ खाऊ. २ यशोदा.

सुरर्षिजवळी स्वयें वदसि, ' तत्र तिष्ठामि; ' या
तुझ्याचि वचनें ह्मणें तुज ' कथावश ' स्वामिया ! ।
जसा स्थिर कथेंत तूं, स्थिर करीं तसें या मना
स्वभक्तसुरपादपा ! सफळ हे असो कामना ॥ २३ ॥
तुझें यशचि तारितें, परि न केवळा तारवे
सहाय असिला असे, तरिच शत्रुला मारवे; ।
न भागवत भेटतां न घडतांहि सत्संगती,
न अशुद्धदयें, तशीं तवयशोरसीं रंगती ॥ २४ ॥
बुडे, बुडवि सागरीं तरि, सुकर्णधाराविना;
सहाय नसतां स्वयें परतटासि ती दाविना ।
सहाय भगवज्जना तव सुकीर्ति जेव्हां करी,
तयींच उतरी भवोदधितटीं जना लौकरी ॥ २५ ॥
सुसंगति सदा घडो; सुजनवाक्य कानीं पडो;
कलंक मतिचा झडो; विषय सर्वथा नावडो; ।
सदंघ्रिकमळीं दडो; मुराडितां हटानें अडो;
वियोग घडतां रडो; मन भवच्चरित्रीं जडो ॥ २६ ॥
न निश्चय कधीं ढळो; कुजनविघ्नबाधा टळो;
न चित्त भजनीं चळो; मति सदुक्तमार्गीं वळो; ।
स्वतत्त्व हृदया कळो; दुरभिमान सारा गळो;
पुन्हा न मन हें मळो; दुरित आत्मबोधें जळो ॥ २७ ॥
मुखीं हरि ! वसो तुझी कुशलधामनामावळी,
क्षणांत पुरवील जी सकल कामना मावळी ।
कृपा करिसि तूं जगत्रयनिवास दासां वरा,
तशी प्रगट हे निजाश्रितजनां सदा सांवरा ॥ २८ ॥
दयामृतघना ! अहो हरि ! वळा मयूराकडे,
रडे शिशु; तयासि वे कळवळोनि माता कडे ।

---

' मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद

असा अतिथि धार्मिकस्तुतपदा ! कदा सांपडे ?
तुह्मां जड भवार्णवीं उतरितां न दासां पडे ॥ २९ ॥

---

## १६ शेवटची प्रार्थना.

दुग्धादिस्वरसें बहु पोषण केलें सदैव, गाई हो ! ।
गोमयदानें अंतीं मज दीना उद्धराचि आई ! हो ! ॥ १ ॥
विश्वंभरे ! क्षमे ! तूं देउनि शयनार्थ दर्भ कामातें ।
या पुरवुनियां, अंतीं देवि ! करीं धन्य अर्भका मातें ॥ २ ॥
माते ! तुळसि ! असो तव दळ वदनीं; मूळमृत्तिका भाळीं ।
प्राणावसानसमयीं, इतुकीच दया करूनि, सांभाळीं ॥ ३ ॥
अंतीं हें ओंस्य वसिव, जेंवि दशरथास्य रामनामा तें ।
त्वत्कामनाचि वाढो; न स्पर्शो अन्य कामना मातें ॥ ४ ॥
भगवज्जन हो ! वंदुनि पदर पसरितों असेंचि द्या स्मरण ।
तरण तसें मज पाजा श्रीहरिहरनाम, पातल्या मरण ॥ ५ ॥
मोहाया न करावा प्रांजलि जो मीं मयूर या तर्जर ।
आप्त मुदित हो ! सुखवा हरिनामाचा करूनियां गजर ॥ ६ ॥

---

## १७ आरती, अभंग, पदें वगैरे.

### आरती रामाची.

ऐक बा रामराया ! तुझ्या वंदितों पाया, आवरी आपुली हे विश्वमोहिनी माया ॥ ध्रु० ॥ मीं मूढ, हीन, दीन, सर्वसत्क्रियाहीन । तूं क्षमाशील देवा ! शुद्धचरितनिजाधीन ॥ १ ॥ घडो सदा साधुसंग, नसो

---

१ पृथ्वी. २ माझें मुख. ३ दुखणेकऱ्याला पेजेचें पाणी देतात त्यास 'तरण' ह्मणतात. ४ गोंधळ. ५ यांतील बहुतेक भाग आजवर अप्रसिद्ध असाच आहे. पंतांचीं पद्यें सुमारें साठ आहेत व तीं पंताचे मित्र चातुर्मासे यांचे दप्तरीं व स्वतः त्यांचेही दप्तरीं आहेत. ६ सदाचारसंपन्न अशा स्वभक्ताच्या अधीन.

विषयप्रसंग । सप्रेम भक्ति द्यावी; सत्व वैराग्य अभंग ।। २ ।। वाटें नित्य भावें तुझे साधुगुण गावे । मन हें आवरेना सांग काय म्यां करावें ।। ३ ।। करितां संसारकाम, मुखीं असो तुझें नाम । दयाघना भक्त मोर याचा पुरविसी काम ।। ४ ।।

---

## अभंग.

१

तूं मळों नेंदिसी महानदी नातें । लहान दीनातें न म्हणसी ।। १ ।।
तुझ्या पुण्यजळीं जो करी मज्जन । तयातें मज्जन म्हणे विष्णू ।। २ ।।
दयाकादंबिनी सर्वदा समोर । सर्व दासमोर नाचविसी ।। ३ ।।

२

प्रसन्न तूं देवा काळभैरवा हो । काळ वैर वाहो, नसे भय ।। १ ।।
कळिकाळावरी तुझी आहे सत्ता । दंडिसी तूं मत्ता सुरेशाही ।। २ ।।
शरणागत हा मयूर हें जाण । करि परित्राण कृपासिंधो ।। ३ ।।

३

राहोनियां संतापासीं । संतापासीं भांडती ।। १ ।।
पावे तोष तोक थानीं । तो कथांनीं पावती ।। २ ।।
रामतोयदासमोर । दास मोर नाचती ।। ३ ।।

## पद्यें.

१

वरें असा विभो दे कीं वत्सा गा मल्लीला ।। ध्रु० ।।
पदवी श्रीची गोपीकांला । वैकुंठीची दिधली बल्लवपल्लीला ।। १ ।।
तुझ्या कीर्तिमात्रेपुढें । न पुसे कोणी धन्वंतरितें खल्लीला ।। २ ।।

---

१ हे गंगे! हा अभंग व पुढला अभंग उघड काशीस रचलेले आहेत. २ हा अभंग पंतांनीं स्वहस्तानें लिहिलेला चातुर्मासे यांचे घरीं सांपडला. एका कार्डाएवढ्या चिटोरीवर लिहिला आहे. ३ संतांजवळ राहून त्रिविध संतापांशीं भांडतात—त्यांना जिंकतात. ४ हें पद्य अद्याप रामनवमीमहोत्सवांत पंतांच्या घरीं म्हणतात.

भक्तमयूरसुखघना । न सुरद्रुम याचक नीचाच्या गल्लीला ।। ३ ।।

२[1]

धणी तो माझा रघुवर धणी । जो मुनीस दे सुखधणी ।। ध्रु० ।।
मथुनि ताटिका कौशिकमुनिमख रक्षुनि लेंकुरपणीं ।
भर्गचाप भंगूनि जानकी प्रणिली दुस्तर पणीं ।। १ ।।
जनकाज्ञेहुनि राज्यरमाही मानुनियां ठेंगणी ।
सपत्नीक सानुज विपिनातें नृपधानीसें गणी ।। २ ।।
खरप्रमुख नक्तंचर खरतरशरें वधुनियां रणीं ।
शिवागृध्रबलिभुग्गादिकांचीं धडवी जो पारणीं ।। ३ ।।
युवतिचोर दशवदन थोर जो प्रबळ सकळखळमणी ।
मथुनि पुत्रमित्रांसह जेणें सोडविली स्वरमणी ।। ४ ।।
ज्याची पदयुगली जनशोकद्रुम आमूलहि खणी ।
मयूरासि घन चकोराशि विधु असि सुखदा देखणी ।। ५ ।।

३

केलें[२] पावन सदया रामारे । रामारे सुखधामा रे ।। ध्रु० ।।
पातकपर्वतपविपदपद्मा उद्धरिलें घनश्यामा रे ।। १ ।।
स्वांतीं संतत चिंतित होतें पूरविलें मनकामा रे ।। २ ।।
मद्देहोपलसंस्पृशारुण जाला पदगुणग्रामा रे ।। ३ ।।
अशनीं पानीं शयनीं गमनीं स्वमनीं गाइन नामा रे ।। ४ ।।
प्राणाविसांवा तूं करुणाब्धे बोले गौतमवामा रे ।। ५ ।।

४

धन्य धन्य धन्य तुका वाणी ।। ध्रु० ।।
अमृतरसाची क्षितिवरि साची । सिंधुचि ज्याची वाणी ।। १ ।।
डोलवितोचि जडा अजडाही । प्रभुच्या वेणूवाणी ।। २ ।।
मोराघनीं श्रोत्यां ज्याचे अभंगीं । हर्षासि नाहीं वाणी ।। ३ ।।

---

१ पंतांचें एकपदी रामायण म्हणून एक होतें तें हेंच असावें असें मला वाटतें. या पदाचे शेवटीं पंतांचें नांव नाहीं तरी हें त्यांचें हातचें लिहिलेलें त्यांचे घरीं बांच्या पदसंग्रहांत आहे; तेव्हां याच्या कर्त्याविषयीं संशय राहत नाहीं.

५

अहो अहो प्रभुजी पळभरि रहा ।
उद्धरिले बहु एकचि उरलों दीन मजकडे पहा ॥ ध्रु० ॥
तडतड तोडिति करिति विकळ खळ कामादिक वृक सहा ।
गृहगहनीं भ्रमलों तापत्रयवणवा दुःसह महा ॥ १ ॥
पंकपतितधेनूद्धरणाला संमति देतिल दहा
शरणागतविकलोद्धृतिकृतिवर ह्मणती महिमा महा ॥ २ ॥
अजि करुणाघन ! साहेल कसा भक्तमयुर विरहा।
सर्वपतितपावन हें अपुलें बिरुदहि त्यजितां अहा ॥ ३ ॥

६

नाम निगम[1]शतसार ॥ ध्रु० ॥
तारित आलें तारितसे हें । तारिलहि पुढें फार ॥ १ ॥
यातें धरिती कंठीं प्रेमें । कवि न मणिचा हार ॥ २ ॥
जेंवि मयूरा जलध[२] तसां । जीवां करितें गार ॥ ३ ॥

७

न[२] भुले सुरसदना कीं । सुरसद नाकीं हेंच ॥ध्रु० ॥
नामरता अंधाहि न लागे । मार्गीं कांटा ठेंच ॥ १ ॥
अमृतें मुकले स्वहिता चुकले । उकले नामें पेंच ॥ २ ॥
भवभुजगाचा नाम मयूर । ध्यानें उतरे रेंच ॥ ३ ॥

८

सुख जें खरें तें नामानें ॥ ध्रु० ॥
न बहुतुरगगजरत्नविराजित–। मणिकांचनमय धामानें ॥ १ ॥
वृद्धपणीं नवसानीं झाल्या । न कुमराच्या दामानें ॥ २ ॥
न स्वर्गींच्या गानें पानें । सुरपुष्पाच्या दामानें ॥ ३ ॥
भक्तमयूर म्हणे रसने हें । सत्य म्हणावें रामानें ॥ ४ ॥

---

१ अनेक शास्त्रांचें सारभूत. २ मीं देवसदनाला ह्म. स्वर्गाला भुलत नाहीं याचें कारण स्वर्गीही देवांना अत्यंत रस ह्म. हर्ष देणारें हेंच नाम आहे, नामावांचून देवांनाही परमानंदकर दुसरें कांहीं नाहीं.

९

रसने न राघवाच्या थोडी यशांत गोडी ॥ ध्रु० ॥
निंदास्तुती जनाच्या । वार्ता वधूधनाच्या ।
खोव्या व्यथा मनाच्या । कांहीं न यांत जोडी[1] ॥ १ ॥
साधूंचिया सदांतें, । सुख देतसे सदा तें ।
श्रवणीं सुधा मदातें । सोडूनि हात जोडी ॥ २ ॥
विनवी मयूर भावें । सखि ! हेंचि नित्य गावें ।
मजला द्रवोनि पावें । दुसरें न बंध तोडी ॥ ३ ॥

१०

वद नामचि तें सार । रसने ! ॥ ध्रु० ॥
गोरस मधुरस इक्षुरस सुधारस,नवरस तेहि असार ॥ १ ॥
तळमळसी किति ? करिसी कीं हे वेडे वेडे चार ॥ २ ॥
भक्तमयूरकृपावन राघव, उघडित मुक्तिद्वार ॥ ३ ॥

११

[2]अगइ असुख रचीतो । असु खरचीतो नंद ॥ ध्रु० ॥
कोण्ही प्रत्याख्यान न करिती । बल्लव केवळ मंद ॥ १ ॥
क्रूरचि मेला काढुनि नेतो । व्रजसुखवल्लीकंद ॥ २ ॥
आम्हां कृष्ण मयूरां घन कीं । जेंवि पिका माकंद ॥ ३ ॥

१२

सदये प्रभो तूं हो पावे ॥ ध्रु० ॥
जन्मापासुनि चुकताचि आलों । कीं जड मी न सुझें कोपावें ॥ १ ॥
मदधिकदीना प्रेम दिल्हें जें । तेंचि मला सुदीना वोपावें ॥ २ ॥
भक्त मयूर असें जन म्हणती । त्वद्यशें न रामा लोपावें ॥ ३ ॥

---

१ लाभ. २ सभेला, समुदायाला. ३ अडथळा.

# २ कविता व कवितारसज्ञ.

सच्चेत: कैरवांतें विकच करि, जगत्ताप संपूर्ण टाळी,
अज्ञानध्वांत सारें हरि, रसिकचकोरांसि अत्यंत पाळी, ।
नाना वस्तु प्रकाशी, कविहृदयपयोराशिसंतोषहेतु,
काव्येंदु[1] स्वप्रभेनें खळविरहिजनीं[2] होतसे धूमकेतु ॥ १ ॥
सुयश न जयांत हरिचें, चित्रहि[3] गुणभवन कवन तें अशुची ।
त्यांत सुमति नर न रमति पळही, बहु मानिती तया पशुची[4] ॥ २
देवाचीं ज्यामध्यें नामें सुयशोंकितें प्रतिश्लोकीं ।
अघ नुरवीच अबद्धहि[5] असतां तो वाग्विसर्ग या लोकीं ॥ ३ ॥
धातूंत जसें हाटक[6], नाटक वर सर्व सुप्रबंधांत ।
तें अरसिकांत संप्रति निष्फळसें मुकुर जेंवि अंधांत ! ॥ ४ ॥
रस न समजती, म्हणविति रसिक,म्हणुनि चित्त बहुत हळहळतें ।
जें तन्निंदक भाषण होतें कर्णांत तप्त हळहळ तें ॥ ५ ॥
थोरांहीं स्तविले कवि तन्निंदा तिळहि सोसवत नाहीं ।
मज सुरस ग्रंथांहीं वृत्तिपरा जेंवि सोस वतनाहीं[7] ॥ ६ ॥
सद्व्यसनीं वेंचावें आयुष्य, नसेचि भरंवसा याचा ।
जालों जीर्ण तरि मनीं आहे रसिकांत भर वसायाचा ॥ ७ ॥
तूं ‘ यत्करोषि[8] ’ ऐसें वदलासि, दिलें तयासि मन पार्थें ।

---

१ येथें काव्यावर चंद्राचें रूपक केलें आहे व तें सर्व बाजूंनीं सुरेख बसविलें आहे. २ चंद्र विरही जनांना तापप्रद होतो, तसें काव्य खळांना तापद होतें. ३ विविध गुणयुक्त ४ त्याला मान देणारे विषयरत पुरुष पशूच समजावे. ५ साहित्यशास्त्राच्या नियमांना सोडून जरी तो वाग्विसर्ग असला तरी तो पाप हरण करितो. ६ सुवर्ण. ७ मराठ्यांना वृत्तीचें महत्त्व इतकें आहे कीं ते इंचभर जमिनीसाठीं प्राण देतील. या उपमेनें कवीनें आपलें सुरस ग्रंथावरचें उत्कट प्रेम चांगलें व्यक्त केलें आहे. ८ ‘ यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ’ ( भ. गी. अ. ९ श्लो. २७ )

कवि वाङ्मयें तपें तुज अर्पिति तीं जाहलींच अनपार्थे[1] ॥ ८ ॥
घेती सर्वत्र मधुप रस कीं हरिभक्त साधु सुरसिक ते ।
असते रसज्ञ; अमृतीं नच रमते, साधुसूक्ति सुर सिकते[2] ॥ ९ ॥
ज्यांच्या हृत्कासारीं होय गुणस्नेहबिंदुही फार ।
सारज्ञ असूयोज्झित, त्यांला माझा असो नमस्कार ॥ १० ॥

---

## १ संस्कृत कवि.

श्रीमत्सद्गुरु नारद वाल्मीकि व्यास शुक कवीश मनीं ।
आणुनि नमितों भावें जे मोहतमाचिया रवी[3] मनीं ॥ १ ।
मुनिकृति[4] नमिल्या श्रीमद्रामायणभारतादि ज्या माता ।
पाजिति जगा अपत्या अमृत, जसे सोम दक्ष जामाता ॥ २ ॥

---

## वाल्मीकि.

वाल्मीकि विप्रोत्तमकाव्यपद्म । श्री रामलीलामकरंदसद्म ।
तेथें मयूरेश्वर भृंग झाला । सेवावया नित्य सुखें रसाला ॥ १ ॥
झालासि पढविता प्रभुपुत्रांतें रचुनि तूं सुकाव्यास ।
देवर्षिवरें जैसें निववाया भागवत शुका व्यास ॥ २ ॥
तें आयके स्वयें प्रभु, हयमेधीं सत्सभेसि आयकवी ।
नायक विद्वांसांचा निवुनि म्हणे, ‘ रचिल अन्य काय कवी ? ’ ३
चरित श्रीरामाचें जें शतकोटिप्रविस्तर, तशातें ।
तूं सुललितप्रबंधें रक्षक सुकविच बलप्रद यशातें ॥ ४ ॥
झाले जे तृप्त भास्वत्कुलतिलकरघूत्तंसलीलारसानें[5] ।
सारासारज्ञ[6] साधु स्वमनिं अमृतही मानिती फार सानें ।

---

१ निरथक नव्हेत अशीं. २देव जर खरे रसज्ञ असते तर अमृताला टाकून अमृतापेक्षांही मधुर जो काव्यरस ( सज्जनांच्या वाणींतला रस ) तेथें रमले असते. ३ जे देहपुत्रकलत्रादिकांच्या ठायीं जो मोहरूप अंधार तो नाहींसा करणारे सूर्य आहेत. ४ मुनींचे ग्रंथ. ५ सूर्यकुळांतला श्रेष्ठ राजा जो राम त्याच्या चरित्राच्या आस्वादानें. ६ तत्त्वज्ञ.

पीयूषें सोदरें दुःक्षयहि न हरिला, त्यागिलेंही पित्याला,
राहूचा घात केला, विषसहजनिला कोण सेवील त्याला ? ॥ ५
वाल्मीकिगीत सेविल कोणी श्रीरामचरित जरि लवही ।
तरि यमधर्म तयाचें कर्म लिहाया करीं न धरिल वही ॥ ६ ॥

---

## व्यास.

श्रीमद्वेदव्यास चरण । ज्ञान देती करितां स्मरण ।
संसारपंकांतूनि उद्धरण । केलें येणें विश्वाचें ॥ १ ॥
सर्व श्रुति सर्व स्मृति । जीं जीं शास्त्रें पुराणें असती ।
त्या सकळांतें महामती । भारतामाजीं सांठवी ॥ २ ॥
शब्दब्रह्मसागर मथिला । अमृतें इतिहासकलश भरिला ।
साधुशिष्यांच्या हातीं दिधला । जाड्यरोगार्तां पाजावया ॥ ३ ॥

---

भव्य महाभारत हा रचिला इतिहास, पांचवा वेद ।
याच्या श्रवणें न उरे अज्ञान, तदुत्थ सर्वही खेद ॥ १ ॥
व्यासा बा ! साक्षात् तूं नारायण, जडजनांसि ताराया ।
अवतरलासि दयार्णव बोधें अज्ञान सर्व साराया ॥ २ ॥
तुझिया सूक्तिश्रवणें लेशहि तापत्रयें न बाधावें ।
बाळें स्तन्यें, अन्यें अमृतरसेंही असें न बा ! धावें ॥ ३ ॥
होतिल बहु कलिमलिन प्राज्ञ, जन न पावतील भव्यास ।
यास्तव करी चतुर्धा वेद विभागासि म्हणुनि तो व्यास ॥ ४ ॥
ऐसा भगवान् व्यास ब्राह्मणरूपें मुकुंद अवतरला ।
जन ज्याच्या उपदेशें निजहित जाणुनि सुखेंचि भव तरला ॥५॥
त्या श्रीव्यासप्रभुतें वंदुनि मीं भारतेतिहासरस ।
पाजीन तुम्हां श्रोत्यां, अमृतरसाहूनि फार हा सरस ॥ ६ ॥
पळही जसें स्वरूपा ज्ञाते, विसरति न विप्र भागवता ।
ग्रंथ असा न पर, न दे दर्भत्व वरुनि नवि प्रभा गवता ॥ ७ ॥

---

१ येथ रामचरित्ररसाहून अमृत कमी कां हें दाखविलें आहे. २ भव्य=कल्याण.

मोहहि नसतां गावीं जीवन्मुक्तींहि संहिता बा ! हे ।
श्रीहरिच्या अत्यद्भुत महिमा ऐसाचि सद्गुणीं आहे ॥ ८ ॥
वाचावे एकावे भागवतांतील उत्तम श्लोक ।
कीं अर्ध, पाद, तारिल या इतुक्यानेंचि उत्तमश्लोक ॥ ९ ॥

---

## २. मराठी कवि.

—:०:—

### ज्ञानेश्वर.

ज्ञानेशा ! भगवंता ! भगवज्जनवल्लभा ! महा सदया ! ।
कलियुगवर्ती जन जो, देशी, स्मरणेंचि, मुक्तिचें पद या ॥ १ ॥
श्रीमद्भगवद्गीताव्याख्या केली जगासि ताराया ।
सारा या सद्ग्रंथा सेविति, संसारताप साराया ॥ २ ॥
श्रीहरिहरकीर्ति तशा बा ! विश्वास प्रिया तुझ्या ओव्या ।
जो व्यास तोहि बहुधा म्हणतो, 'श्रुतिशाचि या मला होव्या'॥ ३॥
ज्ञाता शिष्यासि म्हणे, 'प्राकृत दिसतो परंतु न तसा रे; ।
गोपप्रभुसा अमृतानुभव, तया पाहि सुजन नत सारे' ॥ ४ ॥
ज्ञानेशा ! त्वत्कृतितें करिती ज्ञाते समस्तही प्रणती।
ज्ञानेश्वरी भवानी होय महामोह महिष हे म्हणती ॥ ५ ॥
शंकर निवृत्ति, हरि, ! तूं ज्ञानेश, ब्रह्मदेव सोपान ।
विद्या मुक्ता; तुमच्या कीर्तिसुधेचें सदा असो पान ॥ ६ ॥

---

१ व्हाव्यात. हें 'होणें, या क्रियापदाचें रूप लक्षांत ठेवण्यासारखें आहे. स्मरणीं-ही 'व्हावीस,' बद्दल 'होवीस' असें रूप आलेलें आहे. २ गवळ्यांत जसा श्रीकृष्ण श्रेष्ठ तसा प्राकृतग्रंथांत अमृतानुभव श्रेष्ठ होय. ३ मिथ्यासृष्टीच्या ठायीं सत्यत्वाचा आरोप करून जीव देहगेहादिकांच्या मायेंत गुंततो. महिषासुराचा वध भवानीनें केला त्याप्रमाणें ज्ञानेश्वरी या महामोहाचा निरास करिते.

[stamp] ... मं. ... ता. ... मासिक शाखा

## नामदेव.

श्रीनारदमुनिचें जें सुमहद्व्रत, तेंचि नामदेवाचें, ।
याणें प्रसिद्ध केलें विठ्ठलें हें भव्य नाम देवाचें ॥ १ ॥
भक्तिप्रताप लोकीं अत्यद्भुत याचि नामदेवाचा; ।
परमप्रिय भक्त, सखा कीं, आत्मा आप्तकाम देवाचा ॥ २ ॥
किंबहुना नाम्याची भक्ता दासी जनी तसी वाणी; ।
खाणी पातक, आणी तरिच खळाच्याहि लोचनीं पाणी ॥ ३ ॥
उद्धव, अक्रूर, प्रियभक्त श्रुतदेव, बहु असे कोटी ।
परि याचि नामदेवीं प्रीति चरमबाळकीं तसी मोठी ॥ ४ ॥
श्रीनामदेव, तुकया, तदभंग प्रभुसि गोड घांस तसे ।
गर्हिवरतसे परिसतां, नाचतसे, पांडुरग, हांसतसे ॥ ५ ॥
भक्तिसुखाधिक मानुनि मुक्तिसुख कदापि याचिना, म्यां तें ।
अत्यद्भुत आयकिलें सद्वृंदीं नमुनि याचि नाम्यातें ॥ ६ ॥

---

## एकनाथ.

भूतदया संसारीं एकोपंतास निरुपमा वडली ।
जडली आंगासींच क्षांति सदा; शांति तों गळां पडली ॥ १ ॥
भूताराधनयज्ञीं समदर्शी एक परम हा रमला ।
द्रवुनि म्हणे, ‘ पितन्नें भोज्य, जगन्निंद्य पर, महार मला;’ ॥ २ ॥
एकोपंत जनार्दनपंताचें भजनही असीम करी ।
याची मति गुरुचरणीं, भक्ष्यीं घालि न मिठी असी मकरी ॥ ३ ॥
श्रीज्ञानेश्वर भेटे एकोबाला, तसाचि अत्रिज गा ! ।
हें किति ! दास्य करि प्रभु, ज्याहुनि आधार अन्य न त्रिजगा ॥ ४
ग्रंथ श्रीभागवत, श्रीरामायण, करी सुविस्तर; ते ।
जरि न रचिता दयानिधि, केवळ जड जीव तरि कसे तरते? ॥ ५ ॥

---

१ विष्णु ( विश्वव्यापक परमात्मा ) या शब्दाचें प्राकृत रूप विट्ठु असें झालें व विठ्ठचा विठोबा, विठ्ठल अशीं रूपें झालीं.

विश्वेश्वर अविमुक्तीं, विठ्ठल पंढरपुरीं, प्रतिष्ठानीं ।
प्रभु एकनाथ, वरिला सर्वमहितदैवतप्रतिष्ठानीं ॥ ६ ॥
नमिला शमिलास्यप्रद शांतिजलधि एकनाथ तो भावें ।
शोभावें ज्याचें यश विश्वीं, ज्या देववृंद लोभावे ॥ ७ ॥
भोजन दे चोराला, आदर आग्रह स्वयें करी मोठा ।
साधु प्रसन्नचित्तें बांधुनि लागे वहावया मोटा ! ॥ ८ ॥

---

## रामदास.

द्विज ' सावधान ' ऐसें सर्वत्र विवाहमंगलीं म्हणती ।
तें एक रामदासें आयकिलें; त्या असो सदा प्रणती ॥ १ ॥
कामजयें रघुवीरप्रेमें, हनुमदवतार हा सत्य ।
भवरोग हरुनि येणें लाजविलें, देववैद्य नासत्यं ॥ २ ॥
सर्वत्र रामनवमी परमोत्सव, परमधर्म चालविला ।
द्विजतर्पणसंकीर्तनयोगें कालिकाल दूर घालविला ॥ ३ ॥
शिवराजास ज्ञानद जो, जैसा याज्ञवल्क्य जनकास ।
तरले भवार्णवीं बहु दृढतर त्याची धरूनि जन कास ॥ ४ ॥

---

## तुकाराम.

नरकांतुनि काढितसे, काढुनि बहु पतित, पातुकावाणी; ।
तो गुरु कसा नव्हे हो ? ज्ञानांबुधि अति तपा तुका वाणी ॥ १ ॥
भक्तरसचि मूर्त, असा करिति बृहस्पतिशतक्रतु कयासें ।
कीं वाटे भगवद्यश सुरभीपय, अमृत तक्र तुकयास ॥ २ ॥
विमद, विराग, विमत्सर; तृप्ति सदा सुगुण हे तुकारामीं ।
ते कैचे स्वर्गींच्या विविधविषयलाभहेतुकारामीं ! ॥ ३ ॥
साधुसभाप्राणप्रिय, ज्याचे निर्दोष, युक्तिमदभंग ।
भगवज्जनेतराचा करिती ज्यांतील उक्ति मदभंग ॥ ४ ॥

---

१ शमगुणसंपन्न जे महायोगी त्यांना आपल्या अनुपम शांतिगुणानें नाचायला लावणारा. २ अश्विनीकुमार. ३ अंदाज.

ज्याचे अभंग लागति खळहृदया, जेंवि बाण रामाचे[1] ।
ज्या परवाद न मोहिति; शर जैसे ईश्वरासि कामाचे ।। ५ ।।
स्वात्मानुभव पहातां; तुकया केवळ सखाचि जनकाचा ।
वैराग्यें डोलविला माथा जेणें मुनींद्र सनकाचा ।। ६ ।।
ज्याच्या सदभंगातें सेवी जन, जेंवि बाळ आत्म्यातें ।
घनसा म्हणे भरावें सुरसें, जें मुख करील आ, म्यां तें ।। ७ ।।
ज्याच्या[2] होय अभंगांवांचुनि होऊनि हरिकथा नाहीं ।
श्रोत्यांसि अभंगांही ती दे, जासि माय हरिख थानांहीं ।। ८ ।।
सुज्ञ शिवाजी राजा न ह्मणे तुकयासि काय सुधा निका ? ।
तत्पंडित[3]प्रधाना न कळे गुण; समज फार आधुनिका ! ।। ९ ।।
प्रभु आपण शतमखसा, सदभंग प्रकट जो करी घनसे ।
नाचति मयुरसे हरिभक्त, ह्मणे ज्यांत शोकरीव नसे ।। १० ।।
भगवद्भक्ति कराया बहुजड जीवांसि जो तुका शिकवी ।
त्याच्या दुसरा धरणीवरि येइल कोण हो तुकासि कवी ? ।।११।।

## वामनपंडित.

सुगुण, श्रीहरिभक्त, ख्यात; ज्ञात्या जनांत हा शुकसा ।
बहुजन्मसिद्ध; ऐसा साधेल सुपक्वयोग आशु कसा ? ।। १ ।।
काम न वामनचित्तीं मोक्षाचा कृष्णभक्तिवांचून ।
भगवद्भजनाचि केलें अनुदिन; किमपि न तदन्य वाचून ।।२।।
श्रीहरिचीं बहु रचिलीं, देती जीं हर्ष नित्यनव चरितें ।
भक्तिज्ञानरसभरित यत्कवन; जयांत एक न वच रितें[4] ।।३।।

---

१ रामाचे बाण जसे खळ जे राक्षस त्यांच्या हृदयास लागून त्यांना अंतीं मोक्ष देतात त्याप्रमाणें तुकोबाचे कडाकेही दुर्जनांच्या मर्मीं झोंबतात पण त्यांना गतिदायकच होतात. २ यावरून मोरोपंतांच्या वेळेपर्यंत तुकोबांच्या अभंगांना कीर्तनांत कसें अग्रस्थान मिळालें होतें हें दिसतें. ३ शिवराजा साधुसन्तांना फार मानीत असे, तसे पेशवे हे साधुसन्तांचे गुणग्राहक नाहींत असा कवीचा अभिप्राय दिसतो ! ४ या पंडितावरच्या अभिप्रायांत पंतांनीं फारच विमलमनस्कता प्रकट केली आहे.

केली श्रीगीतेची व्याख्या, बहु भक्ति जींत गाजविली ।
साजविली साधुसभा, भाषाकविकवनशक्ति लाजविली ॥४॥
रीति समश्लोकीची अतुला, साधेल काय नव्यांस[2] ।
या सुयशें होइल कां रोमांचव्याप्तकाय न व्यास ? ॥ ५ ॥
वाटे सूक्तिश्रवणें मस्तक वाल्मीकिनेंहि डोलविला ।
प्रभुनें भुलवाया मन, वामन हा वेणुसाचि बोलविला ॥ ६ ॥
अन्यत्र नसे कवनीं यावे रस सर्व, हा नियम कांहीं ।
केली, भाषाकवि जे, त्यांची तो गर्वहानि यमकांहीं ॥ ७ ॥
वामन वामन साक्षात्, तरिच असा हा महातपा वेधी ।
बहुसुख हरिदासांची, ज्याच्या कृतितें पहात, पावे धी ॥ ८ ॥

---

## महिपती.

श्रीहरिभक्तजनांचीं जी श्रीहरिभक्तिसत्सुधाभरितें ।
चरितें गातां, जेणें आयुष्य क्षण पडों दिलें न रितें[3] ॥ १ ॥
हरिभक्तविजयनामें रचिला सद्ग्रन्थ, दोष साराया ।
वाराया तापातें, प्राणी भवसागरांत ताराया ॥ २ ॥
त्या महिपतितें पाहुनि, ऐकुनि, सच्चित्त कां न लोभावें ? ।
शोभावें यश ज्याचें चिर, नमिला विष्णुदास तो भावें ॥ ३ ॥
ज्याचा ग्रन्थ हरिजना सेव्य, चकोरां जसा सदा इंदु ।
जो पसरला जगांत, स्नेहाचा सत्सरीं जसा बिंदु ॥ ४ ॥
सत्य तुकारामाचा, या महिपतिवरि, वरप्रसाद असे ।
सदनुग्रहाविणें हे निघतिल उद्गार काय सार असे ? ॥ ५ ॥
साधूंचें यश गाया, प्रेमें देवूनियां सुभा केला ।
निःसंशय ताराया जड, महिपति विठ्ठलें उभा केला ॥ ६ ॥
महिपतिच्या वाणीतें सेवुनि तरतात, जेंवि गंगेतें ।

---

१ भाषाकवि म्ह० मराठा कवी, भाषाग्रंथ म्ह० मराठी ग्रंथ. २ नवीनास ३ पंतांचा हा आपल्या समकालीन कवीवरचा अभिप्राय अगदीं अक्षरशः खरा आहे. महिपतीचा उद्योगच अव्याहत जन्मभर चालला होता.

विषयांत रंगलें जें जनमानस, सद्यशींच रंग तें ॥ ७ ॥
ज्ञानोबाची जैशी, एकोबाची सुधा जशी वाणी ।
कीं, मुक्तेश्वर कविची; महिपतिची सेविती तशी प्राणी ॥ ८ ॥

## मुक्तेश्वर.

श्रीमुक्तेश्वर कविवर यातें कोण न शुभेच्छु वंदील ? ।
बंदी लक्ष जयाचें, ज्याचें यश भव्य जेंवि मंदील ॥ १ ॥
मुक्तेश्वरकृत भारत आवडतें विठ्ठलासि, कीं पर्व ।
सर्व श्रवणें हरितें आशा कविंच्या अशेषही गर्व ॥ २ ॥

## इतर कवि.

वंदन नंदनसा मीं करितों भावें **मुकुंदराजाला** ।
वश झाल्या सद्विद्या सत्कीर्ति, सुमुक्ति, सुंदरा ज्याला ॥ १ ॥
जरि शुचिमूर्ति, सुवृत्ता, मान्या श्रवणोचितें गुणें मुक्ता ।
विद्धा जडाहि ते, हे अगुणाही तीस करि उणे **मुक्ता** ! ॥ २ ॥
श्रीरामदाससेवारत तो भरतावतार **कल्याण** ।
दुर्वारकामसिंहीं त्या वीरें घातलेंचि पल्याण ॥ ३ ॥
हरिविजयग्रंथातें मग आधीं **श्रीधरासी** वंदीन ।
शिववंदनकामांहीं लंघावा प्रथम देवनंदी नें ॥ ४ ॥
कीर्तनसुखार्थ झाला अवताराचि **अमृतराय** जीवांचा ।
भलत्या मुखांतुनि अशी सुरसखनि निघेल काय जी वाचा ? ॥५॥
जो भक्तिसरित्पूरीं षडरींची सर्व वाहवी सेना ।
रुचला मनास बहुताचि तो भगवद्भक्त **नाहवी सेना** ॥ ६ ॥
**आनंदतनय** अरणीकर शोभवि फार कवन यमकांहीं ।
तत्सूक्ति पाठ ज्याला त्याचें पाहे न भवन यम कांहीं ॥ ७ ॥
**विठ्ठलकविच्या** भलता लंघूं न शकेचि चित्र कूटांतें ।
प्रबळतरहि पर जेंवि श्रीरामनिवास चित्रकूटातें ॥ ८ ॥

---

१ मुक्ताबाई, यांतील श्लेष सर्वांग सुंदर आहे. २ खोगीर. ३ खरी आर्या मुळांत अशी आहे. या आर्येची आजवर उगाच ओढाताण झालेली आहे. ४ बृहस्पतीचा.

नरहरिनामा पावे संत न सोनार दास मान कसा ? ।
तरला करुनि भवाचा अंत, नसा नारदासमान कसा ? ॥ ९ ॥
गावा नच मानावा चोखामेळा महार सामान्य ।
ज्याच्या करि साधूंचा चोळा मेळा महारसा मान्य ॥ १० ॥
लाजविलेचि निजयशें दुग्धाब्धितरंग रंगनाथानें ।
भक्तिज्ञानें ज्याची मति पोषी जेंवि अंगना थानें ॥ ११ ॥

## ३. हिंदुस्थानी कवी.

### महाराष्ट्रेतर प्रांतांतील कवि.

हिंदुस्थानी भाषा ग्वालेरी गोड तीहि पंजाबी ।
सुरसिक कवि म्हणति इची तूंचि श्रीकृष्णपादकंजा बी ॥ १ ॥
श्रीसूरदासतुलसीदासकबीरादिसुकविकवनांतें ।
सोडुनि लावील कवण रसिक दुजासी रिझोनि नव नातें ? ॥ २ ॥

### तुळसीदास.

श्रीवाल्मीकिच जाला श्रीतुळसीदास, रामयश गाया ।
तरिच प्रेमरसाची खाणी वाणी तशीच वशगा या ॥ १ ॥
याचें सुप्रेमभवन कवन निववितें सदा बुधा सरसें ।
हें जों जों सेवावें, तों तों सेव्यचि गमे, सुधासरसें ॥ २ ॥

### माधवदास.

बहु शांति, क्षांति, दया, पाहुनि, षड्रिपु करीत होते रे ।
त्या माधवदासातें स्त्री हाणी, करुनि कोप, पोतेरें ॥ १ ॥
तद्वर्ति करुनि दीप, प्रभुपाशीं तच्छिवार्थ तो लावी ।
कोणाच्या शांतीशीं हे माधवदासशांति तोलावी ? ॥ २ ॥
साधु म्हणावें म्हणती नर माधवदास साधु याला जे ।
अतिसारीं पट ज्याचें न रमाधव दाससा धुया लाजे ! ॥ ३ ॥

### कबीर.

श्रीराम याचि नामीं, न म्हणुनि अल्ला, खुदा, नबी, रमला ।
झाला पुष्पें तुळसी; स्तवितां तारील तो कबीर मला ॥ १ ॥
श्रीरामभक्त मोठा ज्ञानी वाटे कबीर हित मातें ।
दोहा तो रविच गमे; हरिल तयाचा अबीरहि तमातें ॥ २ ॥
परमचमत्कारवती, साधुमता, श्रुति जशा, तशा उक्ति ।
ज्याच्या ब्रह्मज्ञानामळमौक्तिकरत्नगर्भिताशुक्ति ॥ ३ ॥
माया हे संसृतिची जाळूनि सशोक तो कवी रमला ।
रामपदाब्जीं अलिसा; बहुमत सुमुदोक तो कबीर मला ॥ ४ ॥

---

### नरसीमेहता.

नरसिंहनाम महता, अहतामळकीर्ति, भक्त नागर हा ।
'याच्या वैभवगानीं' स्वमुखसहस्रा म्हणेल नाग 'रहा' ॥ १ ॥
राधादिगोपिकांशीं जगदीश्वर जे स्थळीं करी रास ।
तेथें शिवप्रसादें पावे, न त्यागितां शरीरास ॥ २ ॥

---

### नाभाजी.

कथिलें भागवत तुवां इंद्रप्रस्थाकडील विप्रासी ।
हे कीर्ति 'भक्तमाला' कथिती, जिस सर्व सत्कवि प्रासी ॥ १ ॥

---

## ४. भगवद्गीता व तिचे टीकाकार.

गीतासुधानदींत स्नानें जाताति ताप, मळ सर्व ।
सर्वज्ञत्व सहज ये, गर्व पळे, स्तविति देव गंधर्व ॥ १ ॥

---

१ यांत व्यास, शंकराचार्य, मधुसूदन वगैरे संस्कृत टीकाव्याख्यानकार व ज्ञानेश्वर, वामन हे मराठी टीकाकार यांचा उल्लेख असून शेवटल्या आर्येंत पंतांनीं आपल्या समश्लोकीचा उद्गार केला आहे. सर्व टीकांत ज्ञानेश्वरीवर त्यांची विशेष भक्ति होती हे उघड आहे. इतर टीकाकार गीतादेवीचे सचिव व ज्ञानेश्वरी तिचा प्रतिनिधि असे म्हणण्यांत व ज्ञानेश्वरी नेईल तिकडे गीता जाते असें म्हणण्यांत पंतांनीं ज्ञानेश्वरीचें श्रेष्ठत्व व्यक्त केलें आहे.

अमृतप्रपा उदारें सदयें कृष्णें विनिर्मिली मोठी ।
घोंटीना तो वेडा, स्वमुखें आकंठ सांठवा पोटीं ॥ २ ॥
श्रीमद्भगवद्गीते ! वर्णावें आदरें तुला नमुनी ।
सर्वोपनिषत्सारे ! माते । तुज पाहती तुला न मुनि ॥ ३ ॥
भगवद्गीते ! ज्ञात्या अधिका तुजहुनि सुधानदी नाहीं ।
त्वद्भक्ता तापाहीं, भय जेंवि दिजे बुधा न दीनांहीं ॥ ४ ॥
तुज भजत्या संसारीं वसतां, गतिलाभ होय जो गीते ! ।
त्यासि न पात्र भ्रमति, श्रमति व्यर्थचि तपोनि, जोगी ते ॥ ५ ॥
तव सचिव द्वैपायनशंकरमधुसूदनादि योगी ते ।
ज्ञानेश प्रतिनिधि हें वर्णन तुझिया मनास यो गीते ! ॥ ६ ॥
युवराज तुझा वामन वाम न मानूं तुवांचि मानावें ।
गुरुलघु कविंनीं प्रभुतें नित्य यथामति विशंक वानावें ॥ ७ ॥
भगवति ! शुचिकीर्ति तुझी सुमति ! ज्ञानेश्वरी प्रिया आली ।
झाली विश्वख्याता ! हे कार्या बहु जनांचिया आली ॥ ८ ॥
नेती तिकडे जासी भगवति ! बहुमत इचें तुला उक्त ।
ज्ञानेश्वरीस जन जे अनुसरले, त्यांसि करिसि तूं मुक्त ॥ ९ ॥
एकाचि अध्याय पुरे, किंबहुना श्लोक एक, हा नियम ।
गीते ! त्वदाश्रितजनीं तिळहि करिल न बहु मानहानि यम ॥ १० ॥

---

## ५. आर्यावृत्त.

—:०:—

प्रकटी प्रथम भगीरथनृप लोकीं सुरनदीस ती आर्या ।
ताशि हे मयूर नाहीं तरि सर्वाला न दिसती आर्या ! ॥ १ ॥
उचित प्रचार भासो रसिकांस प्राकृतांत आर्याचा ।
सुष्मद्वरेंचि होता सत्कार प्राकृतांत आर्यांचा ॥ २ ॥

---

१ यांतल्या पहिल्या सात आर्या नामसुधाचषकांतल्या, आठवी भीष्मभक्तिभाग्यांतली, नववी मंत्ररामायणाच्या उपोद्घातांतली व अखेरच्या दोन भारतांतल्या आहेत. यांत आर्यावृत्ताचें मूळ, पंतांची त्याविषयींची गोडी व त्यांनीं त्याची प्रसिद्धि केली याबद्दल साभिमानोद्गार सुरेख दिले आहेत. २ गंगा. ३ आपल्या ( शंकराच्या ) कृपेनें.

गद्यें, ओव्या, सवया दोह्यांतें सर्व जाणती लोक ।
श्लोक प्रिय त्यांस जया प्रसन्न तूं पुण्यपूर्वक श्लोक ॥ ३ ॥
आर्यानाथा ? आधीं छंदःशास्त्रांत पिंगळाचार्या ।
आर्याराध्या देवा ! त्वांचि पढविली मनोहरा आर्या ॥ ४ ॥
आर्यासुधा बुधांनीं आकंठ प्राशिलीच धन्यांनीं ।
कानीं मात्र परिशिली होती हो ! ती सती तदन्यांनीं ॥ ५ ॥
ते हे सुधा बुधांनीं मज लुब्धाला दिली सदा त्यांनीं ।
केलों पात्र दयेला आधीं मग मी किलीस दात्यांनीं ॥ ६ ॥
आर्यावृत्तक्षीरीं युष्मन्नुतिशुद्धशर्करा प्राज्य ।
वरि ओतिलें यथेच्छ स्वच्छ श्रीरामनाम भव्याज्य ॥ ७ ॥
आर्या आर्यासि रुचे ईच्या ठायीं असे जशी गोडी ।
आहे इतरां छंदीं गोडी परि यापरीस ती थोडी ॥ ८ ॥
आर्यकथाछंदानें आर्याछंदेंचि जन्मलीं सरलें ।
यांहीं माझें तनुवाक्कर्ममनःपाप सर्वथा हरलें ॥ ९ ॥
पुरुषा आर्यावृत्तें जैशी, ग्रंथा जया तशी मोठी ।
शोभा आर्यावृत्तें आली, मुलतील यासि कवि कोटी ॥ १० ॥
बहु मानीलचि पूर्वप्रेमातें न त्यजूनि ओव्याही ।
आर्यासि म्हणेल रसिक अभिनव विहिणीस जेंवि 'ओ'व्याही॥ १२
आर्या देखुनि सज्जन चित्तीं होतील फार सानंद ।
मंदज्ञानिच सरतिल मागें, कीं ठाउकें नसे छंद ॥ १३ ॥

---

## ६. मोरोपंताचे आपल्या काव्यांविषयीं विचार.

### मंत्ररामायण.

श्रीकारापासूनियां मकारपर्यंत वर्ण जे तेरा ।
ते राघवचरितांतीं ग्रथिले, हें रामभक्तहो ! हेरा ॥ १ ॥

---

१ पार्वतीपते ! २ मूळ छंदःशास्त्रप्रवर्तक. ३ किल्लीला. ४ आपली स्तुति हीच साखर. ५ उत्तम तूप. ६ भारताला. ७ ही आर्या गीर्वाणभाषेश उपोद्धातांत आहे. ८ 'श्रीरामजयरामजयजयराम' हे तेरा वर्ण.

केवळ उत्तरकांड श्रीरघुपतिमंत्ररत्नमंजूषा[१] ।
[२]पूषा खळघूकांचा, अतिसुखदा सर्वसाधुंची भूषा ॥ २ ॥
देहीं आत्मा जैसा आर्यांतीं मंत्रवर्ण सांग वसे ।
सूक्ष्मदृशांवांचुनिया कथापरालाचि तो कसा गवसे ? ॥ ३ ॥
नृपमुद्रांकित पत्र प्रजेसि होतें जसें शिरोधार्य ।
प्रभुचरित मंत्रचिन्हित यास्तव धरितील मस्तकीं आर्य ॥ ४ ॥
रामाचें रचिलें चरित्र मुनिनें वाल्मीकिनें संस्कृतीं
नाहीं हानि कदापि अन्य कविहीं तें वर्णितां प्राकृतीं ।
मुक्तांचा रचिलाचि हार वहिला जो रेशिमाच्या गुणें
तो [३]कार्पासगुणें करूनि करितां काय प्रभेला उणें ? ॥ ५ ॥
‘ गीर्वाणें राघवाचें यश रसिकजना लागतें फार मिष्ट
तैसें न प्राकृतानें ’ अचतुर म्हणती, मानिती ते न शिष्ट ! ।
पीतां गोक्षीर [४]कार्तस्वरमणिचषकें देतसे जेंवि गोडी
सारज्ञाला [५]पलाशद्रुमदलपुटकें सेवितां ते न सोडी ॥ ६ ॥
श्रीवाल्मीकिप्रभृति मुनिहीं वर्णिली रामलीला
[६]मादृक्षांहीं मुदितहृदयें काय गावें न तीला ? ।
[७]श्रीकंठेंद्राद्यमरपरिषत्सेव्यगंगाप्रवाहीं
संध्यास्नानादिक न करणें काय या मानवाहीं ? ॥ ७ ॥
[८]यावें, दर्शन द्यावें, बोलावें, डोलवूनि बोलावें
वाटे ‘ स्वमंत्ररामायण ’ ‘ निजनाटकें[९] ’ तुम्हींच डोलावें ॥ ८ ॥
वाचीन मंत्ररामायण आधीं मींच मग तुम्ही वाचा ।
वाचा वाचाया बहु झड घाली ग्रंथ सत्य नांवाचा ॥ ९ ॥

---

## कुशलवचरित, आर्यामुक्तामाला व प्रल्हादविजय.

जैमिनिकृताश्वमेधस्थित कुशलवचरित वर्णिलें आहे ।

---

१ राममंत्ररत्नांची पेटी. २ सूर्य. ३ कापसाच्या दोऱ्यानें. ४ सुवर्णाच्या रत्नखचित पेल्यानें. ५ पळसाच्या द्रोणानें. ६ मजसारख्यांनीं. ७ शंकर, इंद्र, आदिकरून समुदायांनीं सेविलेल्या गंगाप्रवाहांत. ८ मारुतीस उद्देशून या पुढील आर्या आहेत. ९ संस्कृत हनुमन्नाटक.

बा ! हे रीति पहावी, मज तों वाटे सुधानदी वाहे ! ।। १० ।।
आर्या मुक्तामाला दावीन परंतु जरि न मागाल ।
लागाल प्रभुकंठीं घालूं, फुगवील कीं रमा गाल ! ।। ११ ।।
श्रीमद्विष्णुपुराणीं पाहुनि अत्यंत आदरें रचिला ।
प्र्ल्हादविजयनाम ग्रंथ पहा, नगाचि मणिगणीं खचिला[1] ।। १२ ।।

---

## महाभारत.

ऐका सज्जन हो ! भवद्वच खरें, आश्चर्य म्यां पाहिलें ।
वाल्मीकिप्रभृतिस्वबंदिनिकरीं[2] दीना मला बाहिलें ।
केलें प्राकृत काव्य ईश्वरपदीं धत्तूरसें वाहिलें ।
सांगूं काय वरप्रसाद ! आजि तें व्यासेंहि कीं साहिलें ! ।। १३ ।।
रामघन सत्प्रसादामृत जों जों बहु वळोनि वर्षतसे ।
तों तों भक्तमयूर स्वार्याकेका करूनि हर्षतसे ।। १४ ।।
रसिक कवि परम सज्जन भगवद्भक्त प्रसन्न होतील ।
न गमेल यापरिस हित जों तों वदनांत अमृत ओतील ।। १५ ।।
धन्य श्रीराम पिता धन्या लक्ष्मी प्रसू जगीं झाली ।
आली सत्यवतीची, कीं भारतकीर्ति सुतमुखीं आली ।। १६ ।।

---

## मंत्रभागवत.

देउनि उत्साह मला श्रीभागवतार्थ वदाविला साचा ।
आनंद यापुढें तो तुच्छ ब्रह्मादिपदविलासाचा ।। १७ ।।
श्रीराम द्रवुनि स्वयेंचि करवी ऐसी नवी योजना
सामग्री अधनासि दे करि धनी त्याच्या गृहीं भोजना ।
हें काय प्रभुला अशक्य हृदया ! कां चित्र भासे तुला ?
क्रीडार्थ प्लवगासि[3] योजुनि रची सिंधुंत हा सेतुला ।। १८ ।।

---

१ रत्नांनीं खचित असा अलंकार. २ वाल्मीकिप्रभृति जे भाट के गुण गाणारे त्यांच्या समुदायांत. ३ नळनामक वानरास.

## गीतार्थटीका.

त्यांचें पाय नमुनि मी दीन अति ज्ञानहीन परि भावें ।
गावें गीतार्थातें म्हणवुनि टीका करावया धांवे ॥ १९ ॥
मी तों अगाध गीतासुधानदीमाजि घालितोंचि उडी !
नरजन्मपर्व दुर्लभ जाणुनि द्यावी कशी न येथ बुडी ? ॥ २० ॥

---

## सामान्यस्तुति.

( स्वकवितेचे गुण. )

जसे होती देव प्रमुदित शचीनायकवनीं[२]
तसे सारज्ञाते बुधजन मयूरेशकवनीं
महाराष्ट्रग्रन्थीं रसिक कवि जे तेच रमती
परंतु ज्ञात्याची पळहि न असावी चरे[३] मती ॥ २१ ॥
संतमयूरेश्वरकृतकवनीं नवनीतकोमळीं गोडी ।
घेतील, कीं तयांचीं करणें परगुणविवृद्धि ही जोडी[४] !॥२२॥
प्रेम, प्रतिभा, शिक्षा, रीति पहा आयका बरें कवन ।
पवनप्रिय पुत्रा ! बा, म्यां केलें हें न निजगुणस्तवन ॥ २३ ॥
तुमच्या पदप्रसादें फार चमत्कार अर्थयमकांचे ।
त्यांत प्रभुयश, तद्दशजेंगदुद्धाराधिनेंचि यम कांचे ॥ २४ ।
वीणा वेणु जडचि परि वाजवित्याची कळाचि बोलवित्ये ।
अन्यांची काय कथा ? ती वादकमस्तकोंचि डोलवित्ये ॥ २५ ॥

---

## स्वकवितेचे निंदक.

आर्येला मानियले बहु पाहुनि सज्जनीं चमत्कृतिला ।
खळाचि न मानिति तैसें बहुदूषणसज्ज नीच मत्कृतिला ॥२६।
प्राकृत म्हणोनि निर्भर हांसोत अतज्ज्ञ नीच मत्कृतिला ।
परि जाणशील बा तूं ! रसिककविवरा ! मनीं चमत्कृतिला॥२७॥

---

१ मकांचे. २ नंदनवनांत. ३ चंचळ. ४ संतांचीं इंद्रियें (मन) परगुणांची वृद्धि जोडतात. ५ जगाचा उद्धार झाल्यामुळें होणाऱ्या चिंतेनें. ६ सभापर्वांतली ही आर्या आहे. द्रौपदीला देवानें वस्त्रें पुरविलीं त्या प्रसंगाकडेही लक्ष आहे. ७ मारुतिराया.

ज्वरितांसि शर्करा जशि, कटु होय खळांसि सुरसही कविता ।
शिष्टा पद्मा सुख दे, दुष्टा घूकांसि ताप दे सविता ॥ २८ ॥

---

## वाचकांची प्रार्थना.

गीर्वाणशब्द पुष्कळ, जनपदभाषाचि देखतां थोडी ।
यास्तव गुणश्लोकीं याची घ्यावी हळूहळू गोडी ! ॥ २९ ॥
प्राकृतसंस्कृतमिश्रित यास्तव कोणी म्हणेल ही कंथा ।
भवशीतभीतिभीतस्वांताला दाविला बरा पंथा ॥ ३० ॥
कोठें दूरान्वित पद, कोठें चुकली असेल यतिमाल !
अतिमात्र दोष ऐसे, न वदोत कवी समस्तगुणपात्र ॥ ३१ ॥
वर्णगुणांतर न गणुनि एकीं ठेवूनि दृष्टि मधुपानीं ।
चुंबावेंचि भलतसे कुसुम प्रेमें रसज्ञ मधुपांनीं ॥ ३२ ॥
पुरुषाचा धर्म भ्रम, म्हणउनि कांहीं पडेल जेथ उणें ।
पूर्ण करावें शोधुनि भगवत्प्रीत्यर्थ सज्जनें निपुणें ॥ ३३ ॥

---

## वरप्रसाद.

सद्ग्रंथ असावा हा बहुजनमत जेंवि शंभुवृषभांड ।
अर्थे पूर्ण असो मम वच, तत्पूजार्थ जेंवि वृषभांड ॥ ३४ ॥
भेटो रसिक लवहि जो ग्रंथीं चषकांत नूरवि, प्राशी ।
ऐसा वर दे, वरदेश्वरचरणा ! या मयूरविप्राशी ॥ ३५ ॥

---

१ मराठी भाषेंतला शब्दसमूह थोडा. २ गोधडी. ३ भवाच्या थंडीनें कुडकुडलेल्यास. ४ नंदीचा वृषण. ५ विष्णुपात्र, देवपूजेचें पात्र.

# ३ उपदेशपर कविता.

## १ तरुण राजपुत्रास बोध.

वत्सा ! शाश्वत होय श्रुति-तज्ज्ञ-पुराण-कथित जो धर्म [1] ।
तो सेव्य उभय लोकीं प्राणी तेणेंचि पावतो शर्म ॥ १ ॥
भज सन्मार्गातें तूं, दैवज्ञाची [2] करूं नको गर्हा, ।
स्वप्नींहि देवहेलन न करावें रीति हे तुला अर्हा [3] ॥ २ ॥
त्वां सत्य न त्यजावें, मानावें प्राण-संकटहि फोल !
गो-ब्राह्मण रक्षाया वत्सा ! केव्हां असत्यही बोल ! ॥ ३ ॥
देव द्विज परवनिता परधन तैसेंचि वस्तु-दुर्लभ जें ।
यांची तृष्णा न धरीं, पुण्ययशस्कर असेल तेंचि भजें ॥ ४ ॥
जी सत्कथा सदागम सद्व्रत सद्धर्म जें सदाचरण ।
बा ! याची तृष्णा धर भावें स्मर शंभुचे सदा चरण ॥ ५ ॥
गो-विप्रातिथि-पूजन स्वाध्याय स्नान होम मंत्र जप ।
पितृतर्पण देवार्चन यांतें तूं आळस त्यजूनि जप [4] ॥ ६ ॥
बा ! कोप लोभ शठता असदाग्रह पिशुनता कुटिलभाव ।
उद्वेग दंभ यत्नें सोडी, जोडी महाजनीं ठाव ॥ ७ ॥
तूं क्षत्रधर्मरत जरि तरि बा हिंसा करूं नको स्वैरें [5] ।
बहुभाषण परनिंदा वत्सा ! तैसेंचि शुष्क जें वैर ॥ ८ ॥
हें न तुवां विसरावें स्त्री-मृगया-द्यूत-पान यांत सदा ।
अत्यासक्ति नसावी स्त्रीजित अविनीत जे तशांत [6] कदा ॥ ९ ॥
सुखसंपन्नीं मैत्री, नित्य दया दुःखितीं जनींहि करी ।
संतोष पुण्यवंतीं बा ! औदासीन्य दुर्मतीं [7] न धरीं ॥ १० ॥
सक्रोध हो अरिजनीं, स्वकलत्रीं हो सकाम तूं बापा ! ।
सकृप सलोभहि चित्तीं हो स्वजनाच्या हरावया तापा ॥ ११ ॥
नास्तिक धूर्त पतित शठ षंढ कितव चपल खल जड क्रूर ।

---

१ वेद व वेदरहस्य जाणणारीं पुराणें यांनीं प्रतिपादिलेला जो धर्म तो शाश्वत (सनातन) धर्म होय. २ ज्योतिषी. ३ योग्य. ४ जपत जा. ५ स्वेच्छेसाठीं. केवळ इंद्रियसुखासाठीं. ६ तसेंच स्त्रैण व उद्धत यांतही अत्यासक्ति नसावी. ७ दुष्टाविषयीं उदासीन नस.

निजकल्याणाकारितां वत्सा ! सोडूनि यांसि दे दूर ! ।। १२ ।।
जननी जनक सती स्त्री गुरु सज्जन यांचिया वचा साधो ! ।
विश्वास पदाहि धरीं, न अविश्वासें व्यथा तुला बाधो ।। १३ ।।
सावध सदां असावें संसारीं स्वहितकृत्य लक्षावें ।
पुरुषार्थांचें साधन बा ! धनसें हें शरीर रक्षावें ।। १४ ।।
वत्सा ! भृत्याचाही तू निजहृदयीं धरीं न विश्वास ।
समज मनीं गुरुकथितन्यायें वश मीं करीन विश्वास ।। १५ ।।
निर्दोष जे तयांची चित्तांत कधीं धरूं नको शंका ।
प्राणहि वेंचुनि रक्षीं वृद्धा बाळा सुदुर्बळा रंका ।। १६ ।।
बा ! पात्र अपात्र असो नीच महत्तम कसाहि हो पावें ।
जो याचना करील, स्वशिरहि हर्षें तयासि ओपावें ।। १७ ।।
यत्नें कीर्तिच जोडी बा ! होय पदार्थ हाचि बहु धन्य ।
राजे पंडित यांचें भूषण नाहींच कीर्तिहुनि अन्य ।। १८ ।।
आयुष्य कीर्ति यश बल पुण्य-द्रव्य प्रजोन्नति प्राज्य ।
जेणें तें कर्म करीं, धर्मन्यायोंचि चालतें राज्य ! ।। १९ ।।
बव्हर्थ जन-मनोहर स्वल्पाक्षर मधुर सत्य बोलावें ।
ज्या सद्वाक्यश्रवणें बुध[1]-श्रोत्याचेंचि शिरहि डोलावें ।। २० ।।
संपत्तींत विपत्तिंत वत्सा होवूं नको कधीं भ्रांत ।
पापी गुरु बहुबोलीं ब्रह्मकुलीं सर्वकाल हो भीत ।। २१ ।।
संतांचे अति हितकर उपदेश तशाचि पुण्य-धर्म-कथा ।
यातें विमुख न हो तूं वत्सा ! सोडूं नकोचि भव्य पथा[2] ।। २२ ।।
कुलटा गणिका कामुक जेथें बहु नीचजन तशा स्थानीं ।
राहूं नको क्षणहि कीं दुर्देशीं न प्रवर्तती ज्ञानी ।। २३ ।।
आचमन करूनि शुद्ध ब्राह्ममुहूर्तीं उठोनियां न्हावें ।
भावें गुरुचरणातें नमुनि शिवातें सदा तुवां ध्यावें ।। २४ ।।
त्वां उदयातें येतां श्रीरविचे किरणचरण वंदावे ।
दारिद्र्यदुःख दुरितध्वंसें प्रारब्ध भोग मंदावे ।। २५ ।।
ऐसा तुज संक्षेपें धर्माचा संग्रह स्वयें युक्त ।

---

१ येथें एक मात्रा अधिक आहे. २ कल्याणाच्या मार्गाला.

काथिला–अन्य पुराणा-मध्यें जो विस्तरें असे उक्त ॥ २६ ॥

ब्रह्मोत्तरखंड अ० ११

---

## २ स्त्रीधर्म.

### आर्यागीता.

पतितद्धांधवसेवा हा स्त्रीचा मुख्य धर्म, यातें सेवा, ।
बाळातें पोसावें. हित भेषज लागतां कटुहि सोसावें ॥ १ ॥
अगुण सगुण पति तातें दिधला त्याजिजे न टाकिजे पतितातें, ।
कीं जारीं सुख न सती वांछिति, दोनीही लोक तेणें नसती ॥ २ ॥

बृहद्दशम अ० २९

---

## ३. प्रल्हादाचा असुरपुत्रांस उपदेश.

बाळांचें प्रेम म्हणुनि हरिचिंतनपरहि तो दयालु बरा ।
त्यां दे निजबोध, झटे हरिजनाचि, न परहितोदया, लुंबरा ॥ १ ॥
" सुख विषयांत न कांहीं, हरिसि भजा, येथवांचि, ' बाळपण।
सारुनि भजों ' म्हणाल, प्रियसख हो ! वश नसोचि काळ पण ॥२॥
देवा ! हरिचाचि सदा व्हावेंचि असुरकुमारहो ! भक्त ।
कीं हा या भूतांचा आत्मा ईश्वर सुहृत्प्रिय व्यक्त ॥ ३ ॥ ।
वाटेल तुम्हांसि जरि श्रीकृष्णाचि एक देव जोडावा ।
तरि भोगोद्यम सहसा आधीं कैसा समस्त सोडावा ? ॥ ४ ॥
यत्नावांचुनि दैवें दुःख तसें सुखहि देहयोगानें ।
भोगोद्यमें न आयुःक्षय भगवत्कीर्तिच्याचि हो ! गानें ॥ ५ ॥
न घडेल भजन हरिचें, तरुणपणीं विषयसाधनीं भ्रमतां ।
वृद्धपणींही दुःसहकासश्वासाद्युपद्रवें श्रमतां ॥ ६ ॥
मोह स्त्रीपुत्रांचा गेहीं, तैसीच अर्थतृष्णा ते ;
दुस्त्यज, या सांपडला प्राणी पावेल काय कृष्णातें ? ॥ ७ ॥
वसतो आत्मा, यास्तव सर्वी भूतीं दया करा नमुनी ।
करिति उपाया इतरा सुखवाया या दयाकरा न मुनी ॥ ८ ॥

---

१ पतिव्यतिरिक्त पुरुषापासून. २ दुसऱ्याच्या हितादयासाठीं हरिजनच झटे; लुबर (अज्ञान असून व चाळ ) न झटे. ३ विषयसुखासाठीं.

ते योगयाग रुचति न भूतदया हे जशी रुचे हरिला !
प्रभु तुष्ट इणें होतां, अर्थ कवण जड मना ! मनीं धरिला ? ॥ ९ ॥
वारिजनेत्रा भावें ध्यावें गावें सदा यशाला हो ! ।
आम्हां इतुकेंचि पुरे, धर्म इतर मोक्षही कशाला हो ? ॥ १० ॥
सुखहेतु भक्तिपथ हा श्रीनारायण सुरर्षिला बोधी !
तो मज, म्यांहि तुम्हांला, येणें तुमचीही हरिरता हो धी ॥ ११ ॥
बाळांसि असें अभिमुख करुनि प्रल्हाद आपल्यासि कवी ।
ज्ञान तसें निववाया चित्ता त्यांच्याहि तापल्या सिकवी ॥ १२ ॥

—मंत्रभागवत स्कंध ७.

---

## ४. वधूवरांस बोध.

तुंबर गेल्यावरि ती स्वसखीतें कुंडला म्हणे " आले " ।
त्वद्धृदयीं सद्गुण जे ते सर्व सुखें वसावया आले ॥ १ ॥
तुज नलगे शिकवावें स्नेहें देतें परंतु आठउनीं ।
पतिभजनीं सुख पावो तव मति शीतांत जेविं पाठ उनीं ॥ २ ॥
पतिपरमेश्वर याच्या भजनीं अनुकूलबुद्धि हो भावें ।
लोभावें न तनुसुखीं त्वां संपादूनि कीर्ति शोभावें " ॥ ३ ॥
त्या नृपपुत्राहि म्हणे, " तुज सर्वज्ञासि काय सिकवावें ।
स्नेहें वदल्ये स्त्रीसह पुरुषार्थत्रय जपोनि पिकवावे ॥ ४ ॥
' स्त्रीयोगें पुरुषाचे साधति धर्मार्थकाम ' सत्या गीं ।
हे श्रुतिची सात्विक घे राजस कीं ईस तामस त्यागीं ॥ ५ ॥

---

१. प्रभु भूतदयेनें तुष्ट झाल्यावर मनीं धरिलेली कोणती इच्छा ( मनोरथ ) जड ( पूर्ण होण्यास कठिण ) आहे ? २. नारदाला. ३. आपल्यास अभिमुख करून म्ह॰ आपणाकडे त्यांचें मन वळवून. ४. मदालसेला. ५. हे सखि! मैत्रिणि ! ६. कुवलयाश्वास. ७. धर्म, अर्थ, काम. वस्तुतः स्त्रीसंगें मोक्षप्रमुख चारही पुरुषार्थ साधतात असें असून कुंडला पुरुषार्थत्रयाचाच उच्चार करिते याचें कारण ' धर्मेच अर्थेच कामेच नातिचरामि ' या विवाहप्रसंगाची प्रतिज्ञा असावी. ८. वचन, वाणी.

दोघे चिरकाळ तुम्हीं सतत सुखें पुत्रपौत्रसह नांदा ।
तुमच्या यशासि सज्जन सेवूत चकोर ते जसे चांदा! " ॥ ८ ॥

मदालसोपाख्यान अ. २

---

## ५. गांधारीचा दुर्योधनास बोध.

( पांडवांना राज्यार्ध देऊन साम करावयाला भीष्म, द्रोण, विदुर हे दुर्योधनाला सांगत असतांही तो त्यांचें ऐकत नाहींसें पाहून धृतराष्ट्रानें गांधारीस सांगितलें कीं ' तूं तरी आपल्या मुलास ताळ्यावर आण, ' तेव्हां त्या श्रेष्ठ मातेनें आपल्या पुत्रास बोध केला तो पुढें दिला आहे. गांधारी ही विदुषी, विचारी व महाज्ञानी होती. तिनें भीड न ठेवितां आपल्या मुलास खऱ्या हिताचा बोध केला. )

स्त्रीस म्हणे तो नृप[1] " सति ! तूं तरि दुर्योधनासि बोध करीं ।
देणार अंतकाच्या स्वासुसह सकळ सहाय योध करीं " ॥ १ ॥
देवी म्हणे " शिकवितां देवर्षि महायशाहि उपरमला[2] ।
उपरमला भीष्म विदुर कृष्णहि, कथिता अशाहि उपर मला ! ॥ २ ॥
सांगेन यथामति, परि कोठें तो ? " नृप म्हणे ' बहा, भ्रौत्या[3] ' ।
आणी सभेंत वळवुनि विदुर पुन्हा वातसा महाभ्रा त्या ॥ ३ ॥
गांधारी त्यासि म्हणे " वत्सा, बहु कष्टतो दुराभिमानी ।
कां त्यजिसि गुरूक्ति ? इला आत्माधिक बहुगुणें सुराभि मानी ॥ ४ ॥
अन्यायकृष्णवर्त्मा[4] न स्पर्शो कीर्तिकापुरा, तनया ! ।
ज्या लोभा भजसी तूं भजले नाहींत बा ! पुरातन[5] या ॥ ५ ॥
कामें लोपें लोभें नागविले अमित यांस जे भुलले ।
यांच्या कुदृष्टिपातें तेजस्वी पुरुषहीरेंही[6] उलले ॥ ६ ॥
न उगाचि मूकसा तूं चित्तांत धरूनि दंभ दर्प रहा !
बा ! दुरभिमान न बरा देइल धनपतिकरींहि खर्पर[7] हा ॥ ७ ॥
अहित कथील तरि कसा गुरु ? बाप कसा ? तसीच आइ कसी ?

---

१ धृतराष्ट्र गांधारीस म्हणतो. २ नारदही थकला, हात टेकले. ३ विदुराला. ४ अन्यायरूप अग्नी. ५ पूर्वज. पूर्वींचे राजे. ६ पुरुषरूप हिरे भग्न झाले. ७ खापर.

नाइकसी गुरु–वचन; क्षुद्रं–वचन बहु जपोन आइकसी ! ॥ ८ ॥
राज्यार्ध पांडवां दे, तूं घे राज्यार्ध, बहु तुला बा ! हें ।
साम करीं, यश रुसलें मुरडुनि तुज पाहतें मुला ! बा हें ॥ ९ ॥
निष्कंटक राज्य करिसि हा महिमा सत्य पांडवांचा रे ।
सत्सख्य करूनि यशें धवल करा सैत्यपांड, वांचा रे ॥ १० ।
भीष्मद्रोणाचार्य प्राणांतें सांडितील, न तयांतें ।
सामर्थ्य असोनि अधिक बहु ते आहेत साधु नत यांतें ॥ ११ ॥
सर्व सुहृत्तम कृष्ण प्रभु, याची कास धरुनि सर्व तरे ।
तूं किति ? तरले याच्या नामें बहु सागरांत पर्वत रे ॥ १२ ॥
तुज पांडवजय दुर्घट, नारळ हरिजेल काय खैवंतरें ।
कृष्णोक्तें सख्य करीं याचि उपायें अनिष्ट सर्व तरें "॥ १३ ॥
ऐसें मातृवचनही लंघुनि गेला उठोनि पुनरपि तो, ।
जो भव्य पावणारा सँद्गुरु-सद्वाक्-सुधेसि सुनर, पितो ॥ १४ ॥

उद्योगपर्व अध्याय. ९

---

## ६ निंदक॑.

दानस्नानजपोपवासनियमें पापासि जें वारितें
देतें पुण्य जनांसि तीर्थ म्हणूनी सन्मानिसी वारि तें ।
जो एतन्निरपेक्ष निंदक गुणें तैसाचि पापापहॅं
त्याला साधु न कां मना ! म्हणसि रे सन्मार्ग बापा [illegible]रा ॥१॥
पापांचे बहुदाट कांट चढले फारा दिसांचे लया

---

१ कर्ण शकुनि यांचें वचन. २ ब्रह्मांड. ३ ठेंगण्या [illegible]ुण्यानें. ४ ज्याचें कल्याण व्हायचें असतें तो सज्जन सद्गुरूच्या चांग[illegible] बोधाचा स्वीकार करितो. दुर्योधनानें मातृबोधाचा अनादर केला [illegible]रून त्याचें अकल्याण होणार हें येथें सुचविलें आहे. ५ हे पांच [illegible]ोक आजवर कोठेंही छापलेले नाहींत. हे पंढरपुरीं पंताची बृहद[illegible]ची जी हस्तलिखित प्रत आहे तिच्या अखेरच्या पानावर खुद्द पंतांनीं स[illegible] लिहिले आहेत. परमार्थी सुपुरुष निंदकाला आपला परम मित्र कां मान[illegible] यावरून कळणार आहे. पंतांच्या खोंचदार लिहिण्याचाही हा एक मासला आहे. ६ पापनाशक.

नेत्यें, सर्व मना ! पुन्हां मिळवितां तैसें न सांचल या ।
दे आह्मां कुतुकें, परेष्टकरणोद्योगीं फुका जी भरे
सन्मान्या चिरजीविनी तुझि असो ती निंदका ! जीभ रे ! ! ॥२॥

घेती माथां परांचा दुरितभर बळें, तुल्य थोरीं लहानीं,
देतीं पुण्यें सुकष्टें करुनि मिळविलीं, मानितीही न हानी, ।
एवं ज्यांची परार्थस्थिति सदुपकृती सज्जना सोयरीं तीं
साजे निंदा तिला ही ? अजि कविजनहो ! हे बरी होय रीती ? ॥३॥

आम्हां श्रीरामभक्तां अजितनुतिविणें स्वस्तुती तों न अर्हा
पापघ्नी पुण्यदात्री करिशिल जरि तूं निंदका ! होय गर्हा ।
मानूं तोषा न रोषा परि म्हणति तुम्हां निंदका वेद, ‘ वाटे
स्वर्गाच्या चूकले हे पडतिल नरकीं!-’ हा मना खेद वाटे ! ! ॥४॥

सुमार्गीं ही हेतु स्खलनपतना जेंवि खळगा
प्रमादी जे त्यांला अचुकचि मना ! तेंवि खळ गा ! ।
न कांटे धोंडे हीं करिति गतिचा रोध डबरें
तयांच्या जे आंगें कुशळपद चालों धड बरें ॥ ५ ॥

दूता निंदिति कुलटा साध्वीतें साधुतेंहि जे विटे ते ।
जार अनघ कसे होते निंदक जरि हाय म्हणुनि ते विटते ? ॥ ६ ॥

जे [illegible] सत्पथीं स्थित ते वाङ्मात्रें न दूषिले जाती ।
माती [illegible] सदे खळ, घेती करुनि आपली मौती ॥ ७ ॥

वि[illegible]चाताला रुचति गुण पीयूषसम जे
परी त्यातें दुष्ट स्वमनिं विष ऐसेंचि समजे ।
घृतें क्षीरें होती प्रमुदित मखीं निर्जर खरें
परी तेंही तापप्रद रस जयाला ज्वर भरे ॥ ८ ॥

---

१ निंदा. २ परदारासक्त जार. ३ वरच्या दोन आर्या हरिवंश अ. ११ मधल्या आहेत. ४ हा श्लोक मंत्ररामायणाच्या उपसंहारातला आहे; शुद्धचित्ताला.

देवी ! निरामय सुखी शतवत्सर सर्व खळ असावेच ।
न प्रार्थितां नच करिल पंकाचा तीर्थजळ असा वेंच ।। ९ ।।

---

## ७ वीरमातेचा वीरपुत्रास निरोप.

( पराभूत झालेल्या आपल्या संजय नामक पुत्रास उत्साह देऊन शत्रुजयार्थ परत पाठविणाऱ्या विदुलेची कथा सांगून कुंती कृष्णाबरोबर पांडवांना वीररसोद्दीपक निरोप पाठीवेत. )

स्वरथीं चढोनि भगवान् मग जाय पुसावयासि आतेला[२] ।
तेंचि वदूं, कोण रसिक गोघृत सोडुनि करील आ तेला ? ।। १ ।।
सांगे सुयोधनाचें मत सक्षेपें यदूद्वह[३] सतीतें ।
धर्मासि निरोप पुसे सुतमार्दव आठवूनि हसतीतें[४] ।। २ ।।
कुंती म्हणे ' वद असें त्या मत्तनयासि कमळनयना ! कीं ।
परिसोत पूर्वज तुझा प्रेमें सुरगीत अमळनय नाकीं ।। ३ ।।
वाटे सुभटें पुत्रें मेळविला विप्रसेवनीं नव टें ।
वर्षोष्णसह जटिलवर, तरि काय बहू तसे वनीं न वट ? ।। ४ ।।
जें सिंधुराजविजित[६] स्वसुतातें बोलिली सती विदुला ।
तें परिस " सांगत्यें तुज यदुकुलकमळाकराचिया विघुला ।। ५ ।।
विदुला म्हणे " अहा ! रे ! क्लीबा ! मंदा ! कसा पळालास
कां वांचलासि, अयशस्कर ऐसा तूं न कां गळालास ? ।। ६ ।।
अरि हरिल राज्य, मग तूं वरिशिल वृत्त्यर्थ काय मा... री ? ।
सुखकर सुकर्म टाकुनि असुखकर कुकर्म कोण सा... री ? ।। ७ ।।

---

१ ही आर्या रामगीतींत आहे. २ कुंतीला, ३ यदुश्रेष्ठ ... कृष्ण. ४ पांडवांचा ... रोप सांगावयाचा आहे मवाळपणा आठवून हंसणाऱ्या कुंतीला तुला धर्माला कां ... नें—युधिष्ठिरानें विप्रसेवा काय म्हणून कृष्णानें विचारलें. ५ कुंती म्हणते माझ्या ... द्धा—त्यासारखें वागायचें करितां करितां नवीन ट मिळविला म्हणजे ... रिमर्दनच योग्य आहे. धर्म ऊन सोडून क्षमावान् भट्टमात्र झाला आहे. क्षत्रियास वटवृक्ष काय थोडे आहेत ! पाऊस सोसणारा जटाधारी बनला आहे ... र्मांतून पतन कां न पावलास ! ६ सिंधुराजानें जिंकलेल्या आपल्या पुत्रा...

मद्यौवन, संजय हें निजनामहि, बुडविलें तुवां दगडें ।
झगडें यशोर्थ, अरिरथचक्रांहीं स्पष्ट लोष्टसा रगडें ! ॥ ८ ॥
जेणें लज्जित व्हावें स्वर्गीं सहपूर्वजें तुजा तातें ।
परमानुचित पलायन कैसें केलें तुवां कुजाता ! तें? ॥ ९ ॥
मरण विहित, न पलायन, भीती धर्मज्ञराजकन्या या ।
अन्या याहुनि अधिका घडल्याही न गणतीच अन्याया ॥ १० ॥
साधूंसि बाहुजांचा मत विजय जसा, तसाचि वध मत रे ।
निजधर्माश्रित न बुडे, निजधर्मच्युत कधीं न अधम तरे! ॥ ११ ॥
अधमा ! तुवां मरावें, क्षणहि न बुडवूनि मान वांचावें ।
काळा ! यासम अन्यहि जे असतिल,त्यांहि मानवां चावें" ॥ १२ ॥
तो संजय तीस म्हणे " पुत्राच्या इच्छितीस कां मरणा ?
वांछिति शमा अकाम–प्राज्ञ, इतर इच्छिती सकाम रणा ॥ १३ ॥
रडसील सस्नुषा कीं मज जरि देइल परासुतां समर
न म्हणेल स्वप्नींही शतपुत्राही परासुतास मर " ॥ १४ ॥
" जी व्यर्थ उभयलोकानुपयुक्त अपत्य वाढवी, ती तें ।
स्पष्ट करी वात्सल्य, ज्ञाते जन म्हणति ' गाढवी ' तीतें ॥ १५ ॥
निजलासि काय ? उठ रे; जय पावतसे सदा समरशील ।
उत्साह टाकितां तूं दैन्यें सांगेन सदास मरशील " ॥ १६ ॥
संजय म्हणे " नमस्ते जननि ! जन निशाकरें जसा निवतो ।
बोधें तसा निवालों, न हितकर गुरूपदेशसा शिव तो " ॥ १७ ॥
विदुलोक्त करी संजय जिंकुनि समरांत सिंधुराजाला ।
सिंहीला तेंचि उचित सुत, जो मारूनि सिंधुरा जाला ॥ १८ ॥
सांग स्वसख्यांस असें, ' झाली त्वत्सूतेंकीं गगनवाणी ।
कीं कुंति ! हा अरि वधुनि पद साधिल;तुज सुखा मग न वाणी' १९
तें सत्य असो, तेंही युद्ध पुरांतका महेशासीं, ।

---

१ उत्तम जय मिळविणार क्षत्रियाचा. [illegible] मृत्यो ! यासारखे दुसरे जे [illegible]ड राजपुत्र असतील त्यांनाहीं तूं खाऊन टाक. ४ [illegible] ५ अगत्य इहपरलोक साधून देणारें इवें. ६ स्त्रियांस इ. ७ हत्तीला. ८ जिआला, जग[illegible] अर्जुनाला. १० त्वज्जन्मकाळीं.

मद्वीरसूत्वहि, श्रीस्त्री--कीर्त्य--पहारकाम हे शासीं " ।। २० ।।
भीमासि म्हणे " द्यूतीं नेलें जिंकूनि वित्त भीमा ! जें ।
तें न स्मरें; न तुमच्या वनवासालाहि चित्त मी माजें ।। २१ ।।
सलतें मनांत, दुष्टें ओढुन नेली सभेंत कृष्णा तें ! ।
स्मरली, त्वांहि उपेक्षा करितां, हरितां निरीस, कृष्णातें ।। २२ ।।
त्या स्मरणें मन पडलें तापीं बहु, जेंवि तळमळत डागें ।
हृदयें मोह उघडिला, जैसा ग्रीष्मांत तळमळ तडागें ।। २३ ।।
दावावें, यश जोडुनि, कुलजानें सुप्रसन्न--वदन कुळा " ।
प्रथम पुसोनि कुशळ मग जगदीशा!तूं असेंचि वद नकुळा।।२४।।
" अयशस्कर तोक पळहि मळवाया धाम बा ! न रांगावें ।
जरि न गमेचि, तरि सुखें चित्ररचितरामवानरां गावें" ।। २५ ।।
" हें क्षत्रियासि समुचित," ऐसाचि निरोप सांग सहदेवा ।
जो पांचांत यशस्कर, तो माजा पुत्र मूर्तमह देवा ।। २६ ।।
कृष्णेसि सांग कृष्णा ! "तिळभरिहि तुजें उणें नसो शील ।
त्वां साहिलें, असें पळमात्रहि सर्वसहा न सोशील! ।। २७ ।।
त्वां रक्षिलें, न झालें क्षम रक्षायाहि मत्तनय, नातें ।
असते क्षम, चरणनखां स्पर्शों देते न मत्त-नयनातें ।। २८ ।।
जऱ्हि बुडविलीस माझ्या पुत्रांहीं व्यसनगर्तलीनांहीं ।
तऱ्हि न विटलीस, यापरि सत्वें कोणीहि वर्तली नाहीं" ।। २९ ।।
किंबहुना सांग तया समयीं जें काय चांगलें कांहीं ।
कृष्णा ! मन्मत हें, कीं यश रक्षावें, न आंग, ले[illegible]हीं ।। ३० ।।

[illegible] पर्व अ. १०

---

१ राज्यलक्ष्मी, द्रौपदी व कीर्ति यांना हरण कर[illegible]ा इच्छा करणारे कौरव २ चित्रांत काढलेल्या व्यापारशून्य रामवानरां[illegible] ३ पांच पुत्रांपैकीं जो शत्रूंना जिंकील तोच माझा पुत्र व तोच माझा मूर्तिम[illegible]नद होय. ४पृथ्वी. ५ समर्थ असते तर तुझ्या पायाचें नख शत्रूंच्या दृष्टीस पड[illegible]ा. ६ पांडवांनीं आपलें नांव राखावें, नांवाकरितां ते मेले तरी बेहत्तर असा [illegible] अभिप्राय-सर्व निरोपाचें सार यांत आहे.

## ८ शाहणा राजा.

निज देशसमीपस्थित बळेंदर्पित जो तयासि कविराजे ।
नच वांचो देति, असें न करी जो तत्प्रताप न विराजे ॥ १ ॥
जो शुभ निज प्रजांचे, देशाची वृद्धि, इच्छितो राजा ।
तेणें पर जिंकावें, न उपेक्षावें कदापि या काजा ॥ २ ॥
अभिषेकें जों ओले अलक शिरीं तोंचि आर्य औधीतें ।
वारूनि प्रकृतीचें रंजन जे करिति कार्य आधीं तें ॥ ३ ॥
प्रथम स्वेंद्रियजेता तो नृप सर्वांहि पात्र होय जया ।
प्रणति करिति शत्रु, म्हणति कवि राज्यश्रीनिवासतोयज या ॥ ४ ॥
' सम्यक् वर्तावें ' हा काम स्वमनांत जो करी धन्य ।
उपदेशिता हित अहित गुरु त्याला लोकसम नसे अन्य ॥ ५ ॥
व्यसनांतें स्पर्शेना, धर्मी रत नित्य, जो बळश्रेष्ठ ।
सांमंतापासुनि तो भय पावेना कधीं नृपश्रेष्ठ ॥ ६ ॥

हरिवंश. अ. ११

---

## ९ श्रीकृष्णाचा उद्धवास वेदांतोपदेश.

भगवान् म्हणे, ' न बंधहि मोक्षहि; बा ! बंध भासतो भोगें ।
मदधीन तीन सत्त्वादिक गुण, जे या उपाधिच्या योगें ॥ १ ॥
ते मो[illegible] बंध ज्यांस्तव, विद्याविद्या अनादि मम शक्ती ।
बंध अ[illegible]नें बा ! विद्येनें मुक्तिची अभिव्यक्ती ॥ २ ॥
वार्याद्युपाधि[illegible]रितां बिंबप्रतिबिंबभेद रविस घडे ।
जळकृत कंपा[illegible] जें, प्रतिबिंबालाचि जेंवि सकळ जडे ॥ ३ ॥
सुज्ञा ! प्रतिबिंबें [illegible] त्यांसि परस्पर उपाधिनें भेद; ।
घट फुटतां, बिंबैक्यें [illegible]तिबिंबाचा जसा सरे खेद ॥ ४ ॥
दे मन तसा अविद्येमा[illegible] प्रतिबिंब, तो मदंश जडे; ।
जीवत्व त्या असे, जो तो[illegible] अविद्येकडून बंध घडे ॥ ५ ॥

---

१ आपल्या सामर्थ्याचा गर्व वाहणारा. [illegible]ज्ञ राजे. ३ केश. ४ चिंतांला, काळज्यांला. ५ प्रजेचें. ६ राज्यलक्ष्मीचें निवासकमळ [illegible] मांडलिक. ८ उदकादि उपाधीमुळें.

बा ! त्या जीवालाचि, स्वाविद्योपाधिच्याचि भेदानें ।
नानात्व असे; सुज्ञा ! कथिलें पहिलें असेंचि वेदानें ॥ ६ ॥
नरवर्या ! जीवेश्वरखग, नग हा देह, यांत आहेत; ।
कर्मफळ एक खातो; त्यांत दुज्याचा नसेचि बा ! हेत ॥ ७ ॥
सुज्ञ असक्त असुनिही प्रकृतींत, जसा जळांत बा ! सविता ।
दीपक अलिप्त जैसा, जरि सर्वां सर्व अर्थ भासविता ॥ ८ ॥
देउनि विरक्तिशाणें तीक्ष्णत्व, ज्ञानसदासितें, सुकवी ।
छेदी संशय जो, तो मायेचे ओंठ हा जपें सुकवी ॥ ९ ॥
बाहेरि निघे विद्वान्, सर्वहि संशय समूळ तोडून ।
स्वप्नासि जसा जागृत, हा देहादि प्रपंच सोडून ॥ १० ॥
मोडेना स्थिति त्याची, निंदा किंवा, नये तया, स्तवन !
लोकव्यवहारातें मिथ्या समजे, म्हणे, ' तयाँस्तव न ' ॥ ११ ॥
भरला शब्दब्रह्मीं न परब्रह्मीं भरे तरि भ्रमला; ।
श्रमला पढोनि घोकुनि आत्मज्ञाला न सुज्ञ तो गमला ॥ १२ ॥
गैरत नव्हे स्त्री तैसी नाहीं सत्कीर्तिपात्र जी वाचा; ।
पोषी असीस जो, त्या वांटा बहु कष्टमात्र जीवाचा ॥ १३ ॥
वस्तुविचार दृढ करुनि, देहाद्यध्यास करिल जो दूर, ।
सर्वगतीं मद्रूपीं मन अर्पिल तोचि निश्चयें शूर ॥ १४ ॥
देहीं विरक्ति, माझ्या ठायीं त्या प्राप्त होतसे भक्ती, ।
ध्यातो मज; सत्संगीं जासि, कोठेंही तसी नसे शक्ती " ॥ १५ ॥
मोक्षद म्हणे " सदय जो कोणाचाही करीचना द्रोह ।
नांदे क्षमा जयाच्या हृदयीं, तो साधु नाशितो मोह; ॥ १६ ॥
भव्यबळ सत्य ज्याचें, नित्य असूयादिरहित जो काय; ।
सुखदुःखांत सम सदा ज्याचा सर्वोपकाररत काय; ॥ १७ ॥

---

१ जीव आणि ईश्वर हे दोन पक्षी. २ विरक्तिरूप साहणेवर घांसून ज्ञानरूप चांगल्या खड्गातें तीक्ष्णत्व देउनि. ३ मिथ्यत्वास्तव तो स्वीकारीत नाहीं. ४ पतिव्रता, कुलीन स्त्री. ५ परब्रह्माचा विचार म्हणजे चिंतन करून जो देहगेहांचा अभिमान दूर करील.

बा ! त्या जीवालाचि, स्वाविद्योपाधिच्याचि भेदानें ।
नानात्व असे; सुज्ञा ! कथिलें पाहिलें असेंचि वेदानें ।। ६ ।।
नरवर्या ! जीवेश्वरखग[१], नग हा देह, यांत आहेत; ।
कर्मफळ एक खातो; त्यांत दुज्याचा नसेचि बा ! हेत ।। ७ ।।
सुज्ञ असक्त असुनिही प्रकृतींत, जसा जळांत बा ! सविता ।
दीपक अलिप्त जैसा, जरि सर्वां सर्व अर्थ भासविता ।। ८ ।।
देउनि विरक्तिशाणें तीक्ष्णत्व, ज्ञानसदासितें[२], सुकवी ।
छेदी संशय जो, तो मायेचे ओंठ हा जपें सुकवी ।। ९ ।।
बाहेरि निघे विद्वान्, सर्वहि संशय समूळ तोडून ।
स्वप्नासि जसा जागृत, हा देहादि प्रपंच सोडून ।। १० ।।
मोडेना स्थिति त्याची, निंदा किंवा, नये तया, स्तवन !
लोकव्यवहारातें मिथ्या समजे, म्हणे, ' तयांस्तव न '[३] ।। ११ ।।
भरला शब्दब्रह्मीं न परब्रह्मीं भरे तरि भ्रमला; ।
श्रमला पढोनि घोकुनि आत्मज्ञाला न सुज्ञ तो गमला ।। १२ ।।
गैरत[४] नव्हे स्त्री तैसी नाहीं सत्कीर्तिपात्र जी वाचा; ।
पोषी असीस जो, त्या वांटा बहु कष्टमात्र जीवाचा ।। १३ ।।
वस्तुविचार दृढ करुनि, देहाद्यध्यास करिल जो दूर[५], ।
सर्वंगतीं मद्रूपीं मन अर्पिल तोचि निश्चयें शूर ।। १४ ।।
देहीं विरक्ति, माझ्या ठायीं त्या प्राप्त होतसे भक्ती, ।
ध्यातो मज; सत्संगीं जासि, कोठेंही तसी नसे शक्ती " ।। १५ ।।
मोक्षद म्हणे " सदय जो कोणाचाही करीचना द्रोह ।
नांदे क्षमा जयाच्या हृदयीं, तो साधु नाशितो मोह; ।। १६ ।।
भव्यबळ सत्य ज्याचें, नित्य असूयादिरहित जो काय; ।
सुखदुःखांत सम सदा ज्याचा सर्वोपकाररत काय; ।। १७ ।।

---

१ जीव आणि ईश्वर हे दोन पक्षी. २ विरक्तिरूप साहणेवर घांसून ज्ञानरूप चांगल्या खड्गातें तीक्ष्णत्व देउनि. ३ मिथ्यत्वास्तव तो स्वीकारीत नाहीं. ४ पतिव्रता, कुलीन स्त्री. ५ परब्रह्माचा विचार म्हणजे चिंतन करून जो देहगेहांचा अभिमान दूर करील.

वाहेना मान, करी इतरांचा मान, बोधनीं दक्ष; ।
वंचक नव्हे, प्रवर्ते धरुनि दयेचाचि नित्य जो पक्ष; ॥ १८ ॥
मोदें अर्पण सर्व प्राप्तार्थाचें मलाचि जें करणें, ।
दास्यें आत्मनिवेदन, कथनीं माज्या कथांचिया भरणें. ॥ १९ ॥
भर बहु असणें येतां जन्माष्टम्यादि मंगळें पर्वें; ।
अति उत्सवें भरावीं पर्वें तैसींच वार्षिकें सर्वें ॥ २० ॥
यत्नें प्रकृतिगुणत्रय हें, सत्वें रजहि तमहि, बुडवावें ।
सत्यदयावृत्ति शमात्मकसत्वानेंचि सत्व उडवावें ॥ २१ ॥
नयनींचा मळ झडतां, जैसा अर्थप्रकाश बहु होतो, ।
तैसा विवृद्धसत्वें धर्महि, मद्भक्तिरूप गुरु जो तो. ॥ २२ ॥
मोडुनि असात्विकांचा प्रेमा, सात्विक पदार्थ जे, त्यांचें ।
सेवन सत्वगुणातें वाढवितें तद्विपक्षजेत्यांचें ॥ २३ ॥
भक्तिस्वरूपधर्म प्रकटोनि, अधर्म सर्वही नासी; ।
त्या निर्मूळा संभव तेंवि नसे, जेंवि गर्व हीनासी. ॥ २४ ॥
यक्षपैनरसखमूर्तिध्यान भलें जाण सात्विक स्पष्ट; ।
स्त्रीध्यान अरिध्यानहि, वाढवितें फार उद्धवा कष्ट ! ॥ २५ ॥
मोह झडे, काळ दडे, निर्मळमद्भक्तिरूप धर्म वडे, ।
मग मत्प्रसाद होतां जें परम ज्ञान तें गळांचि पडे. ॥ २६ ॥
तेजस्वी, स्वमना जरि होतो विक्षेप, मोह आवरितो; ।
विषयीं दोष पहातो, अनलस होउनि विरक्तिला वरितो. ॥ २७ ॥
वाट मम ध्यानाची, हळुहळु अनळस, मनास जो लावी, ।
विषयविरक्ति, तयाच्या त्या स्वांताला, सुखेंचि बोलावी ॥ २८ ॥
सुत हो ! चित्तांत विषय, चित्तहि विषयांत, हें खरें आहे ।
सुटाति परस्पर त्याचे स्वात्म्यास ब्रम्हरूप जो पाहे ॥ २९ ॥
यज्ञस्वरूप यज्ञप्रभु परमानंदरूप जो हा मी ।
स्फुरलों स्वात्मत्वें;तरि तें सुख विधिच्याहि बा ! नसे धामीं ॥ ३० ॥
बहु जिव्हेोपस्थांचा धरणें जो वेग हेचि होय धृती, ।

---

१. ज्ञानदानांत. २. विद्याधनरहितास. ३. शंकर व विष्णु ध्यान. ४. जिव्हा व गुह्येंद्रिय यांचा. ५. धैर्य.

न अनुद्वेगाचि केवळ, समजेल असें यथार्थ तोचि कृती ॥ ३१ ॥
गलिताहंकृति जाणें बंधामोक्षासि, अनुभवीं चढला, ।
तो पंडित; इतर नव्हे, जरि पुष्कळ शास्त्र सर्वही पढला ॥३२॥
वाढवितो विषयांची तृष्णा, संतुष्ट जो नसे प्राणी ।
तोचि जन दरिद्र, क्षम न स्वत्राणीं न वा परत्राणीं ॥ ३३ ॥
बा ! अर्थसिद्धिकर, परि नश्वर हें नरशरीर जाणोनी ।
मोक्षार्थ मृत्युपूर्वी यत्न करावा मनांत आणोनी ॥ ३४ ॥
वश मन होय, विवरितां विश्वाच्या उद्भवासि आणि लया ।
तत्त्वंपदार्थशोधन, कीं मद्भजनाचि वशासि आणिल यां ॥ ३५ ॥
यद्यपि मन्मताचि बरें, त्वन्मत न खरें असा कलह खोटा; ।
तदपि भ्रमवी मायामृगजळ, वादांत सर्वथा तोटा; ॥ ३६ ॥
न घडावें तें घडतें, विषयांच्या काय होय न ध्यासें ? ।
आत्म्याला जन्ममरण लिंगशरीराचियाचि अध्यासें ॥ ३७ ॥
नरदेहीं यम, नियम, व्रत, दान, जप स्वधर्म, जे कांहीं; ।
यांचें मुख्य फळ मनोनिग्रहचि; ज्ञान वेगळें नाहीं ॥ ३८ ॥
वपु कल्पिलें मनें हें, मी हें माझें असें म्हणति अंध; ।
भ्रमति भ्रमें अपारीं संसारीं, दृढ गळां करिति बंध ॥ ३९ ॥
बा ! जीभ चाविली जरि, तरि हित जिव्हेचिसारिखे दांत; ।
कोणावरि कोपावें ? तत्सहनचि तोषकारि खेदांत ॥ ४० ॥
न बरा विषयिजनाचा, योगीं निष्ठा जया, तया संग ।
होय विरागनगाचा या वज्रेंकरुनि उद्धवा ! भंग ॥ ४१ ॥
मोहीं पडतो, कूपीं अंधाचा अनुग जन जसा अंध; ।
गंधहि विषयिजनाचा, सुविरक्तालाहि करितसे बंध ॥ ४२ ॥
भरोंचि तप, श्रुत, विद्या, एकांत, त्याग, मौन, हें सर्व, ।
ज्याचें मन स्त्रियांहीं हरिलें तेणें धरूं नये गर्व ! ॥ ४३ ॥

---

१ चित्ताचें स्थैर्यच केवळ धृति नव्हे. २. आत्मसाक्षात्काराच्या पायरीस चढला. ३. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ देणारें. ४ अभ्यास करणाऱ्या मनास. ५ केवळ ओझेंच होय.

मोह घडे, विषयेंद्रियसंयोग क्षोभवी मना म्हणुनी, ।
स्त्रीस्त्रैणसंग न बरा, सोडावा घात आपुला गणुनी ॥ ४४ ॥
वस्तुज्ञालाहि नव्हे क्षणही षड्वर्गशत्रु विश्वास्य, ।
मग मजसारखियांची काय कथा ? वर्णितोंचि विश्वास्य. ॥ ४५ ॥
वास करिति आनंदें, माहेरीं जेंवि लाडक्या कन्या, ।
साधूंत मत्कथा, ज्या श्रोत्यांचें पाप नाशिती धन्या ॥ ४६ ॥
तेजस्वी संतचि हे नेत्रें देतात आंत बाहेर, ।
तुज दिव्यदृष्टि देउनि, म्हणतिल हा चिद्विलास बा हेर ! ॥ ४७ ॥
बा ! संत देव, संतचि बांधव, गुरु संत, संत हे प्राण, ।
किंबहुना दाशार्हा ! विश्वात्मा मीच संत हें जाण ॥ ४८ ॥
वाहत जावीं कर्में मजला, मन चित्त मजचि अर्पावें ।
माझ्या यशोमृतानें साधुजना आपणाहि तर्पावें ॥ ४९ ॥
सुखहेतु पर्व, यात्रा, परमोत्सव, वेगळेचि, अथवा हे ।
मिळुनि करावे, हा हित, निर्भय, मद्धर्मराजपथ वाहे " ॥ ५० ॥

—मंत्राभागवत. स्कंध ११

## १० पिता. माता व देव.

सुविद्य, धन मेळवी, वचन आयके, आवरी
प्रपंच, भर घे शिरीं, करि कृपा पिता त्यावरी ।
असा जरि नसे रुचे तरि न तो अभद्र क्षण
असा तुजचि आवडे; करिसि तूंचि तद्रक्षण ! ॥ १ ॥
पिता जरि विटे विटो; न जननी कुपुत्रीं विटे,
दयामृतरसार्द्रधी न कुलैकज्जलें त्या किटे ।
प्रसादपट झांकिती, परि परा गुरूचे थिटे[४]

---

१ जगाचें म्हणजे सर्वजनसमूहाचें तोंड. २ उद्धवा. ३ दयामृतरसानें आर्द्र झाली आहे बुद्धि जिची अशी माता त्या कुळास काजळ फांसणाऱ्या कुपात्रालाही वाटत नाहीं. ४ इतर गुरूंचे प्रसादपट झांकितात खरें पण ते थिटे म्ह. अपुरते आहेत, सर्वांगाच्छादक असा एक जननीचा मात्र प्रसादपट आहे!

म्हणोनि म्हणती भले न ऋण जन्मदेचें फिटे ।। २ ।।
विटेल जननीहि, कीं शत रची निमित्तें विधी !
मळे कलियुगीं श्रुती जाशि खरीं तिची तेंवि धी ! ।
कदाचित विटेल बा ! तव दया न दीनावरी
जशी जगदवक्षयीं कर भवन्नदी नावरी ।। ३ ।।

—श्लोककेकावली.

---

## ११ अंगदशिष्टाई.

तो अंगद नयनिपुण प्रभुला वंदूनि जाय लंकेला ।
केला प्रवेश रावणसभेंत, सोडूनि भीतिशंकेला ।। १ ।।
" हे रात्रिंचरराजा ! रामाचा दूत अंगदाभिध मीं ।
कोणी मला पुसाना ' कोण असें ? ' काय बैसलों अधमीं?।। २।।
वैदेहीच्या रमणें वीरें करुणाकरें जगद्वीतें ।
पाठविलें मज, त्याच्या ऐकें कल्याणहेतु सद्वीतें[3] ।। ३ ।।
' चतुरानन जगदीश्वर, त्याचा तूं पौत्र भूतपतिदास ।
श्रुतसंपन्न, नयज्ञ, ब्राह्मणसुत, पावलासि सुपदास ।। ४ ।।
सुरभूसुर यत्नानें पूजावे, धर्मसेतु रक्षावे, ।
निर्मल यश जोडावें, व्यसनानाचार त उपेक्षावे ।। ५ ।।
या विहिताचारातें, सोडुनि धरिलीस वृत्ति जननींचा ।
अनुसरलासि दशास्या ! पक्षाला तूं स्वकीयजननींचा ।। ६ ।।
विधिवरसामर्थ्यानें, होउनि मदमत्त वन्यकुंजरसा ।
धर्मद्रु मोडिले हे, केली ध्वस्ताचि वेदकुंज रसा ।। ७ ।।
शमदमनयभयलज्जा सोडूनि हरिशी परांगनावित्त; ।

---

१ 'आस का बा निरासकी मा' अशी एक हिंदुस्थानी म्हण आहे. ' कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ' असें आचार्य देवीस्तोत्रांत म्हणतात. २ रामानें ३ हितकर अशा उत्तम वाणीनें. ' सद्वाणीभिः ' अशी पंतांची टीप आहे. ४ पुलस्त्यमुनीचा पौत्र व शिवभक्त. ५ जनांत निंद्य अशी वृत्ति धरलीस. ६ रावणाची आई कैकसी ही सुमाली नामक राक्षसाची कन्या होती. ७ वेदरूपकुंजांनीं आच्छादिलेली पृथ्वी.

वित्तमं होउनि निरयप्रद मार्गीं काय ठेविलें चित्त ? ॥ ८ ॥
स्वकुळाला अंजन जो लावी, तो पुत्र न, प्रसूविष्टा ।
शिष्टाचरणीं यास्तव नित्य असावी यशःप्रद निष्ठा ॥ ९ ॥
करिशी अन्याय बळें, हितोपदेष्टा तुला गमे द्वेष्टा,
स्वेष्टांसि मंतुवांचुनि धिक्कारिशि, हे बरी नव्हे चेष्टा ॥ १० ॥
जनकमहाराजसुता रविकुलतिलकाजसूनुची सून, ।
तूं न कळत नेली, तरि दे, हो सद्वृत्त आजपासून ॥ ११ ॥
अपराध हा महाजननिंद्य तशी हे जनाधमा ! केली; ।
अद्यापि मी पुलस्त्यद्विजाकडे पाहुनि क्षमा केली ॥ १२ ॥
रघुकुलज श्रीमंत प्राज्ञ प्रबल क्षमादयानिलय, ।
शरणागतवत्सल हे, ख्यात जनीं, शत्रुचा करूनि लय ॥ १३ ॥
रविवंशज राजांची बहुसरला भ्रूलताहि चापलता; ।
ते वक्रा झाल्यावर, चालेना जिष्णुचीहि चापलता ॥ १४ ॥
नाहीं तुजसीं मजसीं वैर, तथापि प्रियावियोग मला ।
दिधला, यावरुनि तुझा स्वभाव विपरीत सर्वथा गमला ॥ १५ ॥
वैदेहीला तूं जरि आणुनि देशील आझुनी मजला; ।
मीहि लंकाजीवन अभय, समर्पीन तत्क्षणीं तुजला ॥ १६ ॥
नाहीं तरि सायक हे, हे भुज, हा खड्ग, हें धनूरत्न, ।
मीं सज्ज जयधनातें, तूं निधनातें, स्वयें करीं यत्न ' ॥ १७ ॥
यापरि तुज राजेंद्रें कथिलें, आतां करूं नको उशिर; ।
सीतोपायन घेउनि, ठेवीं, ये तत्पदांबुजीं स्वशिर ॥ १८ ॥

---

१ ज्ञानीपुरुषांत श्रेष्ठ. २ बिभीषणासारख्या आपल्या आप्तांस अपराधावांचून उपेक्षितोस. ३ क्रीडा. ४ सूर्यवंशांतले राजे यांची भूलता व चापलता सदा सरळ असते ( म्ह. ते सहसा रागावत नाहींत व धनुष्यबाणही हातीं घेत नाहींत. ) पण त्यांनीं रागानें धनुष्यबाण हातीं घेतले कीं मग त्यांपुढें इंद्राचीही मात्रा चालत नाहीं. ' जिष्णुचीहि चापलता ' असें म्हणण्यांत कवीनें लौकिकाचार पाळला आहे खरा, पण त्यामुळेंच या सुंदर आर्येंत एक मोठा दोष झाला आहे. इंद्र रावणाच्या बंदिखान्यांत दीन होऊन पडला होता, इंद्रजेत्या रावणापुढें इंद्राचें श्रेष्ठत्व वर्णन करण्यांत कवि फसला गेला !

तूं केरुनि समर, न मर; भ्रमरसम रघूत्तमांघ्रिनवपद्मीं ।
रम; रस घे; अमराचि हो; भ्रमरहित स्वस्थ नांद निजसद्मीं !! १९
दे उत्तर, निजलासा, बहिरासा, मूकसा, नको राहूं; ।
याहुनि हित काय वदों ! न वदासि कां आझुनीहि चोरा ! हूं २०
अनल अनिल यम यक्षप वरुण विधु ब्रघ्न सर्प गंधर्व ।
सर्व पराजित केले, परि रामाशीं करूं नको गर्व ॥ २१ ॥
राम प्रणतजनांचा त्राता, रिपुलोककाल, या पाशीं ।
चेष्टा करितां दुष्टा ! भ्रष्टा ! पडशील मृत्युच्या पाशीं ॥ २२ ॥
रामधनंजय, तूंही कापुर तृण तूल काष्ठ घृत तैल; ।
शैलहि पिचाविल, हें तुज नुमजे तूं मातला जसा बैल ! ॥ २३ ॥
यतिवेषें चोरानें, वाटवुनी रामचंद्रदलकुटिला[3] ।
कुटिलानें रत्नातें नेलें, तो शत्रु पाहिजे कुटिला ॥ २४ ॥
गिरिदलन मस्तकानें, स्वशिरोभंगार्थ दुर्मते ! करिशी ।
करिशील तूं मदांधा ! नरकपुरी इच्छितोशि लोकरिशी ॥ २५ ॥
तूं मुकलासि श्रीस्त्रीसौख्ययशःप्राणपुत्रमित्रांतें ।
आत्मौर्ध्वदेहिकातें तरि करि, तुज कोण या जनीं त्रातें ?" ॥ २६ ॥

मंत्ररामायण युद्धकांड.

---

## १२ पतीवशीकरण *

भामाकृष्णा, गंगायमुनाश्या भेटल्या अनादिसत्या ।
साक्षाल्लक्ष्मीगौरी ऐशा झाल्याचि त्या जना दिसत्या ॥ १ ॥
सत्या[5] कृष्णेसि म्हणे " वदत्यें तें तूं खरेंच मान, सये[6] ! ॥
लोक म्हणोत, परि पळहि माझ्या हातीं न कांतमानस ये ॥ २ ॥
त्वां हे पांच पति कसे वश केले ? भजति सर्व एकीतें ! ।

---

१ या प्रसिद्ध आर्येंत अनुप्रास फार उत्तम साधला आहे. 'मर' ह्या दोन अक्षरांची आवृत्ति सात वेळ झाली आहे. २ सूर्य. ३ पर्णकुटिला. ४ हत्तीच्या शीलाचा, मदमत्त.* हें प्रकरण मूळ पंतलिखित प्रतीप्रमाणें लिहिलें आहे. ५सत्यभामा द्रौपदीस म्हणत्ये. ६ सखे, जिवलग मैत्रिणी !

थोडे याहुनि पाहुनि, नटती कादंबिनीस केकी तें ॥ ३
सांग वशीकरण कसें केलें त्वां देवि ! कोणत्या मंत्रें ? ।
कीं दिव्यौषधिमूळें किंवा वात्स्यायनोदितें यंत्रें ? " ॥ ४ ॥
कृष्णा हांसोनि म्हणे " भामे ! मोहावयासि पतिला जे ।
मंत्राद्युपाय करणें या श्रवणें बहु मदीयमति लाजे ! ॥ ५ ॥
प्रेमें पतिचरणासि न देउनि, हे हात तायिताला जे ।
ते स्त्री न रुचे पतिला, कीं तीतें आततायिता लाजे ! ॥ ६ ॥
पतिपरमेश्वरचरणा जी तत्सेवार्थ न नवशी करणें ।
ती मुग्धा कैसी गे ! वळवील स्वामिमन वशीकरणें ॥ ७ ॥
जाणें वशीकरण हें, करित्यें, जेणें कधीं न कोपति ते ।
सखि ! तूंहि असेंचि करीं, मदमत्सर दाखवूं नको पतितें ॥ ८ ॥
पतिचे प्रसाद देती ज्या सद्गतितें न योगसव तीतें ।
वाहे पहा ! शिरीं शिवदेहाऽर्धंगता शिवा स्वसवतीतें " ॥ ९ ॥
श्रुतिला कविधीसी ती मानवली फार शुद्ध वदलीला ।
न पतीसचि कर्णासहि सत्य सती होति उद्धवदलीला[३] ॥ १० ॥

—वनपर्व अध्याय ६

---

## १३ सामान्यनीति.*

### १ धर्म.

वेदोक्तीसी नसतां विरुद्ध जें प्राणिशर्मकर कर्म ।
निसित्यातें म्हणतों आम्हीं संदीपनिसिंधुजीवनद धर्म ॥ १ ॥

### २ श्रद्धा.

श्रद्धाचि करितसे हित धर्मांचें जेंवि माय तनयाचें ।
जप, तप, मख, गुरुपूजा, मुख्य श्रद्धाचि आयतन याचें ॥

---

१ मोर मेघमालेला पाहून हर्षनिर्भर होऊन नृत्य करितात. त्यांच्यापेक्षांही पांच पांडव तुज्या अधिक कह्यांत आहेत १ ‘ मेघमाळा ’ पंतांची टीप...२ ‘ मयूर’—पंतांची. टीप ३ आनंददायक लीला ज्यांच्या अशा. * या प्रकरणांतील आर्या अनेक काव्यांतन काढून एकत्र ग्रथित केल्या आहेत. ४ श्रीकृष्णाचें गुरु. हा उद्गार कृष्णाचा आहे.

श्रद्धेनें भजत्यातें पाषाणहि फलद होय जो अज्ञ ।
तोही सद्गुरु होतो, अश्रद्धेनें वृथा महा यज्ञ ॥ २ ॥

### ३ पंडित.

विदुर म्हणे, " जो आस्तिक, गुरुवेदोक्तीं जयास विश्वास ।
मीपण ज्यासि न शिवलें, तो पंडित मान्य होय विश्वास ॥४॥
दुर्लभवस्तु न वांछी, न करी जो नष्ट वस्तुचा शोक ।
आपत्तींत न मोहें; त्या पंडित म्हणती जाणते लोक " ॥ ५ ॥

### ४ दुर्जननिंदा.

त्यांत पळ न वसावें, जेथ दुरितभीतिधर्मनय नाहीं ।
तृणचरमुखें सुखें अवलोकावीं, खळमुखें न नयनाहीं ॥ ६ ॥
दुर्जनसहवास सदा तापद, हा काय नरक सामान्य ?
होईल यास दाट्ुनि मानधन प्राज्ञनर कसा मान्य ? ॥ ७ ॥
खळ न खळत्व त्यागी जरि सामें गौरवूनि बोळविला ।
लकुच कटुचि, अमृताकरांकरवीही शर्करेंत घोळविला ! ॥ ८ ॥

### ५ दैव.

अनुकूळ दैव असतां न समर्थ करावयासि हानि यम ।
होतां तें प्रतिकूळ प्रबळहि दुर्बळचि होय हा नियम ॥ ९ ॥
भावि प्रबळ, भ्रमतो सर्वहि, बालिश असो, असो सुकवी, ।
होणार सत्पथींही दिवसींही डोळसासिही चुकवी ! ॥ १० ॥
बलवत्तर विधि देतो थोराला थोरल्याचि तापातें ।
इंद्रप्रमुख सुरांसहि जें भावि न लंघवेचि बापा ! तें ॥ ११ ॥
अनुकूळ काळ होतो तेव्हां बळ बुद्धि तेज यश देतो ।
प्रतिकूळ तोचि होउनि मावारें दत्त सर्वही घेतो ॥ १२ ॥

### ६ पौरुष.

अश्वतर म्हणे, " सुत हो ! जरि जन जाणुनि अशक्यकर्मातें ।
न करितिल अनुद्योगें, पावतिल न कार्यसिद्धिशर्मातें ॥ १३ ॥

---

१ मद.लसोपाख्यान अ० ३

पुरुषें आरंभावें कर्म, न पौरुष कदापि सोडावें, ।
कर्मफळ जसें दैवें स्पष्ट तसें पौरुषेंहि जोडावें ॥ १४ ॥
यास्तव यत्न तसा मी करिन जसें होय सिद्ध हें कार्य ।
म्हणती ' सर्वार्थाची सिद्धि असे निश्चयीं ' असें आर्य " ॥ १५ ॥

## ७ व्यसनासक्ति.

चार व्यसनें मृगया, स्त्री, पान, द्यूत, यांत जो सक्त ।
तो धर्मच्युत, तत्कृत सत्कृत न महाजनांत, हें व्यक्त ॥ १६ ॥

## ८ काम, कोप व दुराग्रह.

बहु कामकोपलोभा उग्रा असुरा समस्तसुर भीती ।
हे व्याघ्राचि, बा विदुरा ! जी कीर्ति स्पष्ट होय सुरभी ती ॥१७॥
कामें कोपें लोभें नागविलें अमित यांस जे भुलले ।
यांच्या क्रुद्दृष्टिपातें तेजस्वी पुरुषहीरही उलले ॥ १८ ॥
भ्रमवी, श्रमवी, मळवी, पळवी सत्कीर्तिला, दुराग्रह रे ।
सेव्य सदुपदेश सुधाग्रह, असदुपदेश हा सुराग्रह रे ॥ १९ ॥

## ९ क्षत्रिय व ब्राह्मण.

दुष्टदमन, अपलायन युद्धीं, द्यावें सदाश्रिता शर्म !
राजांचा हाचि परम हेतु अशेषार्थसिद्धिचा धर्म ॥ २० ॥
षट्कर्मींच असावें नित्य रत ब्राह्मणें अघात–रतें ।
क्षत्र स्वधर्मयुद्धानुष्ठानें सर्वथा अघा तरतें ॥ २१ ॥
ब्राह्मणधर्म अहिंसा, सत्योक्ति, तसी क्षमा, मनीं आण ।
क्षत्रियधर्म प्रकृतिप्रतिपालन, दंड उग्रता जाण ॥ २२ ॥
या लोकीं परलोकीं आधार क्षत्रियासि विप्र, भया ।
अभया द्याया प्रभु हे, सप्रभ कीं करिति निपट विप्रभ या ॥२३॥

## १० व्यवहारनीति.

भीष्म म्हणे " कुलधर्मत्याग नव्हे उचित, मान्य मज आहे ।
सत्कुलजाचेंचि सदा स्वकुलाचाराकडेचि मन वाहे ॥ २४ ॥
संसार दों दिसांचा, यश जोडी जो कुलीन तोचि तरे ।
द्यावें बरें म्हणोनि स्वपरमुखीं हें कुलीनतोचित रे" ॥ २५ ॥

दुःख परासि न द्यावें, सत्य वदावे, क्षमा न सोडावी, ।
जोडावी कीर्ति, अशी कुलरीति बुधें कधीं न मोडावी ।। २६ ।।
सुकृतातेंचि स्मरति न कुकृतातें, याचि साधुरीतीची ।
रुचि रसिका, न सुधेची कीं केवळ अल्प माधुरी तीची ।। २७ ।।
चुकल्या जनासि कोणी सांगुनि निजहितपथासि जो लावी ।
धनदेंहि उपकृतीसी त्याच्या निजसंपदा न तोलावी ।। २८ ।।
जाळी ज्वलन, न बोले, न वदेचि जरि प्रकाश करि तरणी ।
न वदोनि कुलज पुरुष आले स्वयशःप्रकाश करित रणीं ।। २९ ।।
संस्कारधर्मलोपें दुष्टजनसमागमें उडे शुद्धी ।
मग गुणवंताचीही सदैधिक्षेपीं प्रवर्तते बुद्धी ।। ३० ।।
मृत्यु हरितसे समयीं अमरासहि, कवण मृत्युला चुकवी ।?
ऐसें जाणुनि तत्त्व व्यसनांत न मोह पावती सुकवी ! ।। ३१ ।।
हृदयीं क्षमा असावी, सर्वत्र सदा असो नये पण ती ।
म्हणती क्षमितां दुर्बळ, न क्षमितां करिति दुर्जन प्रणती ।। ३२ ।।
नीति अशी कीं अबळें प्रबळासि रणीं कधीं न हटकावें ।
दैवें विरोध पडतां बळहीनें त्यजुनि मान सटकावें ।। ३३ ।।
रक्षावाचि, उपेक्षा व्यसनीं अरिचीहि न करिती संत ।
पाहों नयेचि आंगीं बळ असतां दीनजंतुचा अंत ।। ३४ ।।
ज्या प्रेमें स्वापत्या त्या प्रेमें ब्राह्मणांसि पोसावें ।
कल्याणा सुनेनें सासूचें जेंवि तेंवि सोसावें ।। ३५ ।।
भूतीं दया असों द्या, व्हा इंद्रियषडरिनिग्रहीं धीट ।
सोडुनि अन्यपथ धरा निजधर्माचार, मार्ग हा नीट ।। ३६ ।।
विसरिति अपकारातें उपकारातेंचि साधु आठविती ।
कीं सोशितां न सा विति होय वपु ! न सोशितां न आठ विती ३७
बा सत्य धर्म जिकडे तिकडे श्रीकृष्णनाथ जाणावा ।
हा तेथें जय, रविसा प्रार्थुनि नलगे प्रकाश आणावा ।। ३८ ।।
गति उत्तम होय असें वर्तावें, धर्मनीति रक्षावी ।
चित्तांत पूर्वजांची नित्य स्थिति रीति शांति लक्षावी ।। ३९ ।।

१ सज्जनांचा धिक्कार करण्याकडे,

# ४ वर्णनपर कविता.

——:*:——

## १. अंबरीष राजा.

पूर्वी भूपति अंबरीष रविच्या वंशीं महात्मा असे,
धर्मे राज्य करी, सदैव भगवद्भक्तांत भावें वसे, ।
मासे सिंहाचि समरांत गमती तच्छत्रु राजे ससे,
तो शांतांत, नितांतशांत, कमळाकांतींच चित्तें वसे ॥ १ ॥
राजा साधुसमागमें समजला संसार निःसारसा,
सेवी श्रीपतिच्या पदा अलि जसा अत्यादरें सारसा, ।
नामाची धरि कास दास—करुनी सद्भक्तिचा आसरा,
प्राशी निर्मल विष्णुचेंचि यश जें हांसे सुधेच्या सरा ॥ २ ॥
ज्यामध्यें बहुदक्षिणा सुविधिवत् विप्रादिसंतर्पण
प्रेमें यज्ञ करूनि सर्व करि ते श्रीविष्णुला अर्पण ।
आंगें होउनि सत्तपोहुतवहीं तो सर्वदा सर्पण
स्वच्छत्वें नृप जाहला सुमणिचा जैसा नवा दर्पण ॥ ३ ॥
स्वाद्वन्नें परमादरें करुनियां विप्रोत्तमां तर्पुनी,
त्यांतें कांचनदक्षिणा सुवसनें सद्भूषणें अर्पुनी ।
आज्ञा घेउनियां व्रतोक्तनियमा रक्षावयाकारणें
तो राजेंद्र करी उपक्रम सुखें साधावया पारणें ॥ ४ ॥
तो भूतीं समदृष्टि, साधुभजनीं राबे; सदा सांवरी
आंगें दृग्विकलांदिकांसि, भर हा टाकी न दासांवरी ।
सेवेवांचुनि आपल्या न विषयीं याचें शरीर क्षण
श्रीशें जाणुनि हें सुदर्शन दिलें, त्याचें करी रक्षण ॥ ५ ॥

—भक्तभूषण.

---

१ शांतचित्त. २ परमशांत. ३ द्वादशीव्रताचे नियम. ४ आंधळे बहिरे वगैरे पंगूस

## २ अर्जुनाचा पुत्रशोक.

ग्रंथ ८०१

( अर्जुन संसप्तकांकडे युद्धास गुंतला असतां इकडे परम वीर्यशाली अभिमन्यूस कौरवांकडील महावीरांनीं चक्रव्यूहांत खेचून अधर्मयुद्ध केलें. त्या एकांगवीरानें शौर्याची शर्थ करून सर्वांस चकित केलें. जयद्रथानें त्या सोळा वर्षांच्या बालयोद्धयास विरथ करून मारिलें. )

संसप्तक मथुनि विजय सांजे शिबिरासि यावया परते ।
प्रभुसि म्हणे, 'कां कांपे मन ? कांपविलें जरि स्वयें परें[२] ते?।१।
कंठ गहिंवरें भरला, शिरली हृदयांत केशवा ! धडकी ।
येतें रडें वृथा कां ? बा ! माजी प्रकृति काय गा ! रडकी ! । २ ।
स्फुरणहि अनिष्ट, भिवविति उत्पातहि, सांग काय बापा ! हे । ।
कुशळ असे कीं माजा राजा ? ध्यानांत नीट बा ! पाहे ' ।।३।।
देव म्हणे, ' कुशळ असे प्रभु ऐसें मन्मनास वाटतसे ।
कीं थोडे जन जगतीवरि धरिते नीतिधर्मवाट तसे ।। ४ ।।
जालें असेल आणिक कांहीं, त्वद्विक्रिया नव्हे वंध्या ।
' यद्वा तद्वास्तु; ' करूं आधीं न गणूनि आधिला संध्या ।। ५ ।।
संध्या करवुनि नेतां सेनेंत मनीं म्हणे ' परस्वामी ।
स्वधना न जपों कैसा ? काय रथीं वाहतो परस्वां मी ! '।। ६ ।।
अर्जुन अस्वस्थहृदय जाय गतश्रीक शिबिर पाहून ।
प्रभुसि म्हणे ' महदप्रियसूचक बहु चिन्ह काय याहून ? ।। ७ ।।
मीं नायके सुवाद्यस्तुतिगीतरवासि, तूंहि नायकसी ।
मज पाहुनि आप्त अधोमुख होती, गति असेल हाय ! कसी?।।८।।
अतुल प्रताप लोकीं ज्या खलबलैंजलधिवाडवाभाचा ।
तो कृष्णा ! आज तुजा मज आला कां न आडवा भाचा ?'।।९।।
शिबिरीं शिरोनि विजयें धर्मादिक देखिले अधोवदन ।
तें पुत्ररत्न एकचि न निरखिलें सद्गुणर्द्धिचें सदन ।। १० ।।
मृदुलप्रकृति न साहे सुतशोका, जेविं न रविला पाला ।

---

१ संध्याकाळीं. २ शत्रु. ३ युधिष्ठिर. ४ तुला होणारे दुःशकुन वृथा. ५ परधनास. ६ शत्रुसैन्यरूप समुद्राला वडवाग्निप्रमाणें ( जाळणारा ).

शिबिरीं करी परोपरि नारायणमित्र नर विलापाला ।। ११ ।।
" बोले कृष्णमुखींचा वेणु तसा परम लाडिका वाणी ।
जो स्पर्शे, शिशुहि नवे गुरुसंनिध, पर मला डिकावाणी ।। १२ ।।
जो बहु परपृतनांसीं, गोपींसीं बाळकृष्णसा, रमला ।
दावा हो सत्वर तो स्वगुरुवचनगीतकृष्णसार मला ।। १३ ।।
बाळहि जो खड्गपरशुचक्रगदाचापतोमरा वाहे ।
संकल्प दुर्जनांचे जाले कीं सफल ' तो मरावा ' हे ! ।। १४ ।।
ज्याची शास्त्रीं शस्त्रीं व्यवहारीं वासुदेववत् समज ।
काय तुह्मीं केला हो ? आणुनि तो भेटवाचि वत्स मज ।। १५ ।।
बहुधा तुह्मीं धरुनि गुरुकृतचक्रव्यूहभेदकामातें[1] ।
केलाचि पुढें, नाहीं तरि करितां स्पर्श खेद कां मातें ? ।। १६ ।।
न तुम्हीं, न कौरवहि, मीं तद्घातक कीं तया रिवायाचा ।
कथिला उपाय चपला, आधीं म्यां न कथिला निवायाचा !।।१७।।
तुमच्या भुजशस्त्रांतें धिक् ! हा निःसार हो ! खटाटोप ।
शिर ज्या न रक्षवे तो कार्याचा काय ओखटा टोप ! ।। १८ ।।
हर हर ! जाणों चुरिला तो बाळ करेणुंनीं चरणपातें ।
शिव ! शिव ! भरतिल कीं हो तो बाळक रेणुनीच रणपातें ।।१९।।
कुंतीस काय सांगूं ? कृष्णेला दाखवूं कसें वदन ? ।
दुष्कर मला सुभद्रासांत्वन, दुर्धर्ष उत्तरासदन ।। २० ।।
जावूं दिला मजविना परलोका काय एकला भाचा ? ।
होता उपाय हातीं सुयशाच्या हाहि एक लाभाचा ।। २१ ।।
खाताचि अद्वितीय सुदर्शन परबळ पळांत चाटून ।
परि बुडविल निजयश तें कर्म करिल कवि[2] कशास दाटून ? ।। २२ ।।
यांचें स्वरूप कळतें तरि पळ न विसंबितोंचि बाळा हो ।
' शिव ! शिव ! ' म्हणेल मरणावधि वैधव्याधिमग्न बाळा[3] हो ! ।। २३ ।।
स्वार्थपर अकृप निस्त्रप[4] आम्हीं म्हणउनि मनांत विटशील ।
परि उत्तरा सती परगतिकामा[5] तुज म्हणेल ' विट–शील ' ।। २४ ।।

---

१ द्रोणाचार्य रचित चक्रव्यूह भेदण्याच्या इच्छेला. २ श्रीकृष्ण. ३ उत्तरा. ४ निर्लज्ज. ५ मोक्षरूप परमगतीला लुब्ध झालेल्या तुला.

न म्हणे ‘ अमृतरस अधिक ’ करि ज्याच्या बाप लालना कवि तो ।
काय पितृपरिष्वंगज जें सुख त्या बा ! पलाल नाक वितो ।। २५ ।।
कां माजें उर न उले ? कवि ‘ पवि ’ कीं म्हणति तोकशोकाला ।
लोका लाजे मन, कीं जावें यश हारवूनि ओकाला ।। २६ ।।
हा वत्सा ! रक्ताक्षा ! जाले त्वत्सुगुण आजि घातकसे ।
बा ! वाहिले परांचे तुजला हाणावयासि हात कसे ? ।। २७ ।।
अभिमुख परप्रहारें पडला कीं धर्मराज ! सांगावें ।
प्रभुजी न जें यशस्कर तें स्वगुरुसमक्ष तोक कां गावें ? ’।। २८ ।।
धर्ममुखें वृत्तांत स्वसुताचा ऐकतांचि तो कानें ।
पडला मूर्च्छित अर्जुन ‘ हा वत्स ! ’ असें म्हणोनि शोकानें।।२९।।
सर्वाप्तवीरमंडल झालें अत्यंत बावरें हो । तें ।
धर्म म्हणे, ‘ दाखवितें न तपोवन या अघा, बरें होतें ’ ।। ३० ।।
सावध होउनि अर्जुन सोडी बहु दीर्घ उष्ण निःश्वास ।
कोपें पेटे, वाटे जाळील सधार्तराष्ट्र विश्वास ।। ३१ ।।

—द्रोणपर्व अ० ७

---

## ३ श्रीकृष्णाचा गुरुगृहवास.

( श्रीकृष्ण व सुदामा ब्राह्मण हे दोघे उज्जनी येथें सांदीपनी गुरुच्या गृहीं विद्याभ्यासार्थ राहिले होते. पुढें श्रीकृष्ण द्वारकाधीश झाल्यावर सुदामा दारिद्र्यानें गांजलेल्या स्वभार्येच्या आग्रहावरून त्याच्या भेटीस गेला. कृतकार्य होऊन परत आल्यावर सुदामदेवानें आपल्या भार्येस सर्व वृत्तांत सांगितला त्यापैकीं पुढें दिलेला भाग आहे. )

विद्याभ्यासार्थ होतों निजगुरुसदनीं तधवां एकदां जें ।
झालें वृत्त प्रिये ! तें कथुनि यदुवरें मोहिलें चित्त माजें ।

---

१ पित्याच्या आलिंगनापासून होणारें सुख त्या तृणतुल्य ( पलाल ) स्वर्गांत ( नाक ) मिळेल काय ? २ समोर—‘ त्यानें शत्रूला पाठ दाखविली नाहींना ? ’ असा पार्थप्रश्न.

तें मीही तूज आतां जलरुहनयने ! सांगतों ऐक जाये !
प्रेमानें वर्णितां हें घडि घडि हरिच्या नीर नेत्रांबुजा ये ।। १ ।।
" बंधो ! तें नित्य केव्हां तरि कुतुक तुझ्या आठवे कीं मनाला ?
आम्ही या इंधनाला स्वगुरुयुवतिनें धाडिलें जैं वनाला ।
कालावांचूनि आला जलवर, सुटला वात, अंधार जाला,
ज्याला आत्मा करालाहिकुटिलतरलां लास शब्दा विजाला ।।२।।
भास्वान् मावळला, पयोद वळला, स्थूलांबुवाहोपल—
व्रातांहीं बहु पीडलों, स्थिर वनीं राहों न दिल्हें पळ ।
वर्षे कांकडलों, जळांत पडलों, झाला क्षणें दिग्भ्रम,
सारे बाळ कराळ काळ शिरला चित्तीं महासंभ्रम ।। ३ ।।
तो निम्नोन्नतभूविभाग न कळे, सर्वत्र झालें वनें,
आम्हां काळमुखासमान गमलें सर्वांसही तें वन,।
अंधारीं धरुनी परस्पर करीं स्वाध्वंभ्रमा पावुनी
प्रत्यूषावधि हिंडलों, मग परामर्शासि आला मुनी ।। ४ ।।
झालों होतों श्रमानें विकळ सकळही काननीं वृष्टिवातें
आचार्ये धांवुनिया स्वहृदयिं धरिलें जेंवि आत्मोद्भवातें ।
केलें आघ्राण माथां सकरुण गुरु तो वर्षला प्रेमतोया
मच्चित्ता आठवे श्रीगुरुचरणदयाप्राप्त सत्कार तो या ।। ५ ।।
' केले हे क्लेशपात प्रियतमहि तुम्हीं अस्मदर्थ स्वकाय
या कर्माहूनि लोकीं गुरुसि समुचिता दक्षिणा येथ काय ? ।
पावा माझ्या प्रसादें सकळहि सकळा शुद्ध संपूर्ण विद्या
शिष्याच्या हृत्तमाचा प्रशमकर करी ज्ञाननामा रवि द्या ' ।। ६ ।।
एवं श्रीगुरुनें प्रसाद सदयें केला मला तो स्मरे
बंधो ! देशिकपादपद्मभजनें संसार हा ओसरे ।
झालीं यापरि जीं अनेक कुतुकें तीं या मनीं जागतीं "
भार्ये ! देव असा उदंड वदला लोकेश, माजा गती, ।। ७ ।।

---

१ अकालीं पाऊस आला. २ पाण्यांनीं भरलेल्या मोठाल्या गारांच्या समूहांनीं ३ उंचसखल भाग. ४ उदक. ५ आपला मार्ग चुकून. ६ प्रभातकालापर्यंत. ७ मुख.

भार्ये ! ही कथिली कथा निजमुखें जेव्हां जगन्नायकें
तेव्हां उत्तर मीं दिलें हरिस जें तें तूं बरें आयकें ।
' लोकेशा ! जनसंग्रहार्थ गुरुच्या गेहीं तुझें राहणें
अस्मद्भाग्यहि थोर कीं श्रुतिनुता लीला तुज्या पाहणें ॥ ८ ॥
ज्याचा वेदमय स्वदेह कुशलाधार त्रिलोकीं विता[1]
जो वर्णाश्रमधर्मकल्पक कवी श्रुत्यध्वसंस्थापिता[2] ।
विश्वाचा गुरु तो स्वयें गुरुकुळीं विद्यार्थिभावें वसे
हें तों लोकविडंबन प्रभुवरा ! अन्यार्थ येथें नसे ''

—पृथूकोपाख्यान.

---

## ४. सती सावित्रीची दिनचर्या.

### अभंग.

हर्षली पावोनी जसी सती भर्गा[3] । वनाहुनी स्वर्गा तुच्छ मानी ॥ १ ॥
तैसीच सावित्री आनंदली मनीं । क्रीडे तपोवनीं पतिसंगें ॥ २ ॥
श्वशुराची आज्ञा जसीच वेदाची । तिळही भेदाची बुद्धि नाहीं ॥ ३ ॥
कुळदेवताच ती श्वश्रू मानिली । पूजिली वानिली सावित्रीनें ॥ ४ ॥
केवळ अतिथीअभ्यागत बाळ । करि प्रतिपाळ माता सती ॥ ५ ॥
मानीयेला शाकफळमूळकंद- । रसाहुनि मंद सुधारस ॥ ६ ॥
बोलावें सस्मित मृदु परिमीत । सत्य प्रिय हित बोलवीलया ॥ ७ ॥
सर्वांच्या मागूनी तृणशय्येवरी । सुखें निद्रा करी उठे आधीं ॥ ८ ॥
एकांतीं पतीचें हृदय रमवी । संताप शमवी सेवाधर्में ॥ ९ ॥

—सावित्रीगीत.

---

## ५. कुंभकर्णी झोंप.

मग सत्वर रात्रिंचर गेले तो कुंभकर्ण उठवाया ।
पाठविले दशवदनें, जे तन्निद्राधनासि लुटवाया ॥ १ ॥

---

१ त्रैलोक्य निर्माण करणारा. २ वेदमार्ग स्थापणारा. ३ शंकराला

त्याच्या निकट मधुरुधिरवट शतसंख्याक ठेविती पूर्ण ।
मत्स्यवराहमहिषमृगमांसांचे राशि निर्मिती तूर्ण ! ।। २ ।।
विंध्य तसा, निजला तो; वदनदरीमाजि निबिड आंधार ।
फार भयंकर भासे, पातालाचेंचि काय तें दार ! ।। ३ ।।
श्वांसानिलरयपतित क्षणदांचर तूलतुल्य ते भ्रमती ।
नासाप्रवेशनिर्गमगतागतें मशकसे किती श्रमती ।। ४ ।।
' हे कुंभकर्ण ! राजा बलावितो ' मारिती अशा हाका; ।
हा कांहींच वदेना, निद्राप्रिय इंद्रशत्रुचा काका ! ।। ५ ।।
एकसहस्र महारवदुंदुभि संताडिले कितेकांहीं ; ।
मुद्गरमुसलें करिती ताडन, परि लागती न ते कांहीं ! ।। ६ ।।
शतसंख्याकजळाचे कुंभहि आणूनि रिचविले कानीं ; ।
केशोन्मूलन केलें, झाले निजकंठ शुष्क हाकांनीं ! ।। ७ ।।
चाउनियां काय वळें धांवति अंगावरूनियां, हसती ; ।
मृतवन्यगजास जसे वायसगण वेष्टिती तसे दिसती ।। ८ ।।
दशशतगज देहावर चालविले, ताडिला शिलाशिखरें ; ।
निद्रापराजयास्तव केलें त्यांहीं प्रसिद्ध युद्ध खरें ! ।। ९ ।।
ऐसा बहुत यत्नें जागा केला, जसा महाकाळ ।
मधुलोहितंवट घटघट सेवी मांसासमेत तत्काळ ।। १० ।।
क्षुत्तृट्परिहारातें करूनि निद्रालसस्वभावानें, ।
क्रव्यादांसि म्हणे, मज ' ऊठविलें किंनिमित्त भावानें ? ' ।। ११ ।।

—मंत्र रामायण युद्धकांड.

---

## ६. काळ.

तो काळ—लोक ज्याला वश जैसे धन समस्त वाताला ।।
देतां योगावियोग श्रमलव ज्याच्या नसेचि हाताला ।। १ ।।

---

१ श्वासवायूच्या वेगानें पडलेले. २ रात्रिंचर, राक्षस. ३ नाकांत येण्याजाण्याच्या येरझारा करून. ४ मद्य व रक्त यांच्या घागरी. ५ क्षुधा व तृषा यांचें शमन. ६ राक्षसास ७ हें प्रकरण मूळाप्रमाणें छापलें आहे.

लीलेनेंचि सुदुर्घट घडवी, तो प्रभु न होय काळ कसा ? ॥
विघडी घडींत घडिलें, अवघडही निराभिमान बाळकसा ! ॥ २ ॥
जेथें नृप धर्म, गदाधर भीम, महास्त्रशस्त्रपटु जिष्णु, ॥
गांडीवचाप अद्भुतशक्ति, सखा कृष्ण हा स्वयें विष्णु, ॥ ३ ॥
ऐसें अत्यंताद्भुत पुण्यशरीरास्त्रशस्त्रदैवबळ ॥
तेथेंहि विपत्ति असी दावी ! हा काळ सर्वथा प्रबळ ! ! ॥ ३ ॥

—भीष्मभक्तिभाग्य.

---

## ७. द्रौपदी.[1]

धर्म म्हणे, " शकुने ! जी रूपें श्रीला, क्षमागुणें महिला ॥
साजे सखी अखिन्ना कृत्यभरें, सुमति आमुची महिला ॥१॥
शरदुत्पळपत्राक्षी शरदुत्पळपुण्यगंधसमगंधा ॥
अस्खलित चालवी गृहधर्मीं मज, यष्टि जसि पथीं अंधा ! ॥ २ ॥
आधीं जिनें उठावें, पाहुनी निजलों असें मग निजावें ॥
रागेजणें सुदुर्मिळ, तेंहि जिचें ज्वालसें गगनिं जावें ! ॥ ३ ॥
धौम्यापासुनि गोपांपर्यंत जिनें स्वयें समाचार ।
घ्यावा, श्रिततापहार श्रीगंगेचा जिचा समाचार " ॥ ४ ॥

—सभापर्व अ० ४.

---

## ८. रामास वनांत धाडल्यामुळें भरत आईवर रागावतो.

हें जननीचें चरित श्रवण करुनियां, सखेद, फार रडे; ।

---

१ या चार आर्यांत कवीनें धर्माकडून आर्यस्त्रीचीं कर्तव्यें फार मार्मिकपणानें वर्णविलीं आहेत. गृहकृत्यभरानें न दगदगलेली, पतीला गृहस्थधर्माचारांत अंधयष्टीप्रमाणें पूर्ण साह्य करणारी, न रागावणारी व पुरोहितापासून तों गवळ्यापर्यंत सर्व आश्रितांचा त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणे स्वतः समाचार घेऊन मातेप्रमाणें लालन करणारी; लक्ष्मीसारखी सुंदर व पृथ्वीसारखी क्षमाशील, पतीच्या नंतर निजून आधीं उठणारी, कुलीन, विनयशील गृहिणी पतीकडूनही कसा आदर मिळविते हे ह्या सुंदर उताऱ्यावरून स्पष्ट होत आहे. हेंही प्रकरण मूळाप्रमाणें छापलें आहे.

दंडाहत भुजग तसा कोपें मातेकडे तदा मुरडे ॥ १ ॥
"प्रिय वधिला, पापिष्ठे ! धाडुनि विपिनासि सद्गुणकरंडा; ।
केली अकीर्ति, आपण झालासि पापाशेंये ! स्वयें रंडा ॥२॥
मारावें तुज पापे ! परि म्हणतो रामराय माय तुला; ।
यास्तव उपाय नाहीं; गरळाची तुजाचि योग्य काय तुळा ! ॥ ३ ॥
यमकार्यकारिणी तूं कृत्या, मोहूनि यास विश्वास ।
पत्नी होउनि गिळिला राजा माजा, पिता सविश्वास ॥ ४ ॥
ह्री श्री दया जयाच्या ठायीं, जो स्तुत्य या जनामाजी, ।
त्याला वनासि धाडुनि केली तूं काय कामना माजी ? ॥ ५ ॥
तूं राक्षसीपरीसहि अधमा, जे निजकुटुंब खातीस; ।
मीही पाप तुझा सुत;" हें बोले होय पारखा तीस ॥ ६ ॥

—मंत्ररामायण अयोध्याकांड.

---

## ९ रामराज्याचें वर्णन.

राज्यातें अर्जुं तो करीत असतां जाले दरिद्री धनी; ।
रोगी रोगविहीन; बालिश रत ज्ञानाचिया साधनीं; ।
गाई त्या घटदोहनीं; बहुरसा सस्यावृता मेदिनी; ।
यूपस्तंभसमन्विताहि सरयू लोकत्रयाल्हादिनी ॥ १ ॥
दिव्यस्वादुफळाढ्य भूरुहलता संशोभिता पुष्पिता; ।
आत्मापत्यमृतिप्रति क्षितितळीं पाहे न मातापिता; ।
वंध्या लब्धबहुप्रजा सकळही वर्ण स्वधर्मी रत; ।
श्रीरामाख्यसुधेसि कर्णचषकें पीती सुखें संतत. ॥ २ ॥

---

१ काठीनें मारलेला. २ दुष्टबुद्धे ! ३ तुलना, उपमा. ४ तिजकडे पाठ फिरविता झाला. ५ यांतील श्लोक विविध रामायणांतून घेतले आहेत. आपल्याकडेस ज्या राज्यांत परमावधीचें सौख्य मिळतें त्या राज्यास 'रामराज्याची' उपमा देतात. हें पंतांनीं केलेलें वर्णन फारच सरस उतरलें आहे. ६ जन्ममृत्युरहित असा परमात्मा रामचंद्र. ७ घागरभर दूध देणाऱ्या. ८ धान्यांनीं परिपूर्ण. ९ यज्ञस्तंभांनीं युक्त अशी. १० आपल्या मुलांच्या मृत्यूला.

पापातें न वसावया स्थळ दिसे; कोण श्रमाला पुसे ? ।
नाहीं आश्रय यास्तव क्षितितळीं चिंता सचिंता वसे ! ।
विघ्नातें बहु विघ्न होति, रुसली भीति त्रिलोकीं बरी; ।
साकेतीं रघुनाथ सानुजसुहृद्[1] राज्यासि जेव्हां करी ॥ ३ ॥
काम कोपहि सा असे परमोग्र जे सहचारि ते
सर्वही पळलेच सोडुनि दुर्गुणा सहजा रिते; ।
आळ घेउनियां कधींहि न वाळही कळहा निघे;
रामराज्यपदांत केवळ वासनाबळ हानि घे. ॥ ४ ॥
होय विप्रशिशु व्यसु, प्रभु त्यासि सत्वर वांचवी;
सांचवी यश गोड, तें कविमानसें बहु लांचवी; ।
रामराज्य तसें जगांत न भूतपूर्व, न भावि कीं,
नित्य तोंचि अभाविकीं कविगीत, जें सुखभाविकीं ॥ ५ ॥
आधिव्याधिजरादारिद्य व्यसनपंचताक्लेश ।
लेश प्रभुच्या राज्यांत नसे संपन्न सुखी देश ॥ ६ ॥
व्याळ व्याघ्र चोर दुर्भिक्ष प्रभुच्या राज्यांत नसे ।
जन सेविति शिशुसेचि प्रेमें प्रभुचे सुगुणस्तनसे ॥ ७ ॥

---

## १० कुशलवांचें लक्ष्मणाशीं युद्ध.

जैसे वायुविभावसू[2] कुशलव क्रोधें तसें धांवले,
विस्फारूनि धनुर्लतांसि सहसा सैन्यांतरीं पावले, ।
केलें मर्दन मांसकर्दमपटें, रक्तस्रवंती[3] किती
तेथें वाहति,पाहती भट मनीं कल्पांतसे तर्किती ॥ १ ॥
कितेक रथ मोडिले, ध्वज कितेकही तोडिले,
कितेक शर सोडिले, गज कितेकही झोंडिले, ।
असंख्य भट ताडिले, यमपुराकडे धाडिले,
शिरःप्रकर पाडिले, बहुत यापरी नाडिले ॥ २ ॥
तेव्हां शूलगदापरश्वसिलताशक्त्यृष्टिचक्रायुधें

---

१ आपले कनिष्ठ बंधु व इष्टमित्र यांसह वर्तमान. २ वायु व अग्नि. ३ रक्ताच्या नद्या.

कुंतप्रासभृशुंडिमुद्गरमहापाशादि नानाविधें ।
सर्वांहीं त्यजिलीं लवावर तदा तो त्यास खंडी शरें
मूर्खांच्या वचनासि पंडित जसा निःशंक युक्त्युत्तरें ! ॥ ३ ॥
तेव्हां तो रुधिराक्ष राक्षस गदा हाणी लवाच्या शिरीं
मूर्च्छा पावुनियां उठें पुनरपि क्रोधें मुहूर्तांतरीं ।
केशीं त्यासि धरूनि मस्तक तदा कुंतायुधानें हरी
भास्वद्दत्तधनुः करीं करुनियां गर्जे हरीच्या परी ॥ ४ ॥
सौमित्री वारुणास्त्रें शमवित दुसऱ्या मारुतास्त्रासि सोडी
तेव्हां वायु प्रचंडध्वजरथगज जे त्यांसि अत्यंत झोडी
आकाशीं शुष्कपर्णापरि किति फिरती भ्रांत सारे पदाती
स्वर्गातें वृक्ष जाती द्विजसम उडती शैलही भीति देती ॥५॥
ज्यांपासूनि नभोंतरीं शिखिशिखा[1] विद्युत्समा फांकती.
ऐसें बाण लवाग्रजें कवळितां लोकेशही धाकती
त्यांहीं लक्ष्मण हृत्कपाटकवच छेदूनियां भेदिलें
त्यातें भूवरि पाडिलें मग कुशें मूर्च्छास्वहस्तीं दिलें ॥ ३ ॥
जेव्हां दुरूनि बंधुसिंहनिनद श्रोत्रीं तयाच्या घसे
पाहे तों बळराजवेष्टित लव क्ष्माजासुताला दिसे
हातीं घेउनि खड्ग चर्म परम क्रोधें तदा धांवला
अग्नीलागिं सहाय मारुत जसा जाऊनियां पावला ॥ ७ ॥
द्विधा गज विदारिले रथहि धूळिला अर्पिले
पदातिहय चूर्णिले पिशितभुक्[2] क्षणें तर्पिले
कितेक पललक्ष्माधर[3] विनिर्मिले क्ष्मातळीं
कितेक रुधिरें नदी कितिक कूप वापी तळीं ॥ ८ ॥

—कुशलवचरित.

---

## ११ रामेश्वराचा सेतु[4].

शतयोजन आंयत, दशयोजन[5] विस्तीर्ण सेतु, शंकतें ।

---

१ अग्निज्वाला. २ मांस खाणारे. ३ मांसाचे पर्वत. ४ रामवानरांनीं रचलेल्या विख्यात सेतूवर कवीनें या सुंदर उत्प्रेक्षा केल्या आहेत. ५ लांब.

दे, गेला बुडवाया कोपाकुल भूमिबाहु लंकेतें ! ॥ १ ॥
किंवा तो कपिकटकोत्तरसिंधूद्गत बुभुक्षु कालाही ।
दूर पसरला खाया रात्रिचरा क्षुद्रबेडकांला ही ॥ २ ॥
सेतु न तो यत्पतिनें स्वसुता नेली, वृकें जशी एणी, ।
त्या लंकेची श्रीभूदेवीनें ओढिली असे वेणी ! ॥ ३ ॥
रामजयश्रीलग्नीं लंका घालीं सुनील पाटावें ।
सेनावऱ्हाडणीला पायघडी कां असें न वाटावें ? ॥ ४ ॥
बहुधा तुच्छ जलधितृण चाटायाचा धरूनियां वीट ।
गेला प्रभुप्रतापासितपथ रक्षोटवीकडे नीट ! ॥ ५ ॥
कीं पतित पति त्यागुनि विश्वशरण्यांकडे रडत वाट ।
आली जी लंकाश्री तीचा तो सांजनाश्रुपथ वाटे ! ॥ ६ ॥
कीं चिरलें स्वापयशें शोकानलदग्ध सागरोरचि तें ।
सूचविले तर्क असे त्या सेतुवरें महासुधीराचितें ॥ ७ ॥

—पनर्व अ० १२

## १२ भीम आणि दुःशासन.

तेव्हां कर्णामागें दुर्योधन, भीम अर्जुनामागें, ।
संरक्षणासि होते, ते अन्योन्यासि देखती रागें ॥ १ ॥
धांवति अन्योन्यावरि ते दोघे आठवूनि अपकार ।
जाणों ते मदमत्त क्रोधोर्द्धुर दंपतीच अ—पकार ॥ २ ॥
जें वैरशल्य दुःसह, हृदयांत करावया तदुद्धरण ।
अत्यद्भुतबळ अरि ते करिते झाले हटें विरुद्धपण ॥ ३ ॥
दुःशासनशर मर्मी लागे नागेशसा असुख राचिता ।
मूर्छित करि भीमातें इतरांचे तो पळांत असु खरचितां ॥ ४ ॥
सावध होउनि भीम क्षिप्र महाशक्ति शत्रुवरि सोडी ।

---

१ वानरसेनारूप उत्तरसागरांतून निघालेला ( कालसर्प. ) २ हरिणी. ३ राम व जयश्री यांच्या लग्नांत लंकेनें नीलवर्णाच्यापाटाव्याची पायघडीच घातली आहे असें सेनावऱ्हाडणीला कां वाटूं नये ? ४ रामाप्रतापाग्नि. ५ राम. ६ सागराचें हृदय. ७महाबुद्धिमान् नळानें रचलेल्या.८ रागानें खवळलेले ९ पकाररहित दंपती म्ह. दंती हत्ती. १० हट्टानें. ११ प्राण घेतां.

तीसहि तो दुःशासन दशबाणांहीं पराक्रमें तोडी ॥ ५ ॥
तेव्हां गदाप्रहारें भीम ललाटीं स्वशत्रुला ताडी ।
क्षितिवरि हरिवज्राहतगिरिशिखर जसें तसें तया पाडी ॥ ६ ॥
पत्नीचा केशग्रहसमय स्मरला, निजप्रतिज्ञा ते ।
आठवि म्हणे ' म्हणोत न मिथ्यावादी मजप्रति ज्ञाते ' ॥ ७
गरुड जसा गगनांतुनि वेगें उतरोनि पन्नगा झडपी ।
तैसा भीम बळानें दुःशासनकंठ अंघ्रिनें दडपी ॥ ८ ॥
भीम विदारी खड्गें सहज परमकठिन शत्रुचें उर तें ।
वाटे पविपातींही त्या साध्वीला न गांजितां उरतें ॥ ९ ॥
अशनिहत शिलातलजल रक्त जसें खड्गभग्न तें उरवी ।
तृषित घटोत्कचतात प्राशी शोणित न लेशही उरवी ॥ १० ॥
मग कंठनाल चरचर तो सत्य कराया बिरुद कांपी ।
देउनि मिटक्या मटमट घटघट त्या स्वाहितासृगुदका पी ॥ ११ ॥
' जे जे लोकीं असती रसं तो त्यांची न माधुरी थोडी ।
परि अरिच्या रक्तरसीं मज बहु त्याहूनि लागली गोडी ! ' ॥ १२ ॥
ऐसें वदोनि ओष्ठप्रांत जिभेनें पुनः पुन्हां चाटी ।
अवलंबो अत्युग्रा भीम अतृप्त द्विपारिची धाटी ! ॥ १३ ॥
रिपू शूर दूर तेथुनि तें दारुण कर्म पाहतां पळती ।
किति पडती, किति दडती, कितिएकांचीं धृतायुधें गळतीं. ॥ १४ ॥
जाणों त्या अत्युग्रा मूर्त श्रीनारसिंहमंत्रास ।
पाहोनि पावले ते रिपुभटभूपाळभूत संत्रास ॥ १५ ॥
म्हणति मनुष्य नव्हे हा, राक्षस कीं काळ हा खवळला हो ! ।
कीं आमुची कराया, मूर्त प्रळयाग्नि, राख, वळला हो, ॥ १६ ॥
भीम पुन्हां दुःशासनरक्तें अंजलि भरोनियां डोले ।
मिटक्या देउनि पाहुनि कर्णसुयोधनमुखांकडे बोले ॥ १७ ॥

---

१ इंद्र. २ वज्राघात झाला असतां तरी. ३ वीज पडलेल्या खडकासारखें. ४ घटोत्कचाचा राक्षसाचा बाप,हें विशेषण साभिप्राय आहे. ५ प्रतिज्ञा. ६ स्वाहित म्ह० आपला शत्रु त्याच्या रक्तरूप ( असृक् ) उदकास. ७ दही, दूध, मध, मक्षघृत, गंगाजल, मातृदुग्ध वगैरे. ८ सिंहाची.

" पीतों हें रक्त तुझें; हांसत होतासि मज जसा भणगा ।
दुःशासना ! तसा तूं पुनरपि गौर्गौ[1] स्व-आननें म्हण गा ॥ १८॥
आम्हांसि म्हणत होते जे ' गौर्गौः ' क्षुद्रबुद्धि नाचोनि ।
म्हणतों त्यातें ' गौर्गौः ' स्वभुजबळें संकटांत वांचोनी ॥ १९ ॥
मज काळकूटदूषित भोजन दिधलें प्रामाणकोटींत[2] ।
मर्मी सर्प डसविले काळाच्या घातलेंचि ओटींत ॥ २० ॥
आधीं निमग्न केलें ऐसें अतिदुस्तर प्रमोहांत ।
बांधोनि बुडविलें मग मज सरितेच्या गभीरडोहांत ॥ २१ ॥
जतुगृहदाह[3], द्यूतीं श्रीस्त्रीवस्त्रापहार; वनवसती, ।
दुःखें विराटभवनीं जीं बहु कोणींहि भोगिलीं नसती ॥ २२ ॥
काय करूं काळानें अभय दिलें घेतलासि तूं पदरीं ।
दुःशासना ! कुळक्षयमूळा ! तुज रक्षिता दुजा न दरीं[4] " ॥२३॥
ऐसें बोलत हांसत शत्रुरुधिरादिग्धपाणिमुख[5] विकट ।
प्रकट महाभैरवसा नाचत गेला जयाच्युता[6] निकट ! ॥ २४ ॥

कर्णपर्व अ. ४५

## १३ गाईंची वत्सलता.

### आर्यागीति.

तेव्हां धेनू चरती, गोवर्धनपर्वतावरी संचरती ।
तेथुनि दृष्टिस त्यांच्या वत्स दिसति, सुकृत बहु अदृष्टि सत्यांच्या॥१॥
चावूं विसरति घांसा, चाविलियांही गळां न उतरति घांसा ।
हंबरती दयमाना पाहति वत्सांसि ऊचलुनि वर माना ॥ २ ॥
एकिकडे एकि, कडे लंघिति, धांवति करूनि भय एकिकडे ।
पाहुनि आटोपा[7] या गोप न जाले समर्थ आटोपा या ॥ ३ ॥
वत्सांचा मनिं ओढा, न दिसे दृष्टीस दगड तरु वनिं ओढा ।
गोवर्धनगिरिमधुनी जाती सुखसिंधुलागिं त्या प्रेमधुनी[8] ॥ ४ ॥

---

१ 'गाय रे, गाय.' २ गंगातटींचें तीर्थविशेष. ३ लाक्षागृहाचें दहन. ४ भयकाळीं ५ शत्रूच्या रक्तानें माखले आहेत हात व तोंड ज्याचे. ६ अर्जुन व कृष्ण. ७ वेगास आवेशास. ८ प्रेमाच्या नद्या.

आल्या कळपापाशीं क्षय ज्याच्या पदरजें सकळ पापांसी ।
बहु वत्सांवर माया करिति त्या दुग्धसिंधुच्या वरमाया ॥ ५ ॥
हंबरती प्रेमानें चाटिति वत्सांसि पाजिती बहुमानें ।
वत्सवती परि माया बहु त्या प्रेमा जगीं नसे उपमा या ॥ ६ ॥

—बृहद्दशम, अ. १३.

---

## १४ श्रीकृष्ण, गोपी आणि मुरली.

भक्तप्रिय परमेश्वर वाजवि बहु मधुर, चित्तहर पावा; ।
कीं गोपींचा, सेवुनि नादामृत, सर्वताप हरपावा. ॥ १ ॥
वाहों आल्या तनु, मन, निजचरणीं हें कळूनि, आगमनीं ।
त्यासीं विनोद करि बहु निष्ठुरसा जेंवि सानुराग मनीं. ॥२॥
यतिपति, आत्मरत, प्रभु, साक्षी म्हणऊनि त्यास त्या कळल्या; ।
कीं सौंदर्यमदें या निश्चयमूढा व्रजस्त्रिया मळल्या. ॥ ३ ॥
मोकलिल्या तत्काळ, प्रभु झाला गुप्त, दुर्गुणें विटला; ।
स्त्रीजन विरहीं टाकी, जैसा अग्नींत दिव्य पट किटला. ॥ ४ ॥
यमुनापुलिनीं गेल्या, विफळाशा जाहल्या, वनीं भ्रमल्या, ।
श्रमल्या भगवद्विरहीं, शेवटि त्या सर्व दीनशा गमल्या. ॥ ५ ॥

---

१ विहिणी, शुभ्र. २ मंत्र भागवताच्या दशम स्कंधांत गायींच्या वात्सल्याविषयीं कवीनें पुन्हां असेंच सरस वर्णन केलें आहे त्यांतील तीन आर्या:—

गवळी चारित होते गोधन गोवर्धनाद्रिवरि दूर ।
तेथुनि वत्स पहातां गायींला नावरे कृपापूर ॥ १ ॥
वर्षानदी तशा त्या अद्रिवरुनि धांवल्या, न आवरती ।
आल्याचि; नव्या वत्सांपरिस बहु प्रीति त्या जुन्यावरती ॥ २ ॥
ते गोप क्रोधानें आले जों त्यासि न्यावया मागें !
गायींहूनि द्रवले बाळ पाहतांचि सोडिले राग ॥ ३ ॥

२ सौंदर्याचा अल्पगर्व गोपींस वाटतांच श्रीकृष्णानें त्यांचा त्याग केला अशा कारितां कीं अहंकार हा ईश्वरप्राप्तीच्या आड येणारा महाशत्रु आहे हें त्यांस नीट कळावें. ४ त्याग केला, टाकल्या.

नक्षत्रें इंदुविणें, स्त्रीरत्नें प्रभुविणें तशीं गमलीं ।
स्वसुखनिधान करींचें जातां त्यांचीं मनें बहु भ्रमलीं ।। ६ ॥
मोहळ कृष्ण सुरसमय, गोपी सरवाचि, त्यासि त्या चुकल्या ।
काय क्लेश वदावा ? सुकल्या शोकें, स्वजीवना मुकल्या ।। ७ ॥
भक्तीनें आळवितां, गातां गुण चिंतुनी मनीं मूर्ती, ।
प्रकटे गोपींत प्रभु, होतां तद्बुद्धि निर्मळा पूर्ती. ॥ ८ ॥
गलदंजनाश्रुमलिनें वदनें त्यांचीं पुशी स्वपाणीनें; ।
सांत्वन करी प्रियांचें परमेश्वर अमृतमधुरवाणीनें ॥ ९ ॥
ते प्रेमोद्गार मधुर, मधुरतर मुकुंदयशहि आधीं तें ।
गात्यांच्या, श्रोत्यांच्या, दूर करित तत्क्षणींच आधींतें ॥ १० ॥
वाहों नये जलानीं, डोलावें फण करूनि उरगांनीं ।
अश्रूंनीं देवींचें नित्य भिजावें सवस्त्र उर गानीं ।। ११ ॥
सुर अनिमेष, तसे खग, मृगहि; वसति अहि मयूरही जवळ ।
प्रभुवेणुरवश्रवणीं गायी, वत्सहि, न भक्षिती कवळ ! ।। १२ ॥
देवातें, वेणूतें, विरहीं वर्णूनि गोपिका निवती ।
त्यांहीं केली प्रभुची कीर्ति स्वप्रेमशिशुगळां जिवती ? ।। १३ ॥
सुज्ञशिरोमणि उद्धव, बहु त्यांचें प्रेमभाग्य वाखाणी; ।
त्यांसि म्हणे 'बाई हो ! अमृताची प्रेमभाव हा खाणी ।। १४ ॥
देहीं गेहीं झालें चित्त उदासीन, कृष्णगुण गातां; ।
झालां कृतार्थ, जन्मुनि उरलें कर्तव्य काय हो ! आतां ? '।।१५।।
मोठा शुद्धोद[1] असो, घनाविना चातकीस तो मरुची[2]; ।
तैसें सगुणावांचुनि निर्गुण गोपींस लेश दे न रुची ।। १६ ॥
भर बहु सगुणचारित्रीं गोपींचा, नित्य तेंचि आठविती ।
पढवुनि भक्ति बहु दिवस ठेवुनि, मग उद्धवासि पाठविती ।।१७।।

—मंत्रभागवतस्कंध १०.

---

१ स्वच्छ जलसंचय, समुद्र. २ मरुप्रदेश.

## १५ रामाच्या बाललीला.

धरूनियां रूपेंचतुष्टयाप्रती । लीलामनुष्याकृति तो रमापती ॥
भूभारनाशार्थ करूनियां पण । जाला जगत्पाळक बाळ आपण ॥ १ ॥
पीतां स्तनातें क्षणमात्र राहणें । महादरें मातृमुखासि पाहणें ॥
वक्त्रांत तें दुग्ध तसेंचि वाहणें । तेणेंचि फूत्कार करूनि नाहणें ॥२॥
मुखांतुनी दुग्ध गळे सुनिर्मळ । उरावरी ये अति शुभ्र वोगळ ॥
मंदाकिनीचा गगनीं प्रवाह तो । चंद्रप्रभौपांडुर काय वाहतो ॥ ३ ॥
पीयूषगर्वापहमाधुरीधरा । त्रैलोक्यतापांतकरा सुखाकरा ।
निजाननें श्रीश रमामनोरमा । चुंबी पदा दीनजनावनक्षमा ॥ ४ ॥
रमाधराचा रस सेविला असे । पद्मालया आपण भामिषें वसे ॥
म्हणोनियां रम्यतरा महासुखा । पाहोनी चुंबी नखदर्पणीं मुखा ॥६॥
बैसोनि हर्षे जननीचियाकडे । विलोकुनी तन्मुखनीरजाकडे ॥
स्मितामृतापूरित बोल बोबडे । बोले तदा ब्रह्मसुख स्वयें दडे ॥ ३ ॥
रमाकुचाग्रीं पद जे विराजती । करांसि ज्या कल्पतरूहि लाजती ॥
सदा तिहीं जेथ यथेष्ट रांगणें । केलें जनीं दुष्कर पुण्य आंगणें ॥७॥
अत्यंत शुद्ध स्फटिकालयांतरीं । क्रीडा करी राम जवीं परोपरी ॥
नानासुतप्राप्तिसुखासि मावली । विलोकुनी तत्प्रतिबिंब पावली ॥८॥
स्वनंदनातें प्रतिबिंबमंडळीं । धौतामलस्फाटिक मंदिरस्थळीं ॥
माता न जाणें बहु शोधितां भ्रमे । परंतु पावे सुख ती अशा श्रमें ९
धात्रीं जई रामकरांबुजाप्रती । धरूनियां चालविती स्खलद्गती ॥
चुंबी धरा ती प्रभुपादनीरजें । अलभ्य ज्यांची दिविषज्जनीं रजें १०

---

१ श्रीविष्णूनेंच रामलक्ष्मणभरतशत्रुघ्न हीं चार मनुष्यरूपें धारण केलीं. २ ओघळ. ३ चांदण्याप्रमाणें शुभ्र ( गंगेचा प्रवाह ). ४ हीं सारीं 'पदा'चीं विशेषणें आहेत;अमृताचा गर्व हरण करण्याइतकें माधुर्य ज्यांत आहे, त्रैलोक्यताप हरण करणारें, लक्ष्मीला आनंद देणारें, दीनरक्षणसमर्थ असें आपलें पद राम चुंबी. ५ स्फटिकगृहांत राम क्रीडा करीत असतां त्याचीं अनेक प्रतिबिंबें पडलीं तीं पाहून कौसल्येला आपणास अनेक पुत्ररत्नें आहेत असें वाटून परमानंद झाला। ६ अनेक प्रतिबिंबें पाहून यांत खरा राम कोणता हें तिला कळेना यामुळें ती आनंददायी अशा भ्रमांत पडली ! ७ देवांनाही ज्यांचीं रजें दुर्मिळ तीं पदें पृथ्वी चुंबी.

पित्यापुढें रत्नविराजि कंकणें । करें नमस्कार करूनि ठाकणें ।।
धात्र्युक्त सारें निजवृत्त सांगणें । अशा गुणें तो करि नाक ठेंगणें ११
आधीं जयानें उपदेशिला विधी । नाना श्रुतींचा बहु खोल जो निधी ।।
अशा निपीताब्धिसुताधरें मुखें । नृपाल तांबूलनिषेवणें सुखें ।।१२।।
भूपापरी सर्वहि तो सभाजन । याचें करी नित्यसुखें सभाजनें ।।
विलोकितां मर्त्यकृतावतारक । न लोचनीं हालति पक्ष्मतारक ।।१३।।
आला चतुर्वर्ग नृपालयीं स्वयें । चतुःकुमारात्मभिषेंचि निश्चयें ।।
तुळा नसे भूपतिच्या सुखाप्रती । स्तवी सदा यास मुखें दिवस्पती १४
रामासवें लक्ष्मण सर्वदा वसे । शत्रुघ्न तोही भरताश्रयीं असे ।।
पूर्वीं विभागक्रम जाहले जसे । द्वंद्वें सुखें वर्तति बंधु ते तसे ।।१५।।
छाया तनूची तनुला न सोडी । त्या बंधुची एक तसीच जोडी ।।
परस्परीं त्यासि अपार गोडी । त्या मित्रभावा उपमाचि थोडी १६

—छंदोरामायण.

---

## १६. मद्यपी व भगवद्भक्त !

लज्जा, गेह, कुटुंब, धर्म, रुचि, भी, देहस्मृतीही गळे,
आधीं हांसति बाळ कर्मठ भले होती तयावेगळे ।
तोंडीं शब्द विचित्र, अश्रु नयनीं, पुण्यर्धि सारी ढळे
कां पीति मदिराचि मूर्ख ! भगवत्कीर्तिप्रिया नाढळे ? ॥ १ ॥
देहातें विसरे, न मृत्युस गणी, हांसेहि, नाचे, रडे,
लज्जा जाय, नुरेचि रीति पहिली, अन्याचि आंगीं जडे, ।
हें पानव्यसनीं असें सुख ! तरि तें कीर्तिपानीं घडे
पायीं विश्व पडे, न जाय नरकीं, कां मद्यपा नावडे ? ।। २ ।।

—बृहद्दशम अ. ६५

---

१ लक्ष्मीनें चुंबिलेल्या मुखानें. २ पूजन. ३ धर्म, अर्थ, काम मोक्ष हे चार पुरुषार्थ किंवा सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता हे चार मोक्ष. ४ हें वर्णन सत्य आहे पण किती विनोदप्रचुर आहे! ५ पुण्यसंपत्ती. ६ भगवंताचें यशोमृत पिण्यांत.

## १७. राम वनवासांत निघाले तेव्हां अयोध्येंतला विलाप.

**विबुधप्रिया.**

ते[1] म्हणे " रघुनायका ! सुखदायका ! तुजवांचुनी
या जगत्त्रितयीं नसे मज सौख्यलेशहि वांचुनी ।
त्वद्वियोग रघूत्तमा ! हृदयास या श्रमहेतु कीं
उग्रदुःखभराचिया न तुळेत[2] पर्वत हे तुकीं ।। १ ।।
वासरा ! तुज वास राजसुता ! वनीं रुचला कसा ?
कां कठोर करूनि मानस टाकिशी मज लोकसा ।
ने मलाहि चतुर्दशाब्द वियोगदुःख न सोसवे
स्वप्नखेद[3] सहावयासहि आजुनी हि नसे सवे[4] ।। २ ।।
प्रीति देशि सपत्नमातृमनासि[5] होऊनिया जटी
दंडकींहि तपास्विलोकगणांसि होशिल धूर्जटी ।
दुःखसागरपारदा ! मजला परंतु तरी[6] नसे
नेत्रभृंग उपोषणें करितील हे किति दीनसे " ।। ३ ।।
पोटिशी धरुनी सुतासि करी विलाप परोपरी ।
कोपला बहु लक्ष्मण स्वमनांत धीरमणी परी ।
अग्रजासि म्हणे " विभो ! मज दे नियोग[7], भुजाबळें
स्त्रीजित क्षितिपाळ[8] बांधुनि राज्य साधिन हें पळें ! ।। ४ ।।
मारितों भरतासि आणि तयाचिया निजमातुळा
मद्भुजद्वितयासि या भुवनत्रयांत नसे तुळा ।
यौवराज्य करीं, घडो तव शत्रुला वनवास हा
स्वांघ्रिसेवनलब्धविक्रमदासकौतुक तूं पहा ! " ।। ५ ।।
लक्ष्मणासि धरूनियां हृदयीं म्हणे रघुराज तो
" हें यथार्थ परंतु बा ! समयीं पराक्रम साजतो, ।
पूर्ण हो जननीमनोरथ, सत्यसंध पिता असो,
दंडकांत चतुर्दशाब्द तपोधनीं जन हा वसो. ।। ६ ।।

---

१ कौसल्या. २ तुळणेला. ३ स्वप्नांतलेंही दुःख. ४ सवय. ५ कैकेयींच्या मनास ६ नौका. ७ आज्ञा. ८ दशरथ.

अंब ! तूं नगरीं असे, मम तात वृद्ध सचिंत हा
सेवनें सुखवीं, मनीं धरि धीर, मीं नमितों पहा ! ।
मत्समानचि पुत्र लक्ष्मण दास्य नित्य करूं तुजें
या सुतासि सुदुर्लभ त्रिजगीं महासुखहेतु जें [१] " ॥ ७ ॥
कौसलेंद्रसुता म्हणे " पितृवाक्यपालनतत्परा !
वासरा ! जरि दंडकाप्रति जासि चित्तसुखाकरा ! ।
अंतराय नसो पथीं तुजला असो सुख काननीं
मच्छरीर परंतु हें पडलें वियोगवृकाननीं " ॥ ८ ॥
वंदुनी जननीजनांप्रति रामचंद्र निघे तदा
" ने मलाहि " म्हणोनियां धरि लक्ष्मण प्रभुच्या पदा ।
मायबापहि टाकिले परि बंधुरत्न न सोडिलें
स्नेहबंधन सज्जनें भुवनत्रयींहि न तोडिलें ! ॥ ९ ॥
सांगतां वनवासवृत्त विदेहराजसुता सती
सिद्ध होय निवारितांहि, वधूसि मुख्य गती पती, ।
ते [२] धवानुमता स्वभूषण तेधवां अति आदरें
दे समस्त अरुंधतीप्रति पूजुनी नमुनी करें ॥ १० ॥
" काननीं कुशदर्भकंटकगोक्षुरादि पथीं खडे
कोमळाकृतिही तिघे, चरणप्रचार कसा घडे ? " ।
यापरी जन तो विलोकुनियां तयासि वदे, रडे,
लोकशोकजळें करूनि चिखोल भूमिवरी पडे ॥ ११ ॥
वल्कलांबरधारणोत्तर पुत्रयुग्ममुखांकडे
पाहुनी नृप होय मूर्च्छित फार दीन तसा रडे ।
मायबाप गुरू नमूनि निघे रघूद्वह तत्क्षणीं
आणवी रथ तों सुमंत्रकरें नरोत्तम आंगणीं ॥ १२ ॥
दूर तो रथ जाय तों बहु राय ' हाय ! ' म्हणे, पडे
" न्या " म्हणे, " मज राक्षसीसदनांतुनी महिषीकडे [३] ।

---

१ जें तुझें दास्य मला या जगीं महासुख देणारें आहे. या चरणांत रामाची मातृभक्ति सुव्यक्त झाली आहे. २ पति जो राम त्याचें अनुमोदन मिळालें आहे जिला अशी. ३ कौसल्येकडे.

मातृ[1]पुत्रवियोगदायक हा तिच्याच गृहीं पडो,
वांचणें न दिसेंचि, मृत्युचि तत्समीप मला घडो " ॥ १३ ॥
जेथवां प्रभु तो निघे सहसा वनाप्रति जावया
पौर ते रडती, समस्तहि टाकिती द्रविणालया ! ।
त्या रथासह धांवती पडती पथीं किति कश्मळें
' हा ! ' असें वदती मुखें नयनांतुनी गळतीं जळें ॥ १४ ॥
लोक सर्वहि शोकविव्हल ओकें[2] टाकुनि धांवले
कीं तृषाकुळ सर्व ते अमृता[3]शयाप्रति पावले ।
रोधिती[4] रथमार्ग पाहति रामचंद्रमुखाकडे
[5]बर्हिवेष्टित विद्युदंबुदसाम्य तें प्रभुला घडे ॥ १५ ॥
लोक ते कर जोडुनी म्हणती वियोग न साहवे
स्पष्ट संय[6]मनीसमान पुरीस आज न पाहवे ।
त्वत्पदांकित काननीं विचरूं जसे सुरनंदनीं
सर्व सौख्य असें त्वदा[7]स्यविलोकनीं पदवंदनीं ॥ १६ ॥
त्वत्पदाब्जवियोगतापित चित्त हें न रमे घरीं
न श्रुति[8]प्रतिपाद्यवस्तुविचारसार कथांतरीं ।
न स्मरा[9]लसकेलिलालससुंदरीभुजबंधनीं
सर्व सौख्य असें त्वदास्यविलोकनीं पदवंदनीं ॥ १७ ॥
त्वत्पदाब्जवियोगताप हरावया बळ सारसीं
पाहतां न दिसे, नसेचि निशाकरीं, न सुधारसीं, ।
राघवा ! मग शक्ति कोठुनि सर्पवेष्टित चंदनीं ?
सर्व सौख्य असें त्वदास्यविलोकनीं पदवंदनीं ॥ १८ ॥
त्वद्वियुक्तमनासि तोष नसेचि षड्रसभोजनीं
गायनीं शयनीं धनीं वसनीं सुरूपवधूजनीं ।

---

१ मातेला पुत्रवियोग देणारा. २ घरें. ३ जलाशयाजवळ. ४ अडविती. ५ तेव्हां रामचंद्र मोरांनीं वेष्टिलेल्या विद्युद्युक्त मेघासारखे दिसले. ६ यमपुरी. ७ तुझ्या मुखावलोकनांत. ८ वेदांनीं स्तविलेल्या परब्रह्माच्या चिंतनांत किंवा त्याच्या उत्तम कथांत. ९ कामविकारांनीं विद्ध झालेल्या मदक्रीडेविषयीं उत्सुक असलेल्या सुंदरीच्या आलिंगनांत.

२५८३

स्यंदनीं तुरगीं गजीं भुवनत्रयीं स्वकळेवरीं
ने वनास जनास या रघुनायका ! करुणा करीं ॥ १९ ॥
पन्नगाश्रित गेह सिंहगुहाच कीं पितृकानन
बंधनालय यातनास्थळ कीं सकोपयमानन ।
वाटती नगरी तशी तुजवांचुनी रघुनायका !
दे स्वपादसमागमामृत सर्वदा सुखदायका ! " ॥ २० ॥
यापरी वदती, रथासह धांवती अनिवारित,
कोटियज्ञ पदोपदीं अखिलाघसंचय सारित ।
पावले तमसातटाप्रति लोक तों रवि मावळे
काय पौरकथा वदों ! नगरासि टाकिति कावळे ! ! ॥ २१ ॥

—छंदोरामायण, अयोध्याकांड.

## १८ भाषादेवीच्या राज्यातला अद्भुत चमत्कार ! !

( पुढें दिलेला उतारा अपूर्ण आहे. पण तो केवळ कवीच्या भाषास्वामित्वाचा एक पुरावा म्हणून पुढें आणला आहे. भाषादेवीच्या राज्यांत मयासुराप्रमाणें अद्भुत कसरतीचे खेळ खेळणारा जादुगार मोरोपंतच. याला तुला पृथ्वीवर सांपडणार नाहीं. कथाभाग सुसंगतपणानें सरळ व नेहमींच्या गोड भाषेंत वर्णून पुन्हां तो अनेक मंत्ररत्नांनीं विणून काढणें हें काम विश्वकर्म्याशिवाय दुसऱ्या कोणास येणार ? )

रामप्रेक्षाकामें ※ श्रीमदगस्त्यादि पुण्यकीर्ति मुनी !

---

१या सुंदर श्लोकांत रामावांचून आपलें घर व नगर कसें भयाण व भीतिप्रद वाटतें हें सांगितलें आहे. २ पूर्वकर्मांचा नाश करीत. ※ हा उतारा सातव्या कांडांतला असल्यामुळें प्रत्येक आर्येच्या प्रथमार्धाचें सातवें अक्षर घेतलें म्हणजे दर तेरा आर्यांत ' श्रीराम जयराम जयजयराम ' हा मंत्र गुंफलेला सांपडतो. शिवाय कित्येक वर्ण एकत्र केले म्हणजे रामरक्षा अगर विष्णुसहस्रनामांतले श्लोक सांपडतात ! पहिल्या दहा आर्यांत ' रामो दाशरथिः शूरो लक्ष्मणानुचरो बली । काकुत्स्थः पुरुषः पूर्ण कौसल्येयो रघूत्तमः ' हा श्लोक साधला आहे; व पुढील चार आर्यांत ' वेदांतवेद्या यज्ञेशः पुराणपुरुषोत्तमः ' हा श्लोक साधला आहे. सारें मंत्ररामायण त्रयोदशाक्षरी मंत्रांत बसावेलें आहे. व उत्तरकांडांत या मंत्राशिवाय अन्य श्लोकही साधले आहेत व यामुळें तें कांड पंतांच्याच हेतुप्रमाणें ' श्रीरघुपतिमंत्ररत्नमंजूषा ' झालें आहे. हे सर्व मंत्र अद्याप सांपडले नाहींत. कांहीं के. वामनरावजी ओकांनीं हुडकून काढले आहेत. ते खचित ' सूक्ष्मदृशावांचूनकथापरांलाच सांपडणार ' नाहींत. ३ राम दर्शनाच्या इच्छेनें.

येती, त्यांला पूजी राजा निजमस्तकीं पदें नमुनी १
म्हणती, " त्वद्विध राजा पूर्वी आम्हीं न देखिला कोणी ।
दारुणशत्रु निशाचर मथिला, केली सुखाकरा क्षोणी २
क्षालायाला जनमळ भगीरथें आणिलीच देवधुनी !
चंद्रांशूपरि कीर्ती विनिर्मिली त्वांहि सुररिपू वधुनी ३
विमलगुणा ! तुजवांचुनि सूक्ष्मदृशांला न देखणा ठावें ।
अनुदिनि तव चरणाब्जीं म्हणवुनि त्यांचा द्विरेफसा भाव
हें ऐकुनि विनयश प्रभु वंदुनिया म्हणे, " अहो ! स्वामी !
बहुमान कीर्तिशाली भवत्प्रसादें करूनिया आम्हीं ५
लंकेश निशिचराधिप मेला तुमच्या तपःप्रभावानें ।
कारुण्याकुलहृत्स्थलें मजला स्तवितां स्वपुत्रभावानें ६
हा दशमुख अमरांचा रिपु दारुण जन्मला कसा दुष्ट ? ।
दोषनिधीला याला वरदाता कोण जाहला तुष्ट ? ७
हें पूर्ववृत्त मजला सांगा, आकर्णनस्पृहा आहे " ।
ऐसें पुसतां हर्षें अगस्त्य सांगे कथा तयाला हे ८
" चतुरास्य तनय रामा ! पुलस्त्यनामा अखंडितज्ञान ।
वेदाब्धि पावकौजा सत्कैवल्येक्ष गेयविज्ञान ९
संसारसिंधुचें जल केलें लंघूनि जेंवि तृणबिंदु ।
त्या सत्तमासि मग दे कन्या राजर्षिनाथ तृणबिंदु १०
त्याला झाला तनय, ख्यात मुनी विश्रवा गुणें हृद्य ।
वेदांत सारवेत्ता, सर्वजनामाजि मान्य सद्विद्य ११
तद्वनिता रघुराया ! सती भरद्वाजकन्यका झाली ।
यक्षप सुज्ञेश्वरसख, शमधन, वैश्रवणनाम सुत व्याली १२
त्याप्रति लंकानामक पुरातन स्थान अर्पिलें तातें ।
द्रविणस्वामित्वासह, पुष्पक विधि दे स्वभक्तिमंतातें १३

---

१ गंगा. २ सुंदर स्थान. ३ अमरासारखा, ४ दयामृतानें भरलेलें हृदय ज्यांचें. ५ अग्नीसारखा तेजस्वी. ६ ब्रह्मद्रष्टा. ७ प्रशंसनीय आहे आत्मस्थिति ज्याची ८ कुबेर. ९ शंकराचा मित्र.

भव पुरकाल श्रीगल गौरीगुरु भक्तकामनाकर्ता ।
झाला शूलविषोत्तरंगधर वित्तपमित्र कामसंहर्ता १४

—मंत्ररामायण उत्तरकांड.

---

## १९ रंगभूमी.

दुसरे दिवशीं राजापौरांहीं हर्ष बहु मनीं धरिला ।
समर पहाया येउनि शीघ्र महारंग सर्वही भरिला ।। १ ।।
त्या त्या मंचीं ते ते विप्रादि समग्र जन सुखें बसले ।
जेंवि विमानांत अमर गंधर्वादिक तसे समुल्लसले ।। २ ।।
वर मंच वेगळाले विप्रादिस्त्रीजनेंहि शोभविले ।
वेश्यांच्या मंचांहीं बहु कामी मधुपसेचि लोभविले[3] ! ।। ३ ।।
उपरिगृहिं राजवधू जेथें अतिरम्य जवनिका राजा ।
देवीच करिति भजनें प्रिय न सहातीच लव निकारा त्या ।। ४ ।।
प्राङ्मुख कांचनमंचीं इंदु तसा भोजनायक विराजे ।
बसले स्वोचितमंचीं रत्नांबररम्यकाय कविराजे ।। ५ ।।

—हरिवंश अ. १०

---

## २० रावणराक्षस व रापवानर यांचें युद्ध.

मग रक्षःकुंजर तो घेउनि सेनेसह स्वपुत्रास ।
वानरबलासि, येउनि देता झाला, जगद्रिपु त्रास ।। १ ।।
ते दुंदुभि तोयदरव, दरवर, वीणा, मृदंग, वाजविती ।
गजहयरथचक्रध्वनि भटसिंहध्वान भुवन गाजविती ।। २ ।।
कांपे धरा थरारां, गिरि चळती, अब्धि होय संक्षुब्ध ।
पांसु प्रांशूष्णांशुद्युति चोरुनि होय सुरनदीलुब्ध ।। ३ ।।

---

१ शूल, विष व सर्प यांतें धारण करणारा. २ भव्य वस्त्रपात्रादिकांनीं शोभले ३ हें सर्व वर्णन आजच्या नाटकगृहाला बरोबर लागतें. ! ४ माडीवर. ५ पडदे. ६ राक्षसश्रेष्ठ रावण ७ मेघासारखे नाद करणारे नगारे. ८ चांगले शंख. ९ वीरांचे. सिंहनाद. १० फार प्रखर असें सूर्यतेज.

वासेवनीलश्री, तो कवची, खड्गी, गदी, शरी, चापी, ।
प्रासी, शूली, कुंती, मुसली दशकंठ पातला पापी ! ॥ ४ ॥
कपिबळपारावारीं दशमुख शिरला जसा महामकर ।
‘ मामकरक्षोवृंदीं, ’ म्हणे ‘ कसा शर धरील रामकर ?’॥५॥
तो समर लोमहर्षण केला, त्याला तुळा नसे कांहीं ।
केशाकेशि, नखानखि, मुष्टामुष्टि प्लवंगलोकांहीं ! ॥ ६ ॥
नानायुधव्रजक्षत कपि कोपें पादपाद्रिशिखरांहीं ।
रात्रिंचरसेनेला मर्दिति पदमुष्टिदंतनखरांहीं ॥ ७ ॥
मृतगजहयदेहातें हातें उचलोनि मारिती रिपुला ।
क्षतरक्षःक्षतजांच्या क्षितिपृष्ठीं वाहती नदी विपुला ॥ ८ ॥
ते गगनग मग अगनगधर खरतर वीर नीरदासारे ।
वर्षति अध्वररक्षण दक्षासुरसंघ मस्तकीं सारे ॥ ९ ॥
मांसाचे संचय किति; रक्ताचे वाहतो महापूर ।
शूरजनक्षय झाला, भूरजहीना, द्रुमाद्रिही चूर ॥ १० ॥
धूळीच्या निकरानें पडला सर्वत्र निबिड आंधार ।
काय रजःपटलानें भूमि करी निर्जरांसि आधार ! ॥ ११ ॥
घेउनि धिक्कारातें, जय देउनि रामबाहुदंडांतें ।
यातु गृहीं जाय, गणी कोदंडातेंचि कालदंडा तें ॥ १२ ॥

—मंत्ररामायण युद्धकांड.

---

## २१ भारतीयुद्धानंतरचा रणभूमीवरचा शोकप्रद देखावा.

श्रीकृष्णवरें पाहे हें युद्धस्थान दिव्य—दृष्टि सती ।
योग्या जाणाया जी स्वव्रतपुण्यें अशेषसृष्टिस ती ॥ १ ॥

---

१ पाचूसारखी नीलकांति ज्याची तो. २ अंगा वर कांटा उभा करणारा. ३ वृक्ष व पर्वत धारण करणारे. ४ इंद्रजिताचा यज्ञ रक्षण करण्याविषयीं तत्पर असलेले राक्षससमुदाय.५ गांधारी.

जे भक्षिल शिवांहीं गृध्रांहीं कांतकाय काकांहीं ।
ते पाहूनि न पाहति बहुमूल्य मणींस वायका कांहीं ।। २ ।।
तें सर्व स्त्रीचेष्टित गांधारी दिव्यदृष्टिनें पाहे ।
कृष्णासि म्हणे ' कोण्ही स्त्री मजसम दुःखिता जगीं आहे ? ' ।।३।।
हुडाकिति शवें पहा ! पतिसुत वळखायासि बायका सारीं ।।
या कमळवनाविहारा शिरल्या हंसीच काय कासारीं ! ।। ४ ।।
भीरुप्रकृतिहि न गणिति भय पतिंच्या भेटतां घडा, कांकीं ।।
गृध्रीं वृकींहि साहति कदलीहि करेणुचा घडाका कीं ।। ५ ।।
पदरें पुसोनि चुंबिति पतिमुख, सुरतांत जे जसें चुंबी, ! ।।
बा ! मत्क्रिया प्रसवली जैशी ऐशीं न कटु फळें तुंबी ।। ६ ।।
दुर्योधनास भेटे होय तिच्या फार भर विलापाला ।।
दैवें शतपुत्रविप–च्छामेचा तीस भरविला पाला ।।७।।
' कृष्णा ! पहा ! सुतेजा जोडा होता जगांत हा रविला ।।
हार विलासवतीनें जेंवि क्षितिनें तसाचि हारविला ! ।। ८ ।।
हार विलासवतीनें केला हा लक्ष्मणप्रसूनें कीं ।।
हारविला सवतीनें क्षितिनें, पुजिला सुरप्रसूनें कीं ।। ९ ।।
कृष्णा ! युद्धारंभीं हा माझा पुत्र मत्पदा लागे ।। १० ।।
' माते ! विजय घडाया दे आशीर्वाद मज ' असें मागें ।।
वदल्यें मेघश्यामा ! या माझ्या नंदनासि मीं बा गा ! ।।
' जिकडे सुधर्म तिकडे जय युद्धीं, न भ्रमे महाभागा ! ' ।। ११ ।।
वत्सा ! जरि तूं युद्धीं न भ्रमसिल पावसील सुगतीतें ।।
करितां कुलीन जेणें हर्षे स्वर्गीं स्वर्पूर्व फुगती तें ।। १२ ।।
रडत नसे पुत्रातें, स्वर्गा गेला, न सोडिली संधा ।।
कृष्णा ! रडत्यें मी या दीना हतबांधवा धवा अंधा ।। १३ ।।
विटले कंसाऽराते ! संसारा तेचि एक जन धन्य ।।
अन्य व्यर्थाचि गेले, मेले विषयार्थ करुनियां जन्य ।। १४ ।।

---

१ हत्तिणीचा. २ माझें कर्म. ३ कडू भोपळीचा वेल. ४ दुर्योधन स्त्रीच्या, विलासवतीच्या. ५ शतपुत्र हीच विषवल्लीरूप वल्ली तिचा; श्यामाः भांग ( पंत ) ६ आपले पूर्वज. ७ पतीला, धृतराष्ट्राला. ८ युद्ध.

मुख हुंगिती सुतांचें पतिवरि कर फिरविती पहावेना ।
कृष्णा ! कोणाचा तरि शोक करिल हें मज सहावेना ॥ १५ ॥
तापविती अति दुःसह पतिसुतशोकाऽर्क आंत बाहेर ॥
विधिवरि बोटें मोडुनि कोपें खाताव दांत वा ! हेर ॥ १६ ॥
हा दुःशासन कृष्णा ! मेलाही दाखवी न पाठ उनीं ॥
पडला पहा ! उताणा अभिमान असे असूंसि पाठउनीं ॥ १७ ॥
हा मूढ भ्रात्याचें कर्णाचें प्रिय करावयाहि तसें ॥
साध्वीस सभेमध्यें गांजी तें कर्म या गमे हितसें ॥ १८ ॥
म्हणसिल कृष्णा ! मज तरि मारावें या कसें न भावातें ॥
सोडूं नये प्रशस्ता शीला कुलजें जसें नभा वातें ॥ १९ ॥
सौभद्र शिशु शरभसा तो हा संपन्न जो महाशौर्यें ॥
तुजहुनि धनंजयाहुनि अधिक दिढीनें रणीं बळें शौर्यें ! ॥ २० ॥
कृष्णा ! त्वत्सम तव कृत-वर्णन भाचा परा सुकविता कीं ॥
झाला घालाया धृत-वर्ण नभाचा पराऽसु कवि ताकीं ॥ २१ ॥
शुद्धा सरस्वतीशी कृष्णा ! सोडी प्रभा न मेल्याला ॥
मज भगवान् भास्करसा हाहि महाभाग भा गमे त्याला ॥ २२ ॥
अंकीं मस्तक घेउनि ती बाळ उत्तरा पहा पातें ॥
चिबुकें धरुनि बोलविते ' लिहिलें ऐसें कसें महापातें ' ॥ २३ ॥
म्हणत्ये " मौन त्यजुनि स्मितपूर्वक एक बोल बोला जी ! ।
ती कसि निवेल तुमच्या प्रियवागमृतींच नित्यलोला जी ॥ २४ ॥

---

१ पतिशोक व सुतशोक हेच कोणी सूर्य. २ या कठिण आर्येवर खुद्द कवीनें विस्तृत टीप दिली आहे ती अशी:—" कृष्णा ! त्वत्सम कृतवर्णन–कविकृतगुणवर्णन —तव—भाचा परा—अरितें प्रतापें सुकविता शुष्क करिता असा होता कीं तो हा नभाचा घृतवर्ण गगनासारखा श्यामवर्ण सौभद्र स्वाश्रयीं अमृतीं जे कवि होते ते स्ववियोकीं ताकीं—नीरसीं पराश्रयीं-घालावयासि परासु झाला. " पंतांचा भावार्थ असा दिसतो. " कृष्णा ! तुझ्यासारखा श्यामवर्ण पराक्रमी भाचा शत्रूंस स्वतेजानें असा निस्तेज करणारा होता कीं तत्पराक्रमवर्णनामृत पिणारे जे कवि होते त्यांना स्ववियोगतक्र पाजण्यासाठींच कीं काय तो मृत्यु पावला ! " ३ हा सूर्याप्रमाणें भा (तज) त्याला (तेजोरूप अलंकारानें भूषित झाला) ४ हनुवटी. ५ रमलेली

हा जनं सखीसमाजीं तुमचा सोडूनि काय पद रमला ? ।
चुकल्यें क्षमा करावी, पसराया उशिर काय पदर मला ? ॥२५॥
नसतां उशी उशीरव्यजन पय:फेनशुभ्र मृदुशयन ।
कशि निज आली जरि शिर न मदंकीं पदतळींहि हा शये न २६
अपराध का करिल हे ? जाणे पतिदास्यधर्म साध्वी कीं ।
अजि ! तीर्थबुद्धि केवळ जी युष्मत्पीतशेषमाध्वीकीं ॥ २७ ॥
नेत्रें उघडूनि पहा ! दासी तुमचीच हे नव्हे अन्या, ।
भलती स्पर्शेल कसी ? मी सत्य विराटनृपतिची कन्या ॥२८॥
हा सातवा परिचया मास पहा ! गणुनि लोटले साच ।
इतुक्यांत कसे विटलां ? साधु म्हणति सख्य साधुसी साच २९
आर्या कृष्णादेवी, आर्या कृष्णाऽनुजा पृथा आजी ।
यांवरि रुसलां कैसे जातां सोडूनि कां वृथा आजी ? ॥ ३० ॥
वीरा कोणा पांडव माधव तव हे न नाथ सा मान्य ? ॥
मेलासि असाहि कसा सहसाचि जसा अनाथ सामान्य ? ॥३१॥
तुजवाचुनि वांचुनि सुख कैचें ? हा कायं भार, तार मला ॥
ने, हंस मानसीं निज–हंसीविण काय भारता ! रमला? " ॥३२॥
उदकीं लवण तसें हें करिलचि शोकांत उर विलीन सती ॥
असती मृदु तरि पळ या तापें लोकांत उरविली नसती ॥ ३३ ॥
आयांतें दायांतें म्हणत्ये 'मज लाविली बळेंच सवे ॥
कां मोडितां तुलीच ? क्षण आतां स्व–पति वेगळें नसवे ॥३४॥
पति जवळुनि कां नेतां नेउनि हितबोध करुनि खोलींत ॥
तुमच्याहि असें अंतर पडलें कांगें क्रियेंत बोलींत ?' ॥ ३५ ॥
जड सोडवितां हृदयीं देह मनोमयाचि उरविला पतिचा ॥
गांधारीनें कथिला, भिजवी प्रभुचेंहि उर विलाप तिचा ! ॥ ३६॥
रार्धा म्हणत्ये 'हा ! मज पुत्रवतींचीच लागली दृष्टी ॥
पुत्रा ! शून्या झाली तुजवांचुनि जेंवि रविविना सृष्टी ॥ ३७ ॥

---

१ मीं–संस्कृत 'अयं जन:' प्रमाणें प्रथम पुरुषार्थी घ्यावा. २ वाळ्याचा पंखा ३ माझ्या हात. ४ आपण पिऊन उरलेल्या मद्याला मी तीर्थ समजत होतें. ५ पांच पांडव व सहावा कृष्ण. ६ देह. ७ मद्य. ८ कर्णाची आई.

मजपरिसहि बहु म्हणतिल हे वार्ता परिसतां धरासुर[1] ' हा!' ॥
अस्मद्भाग्यें केला तो कर्ण रणांगणीं पराऽसु, रहा ॥ ३८ ॥
द्विज हो ! संतत तुमच्या जो आशीरमृतवृष्टीनें ओला ॥
पार्थदवानें केला कल्पद्रुम भस्म तो कसा ? बोला ! ' ॥ ३९ ॥
वृषसेना राणि म्हणते ' नाथा ! तुज न विजयें न गुरुशापें ॥
वधिलें कृष्णाक्षोभें अथवा माझ्याचि पूर्वकृत पापें ॥ ४० ॥
ब्रह्मण्य शूर दाता बुध सर्वांगोपभोग जो कर्ता ॥
हर्ता शत्रूपद्रव दुष्टे ! मंहि ! मारिला कसा भर्ता ? ॥ ४१ ॥
मज तुजहि समचि भजला उपभोगें तोषला विलासवती ॥
अन्या स्वप्नीं नेणे त्यासि कसा दोष लाविला सवती ? ॥ ४२ ॥
मज कां गिळिलें नाहीं ? पापे ! रथचक्र गे ! कसें गिळिलें।
दे उत्तर ऐकों दे ! कां न वदसि, तोंड काय गे खिळिलें?[2]॥४३॥
बहुभर्तृका कुशीला तूं तुज म्हणतात सुकवि कुतरीच[3]।
रथचक्र कव्य कवळ करुनि खरी जाहलीस कुतरीच ॥ ४४ ॥
धर्मा त्रयोदशाऽब्द न ज्याच्या चिंते करुनि निज लागे।
तो हा पुन्हा नुठाया वसुधे ! तुज दृढ धरूनि निजला गे !'॥४५॥
' देवा ! जयद्रथाचें सांपडलें परि नसेचि धड धड तें।
आलिंगिलें सुतेनें पाहुनि माझ्या उरांत धडधडतें ॥ ४६ ॥
कृष्णा हरिली जेव्हां कृष्णा ! हा तेधवांचि मारावा।
परि धर्म म्हणे ' बुडतें भगिनीसौभाग्य म्हणुनि तारावा ' ॥५०॥
तैसीच या प्रसंगीं धर्में कां दुःशला[4] न आठविली ?।
जाणो ! युद्धारंभीं करुणा तीर्थाटनासि पाठविली ! ॥ ५१ ॥
बहुतकरुनि तों एका कन्येच्या या जनांत ज्या माता।
त्यांसि गमे स्वतनुपरिस अधिक सुतासूनुपरिस जामाता ! ॥ ५२ ॥
येती पुनःपुन्हा शिर हुडकुनि धांवत सुता धडाजवळ।
कीं काकगृध्र-वृक-बक तडतड तोडूनि भक्षिती कवळ ॥ ५३ ॥

---

१ ब्राह्मण. २ पृथ्वीनें रथचक्र गिळिल्यामुळें कर्णवध झाला. ३ पृथ्वी, बहुभर्तृका आहे म्हणजे पुष्कळ राजांनीं हिचा उपभोग घेतला आहे, अर्थात् ती कुशीला आहे ४ दुःशीला ही धृतराष्ट्राची कन्या असून तिचा पति विषयांध जयद्रथ होता.

म्हणत्ये तुझ्या सख्याला वा ! कोणिकडे झुगारिलें शिर तें ? ।[1]
चिरतें काळिज कानीं कन्येचें करुणवच जसें शिरतें ' ॥ ५४ ॥
' भीष्मप्रभु शर--तल्पीं निजला आहे जसा कुसुमतल्पीं ।
हें शौर्यवीर्य न सुरीं, कैसें मनुजीं असेल मग अल्पीं ? ॥ ५५ ॥
या मागें धर्माचें पांडव पुसतील तत्त्व कोणातें ? ।
हा ! राजनीति विधवा झाली बैसेल धरुनि कोणातें ! ॥ ५६ ॥
हा परमसत्यवादी स्ववधोपाय स्वयेंचि कीं कथिला ।
मग अर्जुनें शिखंडी करुनि पुढें न्यस्तशस्त्र हा मथिला ॥ ५७ ॥
सकळां शस्त्रधरांचा हरसा आचार्य[3] नायक विनेता[4] ।
पडला पहा परांतें विलया म्हणऊनि ' हाय ' कवि नेता ॥ ५८॥
शिव शिव कृष्णा ! क्रव्यादांहीं याचाहि भक्षिला काय ।
स्वाश्रय न रक्षिला तरि अस्त्रांहीं अर्थ रक्षिला काय ? ॥ ५९ ॥
ज्याचें अतुळ ब्राह्मक्षात्रहि तेज प्रसिद्ध, जो लोहा ।
स्पर्शमणि तसा, प्रणता शिष्या अत्युत्तमत्व दे, तो हा ॥ ६० ॥
त्याचा खातात पहा तडतड तोडूनि करट[6] पायातें ।
सर्व तुम्ही वंदाया तेव्हां जोडूनि कर टपाँ यातें ॥ ६१ ॥
कृष्णा ! कृपी कृशाकृति कृपणा झाली पहा महाशोकें ।
नाना विलाप करिती गमती कोकीच टाकिली कोकें ॥ ६२ ॥
ती ब्रम्हचारिजटिलच्छात्रजनासह करूनि आशु चिता ।
उचिता क्रिया करितसे, या स्त्रीची अद्भुताचि वा शुचिता! ॥ ६३ ॥
तळमळती पाहोनि प्रेतदशा निपट अनुचिता पतिची ।
असिला बहु काय चिता ? देणारी सुबहु तनुचि ताप तिची ॥ ६४ ॥
हा शकुनि, अमृत परि ज्या विष धर्मन्याय, सत्य वामेला ।
नाहींच मनीं कपटद्यूतीं जोडूनि अत्यघा मेला ॥ ६५ ॥

---

१ पार्थाला. २ कोपऱ्याला. कुलीन घराण्यांतली विधवा लज्जेनें दुःखानें कोपऱ्यांत रडत बसते. ३ द्रोणाचार्य. ४ शिक्षक, गुरु. ५ कौरव व पांडव उभयतांचा आश्रय द्रोणाचार्य होता तेव्हां त्याच्या अरक्षणाचा दोष दोघांकडे आहे. ६ कावळे. ७ टपत होतां ( पंत ) ८ द्रवला, विरघळला.

हे राजश्री व्हाया मम तोकांचा विनाश शिकले तें[1] ।
तपनालाहि गिळी जो तम तो कां चाविना शशिकलेतें ? ॥ ६६ ॥
तूं एक पांच पांडव हे सा केवळ अवध्य गमतात ।
आपण नामेंचि अचळ ऐसें येइल अवध्यगमतांत[2] ॥ ६७ ॥
भीष्म द्रोण जयद्रथ दुर्योधन कर्ण यां पुढें पुरलां ।
कृप कृतवर्मा अश्व–त्थामा अत्युग्र, परि तुम्ही उरलां ॥ ६८ ॥
हे समरीं अमरींचे तिलकहि लकलकित नाहींसे करिते ।
परि तेजोनिधि दैवें घटजें केलेचि कीं अनेक रिते " ॥ ६९ ॥
ऐसें वदोनि दुःखध्वस्तज्ञाना[3] सती बहुत रडली ।
धैर्यातें सांडुनि ती गांधारी शोकमूर्च्छिता पडली ॥ ७० ॥

—स्त्रीपर्व. अ. ४ व ५

---

## २२. रामाचा सीतेसाठीं शोक.

प्रणमन करूनि लक्ष्मण, विमुला सीतोक्ति सर्व आयकवी ।
तच्छ्रवणें व्याकुळ बहु झाला चित्तांत सुज्ञराय कवी. ॥ १ ॥
तों निजउटजा येतां, मार्गीं होती अनेक अपशकुन ।
हानीतें सुचवीती निजदेहस्फुरण, मृग, शिवा, शकुन[4]. ॥ २ ॥
आलय जाउनि पाहे, तों सीता राघवासि भेटेना; ।
त्या समयाहुनि दारुण मृत्यु, असें लक्ष्मणासि वाटेना ! ॥ ३ ॥
" रुचिराक्षा नाहीं कीं, वत्सा ! हें अन्यगेह वाटतसे; ।
इतरस्थळासि आलों, चुकती अनभिज्ञ[5] लोक वाट, तसे ॥ ४ ॥
वत्सा ! मज जरि म्हणसी, सीतेची हेच होय दलशाला; ।
तरि मीच रामनामा नसेन; साध्वी दिसेल काशाला ! ॥ ५ ॥
ते मजवांचुनि नाहीं गेली गोदावरीविहारातें; ।
क्षण मद्विरहें तीतें; युग होतें; भार भाति हारातें[6]. ॥ ६ ॥

---

१ कपटद्यूत. २ अवधि—अग—मत ह्म. हिमाचलाच्या मनांत. ३ दुःखानें हरण केली संज्ञा जिची अशी गांधारी. ४ अंगस्फुरण, हरिण. कोल्हीं व पक्षी अशुभ सुचवितात. ५ अजाणते. ६ माझ्या विरहांत तिला हारही भार ( ओझें ) वाटतो.

ते प्रियतमा न हिंस्रें वधिली; नाहींच रक्त भूवरतें; ।
नेलीच राक्षसानें; " म्हणोनि शोधी स्थल क्षमावर तें ॥ ७ ॥
" कोठें जनकसुते ! तूं गेलीस; धरासुते ! प्रिये जाये ! ।
न करीं विनोद; झाला व्याकुळ अत्यंत देह माजा, ये ॥ ८ ॥
तूं काय कोप धरिला अपूर्व मृग नाणिला म्हणून मनीं ? ।
तरि चंद्रमृगहि आणुनि देईन, हें तूं असत्यसें न मनीं ॥ ९ ॥
श्वशुराला परलोकीं गेलिस जरि तूं करावया नमना; ।
पुसल्यावांचुनि कैशी सीते ! झालीस आज यानमना ॥ १० ॥
न्यावें मजही तेथें, श्वशुराची प्रार्थना करून, सती ! ।
भरत करूं राज्यातें. तुजवांचुनि वांचुनी, सुखें नसतीं. ॥ ११ ॥
राज्यश्री हरुनि, जरी कैकेयीनें वनास पाठविलें ।
तरि तवयोगें तें मीं नाहीं कांहीं मनांत आठविलें ! ॥ १२ ॥
मज राजकन्यके ! तूं वरूनियां पावलीस न सुखातें; ।
खातें हें चित्तातें; सांगों कोणास मी स्वदुःखातें ? ॥ १३ ॥
हा कमलाक्षि ! तनूदरि सुंदरि ! जाये ! प्रिये ! अये ! सदये ! ।
विधुमुखि ! पिकगर्वापह, अमृताहुनि गोडसें, स्वयें वद; ये ॥ १४
पंकेज, विधु, हरि, गज, पिक, चमरीमृग, कीर जिंकिले होते; ।
त्वन्मित्रातें मातें, त्वद्वैरें, पीडितील सखि ! हो ते ॥ १५ ॥
हा प्रियतमे ! वियोगज्वलनमुखीं होमिलेंस कां मातें; ।
वैरी संतोषविले, टाकुनि यातें वनीं सकामातें ! " ॥ १६ ॥
ऐसा रात्रिदिवसही विलाप करि शोकपर, जसा कोक ।
कोकनदाक्ष सुमित्रातोकसहित तो करी विकळ लोक ॥ १७ ॥

—मंत्ररामायण ( अरण्यकांड )

पंपासरोवरावर लक्ष्मणासह राम आले तेव्हां पुन्हां शोक करितातः—

वत्सा ! धरारुहातें वेष्टुनि वल्ली जशाचि आहेत ।
सीतालिंगित होतों ऐसा, परि तो न पूरला हेत ॥ १८ ॥

---

१ सुवर्णमृग. २ जाण्याविषयीं इच्छा जिला अशी. ३ कमल ४ चक्रवाक.

सप्राणा जनकसुता असेल ? मी काय तीस पाहीन ? ।
स्त्री हारवूनि रडतो ऐसा कोणी नसे त्रपाहीन ॥ १९ ॥
नरराय देत असतां अभाग्य हा मी न पावलों कमलों ।
कांतेला हारविलों, हांसत असतील सर्व लोक मला ! " ॥ २० ॥
तेथें मयूरसारसहंसकपिक्रौंचकीरकोकांतें ।
सस्त्रीकांतें पाहुनि मानी प्रभु धन्य पक्षिलोकांतें ॥ २१ ॥

मंत्ररामायण ( किष्किंधाकांड ).

## २३ मातृभक्त कुश.

( रामपक्षीयांनीं धाकट्या लवाला पकडून नेल्यामुळें शोकग्रस्त झालेल्या सीतादेवीस पहातांच कुश म्हणतो. )

वदन रोदनमोहहेतुला । उचिता अंब ! दशा न हे तुला ।
तव दुःख न नाशिलें जरी । तरी लोकीं व्यसुतोंचि साजिरी ॥ १ ॥
अहह ! श्रम जाहला तुला । न दिसे यासि जगत्त्रयीं तुला ।
तव वक्त्रनिशीशें कोमला । मग तें जीवितही नको मला ॥ २ ॥

—कुशलवचरित्र.

## २४ राजाचें प्रजेवरील प्रेम.

( सत्यनिष्ठ व सत्वधीर राजा हरिश्चंद्र छलाच्या कसाला लागून श्रेष्ठ ठरल्यावर इंद्रानें त्याला स्वर्गास बोलावलें, पण तो प्रजापालनतत्पर राजा म्हणाला कीं ' माझ्या प्रजेला सोडून मला कोणतेही सुख नको ' तो प्रसंग. )

नरवर म्हणे " कुटुंबी जे कोणी लोक, तत्प्रभावानें ।
भोगितसे राज्यातें राजा, नच केवळ स्वभावानें ॥ १ ॥
तें म्यां जनप्रसादें शक्रा, सर्वहि अनुष्ठिलें कर्म ।
उपकारी न त्यजिन, स्वर्गीं वांछुनि तयाविना शर्म ॥ २ ॥
जें तपदानमुख सुकृत माजें, त्यांचेंहि बा ! असो सम तें ।
गमतें समुचित मज हें सुकृतज्ञमतें, न केवळ स्वमतें" ॥ ३ ॥

—हरिश्चंद्राख्यान.

---

१ निर्लज्ज. २ लक्ष्मी, राज्यलक्ष्मी. ३ रडण्याचें कारण, ४ आई ! ५ मरण. आईला होणाऱ्या दुःखाचें निवारण करितां आलें नाहीं तर तशा जगण्यापेक्षां मरणच बरें ! ६ तुलना. ७ मुखचंद्र.

## २५ मारुतीची योग्यता.

( समुद्रोल्लंघन करून परत येण्यास कोणी समर्थ नाहीं या विचारानें वानरसेना चिंताग्रस्त बसली असतांना वृद्ध जांबवान् मारुतीचें नांव सूचवून म्हणतो. )

हा तनय मारुताचा, याच्या ऐका अपार वीर्याला ।
भक्षित होता परिणतफलमतिनें उपजतांचि सूर्याला ।। १ ।।
व्यर्थचि मनांत धरितां चिंता, पावोन सेतुला याला ।
ओजस्तेजें यासम कोणी प्राणी नसे तुलायाला ।। २ ।।
याचे भुजदंड पहा ! प्रचंड यमदंड दंडदक्ष महा ।
हा वज्रदेह केवळ सुरशत्रुपराजयप्रदक्षम हा ।। ३ ।।
हा विजयवीर्यशाली, दुर्धर, दुर्धर्ष, सर्ववीरमणी ।
लंघुनि नदीपतीतें, शोधील, पालसूनुची रमणी ।। ४ ।।

मंत्ररामायण ( किष्किंधाकांड ).

# ५ कथानकपर कविता.

——:※:——

## १ सुभद्राहरण.

( हें प्रकरण विनोदप्रचुर असून बळरामाच्या रागीट पण उतावेळ व उदार स्वभावाचें यांत उत्कृष्ट चित्र रेखाटलें आहे. )

तीर्थे हिंडत गेला धर्मानुज अर्जुन प्रभासाला ।
आप्तमुखें निजमातुळ कुळवृत्तांतासि ऐकता झाला ॥ १ ॥
कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे ।
तीतें स्वमतें हलधर धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे ॥ २ ॥
पार्थ त्रिदंडिवेष स्वीकारी हळधरासि वंचाया ।
युक्तीनें स्वपरविहित हित करितां कपटदोष कंचा या ? ॥ ३ ॥
द्वारवतींत बसे तो यति वार्षिक चारमासपर्यंत ।
हर्यंतःकरणांसाचि ठावा तद्योग जो सदैर्यंत ॥ ४ ॥
मौन, सदा एकांतस्थिति, साधु समाधियोग, सुविरक्ती, ।
सक्ति न लोकसमाजीं, लागे पौरांसि पार्थयतिभक्ति ॥ ५ ॥
मोठेमोठेहि मठद्वारांतुनि भेटि घेति पायांची ।
असमशैरज्वरभरखर करपवि, परि वरि समाधि वायांचि ! ॥ ६ ॥
तो यति एका दिवशीं बळदेवें आणिला स्वगेहास ।
पूजुनि सुश्रद्धेनें जेववितां माधवासि ये हास ! ॥ ७ ॥
यतिदर्शना सुभद्रा येउनि बैसे निजाग्रजाजवळ ।
न बळ प्रेक्षी, परि यतिहस्तींचा पाहतां गळे कवळ ॥ ८ ॥
घाली घृतांत सैंधर्व, दुग्धीं जंबीरें, पायसीं कथिकों ।

---

१ कृष्णाच्या मनाला. २ अरिनाशक. ३ असम-विषम—पंच. पंचशर—मदन ४ मीठ. ५ लिंबु. ६ कढी.

मथि कामशर जया त्या खम म्हणे ' साधु ' मोक्षसत्पथिका ॥ ९ ॥
कन्यारत्न हराया अवसर पाहे जसा खरा चोर ।
घोर प्रताप परि मी भीमानुज, कीं अनंतबळें थोर ॥ १० ॥
अनुकूळ ब्रह्म तसें तों झालें तन्मनोरथा पर्व ।
तीर्थस्नान कराया पुरवासी लोक चालिले सर्व ॥ ११ ॥
दिव्यरथांत सुभद्रा राकारजनी तसी बळीं शोभे ।
यन्मुखसुधाकरें नरवरपार्थाशयपयोनिधि क्षोभे ॥ १२ ॥
तेव्हां धांवुनि बैसे पार्थ सुभद्रारथीं, जसा पाटीं ।
सुचिर क्षुधित ब्राह्मण ' हां हां ' म्हणतांहि वाढल्या ताटीं ॥ १३ ॥
समयज्ञ चतुर सेवकधनुतूंण तशांत देति आणोनी ।
धांवति रक्षक सैनिक कपटयतिकृतात्यनर्थ जाणोनी ॥ १४ ॥
' धर्मानुज मी अर्जुन सिंह, तुह्मीं शशकिशोर, आटोपा ।
या टोपा कवचांच्या भीना, वल्गा उगेचि आटोपा ॥ १५ ॥
ऐसे नीट दटावुनि जाय सुभद्रा हरूनि तो पार्थ ।
मारिति हाका केवळ, नागविला बनिं जसा वणिक्सार्थ ॥ १६ ॥
सार्थक पार्थ करी, ती कैरविणी, तो सुधांशु गौरविता ।
सविता बिसिनीसि करी, कीं भेटे तो गुणज्ञ ती कविता ॥ १७ ॥
झटिति भटकटक बहु करि ' कन्या नेली ' म्हणोनि बोभाट ।
वाटे बळास सांगे जो जो त्या दस्युचाचि तो भाट ! ॥ १८ ॥
प्रस्फुरदधरदल प्रभु बळभद्र म्हणे ' खरेंचि सांगा ! रे ।
कोठें तो कपटपटू ? गांठितसे जो पटांत आंगारे ! ॥ १९ ॥
कोठें रथ ? मुसळ पुरें, कवच कशाला ? धनुष्य ? राहों द्या ।
वत्सेला निजधर्षणकरखळदंडोत्सवासि पाहों द्या ॥ २० ॥
पर्वीं अर्णव तैसा भगवान् बळभद्र पुष्कळ क्षोभे ।
संध्यारागसुरंजित शरदभ्राहूनि फार तो शोभे ! ॥ २१ ॥
जाय हळूच विनयनतराय चतुर वृष्णिराय देव हरी ।

---

१ बळरामाची शक्ति. २ पौर्णिमेची रात्र. ३ तेलंगी ! ४ धनुष्य व भाता. ५ लगामास. ६ व्यापाऱ्यांचा तांडा. ७ चोर पार्थाचा स्तुति पाठक. ८ कृष्ण.

माय सुतार्थ पतीचे काय गुरूचे नमुनि पाय धरी ! ॥ २२ ॥
हांसे बळभद्र, म्हणे कृष्णाक्रुरोद्धवां ' अहो ! कळलें ।
वळलें मन, मत्पदभय सोडा, आदान बंधुचें टळलें ॥ २३ ॥
जा जा, उठा, मुलीला पाहों, वाहों वरा घरा आणा ।
प्राणाधिक तो येना तरि घालाव्या मदंघ्रिच्या आणा ॥ २४ ॥
धाडा भूषा वसनें दासीदासाश्वहस्तिरथरत्नें ।
जाला भगीरथाचा पार्थ सखा आजि या महायत्नें ! ' ॥ २५ ॥

—कृष्णविजय अ० ८६.

---

## २ रुक्मिणीचें स्वविवाहवृत्तकथन.

कौरवयादवैंभार्या एका जागां मिळोनियां बसती ।
हरियश गातां पळविति कोकिळशुकसारिकांसि लांब सती ॥ १ ॥
श्रीमद्रुक्मिण्यादि प्रभुपत्नीतें अजातरिपुभार्या ।
प्रश्न करि प्रेमें जे मित्र ननांदा प्रियासखी आर्या ॥ २ ॥
" हे वैदर्भि ! स्वमुखें स्वविवाहोत्सवकथा मला सांगें ।
कैसें वरिलें तुजला श्रीकृष्णें दीनवत्सलें आंगें ? " ॥ ३ ॥
प्रथम म्हणे वैदर्भी, " बाई ! होतें लहान मी कन्या ।
धन्या कृष्णकथा मज तेव्हांच रुचे, न आवडे अन्या ॥ ४ ॥
भगवद्भक्त ब्राह्मण जे येती मत्पित्याचिया गेहा ।
ते हारि हरियशोमृत पाजिति तें मात्र चालवी देहा ॥ ५ ॥
हरिगुणगायक सज्जन ते धनलोभी नव्हेत, परि हार ।
मुद्रा कंकण द्यावें, न करिति मातापिताहि परिहार ॥ ६ ॥
ज्या दिवशीं हरिचरितश्रवण नसे त्यांत मज दहा दुखणीं ।
दुखणी काय नवखणी माडी नलगे, धरा नखेंदु खणी ॥ ७ ॥

---

१ गाठीला पकडणें. २ मूळ पोथींत ' यदुकुरुभार्या कुशलप्रश्नालिंगन करूनियां ' असाही पाठ पंतांनीं स्वतः दिला आहे. ३ ' मंजुभाषिणी त्या ' पंतांची टीप ४ द्रौपदी. ५ कारण तिची नणंद, प्रियसखी व आर्यस्त्री या तीनहि नात्यानें तिला रुक्मिणीला प्रश्न विचारावयाचा अधिकार होता. ६ चित्तहारी. ७ दुमजली. ८ ' पदनखें धरा खणीत बैसें ' चिंतालक्षण ( पंत ).

‘ श्रीकृष्णाला द्यावी, श्रीरामा जानकी तसी दुहिता ’ ।
ऐसी गुरुबुद्धीनीं केली बाई ! विचारणा सुहिता ॥ ८ ॥
कृष्णीं माझें अर्पण चित्ता आलेंवि साधुभावांच्या ।
कृष्णगुणीं श्रुत्यर्पण ये जेंवि मनास सत्स्वभावांच्या ॥ ९ ॥
रुक्मी माझा दादा जो आम्हां साजणांमधें मोठा ।
खोटा नव्हेचि, परि हरिचरितरसीं तो भिजे न मणिगोटीं ॥ १० ॥
त्या स्वगुरुविचारातें निंदुनियां मोहरोगवैद्यातें ।
मजला देऊं केलें दादानें हठ धरूनि चैद्यातें ॥ ११ ॥
केला लग्नाचाही निश्चय चैद्यासि धाडिलें मूळ ।
गूळ क्ष्वेडेंचि वाटे मज, तातविचार होय पांगूळ ॥ १२ ॥
न चले कांहीं तेथें जननिचें बंधुचें स्वताताचें ।
होय लवांत दहादा फळ इष्ट अनिष्ट आत्मघाताचें ॥ १३ ॥
एक ब्राह्मण केवळ साधु दयामूर्ति, तत्पदीं नमनें ।
केलीं पाय धरुनि म्यां एकांतीं विनविला सुदीनमनें ॥ १४ ॥
कां तो द्रवता, माझा असता जरि भाव पाहिला खोटा ।
जेणें अभयवर दिला, त्या गुरुहस्तांत म्यांहि लाखोटा ॥ १५ ॥
स्वकरें वसंततिलकावृत्तें पत्रांत सात मोजूनी ।
लिहिलीं होतीं तींही लिहितां लिहितां क्षणांत योजूनी ॥ १६ ॥
काय लिहावें म्यां सखि ! ज्याचे संपूर्ण वेद निःश्वास ।
विश्वास ज्ञानप्रद, परि माझा हरिपदींच विश्वास ॥ १७ ॥
गेला धांवत घेउनि मत्पत्र द्वारकेस सद्विप्र ।
या प्रणतवत्सलाला आणाया आण घालुनि क्षिप्र ॥ १८ ॥
तों आला शाल्व मगधपतिसख तो चैद्य, मांडलें लग्न ।
जालें पुर तद्बळजळनिधींत, आधींत मन्मनाहि, मग्न ॥ १९ ॥

---

१ काम देणें. २ “ रत्न जऱ्ही झालें तऱ्ही पाषाणचि, अमृतांतही भिजावयाचा नव्हे. भावास रत्न ह्मणती ”— पंतांची टीप ३ श्रीकृष्णातें. ४ विष. ‘ वांचणाचा वीट ’—पंतांची टीप. ५ ‘ मरण बरेंही वाटे, वाईटही ’( पंतांची टीप ) ६ ‘ श्रुत्वा गुणान् भुवनसुंदर ’ इत्यादि सप्तश्लोकी रुक्मिणीपत्रिका सर्वांस माहीत आहेच.

तांतडि बहु दादाची; कैचा अवकाश ? लागली हळद ।
खळदर्पघ्न दिसेना जो नतचातकदयासुधाजळद ॥ २० ॥
गरळविलेपन वाटे लाविति अंगास जी हरिद्रा तें ।
सखि ! सुकृपणकृत शुष्कोपचरण निवविल कसें दरिद्रातें ॥ २१ ॥
शतदा ध्वजाचि झाल्यें, प्रासादशिरीं पुरेक्षणछद्मे ।
द्वारवतीपथ पाहति नयनें हरिदिङ्मुखीं जसीं पद्में ॥ २२ ॥
आली रात्रि सुगात्रि ! द्रौपदि ! अवकाश तीच लग्नासि ।
झाली यष्टी कष्टी जें मन त्या आधिभारभग्नासि ॥ २३ ॥
चिंताज्वरांत रात्रौ माझा नाहींच लागला डोळा ।
जायासाठीं कंठीं शतवार प्राण जाहले गोळा ॥ २४ ॥
लावियला म्यां दुःखीं बाई ! त्या ईश्वरासही बोल ।
यत्पदपद्मरजाचें चिंतामणिकोटिही नव्हे मोल ॥ २५ ॥
तों ‘ प्रियकंठीं आपण पडोन हेही सुखांत पाडावी ’ ।
या भावेंचि स्फुरली, करि माझी भुजलता कृपा डावी ॥ २६ ॥
नेत्रभुजोरुस्फुरणें चिंतेची सोडिली मनें वाज ।
माज प्राणांनींही, गेल्या धैर्येंहि यावया लाज ॥ २७ ॥
तोंचि समूळाधिज्वरहरमात्रा आणुनी उषःकाळीं ।
आला द्विज धन्वंतरि, सदय पिताही तसा नसे बाळीं ॥२८॥
आधीं विप्रमुखश्री कळवी येतांचि माधवागमन ।
मग मुनि सांगत, मज तों ऊठ म्हणे, ‘ गुरुपदास लाग,’ मन२९
विप्रें कथिलें मज कीं ‘ वत्से ! लिहिलेसि उत्तम श्लोक ।
ज्यांच्या अर्थश्रवणें आला धांवोनि उत्तमश्लोक ’ ॥ ३० ॥
आले प्रभु हें कळतां सामोरा शीघ्र धांवला बाप ।
हा पर्जन्यप्रियसख शिखिमुख सेवी, उरेचिना ताप ॥ ३१ ॥
कृष्णागमनानंदें हृदयांतुनि ज्यां बळेंचि घालविलें ॥

---

१ श्रीकृष्ण. २ कोरडे उपचार. ३ नमर पाहण्याच्या मिषानें माडीवर गेले. ४ कृष्णाच्या वाटेकडे. ५ “ प्रस्थानीं कटि बांधोनि अशक्त सिद्ध होतात ”—पंतांची टीप. जाण्यासाठीं प्राणांनीं माज म्हणजे कंबर बांधली होती तीही सोडली.

चैद्यादिमनें द्याया स्थळ त्या चिंतादिकांसि पालविलें ! ॥३२॥
अंबेच्या नमनाला न्यावी जीचा विवाह नवरी ती ।
धरि हरिशंका दादा, देवीयात्रा कुळीं, न नवरीती ॥ ३३ ॥
मग बाई ! दादाचे मागधशल्यादिकाहि मेल्यांचे ।
सैनिक मज रक्षाया आले धाकें विरोनि गेल्यांचे ॥ ३४ ॥
स्वसखी धात्री जननी विप्रस्त्री मंडळी न, ती पेटी ! ।
तींत मणी मीं, नेलें शुभविधिनें श्रीशिवेचिये भेटी ॥ ३५ ॥
पूजुनि पाय विनविली, ' कन्यांतें प्रसवितात ज्या माता ।
त्या लटक्या, तूंचि खरी, तुज कृष्णचि योग्य होय जामाता ' ३६
पत्रीं लिहिलें होतें ' देवीयात्रेंत मज पदें दावा ।
दावा बहुतांसीं, हा भाव कळों दुर्जनांसि नेदावा ' ॥ ३७ ॥
तों आला हरि, सुंदरि ! जोडा नाहींच त्या महा, भागा ।
आपुलिया व्याया, ते कोले वारिति कसे महाभागा ? ॥ ३८ ॥
हरि रवि, मीं नलिनी; स्त्री कैरविणी, वीर वायसाराती ।
आनंदाची वेळा सांगों तुज साध्वि ! काय सारा ती ? ॥ ३९ ॥
माझा मूर्त मनोरथ तो रथ आला प्रियास घेऊन ।
दर्शन नयनें घेती, जैसें शिशिरीं दरिद्र घे ऊन ॥ ४० ॥
तों आलि म्हणे मज ' सखि ! सुमनोमाळा वरा वहायास ।
हा या समयीं विधि, मग नित्य असेंचि प्रिया पैहायास ! ' ॥४१
माळा उंचलितां प्रिय आपणहि रथावरूनियां लवला ।
लव लागेना तों घे अंकीं, करुणासमुद्र कालवला ॥ ४२ ॥
हंसें मुक्ता नेली मग केला कलकलाट काकांनीं ।
हाकांनीं नभ भरलें, जाय सुरांच्याहि नाद हा कानीं ॥ ४३ ॥

—कृष्णविजय. अध्याय ८३.

---

१ बोलविलें. माझ्या हृदयानें कृष्णागमनानंदानें चिंतेला हांकून दिलें तों तिला चैद्याच्या हृदयांत स्थान मिळालें ! २ आनंदाला. ३ रुक्मिणीची सखी थट्टा करावयाच्या वेळेला थट्टा करायचा आपला हक्क कां गमवील !

## ३ कोल्ह्याचें शहाणपण.

( पांडवांचा पराक्रम, ऐश्वर्य व गुण हे वाढत चालल्यामुळें धृतराष्ट्रास दुर्योधनादि आपल्या पुत्रांविषयीं चिंता पडली. तेव्हां त्यानें आपल्या राजनीतिनिपुण कणक नांवाच्या प्रधानास शत्रुनाशाचा उपाय विचारला. त्यानें कोल्ह्याच्या चातुर्याची गोष्ट सांगून त्यानें वाघ, लांडगा, मुंगस, उंदीर या सर्वांना ठकवून स्वहित जसें साधलें तसें तूं साध म्हणून सांगितलें. )

'राज्यार्थ शत्रुवध हा पुरुषार्थ ' असेंचि बोलिला कणिक ॥
तत्कथितजंबुककथा मात्र कथिन कौतुकें, न मी अणिक ॥१॥
[1]कोठें व्याघ्रवृक नकुळ जंबुक मूषक सखे वनीं होते ।
बहु जपले परि एका [२]मृगकुळपतिला न पावले हो ! ते ॥ २ ॥
जपति जसे पाडाया व्यसनीं सुजनासि सर्वकाळ विट ।
तेहि तसेचि, परि करी विफळचि तद्यत्न सर्व काळविट ॥ ३ ॥
चिंता करितां जंबुक त्यांस म्हणे " आचराल जरि सारे ।
सांगेन सुयुक्ति, तुम्हीं [३]स्वेष्टफलप्रद मदुक्ति परिसा रे ! ॥ ४ ॥
या आखुनें करावा क्षत-[४]खुर जेव्हां असेल तो सुप्त ।
व्याघ्रें मग मारावा मृगवर, पर मंत्र हा करा गुप्त " ॥ ५ ॥
करितां तसेंचि, कोल्हा त्यांसि म्हणे ' स्नान करुनियां खाया ।
तोंवरि सावध बसतों येथें मी या मृगास राखाया ' ॥ ६ ॥
तो स्वार्थ-पंडित असें सांगे तें जेंवि अंबु कमळाला ।
त्यांच्या मना रुचे, दे न दिसों कपटींद्र जंबुक मळाला ॥ ७ ॥
न्हाउनि येउनि पाहुनि दीन पुसे व्याघ्र, " वद नवा घाला ।
पडलासा कां दिससी, " सांगे तो म्लानवदन वाघाला ॥ ८ ॥
[५]फेरु म्हणे परिसावें, " वदला जें किमपि आखु खोटा तें ।
धिग् व्याघ्रातें माझ्या सामर्थ्यें भरिलें आजि पोटातें " ॥ ९ ॥
व्याघ्र म्हणे " हें नलगे, घालिन [६]मृगयूथपीं नवा घाला ।
देईल या भुजांचें बळ फळ याहूनि [७]पीनँ वाघाला " ॥ १० ॥

---

१ कोण एके ठिकाणीं. २ काळविट. ३ आपले इष्ट हेतु सफळ करणारी ४ कुरतडले आहेत खुर ज्याचे असा. ५ कोल्हा. ६ हरिणांच्या कळपांच्या नायकावर. ७ पुष्ट.

गेला तो तेजस्वी अभिमानी व्याघ्र भक्ष्य सोडूनी ।
तों आला आखु तया फेरु म्हणे साधुभाव जोडूनी ।। ११ ।।
" वदला ' व्याघ्रामिष विष, तुज खाऊंदे,' असेंचि मुंगस, 'खा' ।
ऐसें कसें म्हणों मी ? लघु परि तूं मेरुहूनि तुंगं सखा ।। १२ ।।
हें ऐकतांचि वंचकवचनें शरण जाय तो बिळाला हो ।
चित्तीं म्हणे ' न मेलों हाचि महालाभ मज मिळाला हो ! ' १३
वृकही आला त्याला फेरु म्हणे " मज मृगासि रक्षाया ।
ठेवुनि गेला व्याघ्र स्त्रीसह येणार सव भक्षाया ।। १४ ।।
वांच, मरसि कां लोभें, मांसाशा शीघ्र सांड गा जा गा " ।।
हें ऐकतांचि निसटे, झाला तत्काळ लांडगा जागा ।। १५ ।।
मग मुंगसासहि म्हणे " आखु वृक व्याघ्ररायही नकुळा ! ।।
म्यां जिंकोनि पळविले, तेथें तुज काय लाभ हीनकुळा ! ।।१६।।
युद्धीं न भंगितां मज कोण मृगाला शिवे कवळ खाया ।।
मी श्वापदवर आहें, परि तुज नाहीं विवेक वळखाया ! " ।।१७
नकुळ म्हणे " आखु वृक व्याघ्रहि जिंकोनि पळविले जेणें ।।
तेणेंसीं न झगडणें येणेंचि भलें, न या मृतें एणें " ।। १८ ।।
ऐसे मंत्रबळें वृक-नकुळ व्याघ्राखु मोहुनीं चवघे ।
जंबुक निर्भयचित्तें मृगमांसाची वनीं सुखें चव घे ! ।। १९ ।।
ऐसेंचि कृतप्रज्ञें साधावें आत्मकार्य नैपुण्यें ।
अघशमनाऽर्थ करावीं, होईल स्वार्थ–सिद्धि तैं, पुण्यें ।। २० ।।

—आदिपर्व अ० २८

---

### ३. हंस व काक यांची स्पर्धा.

पूर्वीं सागरतीरीं साधु नृपाच्या पुरांत एक धनी ।
सन्मान्य वैश्य होता, नांदे ज्याच्या स्वधर्मनीति मनीं. ।। १ ।।
त्या धनिका वैश्याचे होते बहु पुत्रपौत्र गुणवंत ।

---

१ व्याघ्रसंपादित मांस, २ उंच, श्रेष्ठ, ३ लबाड कोल्ह्याचें भाषण, ४ हरिण, ५ मसलतीच्या जोरावर,

त्यांतें आशीर्वादें गौरविती सर्वदा सदय संत ॥ २ ॥
त्या वैश्य–कुमारांचें भक्षी उच्छिष्ट एक काक सदा ।
बाळक उदारमति ते न वदति वाणी कदापि साध्वसदा[१] ॥ ३ ॥
देती वैश्यकुमारक मांसौदन सेवया वडे मांडे ।
मधु. घृत पायस वायस खाय सदा पक्षियांसवें[२] भांडे ॥ ४ ॥
सागरतीरीं तेथें आले दैवें कदाचित मराळ[३] ।
जे मुक्ताफळभोजन करिती बिसतंतु भक्षुनि फराळ ॥ ५ ॥
पाहुनि हंसांतें ते बाळ स्वोच्छिष्टपिंडपुष्टातें ।
ह्मणती ' तूंचि विहंगा ! सर्व-खग-श्रेष्ठ ' त्या सुदुष्टातें ॥ ६ ॥
गर्वें मूर्खपणें तो मानी बाळोक्त सर्व साचार ।
अविकचि माजे स्तवनें न विचार करी मलीमसाचार[४] ॥ ७ ॥
गेला उडोनि गगनीं मग नीच सगर्व काक तो त्यांत ।
साधूंत खळ जसा कीं काचमणी परम-शुद्ध मोत्यांत ॥ ८ ॥
जाणे त्या हंसांत श्रेष्ठ जया त्यासि तो म्हणे काक ।
' दोघे उडों, तुझें बळ पाहों दे, मत्समीप ये, ठाक. ' ॥ ९ ॥
ऐसें वायस वदतां हांसति ते हंस त्या खगापसदा[५] ।
कीं शुद्धासीं मत्सर मूर्ख करी ज्यांत तापपाप सदा ! ॥ १० ॥
म्हणती हंस तयातें " गर्वभरें करिसि वायसा ! चार ।
आम्हीं मानसवासी सर्व खगांचेहि राय साचार ॥ ११ ॥
आम्हीं सुदूरपाती हंस खगांमाजि पूज्य खगनीचा ! ।
क्षीरधितीरबिहारी, जलकेलि करूं नदींत गगनींच्या[६] ॥ १२ ॥
करिसी बरोबरी तूं हंसाची काय ? वायसाऽपसदा ! ।
करितो घात तुझा मद, मारीलचि जो गृहांत साप सदा ॥ १३ ॥
रे बालिपुष्टा ! दुष्टा ! कैसा हंसांसमेत उडशील ? ।
साहस करितां सहसा स्पष्ट व्यसनार्णवांत बुडशील " ॥ १४ ॥

---

१ भीति देणारी. २ श्रीमंताच्या घरचीं उत्तम पक्वान्नें खाऊन मत्त झालेला तो कावळा पक्षिश्रेष्ठांबरोबर भांडूं लागला. ३ हंस ४ मलीन आचरणाचा. ५ पक्ष्यांतल्या अधमाला ६ आकाशांतील गंगा—मंदाकिनी.

वायस बहु हंसांच्या हितवचनाची करूनि कुत्सा[1] हें ।
वदता झाला त्यांसीं पुनरपि तो गर्वराशि उत्साहें ॥ १५ ॥
" शत पात[2] जाणतों मी, उडेन एकैकपात शतगांवें ।
मजसीं उडतां अन्या खगमांचें पक्षिवीर्य न तगावें ॥ १६ ॥
गति शत दावीन तुम्हां, तेव्हां माजें कळेल बळ साचें ! ।
निवडे निकटचि वर्णे, दूर समचि पद्म पुष्प तळसाचें " । १७ ॥
ऐसें पुष्कळ बोले दावी बहु गर्व मूढ तो करट ।
स्तनमान काय पावे जरिहि उरीं वृद्धि पावलें करट ! ॥ १८ ॥
हांसोनि एक हंस ध्वांक्षासि[3] म्हणे " तुझ्या गती शतशा ।
आम्हीं हंस समस्तहि एकचि गति जाणतों दुज्या न तशा॥ १९॥
जाणें एका गतिला त्याचि गतीनें उडेन आकाशीं ।
माने तिनें उडें तूं " बोले ऐसें मराळ काकाशीं ॥ २० ॥
ते बहु हांसति जे कीं आले होते मिळोनि तज्ज्ञाती ।
शतविधगतिहुनि अधिका परि तुच्छा भासली अतज्ज्ञां ती ॥२१॥
" शत-पात-पंडितासीं या अस्मन्मित्रबंधुकाकाशीं ।
हा एकपातमात्रज्ञाता कैसा उडेल आकाशीं ! । २२ ॥
एका पातांताचि या हंसाला हा स्वबंधु हारवितो " ।
ऐसें हांसति वायसखद्योत, परी करि क्षमा रवि तो ॥ २३ ॥
हंस उडे तों त्यासीं स्पर्धेनें कावळा उडे व्योमीं ।
शतपात पातकालय[4] दावी, सांगों प्रकार किति तो मी । २४ ॥
उड्डीनप्रमुखें जीं होतीं शतसंख्य ठाउकी पतितें[5] ।
तीं सारीं दाखविलीं हंसप्रवरापुढेंचि त्या पतितें ॥ २५ ॥
स्वज्ञातिश्रेष्ठाचें गतितांडव पाहतांचि, काकांनीं ।
हर्षभरें नभ भरिलें ' का का का का ' अशा स्वहाकांनीं ॥ २६॥
अप्रिय बोलति पुष्कळ हांसति बहु हेळसोनि हंसातें ।
अवमानिती अमंगळ खळ ते खगकुळशिरोवतंसातें[6] ॥ २७ ॥

---

१ निंदा, धिक्कार. २ शंभर प्रकारचीं उड्डाणें. ३ कावळ्यास. ४ पापाचें घर असा जो काक. ५ गमनें, ' उडणीं ' पंव. ६ पक्षिकुळाला भूषण अशा हंसाला.

मृदुपातें हंस उडे काकाहुनि हीनशक्तिसा भासे ।
ऐसें मुहूर्तभरि तो दावी, तों काकमंडळी हांसे । २८ ॥
हंसासि काक म्हणती ' हा ! हारविलाचि कीं भवज्ज्ञातीं ' ।
आयकिली दूरुनि त्या सर्व मराळोत्तमें अवज्ञा ती ॥ २९ ॥
मग पश्चिमदिग्देशीं शीघ्र शिरे हंस काकही मळवी ।
जिकडे होता कर्णा ! गंभीर अपार खोल तो जळधी ॥ ३० ॥
मागें धांवे वायस, हंस पुढें, सोडिला जसा तीर ।
स्पर्धेत काक नेणे कीं केवळ दूर राहिलें तीर ॥ ३१ ॥
पक्षांचें बळ सरलें, गर्व मनींचा मनांतचि जिराला ।
घे धाक काक, सागर सर्वत्र दिसे, निराश्रय, विराला ! ॥ ३२ ॥
न दिसे अग नग, मग तग गगनीं खग नीच काय काढील ? ।
चित्तीं म्हणे ' समय हा मज काळाच्या मुखांत वाढील ' ॥ ३३ ॥
जावूनि दूर आला किंवा नाहीं असें फिरे, पाहे, ।
राहे न करि उपेक्षा हंस खळाचीहि काळजी वाहे ॥ ३४ ॥
आला हंसापासीं प्रतिक्षण क्षीणशक्ति करटपती ।
आतां पडेल ऐसें जाणुनि त्या खावया मकर टपती ॥ ३५ ॥
अवलोकिला मराळें अत्यंतासन्नपतन पामर तो ।
मग आणिलें मनीं कीं ' यावरि मीं न करितां कृपा मरतो ॥ ३६ ॥
रक्षावाचि, उपेक्षा व्यसनीं अरिचीहि न करिती संत ।
पाहों नयेचि आंगीं बळ असतां दीनजंतुचा अंत' ॥ ३७ ॥
ऐसें सत्पुरुषव्रत आठविलें, मग म्हणे मराळ अगा ! ।
बहुगतिचतुरा ! पतितें शत कथिलीं त्वां स्वयेंचि काकखगा? ॥ ३८ ॥
परि जें निजगुह्यपतित आम्हांसि न सांगसीच कां गा ! तें ।
झालें सख्य परस्पर दूर उडालों नभांत सांगातें ॥ ३९ ॥
वद काय नाम काका ! या पाताचें ? शतीं असे हा कीं ।
त्याहूनि वेगळाचि ? स्पष्ट कथीं मौन एकदा टाकीं ॥ ४० ॥
बे ये झडकरि हा मी हंस तुझी वाट पाहतों करटा ! ।

---

१ अगदीं पडायाला झालेला. २ बरोबर.

या लक्षयोजनांबुधि परतीरीं आमुचा असे घरटा ॥ ४१ ॥
नेत्रीं नाकीं कानीं क्षारोदक, पक्ष जाहले ओले, ।
केवळ विव्हळ दुर्बळ तो खळ आर्तस्वरें असें बोले ॥ ४२ ॥
" का का शब्द करूनी भ्रमती त्यांच्या कुळांत मी झालों ।
प्राणोपायन घेउनि तो आतां शरण मीं तुला आलों ॥ ४३ ॥
तें मज सागरतीरीं हंसा ! दे प्राणदान दीनातें ।
उडतां व्याकुळ झालों भ्यालों या दुस्तरा नदींनातें[1] " ॥ ४४ ॥
ऐसें वदतां पडला सिंधुजळीं काक धाक पावोनी ।
त्याच्या समीप गेला सदय जनोत्तंस हंस धावोनी ॥ ४५ ॥
हंस म्हणे " रे काका ! सांगत होतासि ' पात शत जाणे ' ।
आत्मश्लाघा ज्यांत, स्मर तें ज्ञाति-प्रमोद-कर, गाणें ॥ ४६ ॥
मजहूनि अधिक तूं कीं इतुक्यांतचि भागलासि ? सांग मला ।
शतपातपंडिता तुज हा श्रम अल्पापथींच कां गमला " ॥४७॥
काक म्हणे " मीं भक्षुनि उच्छिष्टें फार मातलों बा ! गा ।
कीं आपणासि मानीं गरुडचि हंसोत्तमा ! महाभागा ! ॥ ४८ ॥
म्यां काक अन्यखगही पुष्कळ अवमानिले अदभ्र मदें ।
ऐकविलीं बा ! तुजही दुर्वाक्यें सज्जनश्रुतिश्रमदें ॥ ४९ ॥
हो बेट, भेट, हंसा ! अससी तूं दक्ष रक्षणीं आंगें ।
पाळिति संत व्यसनीं दीन मुकें बधिर आंधळे पांगें" ॥ ५० ॥
ऐसें वदे, रडे बहु, खाय गटकळ्या जळांत करि ' का का ' ।
धांवे मराळ, चरणीं कवळुनि काढी क्षणांत वरि काका ॥ ५१ ॥
वाहे त्या दीनातें पृष्ठीं तो ब्रह्मवाहनहि हंस ।
घेउनि गेला सागरतीरातें सर्व सजनवतंस ॥ ५२ ॥

—कर्णपर्व अ० २८

---

## ५. ब्रह्मदत्त राजा व चिमणी यांची गोष्ट.

भीष्म म्हणे ' ऐक नृपा[2] ? संवाद सुखें सदा करायाची ।

---

१ नदीचा ईन ह्म. स्वामी त्यातें, सागरातें. २ युधिष्ठिरा !

ती पक्षिणी प्रियसखी होती त्या ब्रम्हदत्त रायाची ॥ १ ॥
केला अंध नृपतनय, कारण कथितों नृपा ! तुला याचें ।
त्या नृपगृहांत होतें स्थान पिल्याचें तिच्या कुलायाचें[1] ॥ २ ॥
निजनृपपुत्रार्थ[2] फळद्वय अमृतस्वाद नित्य ती आणी ।
नानादेशादिकथा सांगे, बोले मनोहरा वाणी ॥ ३ ॥
न गमे नृपा, पळ, दिसा गेली ती पक्षिणी जरि चराया. ।
सांजे येउनि भेटे, बोले, सुख होय त्या तरिच राया ॥ ४ ॥
धात्री खेळवि नित्यापरि तो खगबाळ मृदुशरीर गडी ।
नृपपुत्र एकदा त्या दृढमुष्टीनें बळें धरी, रगडी ॥ ५ ॥
सोडवितां सोडीना, कर्म–विपाका न बाळ तो भ्याला ! !
ज्ञाते केवळ शिशुला किंवा 'दृढमुष्टि' म्हणति लोभ्याला[3] ॥ ६ ॥
राजा धांवुनि येउनि दे त्या वक्षस्थळीं पदें[4] पिल्याला ।
मृत जाणुनि सर्वांगीं शोकातें ज्ञानवान् तदपि ल्याला ॥ ७ ॥
साश्रु सखीसुतघातें धात्रीतें शोकतप्ततनु गांजी ।
कीं तीच आपणाला अन्यायें प्राप्त होय अनुगां जी ॥ ८ ॥
तोंचि फलद्वय घेउनि आली राजर्षिची अनव्याली[5] ।
सुत मृत पाहुनि खवळे, घातीं योजी जसें मन व्याली ॥ ९ ॥
शोकें रडली पडली किति वर्णावा महाविलाप तिचा ।
नेत्रें फोडुनि करी अंध स्वसुतघ्न सुत इलापतिचा[6] ॥ १० ॥
भूपासि म्हणे ' रे ! श्रितविश्वस्तारक्षणें[7] पतन नरकीं ।
नेणासि भतदयेनें विधिलोकीं जोडिती वतन नर कीं ॥ ११ ॥
विप्रिय करूनि जाऊं लागे तो ब्रह्मदत्त सुखगीतें ।
विनवी तें परिसावें ज्याच्या होतें अनंत सुख गीतें ॥ १२ ॥
सखि ! अखिलखिन्नताहरसुगुणें[8] मधु–वाणि ! पूजनीये ! तें ।

---

१ घरट्याचें. २ आपल्या पिलाकरितां एक राजपुत्राकरितां एक ३ दृढमुष्टि हें पद बाळ किंवा लोभी यालाच लागेल ! ४ त्या पिलाला आपल्या उरावर थान दिलें, ( ठेविलें ) व जाणता असूनही शोकाकुल झाला. ५ जुनी मैत्रीण. ६ पृथ्वीपतीचा. ७ आश्रयाला राहून विश्वास ठेवणाऱ्याचें रक्षण न केल्यानें. ८ सर्व दुःखें नाहींशीं करण्यासारखे सद्गुण जिच्यांत आहेत अशी,

सख्य त्यजुनि न जावें, जें कामा स्वर्ग—भूजनीं येतें ॥ १३ ॥
त्यजिला म्यां सत्य, तुवां त्यागावा खेद, जाहलें नीट ।
सखि ! बहुतां दिवसांचें प्रेम, तयाचा धरू नको वीट ॥ १४ ॥
वस निजगृहीं, वदत जा शब्द सुधामिश्र, मी न कोपरत ।
तूं आपणा करूं मजलाहि सुधोमीं श्रमी नको, परत " ॥ १५ ॥
ऐकुनि भूपवचन हें गगमगता ती म्हणे " अगा राया ! ।
झालें विप्रिय यास्तव जात्यें सोडूनि मी अगारा या ॥ १६ ॥
अप्रियकारि जनाचा अणुमात्र धरूं नयेचि विश्वास ।
तुज म्यां त्वां मज पाहुनि सोडावे दीर्घ उष्ण निःश्वास ॥ १७ ॥
जेथें विरोध तेथें न वसावें त्यजुनि नीतिची पदवी " ।
ऐसें त्या चटकेला तद्धृदयस्थ प्रभु स्वयें वदवी ! ॥ १८ ॥
तेथूनि गेलीच खगी देउनि मित्रात्मजासि अंधपण ।
त्यांचें सख्य निरुपमचि होतें सरला ऋणानुबंध पण ! ॥ १९ ॥

—हरिवंश अ. २

---

## ( ६ ) आस्तीकजन्म.

(एक जरत्कारू नांवाचा तपोनिष्ठ मुनी होता. त्याचे पितर अधोगतीस जातांना त्यानें पाहिले. कारण विचारतांच त्यांनीं सांगितलें कीं 'तूं विवाह करून वंश चालूं दे' जरत्कारूनें वासुकीनागाच्या बहिणींशीं लग्न लावलें, व ती सगर्भ आहे असें कळतांच, व आपलें वीर्य अमोघ आहे असें जाणून कांहींतरी निमित्त काढून त्यानें तिचा त्याग केला. तिच्या पोटीं आस्तीकऋषि जन्मलें )

स्त्रीस मुनि म्हणे, ' अप्रिय करितांचि त्यजिन तत्क्षणीं तुजला ।
विप्रिय सोसीं त्रिषयी, हा विषयाकारणें नसे सुजला !' ॥ १ ॥
त्या शब्दें कंपिततनु झाली झंझानिलें जसी कदली ।
पदलीना ते साध्वी मान्य करुनि ' बहु बरें ' असें वदली ॥ २ ॥

---

१ परलोकीं व इहलोकीं जी मैत्री उपयोगीं पडते. २ चांगल्या गृहीं, राजवाड्यांत. ३ यां गोष्टीचें सुंदर रहस्य पुढील आर्यांतच दिलें आहे.

भयचकितता मृगाची, शुनकाची जागरूकता शिकली ।।
ती इगितज्ञताही काकाची, म्हणुनि सेवनीं टिकली ।। ३ ।।
पत्नी अंतर्वत्नी होतांचि म्हणे मनांत तो ‘ जावें, ।।
हा स्नेहपाश कैसा तोडावा यासि काय योजावें ? ’ ।। ४ ।।
एका समयीं स्त्रीच्या अंकीं ठेवूनि शिर निजे श्रमला ।।
साध्वीस तोचि अवयव सर्वावयवांत धन्यसा गमला !। ५ ।।
संध्यासमयावधि पति निजला न उठे म्हणोनि ती व्याली ।
निद्राभंग कराया, न करायाही, सती मनीं भ्याली ! ।। ६ ।।
निद्राभंग बरा परि न बरा आवश्यकक्रियालोप ।
करुनि विचार असा जों उठवी, तों विप्र तो करी कोप ।।७।।
“ कां गे भुजंगमे ! त्वां मजला निद्राभरांत जागविलें ? ।
काय करसील ? अंकीं शिर ठेवुनि तुज उदंड भागविलें ! ।।८।।
जातों, न साहवे मज ऐसा अवमान पळहि हा कांहीं, ।
गृहसुख पुरें, क विलें शूळचि उठले शिरांत हाकांहीं ।। ९।।
‘अस्तासि चालिला रवि संध्याविधि अंतरेल या भावें ’ ।।
म्हणसी जागविलें तरि माझें सामर्थ्य तुज नसे ठावें ।। १० ।।
मी निजलों असतां बळ कैंचें अस्तासि जावया रविला ? ।।
म्यां काय द्यूतांत ख्यात स्वतपःप्रताप हारविला ? ” ।। ११ ।।
दाटूनि दोष ठेवी तो काय किति प्रकार बोलावा ? ।
स्नेहाचा निजचित्तीं लेशहि येऊं नदेचि ओलावा ।। १२ ।।
जातां स्त्रीस म्हणे, ‘ मी होतों सुखरूप या तुझ्या भवनीं ।
गेल्यावरि वासुकिला सांगावें योग्य हा जन स्ववनीं ’ ।। १३ ।।
नमुनि जरत्कारु म्हणे ‘ नसतां अपराध टाकिता दासी ।
द्विजराज तुम्ही या अप-वादा कै द्याल हर्ष चांदासी ? ।। १४ ।।

---

१ पतिसेवा तिनें किती जपून केली तें या आर्येत सांगितलें आहे २सगर्भ. ३ सर्पाण वासुकी नागाची बहिण. ४ ब्राह्मणाच्या नित्यक्रियेंचा लोप बरा नव्हे. ५ हा जन ( मी ) उत्तम रक्षणास योग्य आहे, माझें उत्तमप्रकारें रक्षण कर असें आपल्या भावाला सांग.

वासुकिनें ज्या अर्थे या देहें पूजिले भवच्चरण ।
आजि वरद ! अहो वत्सळ ! आहे कीं तें नसे तुम्हां स्मरण ? ' ॥
विप्र म्हणे ' त्वद्गर्भी आहे गुणमणिकरंड, कवि, शिष्ट
शापव्याकुळमातुळकुळविपदर्णवतरंडक विशिष्ट ' ॥ १६ ॥
चिंतामणि पेटीला कीं जेंवि निधानकुंभ सुक्षितिला ।
कीं अमृतरस कुपीला बहु गौरव दे तिचाचि कुक्षि तिला ॥ १७ ॥
उत्तम समयीं झाला पुत्र तिला, प्रकटतां रवि प्राची ।
जसि शोभे तसि तेणें ती भार्या फार फार विप्राची ॥ १८ ॥
आस्तीक नाम त्याचें ठेवुनि मानूनि लाभ लाभाचा ।
वासुकिनें स्वप्राणाहूनि सदा रक्षिला भला भाचा ॥ १९ ॥

—आदिपर्व अ. ५

## ( ६ ) बळीचें औदार्य.

मग हरि जाय बळिकडे जेथें श्रीनर्मदानदी नांदे ।
जी सहजपान घडतां स्वर्गीं बहु शर्मदान दीनां दे ॥ १ ॥
मखमंडपांत येतां वामन धाम न मुनिव्रजीं राहे ।
तेजें धर्षित झाले, ग्रह कोण असा रवीस जो साहे ? ॥ २ ॥
भार्गव सशिष्य उठले, सभ्य जनहि, अग्निहि स्वकुंडांत, ।
देहांत सर्व सात्विकभाव, ' नमस्तेस्तु ' वर्ण तुंडांत ॥ ३ ॥
स्वकरें आसन मांडुनि बहुमानें नमुनि बैसवुनि बटुतें ।
गुरुहुनि शतगुण पूजी बळि, मेळविता न अन्यजन पटु तें ॥ ४ ॥
श्रीचरण प्रक्षाळुनि वाहे सकुटुंब मस्तकीं सलिला ।
जें शंकरतापापह तीर्थाचें तीर्थ ताप दे कलिला ॥ ५ ॥
कर जोडुनी बळि म्हणे " सर्वब्राह्मणशिरोमणे ! आर्या ! ।
वद वदनें बा ! आहें मी सिद्ध करावया तुझ्या कार्या ॥ ६ ॥

१ शापानें व्याकुळ झालेल्या मातुळकुळाला विपत्तिरूप सागरांतून तारून नेणारी नांव. २ धनानें भरलेला घट. ३ भृगुकच्छ ( भडोच ) शहरीं बळीनें अश्वमेध यज्ञ मांडला होता. ४ तेज. वामन येतांच मुनि निष्प्रभ झाले हा भावार्थ. ५ बळीचा गुरु शुक्राचार्य.

हें कुळ पवित्र झालें, तृप्तीतें आजि पावले पितर ।
श्रितरक्षणपटु हरिसा तूं तुजसम बटु न देखिला इतर ॥ ७ ॥
अर्थी तूं गोधन गृह कन्या सुग्राम सुगज रथ वाजी ।
घे देतों तीहि करिन सफळा इच्छा असेल अथवा जो " ॥ ८ ॥
बटु बोले " या वंशीं म्हणता निःसत्व याचका नाहीं ।
ऐसा पुरुष परिशिला वृद्धांच्याहि न न याच कानांहीं ! ॥ ९ ॥
प्रल्हादसुत विरोचन, तव तात, परा धना जसा वायु ।
द्विजवेष सुरांतें दे जाणुनिही सर्व आपुलें आयु ॥ १० ॥
तूंही सुकीर्तिभाजन हा जन आला म्हणोनि यांचाया ।
त्रिपदपरिमिता वसुधा दे आजि पदें गणूनि यांच्या या " ॥ ११ ॥
भूप म्हणे " द्विजपुत्रा ! वृद्धबहुमता मुखें वदसि वाणी ।
बालिशमति बाळचि तूं, असदासिहि वरिच दिसे सदसिवाणी[1] । १२ ।
द्वीपाचि देणारा प्रभु म्हणसि तया त्रिपदमात्र दे वसुधा ।
गंधचि मागसि त्याला जो पुष्कळ पाजणार देव सुधा ॥ १३ ॥
घे तूं पटो ! बटो ! मजपासुनि मागोनि भूमि वृत्तिकरी[2] " ।
बळि अर्थिवृत्ति चालवि बहु दानें, जेंवि मधुपवृत्ति करी[3] ॥ १४ ॥
वामन म्हणे " प्रिय विषय जितुके या त्रिभुवनांत आहेत ।
तेही अजिता ह्याचा पूर्ण कराया न शकति बा ! हेत ॥ १५ ॥
जो त्रिपदमहीलाभें संतुष्ट त्रिभुवनेश्वरा ! नाहीं ।
होईल न सनववर्षद्वीपेंही[4] पूर्णकाम तो कांहीं ॥ १६ ॥
सप्तद्वीपवरेश्वर एकतसे पृथुगयादि हो बा ! जे ।
अर्थांहीं कामाहीं तृष्णांतातें न पावले राजे ॥ १७ ॥
जो संतुष्ट यदृच्छालाभें ब्राह्मण सदैवही असतो ।
वाढे तत्तेज असा बहुतेजस्कर नव्हे सुधारस तो ॥ १८ ॥
स्मित करुनि बळि म्हणे तो " घ्यावें बापा बटो ! यथाकाम " ।
सूदान द्यावया घे जलपात्र न ओळखोनि तें धाम ॥ १९ ॥

१ वाईट तलवार वरच चांगल्या तलवारीसारखी दिसत, वस्तुतः तशी नसते. २ उपजीविका चालविणारी. ३ हत्ती मदस्रावानें जसा भ्रमरांची वृत्ति चालवितो तशी बळी याचकांची वृत्ति चालवित असे ४ नव खंडांसह द्वीपानें.

विष्णुमतातें जाणुनि, भूदानाज्ञा तया न भार्गव दे ।
वारावया प्रवर्ते निजशिष्यातें प्रवृत्तिमार्ग वदे ॥ २० ॥
“ हा हरि अदितितनय वरिवरि वदतो गोड आर्यसा, धाया ।
कपटें पटु बटु होउनि आला अरि देवकार्य साधाया ॥ २१ ॥
म्हणतो पादत्रय परि व्यापिल हा विश्वकाय विश्वास ।
हो सावधान कपटिप्रभुचा धरितोसि काय विश्वास ? ॥ २२ ॥
ज्ञानें मला समजलि स्पष्ट कपटबुद्धि विष्णुची गूढा ।
सर्वस्व यासि देउनि मग कैसा वर्तशील रे मूढा ! ॥ २३ ॥
असुरश्रेष्ठा ! जेणें होतो संपूर्ण वृत्तिचा अंत ।
ज्यांत विचार नसे त्या दानातें न प्रशंसिती संत ॥ २४ ॥
कीं वृत्तिमान् पुरुष जे त्यांसि घडे दान यज्ञ तप कर्म ।
बुडतां वृत्ति बुडे जन, जोडावा व्याकुळें कसा धर्म ? ॥ २५ ॥
धर्मार्थकामकीर्ति स्वजनार्थ विभागितां स्ववित्तातें ।
या लोकीं परलोकीं पुरुषाच्या हर्ष होय चित्तातें ॥ २६ ॥
अनृत वदावें राया ! निःशंकचि वृत्तिसंकटीं नर्मीं ।
गोविप्रपरित्राणीं जेंवि विवाहीं न दोष या कर्मीं ”॥ २७ ॥
बळि गुरुसि म्हणे “ स्वामी ! कथिला त्वां धर्म या जना सत्य !
हृद्रोगशमविता तूं शिष्यांचा सुज्ञराज नासत्य ॥ २८ ॥
पूर्वीं भू वदली कीं ‘ अतिदुःसह सर्वभार साहेन ।
परि मीं स्पष्ट अनृतपरनरभर परमोग्र पळ न वाहेन ’॥ २९ ॥
नरक, दरिद्रत्व, पदभ्रंश, मरण, असुखासिंधु हो ! मी तें ।
यांपासुनि भीत नसें जैसा बहु विप्रवंचना भीतों ॥ ३० ॥
साधु करिति सर्वस्वें भूतांचें श्रेय, दे वपु दधीची ।
नेतात साधुची बा ! याचक संपत्ति, मेघ उदधीची ॥ ३१ ॥

---

१ संभाविताप्रारखा. २ धर्म, अर्थ, काम, कीर्ति प्राप्त होतात. ३ विनोदांत. ४ अश्विनीकुमार. ५ असत्यांत रमलेल्या पुरुषांचा भार. ६ होवो, प्राप्त व्हावो. ७ या मुनीनें वृत्रासुराचा वध व्हावा म्हणून इंद्रास वज्र तयार करण्यासाठीं आपल्या अस्थि दिल्या.

गुरुजी ! कापुनि देतां निजमांसहि उबगला न शिबि[1] कांहीं ।
सुख साधुरीतिहीं जें दिधलें श्रांतासि तें न शिबिकांहीं ॥ ३२ ॥
यास्तव देतों बटुला भूमि पदत्रय तुम्हीं वदा दे हें ।
किति काळ अनुभविल हा शिष्य अनित्यें चळा पदा देहें" ॥ ३३ ॥
सुरगण बळितें स्तविती पुष्पांच्या सर्व वर्षती वर्षें ।
कीं जाणोनि हि रिपुला विपुला संपत्ति अर्पिली हर्षें ॥ ३४ ॥
वाढे वामन सहसा, कोंदे विश्वांत तनु असा फुगला ।
झाला सल्लाभोत्सव ज्याला राहेल तो कसा उगला ? ॥ ३५ ॥
होय त्रिविक्रम पुन्हां वामन तो विश्वविरचिता त्वष्टा ।
बळिस अहंकृतिहरणा[2] लावी तिसऱ्या पदाचिया कष्टा ॥ ३६ ॥
प्रभुसि बळि म्हणे 'पुण्यश्लोका ! मीं तो स्वयें मृषा कांहीं ।
वंचन तुझें करावें या भावें करुनि बोलिलों नाहीं ॥ ३७ ॥
तों ये प्रल्हादप्रभु, त्यासि करी बद्ध बाळि शिरें नमनें ।
जाणों म्हणे कदा तो गुरुपदपद्मांत अळि शिरेन मनें ॥ ३८ ॥
प्रभुला प्रल्हाद म्हणे " दिधलें होतें तुवांचि पद यातें ।
हरिलें हि तुझेंचि तुवां केवळ कारुण्य होय सदया तें ॥ ३९ ॥
भुलवी ज्ञात्यांतें हा राज्यश्री स्पष्ट होय हाला हो ।
प्रभुजी ! आतां बळिअळि या पदपद्मासवासि हा लाहो " ॥ ४० ॥
राज्ञी[3] बोले " प्रभुजी! तुमचेंचि तुम्हांसि काय अर्पावें ।
कैसें जी जलदानें जलदानें सागरासि तर्पावें ? ॥ ४१ ॥
विश्वाचे उत्पादक परिपालक हेचि चरण संहरिते ।
पडती स्वामी आपण म्हणुनि करुनि दुरभिमान अहं[4] रितें" ॥ ४२ ॥
भगवान् म्हणे "विधात्या ! माझ्या स्तुति करिति साधुरीतीची ।
आइक, सुधा सुधा जन म्हणती परि काय माधुरी तीची ? ॥ ४३ ॥
करितों अनुग्रह मनांतूनि जयावरि दयाभ्र मी हरि तों ।
त्याच्या सर्वार्थातें, न पडो ह्याया तया भ्रमीं, हरितों ॥ ४४ ॥

---

१ श्येनापासून कपोताचें रक्षण करण्यासाठीं. २ मीं पृथ्वी व स्वर्ग यांचा स्वामी आहे हा बलीचा गर्व हरण करण्यासाठीं. ३ बळीची स्त्री. ४ पाप

अर्थीहीं मद होतां होय पुरुष बहु अनम्र वा ! धात्या ! ।
अवमानितो जनातें मातेंही, ती पिशाचबाधा त्या ॥ ४५ ॥
बहु पुरुषजन्म दुर्लभ तथें अत्यंत सर्वहानिकर ।
पापांचा शापांचा तापांचा होय गर्व हा निकर ॥ ४६ ॥
ऐशा गर्वाचा क्षय माझ्याचि अनुग्रहें अगा धात्या ! ।
मदनुग्रहेंचि तरले यासि जसे सेतुनें अगाधा त्या ॥ ४७ ॥
आतां गतमद मत्पर झाला हा सविनया विधे यातें ।
देइन जें बहु दुर्लभ हर्षे हांसविन या विधेयातें ॥ ४८ ॥
अत्यद्भुत च्छळें या दुसरा जन कोण सत्य न त्यजिता ? ।
यानें शुचिसत्वबळें हारविलें मज अशाहि अत्योजिता ॥ ४९ ॥
हा बळि सत्वें समधिक या प्रह्लादापितामहापरिस ।
कीं उतरला बहु कसा म्हणसि कसा परि पितामहा! परिस!॥५०॥
प्रह्लादाला होता गुरुचा माझाहि आश्रय पहा, या ।
बळिला एकहि नव्हता मत्कृत अत्यद्भुत छळ सहाया " ॥ ५१ ॥
" येथुनि जाउनि हो तूं माझ्या आज्ञेकरूनि सुतलेश ।
सद्भक्ताहुनि अधिक प्रेमास्पद मज गमे न सुत लेश ॥ ५२ ॥
निश्चिंत रहा सुतळीं रक्षीन सदा तुला सपरिवारा ।
माता आपण मागे लागोंचि न दे मुलास परि वारा " ५३ ॥
या सुवरें प्रह्लादप्रभुचा जो पौत्र महिवरेश तदा ।
बद्धांजळि होय बहु प्रेमभरें करुनि गहिंवरे शतदा ॥ ५४ ॥
"परमेश्वरा ! तुज दिलें म्यां त्रिभुवन, काय गोष्टि हे, राहो, ।
ज्याणें न पाहिले हे श्रीचरण, भ्रांति त्याचि येरा हो ! ॥ ५५ ॥
या हस्तमस्तकांहीं तादृक्सद्भक्तिभाग्यहीनाहीं ।
प्रभुच्या श्रीचरणांला केला सम्यक् प्रणामही नाहीं " ॥ ५६ ॥
ऐसें वदोनि बंधनमुक्त बळि प्रभुसि विधिसि रुद्रासी ।

---

१ सेवकास ( बळीस. ) २ कधीं न जिंकला गेलेल्या ( मला ). ३ सुतल नांवाच्या पाताळाचा राजा, ४ जीव,

वंदुनि, सुतळीं शिरला पावुनि भगवत्प्रसादमुद्रासी ॥ ४७ ॥
वामनचरित्र.

---

## ७ उषा व अनिरुद्ध.

सेवेंत नग-सुतेच्या त्या बाणाची सुता उषा होती ।
पाहे प्रभुसीं क्रीडा देवीची निकटवर्तिनी हो ती ॥ १ ॥
इच्छी अनुरूपसगुणपतिसीं क्रीडा तसीच ती धन्या ।
समजे, स्मित करुनि म्हणे तीतें ती श्रीहिमाद्रिची कन्या ! ॥ २ ॥
" वत्से ! करिसिल तूंही ऐशीच प्रियतमासह क्रीडा " ।
या श्री-देवी-वचन-श्रवणें आलींत पावली व्रीडा ॥ ३ ॥
' पतिलाभ घडेल कधीं ' ऐसें जों ती उषा मनीं आणी ।
तेंही समजोनि वदे श्रित-कल्पलता शिवा अशी वाणी ॥ ४ ॥
" जो रमवील स्वप्नीं वैशाखद्वादशीनिशाकाळीं ॥
कन्ये ! तो दयित तुझा तूं त्याचें वचन सर्वदा पाळी " ॥ ५ ॥
सखिया हंसति हंसविती म्हणती " वांच्छितवरा उखा लाहो ।
स्वप्नीं लग्न ! वराडी आपणचि ! सुपात्र हे सुखाला हो ! ॥ ६ ॥
करितां पति-प्रतीक्षा झाली बहु काममोहवशगा ती ।
व्हाया स्वस्था आलि श्रीदुर्गेचेंचि भव्ययश गाती ॥ ७ ॥
न निजे, जेवी, सेवी न जळहि, तांबूलही न ती चावी ।
पांडुत्वातें देह प्रतिपळ अतिशक्तिहीन तीचा वी ॥ ८ ॥
निंदी शीतकरातें, सेव्यहि वाटे तिला असेव्य जन ।
' आर्द्राहि नलगेचि ' म्हणे ' भाजितसे तापलें असे व्यजन ' ॥ ९
प्रभुजलकेलिविलोकनसमयापासूनि फार मातें, तें ।
दासी कथिति उषेच्या देहींचें व्याकुलत्व मातेतें ॥ १० ॥
माता धांवुनि आली, प्रियकन्येतें विलोकिती झाली, ।
चित्तीं बहु ती भ्याली, घर्माच्या अश्रुच्या भरें न्हाली ॥ ११ ॥

---

१ भगवंताच्या प्रसादाचा परमानंद, २ पार्वतीच्या, ३ शंकराशीं, ४ प्रसवे' निर्मी,

आलिंगी, कुरवाळी, वदवी, परि किमपि ती सुता न वदे ! ।
दावी चिकित्सकांला तीस परमभय तिचें सुतानव दे ।।१२।।
पटुवैद्य वदति ' देवि ! स्वस्थ रहा ईस लागली दृष्टी ।
कीं अतिसुंदरपण हें न असें अन्यत्र शोधितां सृष्टी ! ।। १३ ।।
अभिषेक करा, उतरा सैर्षप, लावा मुलीस आंगारा, ।
सांगा राम-कवच-मनु-पाठ, सुधा जवळि असुनि कां गारा?"।।१४।।
वदल्या चतुरा नारी " केला देहीं प्रवेश तारुण्यें ।
पति शीघ्र उबेसि मिळो पितृ-वात्सल्यें महेशकारुण्यें ! " १५ ।।
त्याउपरि भगवतीनें कथिल्या काळीं उषा सखी सहिता ।
निजहर्म्यवरीं निजली स्वप्नीं पाहे तसेचि ती महिता ।। १६ ।।
देवीवरसामर्थ्यें अतुळें, नागोत्तमें जसी नागी ।
स्वप्नीं सभोगचिन्हा पुरुषवरें होय भोगिली जागी ।। १७ ।।
कुंभांडसुता रामा तीस म्हणे " सखि ! धरूं नको ताप ।
घडतां स्वप्नीं संग स्त्रीसहि पुरुषासही नसे पाप ! ।। १८ ।।
रामेसि उषा प्रार्थी " प्रियसखि ! न सुचेचि, मन्मति भ्रमली !
तूं सांग उपाय, सुजनाजिव्हा नच सांगतां हित श्रमली " ।।१९।।
रामा सांगे, " कार्या करिल निजा तेंवि चित्रलेखा या ।
कविनीं न सुमैत्रिहुनी कल्पलतेनें विचित्र लेखाया " ।। २० ।।
तत्काळ अप्सरा ती प्रभुपौत्रीनें[६] समीप आणविली ।
पडुनि गळां अतिपीडा वांच्छा निववूनि तीस जाणविली ।।२१।।
देवी तीस म्हणे " सखि ! हें कार्य अशक्य, कीं न कुळशील ।
देशहि लोकहि ठावा, परि विरहें तूं उरांत उलशील ।। २२ ।।
याकरितां लिहिल्ये मी त्रैलोक्यामाजि पुरुष जे महित ।
सुरदानवयक्षोरग–राक्षसगंधर्वमानवांसहित ।। २३ ।।

---

१ वैद्यांना, २ अत्यंत कुशत्व, ३ मोहऱ्या, ४रामरक्षेचे चौदा पाठ ५ कविनीं उत्तम मैत्रीपेक्षां कल्पलता विचित्र म्ह० अधिक चमत्कारवती न लेखाया—चित्रलेखा मात्र तुझें कार्य हें आपलेंच कार्य आहे असें समजून करील, तिचें साह्य आहे. कल्पलतपेक्षां तिचें मित्रत्व अधिक ठरेल. ६शंकराचा भक्त--सुत बाणासुर त्याची कन्या.

देवस्त्री ती आणी पट्टातें सप्तदिन सदा लिहुनीं ।
प्रिय संसारांत करी, सेविलि संपत्तिहि न सदालिहुनीं ।। २४ ।।
देवासुरादि सुपुरुष जे चित्रपटांत रेखिले होते ।
सादर सर्व उषेनें वळखाया दयित देखिले हो ते ।। २५ ।।
नंदाचें भाग्य म्हणे 'व्रज तारायासि, बळ खिलारा' ज्या ।
त्या प्रभुचा पौत्र परम सुंदर अनिरुद्ध वळखिला राज्या ! ।।२६।।
वदली स्मित करुनि उषा 'रतितस्कर हाच साच जाणावा ।
सखि ! कोणाचा कोण ? ध्यानीं त्वां प्रथम नीट आणावा! ।।२७।।
कुलशील नाम याचें प्रथम मला त्वां अशेष कळवावें ।
मग मी कथिन उचित तें जन्मुनि पितृयश सये!न मळवावें"।२८।
सांगे देवी"ज्याची कीर्ति निववीती सुधा जशी तसा ।
त्या श्रीकृष्णप्रभुचा सखि ! अनिरुद्धाख्य होय हा नसा" ।।२९।।
ती तिस म्हणे "सखि ! करीं; बहुत न लावूनि दिवस, भेटि कसी।
सेवेंत शिवेच्या तूं शीलितयोगींद्रशिवसभे टिकसी । ३० ।।
देवी वदली "जात्यें, म्हणसि मज स्तवुनि साहसी आण ।
करिल भगवती करुणा, कीं वदसि मरेन वाहसी आण" ।।३१।।
वदुनि अशी गुप्तपणें ती प्रभुच्या नित्यनवपुरा गेली ।
कीं कीर्ति सदुपकारीं करितां श्रमपात्र न वपु रागेली ।। ३६ ।।
मग ती अनिरुद्धातें पाहे जावूनि रम्यगेहांत ।
ज्याच्या ऊषाविरहज्वर दुःसह सुप्रवृद्ध देहांत ।। ३७ ।।
उपभोग जिचा स्वप्नीं चिंतित होता उषेसि चित्तांत ।
तद्रूपी तो तैसा लुब्ध जसा दृष्ट नष्टवित्तांत ।। ३८ ।।
" अनिरुद्धा ! यदुवीरा ! कुशल असे कीं तुला पहायाला ।
आल्यें दूती होवुनि मी बाणसुतासखी वहायाला ।। ३९ ।।
दिधलासि भगवतीनें जीचा स्वप्नीं तुला समागम, ती ।
मत्प्रियसखी उषा पति-विरहें त्या जानकीसमा गमती ।। ४० ।।
प्राण उषेचे विरहीं याबरि यदुसत्तमा ! न बांचावें ।

---

१ उत्तम मैत्रिणीपेक्षां. २ नातु. ३ उत्तम शीलवंत अशा योग्यांच्या मंडळांत. ४ नित्य नवीन अशी द्वारका.

ज्ञात्यांहि सुराअसुरां, स्मरअहि अतिमत्त, मानवां चावे ॥ ४१ ॥
बलिसुत शोणितपुरपति बाण तयाची सुता उखा लाहो ।
तुज ती तिस तूं लाहे बा! हें यश सत्सभासुखाला हो" ॥४२॥
अनिरुद्ध म्हणे "मज ने सत्य करीं स्वप्न रक्ष तीस मज ।
जी उपकृति अत्यार्थी देवि ! स्वल्पाहि लक्ष ती समज ॥ ४३ ॥
तुज सत्य चित्रलेखे! वाटो स्वप्नीं विलोकिली परि ती ।
करिती खरीपरिसही बहु विकळ, मन क्षणक्षणीं हरिती" ॥४४॥
देवी चित्तांत म्हणे 'पावलि परमेश्वरी, उखा यास ।
चंद्रासि चकोरीसी सेविल, हा जन जशीं सुखायास' ॥ ४५ ॥
मग अनिरुद्धासि म्हणे "भेटवित्यें शीघ्र अंगना चाल ।
दोघे परमानंदें, पावुनि अन्योन्यसंग, नाचाल !" ॥ ४६ ॥
श्रीनारददत्ताद्भुत विद्येनें ती तयासि झांकून ।
घेउनि जाय, करूं दे कोणा पुरुषस्त्रियांसि कांकू न ॥ ४७ ॥
शोणितपुरांत ने त्या न धरूं दे विरह नेट वीरा ज्या ।
अनिरुद्धासि उषेसी क्षण करुनि विनोद भेटवी राज्या ॥ ४८ ॥
ती तीस म्हणे " अनघे! धन घे शोधुनि दिलें उखे ! नाच ।
दोघे सावध वर्ता जेणें मन लेशही दुखेनाच " ॥ ४९ ॥
श्रीहरिहरांसि वंदुनि गांधर्वें सुज्ञ इष्ट संपादी ।
दुर्गावरविश्वासें सोडी ती सुतनु दैन्यकंपादी ॥ ५० ॥
कांहीं काळ प्रेमें क्रीडा व्रीडावती करी राजा ! ।
विनवी पतिसंगसुखें, कामदहन तापवी शरीरा ज्या ॥ ५१ ॥

—हरिवंश अध्याय ४१.

---

## ८ एका कुटुंबावरची पाळी.

(पांडव तापसवेषानें आपली आई कुंती इजसह एका ब्राह्मणाचे घरीं राहत होते. त्या नगरीस बकराक्षस फार छळीत होता. त्यास रोज पुष्कळसा साळीचा भात, एक बकरा व एक मनुष्य आहारार्थ लागत असे. प्रत्येक कुटुंबावर एकदा पाळी

---

१ मदनसर्प देवासुरमानवांना ज्ञात्यांनाही चावतो. २ अत्यंत पीडित होवर.

येई. पांडव ज्या ब्राह्मणाचे घरीं होते त्या ब्राह्मणावर तशी पाळी आली, तेव्हां सर्व कुटुंब मोठ्या दुःखांत पडलें. ब्राह्मण, त्याची भार्या, त्याची उपवर कन्या व तान्हुला मुलगा यापैकीं कोणीं बळी जावें असा मोठा विचार पडला. अखेर कुंतीच्या आज्ञेवरून भीमसेनच ब्राह्मणाच्या वतीनें गेला व बकासुरास मारून ब्राह्मणाचें व एकंदर नगरीवरचें संकट त्यानें नाहींसें केलें. य प्रकरणात आश्रयद ब्राह्मणाचा उपकार फेडण्याची कुंतीची उत्सुकता व पांडवांचें औदार्य वर्णनीय आहेतच, पण ब्राह्मण, त्याची स्त्री, कन्या, व पुत्र यांचा संवाद व अन्योन्यप्रेम फार हृदयद्रावक असें कवीनें वर्णिलें आहे. यांत कौटुंबिक नीति ध्वन्यार्थानें फार चांगल्या तऱ्हेनें दर्शविली आहे. )

जातां[1] देवूनि अभय निज-जनकाचा[2] पिता, महाज्ञाते ।
त्याचि नगरीं द्विजगृहीं होते पाळुनि पितामहाज्ञा ते ॥ १ ॥
सिद्धान्न मातृहस्तीं देती ते वरुनि वृत्ति माधुकरी ।
भीमासि अर्ध दे ती अर्धाचे पांच भाग साध करी ॥ २ ॥
होते कांहीं काळ स्वीकारुनि भैक्ष्यवृत्तिला मुदित[3] ।
तों कुंती परिसे त्या आश्रयदब्राह्मणालयीं रुदित[4] ॥ ३ ॥
भीमासि म्हणे ' रडतो दुःखें सकुटुंब विप्र बापा ! हें ।
मज बहु दुःसह झालें आलें नेत्रासि अश्रु वा ! पाहे ॥ ४ ॥
आम्ही पक्षी, हें गृह नीडे[5], धरादेव आश्रयागम[6] हा, ।
दुःख हरूनि करावी प्रत्युपकृति, होय हाचि याग महा ' ॥ ५ ॥
भीम म्हणे ' शोध करीं, जा, स्वमुखें विप्रनायका पूस ॥
वारीन दुःख सर्वहि, दहना आतिभार काय कापूस ? ॥ ६ ॥
जाय द्विजाकडे ती गाय जसी वासुराकडे मोहें ।
करितां विलाप बोलत होता निज दुःख तधवां तो हें ॥ ७ ॥
' ज्याये ! वदलीस पर-स्थळगमन विचार, सर्वथा राहो ।
माहेर येथ होतें, ओळखिती लोक सर्व थारा, हो ॥ ८ ॥
गेलों असतों तरि कां पडतें हें प्राणसंकट प्रसदे ।
स्वकुटुंबव्यसन जसें देतें न तसें वुधा विष भ्रम दे ॥ ९ ॥

---

१ हें प्रकरण मूळ पंतांलिखित प्रतीवरून तपासलें आहे. २ पांडूचा. ३ आनंदित. ४ रडण्याचा स्वर. ५ घरटें. ६ आश्रयभूत वृक्ष.

जरि दान तुझें द्यावें कांते ! मज भासतें तसें तरि तें ।
सिंधदरीं विकावें स्वहितार्थ तितीर्षुनें जसें तरिते[1] ।। १० ।।
पुत्राचि[2] अधिक, न कन्या, अन्यास गमे, मला न लोभ्याला ! ।
नयनयुगांतुनि एकहि द्याया स्वप्नीं न कोण तो म्याला ? ।। ११ ।।
देतों निजवपु परि तूं भीरु कसी साहसील विरहातें ? ।
स्वप्नींहि दुःसहचि जें ह्मणसील मज स्मरोनि चिर 'हा !' ते १२
प्राणाचा त्याग बरा तुमचा न बरा, कसा न तो पापी ।
कूपांत बळें अबळां घालुनि टकवूनि दोर जो कापी ? ' ।। १३ ।।
तों ब्राह्मणी म्हणे ' हो कवि साधु तुम्हीं करूं नका शोक ।
यन्मूल ' आपदर्थे[3] ' तो शंकरसाचि आठवा श्लोक ।। १४ ।।
पतिपूर्वी स्त्रीस मरण, ते लग्नाहूनि काय हो ऊन ? ।
न रहावेंचि सतीनें पळभरहि विरूपकाय होऊन ।। १५ ।।
रक्षाल तुह्मींच मुलें, अबळा वाहील भार जीवा हे ।
रक्षील कसी अन्या नवपुरीं भीरु फार जी वाहे ।। १६ ।।
जाईन मीच, राक्षस जरि करकर सर्व मानवां चावे ।
दैवें स्त्री म्हणूनि दया येतां मत्प्राण कां न वांचावे ? ।। १७ ।।
मज भक्षीलचि तो तरि विधुरपणें सर्वथा नका राहूं ।
ती स्त्री मींच म्हणा जी, मागें सारूनिया[4] नकारा, हूं ' ।। १८ ।।
ऐसें म्हणतां स्त्रीच्या कंठीं घालुनि मिठी म्हणे ' अयि ! ते ।
कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितुं क्षमो दयिते ' ।। १९ ।।
परिसे असें पृथा जों तोंचि म्हणे त्यांसि कन्यका ' मातें !
द्या, द्यांयाचीच सुता, हे किमपि नयेचि अन्य कामातें ।। २० ।।
आत्मा पुत्र सखा स्त्री, कन्या चिंताचि सर्वकाळ, जिला ।
प्रसवोनि वाहतो मनिं श्रीमंतहि पितर सर्व काळजिला ।। २१ ।।

---

१ संसारसागरांतून धर्मपत्नी तारून नेणारी नौका आहे हा बोलण्याचा भावार्थ. २ पुत्रापेक्षां कन्या कमी योग्यतेची असें लोक समजोत; मी तर पुत्र व कन्या हे माझे दोन डोळे आहेत असें समजतों. ३ ' आपदर्थे धनं रक्षेत् दारान्रक्षेद्धनैरपि । आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि '॥ ४ पंतांची टीपः—' नकारातें मागें सारून हूं ह्मणा. ' ५ ' अर्थो हि कन्या परकीय एव '–कालिदास.

' कन्या रक्ष्य तिघांतुनि एका ' तुज बुध म्हणेल कां टाकीं, ।
बापा ! कांट्यानेंचि प्राज्ञ सुखें काढिताति कांटा कीं ' ॥ २२ ॥
ऐसें वदोनि कन्या रडवूनि रडे, तशांत जवळून ।
खवळूनि उठे बाळक बोले हस्तें तृणासि कवळून ॥ २३ ॥
समजावुनि त्यांसि म्हणे ' ऐसें लाल्लिचलासि माळीन ।
कां ललतां आललतां ! पलतां मी सागलांत तालीन ' ॥ २४ ॥
हांसविलीं हर्षविलीं व्यसनार्त तिघेहि बाळ-शब्दानें ।
अब्दानें ग्रीष्मदवाकुळबर्हिकुळें जसींच अब्दानें ॥ २५ ॥
तेव्हांचि पृथादेवी भेटे, अभयोक्ति जी वदे त्यांतें ।
संजीवनीच जाणों ती रोगेंकरुनि जीव देत्यांतें ॥ २६ ॥
कुंती म्हणे ' दिला तुज एक स्वसुत द्विजा ! नकोचि रडों ।
हा शोकभर स्वशिरीं घेउनि सकुटुंब तूं नको चिरडों ' ॥ २७ ॥
कुंती म्हणे, ' मदात्मज गुरुवरमंत्र असे महातेजा ।
साहों न शकति राक्षस वज्रघातासही सहाते ज्या ॥ २८ ॥
सुरवल्लिचा नव्हे गा क्षुद्रलतागुच्छकासम स्तवक ।
स्पष्ट मदात्मजचरणीं अर्पील प्राणधन समस्त बक ! ' ॥ २९ ॥
मग विप्रपृथाप्रार्थित भीम धरुनि राक्षसापराध मनीं ।
कोपे, जाणों दहनचि तो होय; प्रार्थना तया धमनी ॥ ३० ॥
तें मान्य करुनि मुनिला व्हा स्वस्थ असेंचि तो कवि प्रार्थी ।
संसारीं वित्तार्थी तैसेचि कुलीन लोक विप्रार्थी ॥ ३१ ॥

—आदिपर्व अ० ३१

## (९) परांगनाधर्षणाचा परिणाम.

कीचकनामा सेनापाल स्याल प्रसिद्ध राजाचा ।
भंगूं पाहे कृष्णाव्रत, वांछी अभ्युदय धरा ज्याचा ॥ १ ॥
भगिनीस म्हणे ' पूर्वीं आढळली या न हे मला भवनीं ।
वाटे जन्मदरिद्रा झाला बहुकोटिहेमलाभ वनीं ' ॥ २ ॥

१ सागरांत. २ उन्हाळ्यांत भडकलेल्या वणव्यानें पीडिलेलीं मोरांचीं कुळें मेघ (अब्द) जसा जळाच्या दानानें ( अप्-दानें ) हर्षवितो. ३ विराटराजाचा मेहुणा ( बायकोचा भाऊ ) व सेनापति. ४ द्रौपदीचें पातिव्रत्यरूपव्रत.

लब्धतदनुमोदन तो जंबुक सिंहीस, कीं सकाम ससा ।
व्याघ्रीस, सतीस बळें, शांतीस वरावयासि तामससा ।। ३ ।।
रावणसा बहु विनवी प्रेम प्रत्यक्षरीं न दावी ।
कीचक नीच कलुषनिधि त्याची आर्यांत गोष्टि न वदावी ।। ४ ।।
कृष्णा म्हणे " अहाहा ! बुडतां तरि भजति नीच कामातें ।
सावध हो, गा वध हो न, व्याळी जाण कीचका ! मातें ।। ५ ।।
परदारा मी, मत्पति गंधर्व, प्रबळ उग्र शिवशील ।
मागें सरशिल, तरशिल; मरशिल जरि मज बळेंचि शिवशील ।। ६ ।।
प्रिय पांचजन्य जीसें प्रिय तदितर त्या भुजेसि कंबु कसा ? ।
झिडकारिला सतीनें सिंहीनें दुष्टबुद्धि जंबुकसा ! ।। ७ ।।
बंधु भजो, पति न भुलो, म्हणउनि, नसतां परस्व सामान्य ।
ती त्या कार्यासि करी, जरि न करावें पर, स्वसा मान्य ।। ८ ।।
ती[6] तीस म्हणे " कीचक-सदना जाऊन आण गे हाला " ।
धाडी बळें वृकाच्या घालुनि हरिणीस आण गेहाला ।। ९ ।।
कृष्णा म्हणे " न जाइन-जेंवि मृगी वृकबिळा-विटागारा ।
साधुगृहा धाड, परमतक्षा तत्पथशि ा विटा गारा ।। १० ।।
विनवी ऐसें बहु परि तीस सुदेष्णा ह्मणे तरी ' जा च ' ।
फारचि बरी निरयगति, परवशता शतगुणें करी जाच ! ।। ११ ।।
ती आपणा ह्मणे " हा द्रौपदि ! तुजवरि हरीच विटला गे ।
चुकलीस तूंचि, नसतां पदरीं अघ, पाठिला न विट लागे ।। १२ ।।
ज्या श्रीकृष्णसखीतें योग्य नमाया सुरासुर सतीतें, ।
प्रेषी आणाया ती राज्ञी, मानुनि सुरा सुरस, तीतें ।। १३ ।।
जातां परार्थही बहु तापातें पावली सुरामा ती ।
न करील कां पित्याची, दुर्गतिची मावली सुरा, माती ।। १४ ।।

---

१ भगिनी सुदेष्णेचें अनुमोदन ज्यास मिळालें असा. २ पापसागर. ३ पांचजन्य शंख विष्णुभुजेस प्रिय. ४ द्रौपदीरूप परधन. ५ ती सुदेष्णा बहीण त्या बंधुकार्यास मान्य करी. ६ सुदेष्णा द्रौपदीस ह्मणे. ७ मद्य. ८ नरकवास. ९ दुर्गतीची माउली जी सुरा ती पित्याची (पिणाराची) माती न करील कां ? सर्व अधोगतीचें मूळ असें जें मद्यप्राशनाचें व्यसन तें मद्यप्राशनाधीन पुरुषाला धुळीला मिळविणार नाहीं

कीचक विलोकुनि म्हणे त्रिजगद्गुरु विष्णुच्याहि आलीस ।
" रंभाचि सुदति ! तूं या नलकूबरमंदिरासि आलीस ॥ १५ ॥
सर्वस्व अर्पितों तुज देवि ! करीं पूर्ण काम, हो दारा ।
विकत मिळतां स्मितसुधालेशें घेसी न कां महोदारा ? " ॥१६॥
इत्यादि नीच कीचक दुष्कर्माची धरूनि आस वदे ।
कृष्णा वदे " सुदेष्णे-कारितां पात्रीं भरूनि आसव दे " ॥ १७ ॥
तों कर धरुनि खल म्हणे " दासी आहेत फार अन्या या ।
बैसा शयनीं; राज्ञी करिते करवूनि दास्य, अन्याया !" ॥ १८ ॥
कर आसुडितांचि पडे धडधड वात्यासवें जसा विटपी ।
कैंचें तेज बल तशा दुर्वृत्तीं जो सुरारसा विट पी[3] ! ॥ १९ ॥
तेथुनि राज्ञीपासीं जावूनि म्हणानि ' तात ! अंब ! ' रडे ।
फोडी जैसी व्याघ्रविमुक्त कुलभ्रष्ट धेनु हंबरडे ॥ २० ॥
कळतां म्हणे सुदेष्णा " नाहींच विचार कीचकीं अधर्मी ।
सखि ! उगि, जरी म्हणसील, तरि करिन तवसुखार्थ बंधुचा वध मी"
कृष्णा म्हणे " वधावा भ्राता त्वां कां ? तुझा न अपराधी ।
पति गंधर्व न दुर्बळ, माझी प्रार्थील किमपि न परा धी ' ॥२२॥
जाय निशीथीं साध्वी, दावी तिस तत्प्रभाचि वाट तमीं, ॥
चित्तांत म्हणे " भीम ! दयिता ! दयिता नसेन वाटत मीं ? '२३
पाहोनि म्हणे " भीमा ! आश्रय तुज काय हें महानसें ? हा ! ।
न यशोहानि सहा गा, सुज्ञा, सह-काय हेमहान सहा ॥ २४ ॥
साश्रु गळा पडुनि म्हणे " मेलां किंवा तुम्ही अहा सासू ? ।
हास्यें म्हणत वियाद्दीं माजाचि रिपुक्षयावहा सासू ॥ २५ ॥
निजलां काय मृतापरि ? व्हा जागे, सिंहसे उठा, राहा ।
निद्रा, कीर्ति वरा हो, हीनद हा बाहु भृगुकुठारा हो ॥ २६ ॥

---

काय? अवश्य मिळवीलच. १३ व्या व १४ व्या आर्यांतले रम्य अर्थांतरन्यास मराठींत म्हणीवजा झाले आहेत. १ कुबेरपुत्र. २ वावटळी-बरोबर. ३ व्यसनी पुरुषाचें सर्व सामर्थ्य जिरलेलें असतें. व्यसनानें तो तेजोहीन बलहीन झालेला असतो. ४ स्वयंपाकघर. ५ देहासह सुवर्णहानि सोसा पण यश गमावूं नका. ६ जिवंत.

भीम गडबडोनि उठे अंकींच निवास तीस दे वामीं ।
चित्तीं म्हणे " बहुदिसां आतळलों या सतीस देवा ! मी ॥२७॥
दयिते कां आर्तस ? प्रमदे ! हा आर्द्र कां पदर ? ज्याय ।
ज्यालीस भीरु, भय कां ? भेट, त्यालाचि कांप, दर ज्या ये[1]"२८
देवी म्हणे " पुसतसां जाणुनिही खेद काय मातें ? हो ।
विनवा, तुम्हीं तरि ' सुकृत जें बंधच्छेदका यमा तें हो ' ॥२९॥
कृष्णसखी, द्रुपदसुता, धर्मस्त्री, सून पांडुराजाची ।
कविगणगणपतिगौरी कीर्ति सुधासिंधपांडुरा ज्याची ॥ ३० ॥
कीचक नीच कर तिचा धरि, परि हरिची सखी न अनुसरली ।
कर आसुडितां, पडतां खळ, तेथुनि दूर ती सुतनु सरली ॥३१॥
पक्वा बुद्धि करितसे सुयशाची वृद्धि, मृत्तिका काची ।
हरिनीं श्ववृत्ति वरिली, कीं हंसांनींच वृत्ति काकाची ! ॥ ३२ ॥
तेज तुम्हां असतें तरि उरता हाणोनि न विट लातेला ।
अहितायुला न पीतां तेजस्वी दीप न विटला तेला ! ॥ १३ ॥
देवा वांचाया, हे स्त्री, मातीसीच तुडविली, लाजो ।
तोहि पती, उद्धरिना अरिनें व्यसनांत बुडविलीला जो ! ॥३४॥
हे स्त्री नव्हे, प्रतिष्ठा तुमची, जरि ईस सोडितां पाणी ।
' धर्मेचाऽर्थेच ' असें वदल कां प्रथम जोडितां पाणी "॥३५॥
नेत्र पुसोनि कवळुनि भीम सतीला म्हणे " उगी न रडें ।
अज्ञातवास नसता तरि अरिचें ताचि मुरडितों नरडें ॥ ३६ ॥
एकांत नृत्यशालाशयनीं भेट असेंचि कर, ज्याये ! ।
येइल तसेंच माझ्या नृहरीच्या रशे जसें चि करजां ये ॥ ३७ ॥
मुळमुळ रडों नको सति, सीतसहि सोडिलें न भोगानें ।
तेज असोनिहि वरिलें कालकृताभ्युदयलय नभोगानें ॥ ३८ ॥

---

१ मराठी म्हण ' ज्याली दर त्याला डर '. २ शत्रु मारितात. ३ ही स्त्री लाजो. व शत्रूनें व्यसनांत बुडविलीला तारण्याविषयीं असमर्थ जो तिचा पती वांचाया लाजो. ४ नखांना. नृसिंहानें हिरण्यकश्यपूचें उदर जसें नखांनीं फाडलें तसें मी ( भीम ) कीचकाचें फाडीन. ५ सूर्यालाही कालकृत उदयास्त आहेत.

हरि-भक्त-च्छल करितां तत्काल उलेल कां न नीचोरें ? ।
निश्चय, सद्धन हरितां निजमार्ग भुलेल काननीं चोर " ।। ३९ ।।
गांठी तिला पुन्हां तो खळ, जेंवि पतंग दीपकाळि केला ।
प्रार्थुनि म्हणे "सुमुखि ! मज भज, तुजसीं म्यां चुकोन कलि केला ४०
सुंदरि ! विराट राजा नांवाचा जाण, साच मत्स्यप हा ।
शृंगाररसतरंगिणि ! तळमळतो संगमार्थ मत्स्य पहा ! " ।।४१।।
त्यासि खरें भासेसें प्रियँ-शिक्षित सस्मित स्वयें वदली ।
परि कांपली सतीची तनु जैसी मंदमारुतें कदली ।। ४२ ।।
त्या शून्य नृत्यशाला-शयनीं सांजेचि गुप्त भीम निजे ।
जागति ते स्वाकारें भुजगांच्या नित्य देति भी मनिं जे ।। ४३ ।।
जों चांचपी तयाच्या मृगपातिच्या जेंवि फेरुं-आंगातें ।
करिती करकर जाणों म्हणति जडवरासि ' कां मरसि ? गातें ४४
" आलों तुज भेटाया घेवुनि सर्वस्व हें उपायन हो ।
प्रमदे ! त्वत्प्राप्तीस्तव बहु केला विफळ हा उपाय न हो ।। ४५ ।।
असता दीप तरि सुमुखि ! मानुनि मज मूर्तमदन रमतीस ।
लटकी म्हणूनि हृदया-माजि न देतीस पद नरमतीस ! " ।।४६।।
हळुच म्हणे भीम " तुम्हीं सुमहागुणनदनदीपं काशाला ।
दीप ? प्रकाशली कीं पावुनियां वदन- दीपका शाला ! ।। ४७ ।।
तुमचं लोकांत अहो ! कीचक सामान्य काय हो शील ? ।
परि तूं वरटासि करट-नीच कसा मान्यकाय होशील ? ।। ४८ ।।
संगासि उर्वशीच्या स्वप्नीं तरि काय गा ढंवा लाहे ।
सैरंध्री वीर-वधू या तुज नरकाय गाढवाला हे ! " ।। ४९ ।।
ऐसें बोलुनियां धृत-खळगल बलजलधि तो भला बुकली ।
पावेल जय कसा प्रभु-सेतुसवें करिल जो अलाबु कली ? ।।५०।।

---

१ नीचाचें उर. २ खरोखर. ३ हें रंगेल भाषण परस्त्रीलुब्धाला योग्यच आहे. ४ भीमानें शिकविलेलें. ५ कोल्हा. ६ पलंगाचीं लांकडें. ७ मला मनुष्य न समजतां प्रत्यक्ष मदन समजतीस ८ गुणसमुद्र. ९ कावळ्यांतला नीच. १० सांजिद्याला निंदेनें ढवा म्हणतात. ११ धरिला आहे खळाचा गळा ज्यानें असा भीम.

प्राणा मुकेल इच्छुनि सिंहीचे गजाहि सबहुमान मुके ।
मा न मुके कोल्हा कां ? 'छी' म्हणतिल त्या जनाधमा न मुके ?
प्रबळांसीं करिल स्त्री-स्तव आमृति कां न नीच मूढ कली ? ।
सुकविहि दशमुख निजतनुसह काल-वृकाननीं चमू ढकली ॥२२॥
दावा दूरुनि नरकग्रामाची भीम कीचका वेस ।
कलिमाजि लघुत्वप्रद शक्तीस तसेचि नीच कांवेस ॥ २३ ॥

—विराटपर्व अ. १.

---

१ श्रीकृष्णभक्त भीमानें कीचकाला नरकग्रामाची वेस दुरून दाखविली. कृष्णभक्त-संगतीनें मोक्ष मिळायला पाहिजे, पण नीचाच्या संगतीनें सज्जनांनाही कधीं कधीं लघुत्व पत्करावें लागतें. नीच ह्म० शाक्त मद्यप्राशनादि करून शक्तीस ह्म० देवीस लघुत्व आणतात व भगवीं वस्त्रें पांघरून पापकर्मी दांभिक कांवेस ( गेरूस ) कमीपण आणतात, त्यांतलाच हा प्रकार होय.

# ६ चक्रारामायण

श्रीरामाचें वारितें पातक सारें नाम ।
सकृदुचारें तारितें सर्व पुरवितें काम ।। १ ।।
पीयूषाहूनि शतगुणें रामाचें यश गोड ।
याचें उदारपण म्हणे मंदारा ‘ कर जोड ’ ।। २ ।।

—दोहारामायण.

विधिमुखामरप्रार्थनावश । त्रिभुवनीं बरें व्हावया यश ।
दशरथात्मभू जाहला हरी । प्रभु शुभा चतुर्मूर्तिता धरी ।। ३ ।।

—मंजुरामायण.

भवाब्धि सुकवी, कविप्रिय करी, करशितम हा महादय हरी ।
सुकीर्ति परमा रमाप मिरवी, रवीडितमहा महास्पद नवी ।। ४ ।।

—विचित्ररामायण.

श्रीमान् राजशिरोमणि दशरथ जो निजयशें बरा महित ।
द्विजसेवक, यज्ञनिरत, जनभयहर्ता, धरानिकामहित ।। ५ ।।

—मंत्रमयरामायण.

नरपति अनपत्य होता, तया प्राप्त झाली प्रजा आदरें पाळितां वृद्धता साधिता । विधिसुतकथित स्वयें ऐकिलें ते सुमन्त्रप्रधानोक्त होय क्षमापाळ तो साधिता । हयमखं करि, ऋष्यशृंगासि आणूनि तो त्रिष्णुहंसा वदे, पद्मभू. ‘ रावणावायसा । वधुनि सुखिव दिग्रथापत्य हो, ’ ‘ हो ’ म्हणे देव, पुत्रेष्टि होता द्रवें, अग्नि दे पायसा ।। ६ ।। त्रिभुवनपति पायसीं त्या शिरे, दिव्य तें अन्न राजप्रिया ज्या तिघी सेविती सन्मती, ।

---

१ गजेंद्राचें संकट. २ सूर्यानें वर्णिलें आहे तेज ज्याचें असा. ३ मह म्ह. आनंद; आनंदाचें स्थान. ४ स + आधि + ता = मानसिक दुःस्थिति. ५ वासष्ठ. ६ अश्वमेध यज्ञ. ७ ब्रह्मदेव.

तदुदरभव चार साराकृति श्यामगौरप्रभ प्राज्यतेजस्क सत्पुत्र जे जन्मती । प्रथमतनुज कोसलेंद्रात्मजेचा तया ' राम ' हें नाम ठेवी महात्मा सुधी तो पिता । परममुदितचित्त होय द्विजाकारणें भूवर्गें सद्वनें कल्पशाखी तसा ओपिता ॥ ७ ॥

—दंडकरामायण.

कैकेयीच्या पोटा आला, ठेवी रम्या आख्या त्याला ।
रघुवर दशरथ 'भरत' असि सुकवि, अहितसुख सुकवि, कुगतिसहि चुकवि
म्वाद्या मित्रा तीचें दोधे, तज्जन्में धन्यत्वा तो घे ।
स्तुति शतमख करि, सुगति चरण धरि, जगदघ परिहरि, सुयश भवन भरि
यन्नामीं लक्ष्माच्या अंतीं ण प्रेमानें घ्यावा संतीं ।
प्रथम तनय नयरत ततगुण शुचि, उचित निपुण निजरुचिजितहिमरुचि १०
याचा शत्रुघ्नाख्य भ्राता, कैकेयीपुत्रांधिव्याता ।
रघुकुलहितकर, सकलपुरुषवर, नयनहृदयहर, विमलगुणनिकर ॥ ११ ॥

—सौम्यरामायण.

हर्षे केलीं तदुपनयनें त्यांसि भूदेवशिष्ट
प्रेमें विद्या जपुनि सकळा निर्मळा दे वशिष्ट ।
तों त्या वृद्धा दशरथनृपा तद्विवाहाधि लागे
विश्वामित्र क्रतुसमवना रामचंद्रासि मागे ॥ १२ ॥
गुर्वाज्ञेनें नृप मुनिकरीं दे सुतप्राण दोघे
त्याला अस्त्रे शत कथुनियां, सद्यश प्राज्य तो घे ।
सांगे विद्या प्रथमचि ' बळा ' जी निवारी क्षुधेतें
तृट्बाधाघ्नी मग ' अतिबळा ' लाजवाया सुधेतें ॥ १३ ॥

—भावरामायण.

कृत्या तसी शोभे, पथीं रोधी तपस्य हाटका ।
त्याच्या निदेशें मारिली श्रीराघवें ती ताटिका ॥ १४ ॥
सिद्धाश्रमीं श्रीगाधिज स्वस्थें मनें यागा सजे ।

---

१ सु आहे आदि जिच्या अशी मित्रा म्ह० सुमित्रा. २ लक्ष्माच्या अंतीं ण म्ह० लक्ष्मण. ३ आपल्या अंगकांतीनें जिंकिला आहे शीतांशुचंद्र ज्यांनें. ४ क्षुधातृष्णा निवारणाऱ्या बळा अतिबळा नांवाच्या विद्या.

ते राक्षस व्यापादिले कर्तें बळें आगांस जे ॥ १५ ॥

—सूरारामायण.

त्यावरि तो मिथिलेसि महामुनि जाय; पथीं प्रभु गौतमजाया
उद्धरि पादसरोजरजें, बहु जी भ्रमवी मन ती हरि माया ।
त्र्यंबक कार्मुक भंग करी क्षितिजाजनकादि लयाप्रति जाया
कांडहि केवळ होय थिटें अतुळ प्रभुचें सुजसद्यश माया ॥१६॥
श्रीजनक क्षितिपाळक सत्वर आणवि पंक्तिरथा अतिधन्या
तत्तनुजा चवघांसहि तो अनुजासह दे चवघी निजकन्या ।
ग्रामगजा अवलोकुनि ये बहु कोप जसा पर दुःसह वन्या
क्रोध करी भृगुराम तसा नच तो वळतां प्रभुवांचुनि अन्या ॥१७॥
भार्गवराम पराभवल्यावरि पंक्तिरथ स्वपुराप्रति पावे
पौर असे वदले, ' न सुरद्रुम रामभुजाधिक हे गुरु गावे ' ।
मातुळ ने स्वपुरा भरताप्रति दे अनुमोदन भूपति पावे
हे प्रभुचे परमाद्भुत सद्गुण सोडुनि अन्य न मंत्र जपावे ॥१८॥

—सवयारामायण.

दिग्रथाप्रति योजितां युवराज राम करावया
सप्रधान म्हणे वसिष्ठहि, ' हा विचार बरा वया ' ।
मध्यमा दयिता वदे ' वर दोन हे रुचले मना ।
मत्सुता अभिषेक, राम चतुर्दशाब्द भजो वना ! ' ॥१९॥

—विबुधप्रियरामायण.

हें ऐकतां भूपती पावला ताप, । तीतें म्हणे ' काय तूं बोलशी पाप ! ।
का चित्त ऐसें कठोर प्रिये ! आज । जालें अमर्याद सोडूनियां लाज!२०
ब्रह्मोपचायी सुविद्य क्षमाशील । हा टाकितां तूं जनीं निंद्य होशील ।
दाता कृती शूर सत्कीर्ति निर्दोष । ऐशा स्वपुत्रीं बरा काय हा रोष ? २१
ते निर्दया केकयाची सुता यास । कोपे म्हणे ' कां करीसी वृथायास ? ।
का पुत्रलोभें प्रतिज्ञाव्रतत्याग । कां रुचला ? हा यशाला तुझ्या डाग !२२

---

१ हें सूरा' वृत्त हिंदुस्थानी आहे.

सत्यासि रक्षी पहा आपला प्रांत¹ । तूं या अवस्थेंत होऊं नको भ्रांत ।
येणेंचि होईल अंतीं अधःपात । यामाजि आहे तुजा सर्वथा घात' ॥ २३ ॥
म्हणे राम ' तातार्थ मीं प्राणदान । करीन क्षणें हें मनीं सत्य मान ।
त्यजीन स्वयें राज्यधाराधनातें । स्वमातेचियाही पदाराधनातें ॥ २४ ॥
करी² जो अनुज्ञेविणें तातकार्य । जनामाजि तो धन्य सत्पुत्र आर्य ।
दुजा³ बोलिला मध्यम प्रोक्तकारी । व वर्ते नियोगेंहि जो तो भिकारी' ॥ २५ ॥

—साररामायण.

सकनिष्ठ सदार निघे चरणगति, तयासि तात रथ धाडी ।
सारथि गंगा तरतां त्याजि आजि ! न निषाद खेदही झाडी ॥ २६ ॥
करि चित्रशृंगशैलीं ऋषि हर्षित, दशरथ त्यजी देहा ।
आजाच्या नगरीचा कैकयीतनय आणिला गेहा ॥ २७ ॥

—निरोष्ठरामायण.

वंदूनि⁴ मातेसि तेव्हां म्हणे ' आज,
गेला असे सांग कोठें महाराज ? '
' स्वर्गासि गेला कुमारा ! तुजा तात ' ।
' अंब अकस्मात ! झाला कसा घात ? ' ॥ २८ ॥
' हा पुत्रशोकेंचि मेला सुता ! राय ' ।
' तो कोणता हें मला सांग हो माय ? '
' बंधू नमस्कार सोर करा ज्यास '
' जालें तया काय ? तो मान्य राजास ' ॥ २९ ॥
' स्त्रीबंधु घेऊनि गेला अरण्यास '⁵ ।

---

१ शेवट. कैकेयी म्हणत ' तूं पुत्रमोहांत पडून आपलें सत्यव्रत सोडूं नकोस, आपला प्रांत ( आत्यंतिक क्षेम, मोक्ष ) कशांत आहे तें पहा ! तूं आपलें हित पहा ! ' कैकेयीच्या उपदेशाप्रमाणें दशरथानें खरोखरच आपला प्रांत ( मृत्यु ] पाहिला ! ! २ बापाचें मनोगत ओळखून त्याप्रमाणें वागणारा तो उत्तम पुत्र. हा श्लोक किती सुंदर आहे ! ३ आज्ञा झाल्यावरही ती न पाळणारा पुत्र भाग्यहीन कपाळकरंटा समजावा. ४ हा माता पुत्रांचा संवाद किती बहारीचा आहे ! हे चार श्लोक संस्कृतांतील हनुमन्नाटकांतील ३ अंकांतल्या ' मातस्तातः क यातः, ह्या श्लोकाचें सुरस भाषांतर आहे. ५ कैकेयी रामाचें नांव घ्यायला संकोचते !

‘ कां मानलें हें जनाच्या शरण्यास ? ’ ।
‘ वत्सा तुझी तातवाणीच तन्मूळ । ’
‘ ऐसें कसें बोलिला भूपशार्दूळ ? ’ ॥ ३० ॥
‘ बोले असे भूप मद्वाग्गुणावद्ध ’ ।
‘ कैची फलप्राप्ति ? कां पीडिला वृद्ध ? ’
‘ व्हावें तुला राज्य तो साधिला काम । ’
‘ हा पापिणी ! काय केलेसि ? हा राम ! ’ ॥ ३१ ॥

—एक अपूर्णरामायण.

कौसल्या समजावी भरता, बोधुनि गुरुक्रिया करवी, ।
मग जाय चित्रकूटा, तुष्टि भग्द्वाज दे बरवी. ॥ ३२ ॥
प्रभुला वंदुनि साश्रु स्वपित्याच्या कळवि भरत हा निधना ।
राम म्हणे ‘ हा ! ’ होतां अतिलोभी जेंवि हानि धना ॥ ३३ ॥
पिंड पित्यासि दिल्यावर भरत म्हणे धरुनि पाद, ‘ या परतें ’ ।
ऐके न सत्यसंध त्रिदशहितोद्यत दयापर तें ॥ ३४ ॥
‘ म्यां त्वांहि न लंघावें स्वगुरूक्त ‘ अवश्य ’ शब्दच वदावा, ।
राज्य करीं बा ! येतों मी सरतां अब्द चवदावा ’ ॥ ३५ ॥
सिंहासनीं बसाया मागुनि घे पादुका, शिरीं वाहे, ।
राहे नंदिग्रामीं अंत्याब्दसमाप्तितें पाहे ॥ ३६ ॥

—आर्यारामायण.

“ देवुनि अभय मुनींतें, आशीर्वादप्रसाद जोडून ।
अत्र्याश्रमासि गेले स्वामी तो चित्रकूट सोडून ॥ ३७ ॥
चालति माझ्या मागें लक्ष्मणजी, काननीं, पुढें स्वामी ।
धामीं तसींच हर्षे चाले पाहोनि आपल्या स्वामीं ॥ ३८ ॥
जेंवि भरद्वाज तसे द्रवले पाहोनि तेहि मामाजी ।
झाले अतितर सुखकर, कर जैसे भानुचे हिमामाजी ॥ ३९ ॥
तद्भार्या अनसूया मजवरि करि सासुमायेसी माया ।

---

१ वाट पहात राहिला २ भरद्वाजास. ३ सीता आपल्या स्वसा-जावांस सांगते. ४ विप्रधन जो राम त्याला. ५ कुलीन स्नुषा सासूला आईहून, अधिक मानते. ६

स्वकरींचि अळंकारी, आहे प्रेमासि काय सीमा या ? ॥४०॥
वेणी घालुनि, लोचनीं निजकरें ती लेववी कज्जळ
लावी चंदन सुव्रता, मज गमे गंगाचि तें तज्जळ ।
गुंफी सत्कुसुमें शिरीं, सुरुचिरा माळा गळां अर्पुनी
प्रेमें धर्म कथी, सुधाधिकरसें सूक्तें मला तर्पुनी ॥ ४१ ॥
तैसाचि मल्ललाटीं साध्वी सिंदूरतिलक जो लावी ।
तोहि अगतसार सदा, कैसी तत्सुकृतसिद्धि बोलावी ? ॥ ४२ ॥
तो अंतराग चिरकाळ तसाचि ओला
यत्सौरभीं भ्रमरपंक्ति सदैव लोला ।
घ्राणेक्षणांसि म्हणती कुसुमेंहि ' डोला '
वेणी नवीच, न सतीयश शक्य बोला "

—सीतारामायण.

राघवें मग विराध तारिला । तन्महोग्रतर शाप वारिला ।
नाशिला सुचिर ताप स चला । देवता म्हणति तापसा ' चला '॥४४॥
जो स्वतातसख त्या जटायुतें । तो नमी प्रभु शिरें जटा-युतें ।
प्रीति याचि कवि साधुरीतितें । जा सुधा न असि माधुरी तितें ॥ ४५॥

—गदधरामायण

गळां पडे शूर्पणखा, परांतें । पाहे वराया, पण खापरातें ।
तो सद्गुणाचा वनिना कांडा । प्रहृष्ट दडें करि नाक रंडा ॥ ४६ ॥
सौमित्रि खड्गें हरि कणनासा । ज्याच्या करीतां गुणवर्णना सां ।
पावेल त्या केंवि तशी कुशीला ? । पुण्यें न येतां क्षितिच्या कुशीला॥४७
खरा ससैन्या हननार्थ धाडी । लीळेकरून प्रभु त्यासि ताडी ।
छेदी शिरें, सर्व परोरें फाडी । सेना जनस्थानहि ओस पाडी ॥ ४८ ॥
स्वदुर्गुणें पावुनि ताप, भावा । दशानना ती कथि पाप भावा ।

---

१नवा टवटवीत. २ जटांनीं युक्त अशा. ३ बापाच्या मित्राला बापासारखा पूज्य मानण्याची जी कुलीनांची रीति तीतें. रामचरित्रात पदोपदीं. अशी गोडी लागते कीं अमृत त्यापुढें तुच्छ वाटतें. ४ ईश्वराला. ५ सहा शस्त्रें ६ रामासारखा पति मिळा- यला सीतेसारखीच पुण्याई पदरीं पाहिजे. ७ शत्रूचें वक्षःस्थळ.

'स्त्रीरत्न घे होउनि निःस्व साहो । न शोक वैरी, मुदिता स्वसा हो'।।४९।।
मारीच मायामृग शत्रु दावी । श्री त्यासि हेमाकृति सत्य भावी ।
माग धराया दयितासि लावी । मनुष्यलीला प्रभुनीच गावी ।। ५० ।।
मर्मी तयाते शर राम हाणी । तों तो खळ श्रीरमणाचि वाणी ।
' हा ! हा ! ' अशी तारतरार्त वाणी । बोले भ्रमे श्री न जशी शहाणी।।५१
सौमित्रिते भावुनि घात, भीता । ' धावें ' म्हणे, ' पत्यवनार्थ ' सीता ।
तो जाणवी सत्य भला, शमाया । तत्त्रास, 'हे देवि ! पलाशमाया '५२।।

—सद्वित्तरामायण.

सीता वदे, " मदभिलाष तुझ्या मनांत। आलासि यास्तवचि तूं कुजना ! वनांत
जा,नीच,नीच,उटजीं कितवा ! न राहें । ऐसें कुकर्म न नरा हित, वानरा हे ५३
भार्या कसी उचित जा तुज सायसी ते?।ती आपणासहि वदे, ' त्यज काय!सीते
रामाकडे रडत तो वृततापगेला । सोडी तिला खग जसा कलुषापगेला ।। ५४

—सद्भक्तसर्वस्वरामायण.

कटु ऐकुनि तो असे रडे, द्रुत जाय प्रभुसत्तमाकडे ।
तंव ये दशकंठ, ते यती गमला, सादरबुद्धि होय ती ।। ५५ ।।
हरि कामसहाय हा यती, वदली शापुनि ' हाय ! हाय । ' ती ।
' अजि राघव वीररायजी ! करुणा ती त्यजिलीच काय? जी।।५६
त्यजिली कसि कीर्ति ? याच, कीं तुमच्या दैन्य उरें न याचकीं।
आज लक्ष्मणजि ! त्वरा करा, यश द्या स्वाहितजित्वरा करा' ५७
अवलोकुनि गृध्रपा वटीं, यश द्याया अतिभव्य, शेवटा ।
वदली, ' निववा दयारसें अजि मामाजि ! पहा उडा' असें।।५८
करि तो अरितोषहानितें, समरा त्या सरवृंद वानितें ।
रथ भंगुनि सून सोडवी, परि त्याचे विधि पक्ष तोडवी ।। ५९ ।।

---

१ सामान्यांच्या चरित्रांत काय गोडी २ रामसारखी. ३ त्या सीतेची भीति. ४ संशयग्रस्त सलिला क्षणिक गढूळ झालेल्या पण निसर्गशुद्ध जशा गंगेची उपमा शोभते ! ५ हे वैतालीय वृत्त करुणरसाला अत्यंत अनुकूळ आहेच पण त्यांतही या श्लोकांतली पदरचना किती कोमळ आहे ! ६ आपल्या शत्रूंना जिंकणाऱ्या.

अमृताधिकगोड वीक्षण द्विज पावे, सुन सोडवी क्षण ।
परि तोडुनि गृध्रपक्षती हरि अन्यायरणैकदक्ष ती ।। ६० ।।

—प्रियरामायण,

कीशांमध्यें टाकी भूषा, पावे मंदत्वातें पूषा ।
लंकेत स्वारामीं स्थापी, दापी कामी क्रोधी पापी ।।
राम श्रीविश्लेषें शोका स्त्रैणाच्या तो दावी लोका ।
विश्वाचा जो धाता तो या दे गृध्रेंद्रा ताता तोया ।। ६२ ।।
ज्यां मूर्धा नाहीं तो खाया पाहे स्वामी दे तोखा या ।
दिव्या भक्ता भिल्ली केली श्रीरामें स्वस्थाना नेली ।। ६३ ।।

—विद्युन्मालारामायण.

पंपातीरीं बोले सीतेतें आठवूनि ' हा ! ' राम ।
जो साक्षात् सर्वांही दासांचा स्वर्गभूहाराम ।। ६४ ।।

— दिव्यरामायण.

दयिताविरहीं शोकें प्रभुचा काय कोंदिला ।
विलाप सर्व न जना करुणें आयकों दिला ।। ६५ ।।
वनीं विलाप प्रभुचा ज्याचिया श्रवणीं पडे ।
रडे खग मृग व्याघ्र द्रुम वल्ली अस घडे ।। ६६ ।।

—अनुष्टुप्रामायण.

मी सुगळ, परंतु पुढें ये भेटे पवनपुत्र विनयानें ।
वाहे पृष्ठें, दे सुख देवांच्या तेंवि लेशाहे न यानें ।। ६७ ।।
अन्योन्य ते न देती कटक मुकुट रत्नहार निष्क पट ।
समदुःखत्वें नरवानरसख्य परंतु होय निष्कपट ।। ६८ ।।
प्रभुसि सुगळ देवीचे नग शोकप्रद परंतु ते दावी ।
लावी राम उरासीं, स्वाधिकदुःखी सखा तया भावी ।। ६९ ।।
तज्ज्ञ परंतु पुसे प्रभु, सौमित्र म्हणे, ' मला कळे सेवा, ।

---

१ सुधामधुर अशा दृष्टीनें सीतेचें जटायूकडे पाहणें. २ अशोकवनांत. ३ कबंधराक्षस. ४ कल्पवृक्ष. ५ लक्ष्मण म्हणतो, 'मी सीतामातेच्या सर्वकाळ पायांकडे पाहणारा तिचा दास. तिच्या वरचे अलंकार मी कधींही पाहिले नाहींत, हीं नूपुरें मात्र तिचीं आहेत खास !'

नमितां देखत होतों मीं जीं तीं हींच नूपुरें देवा ! ' ।। ७० ।।
सुग्रीव म्हणे ' वानर हृतदार परंतु मी नसे कष्टी ।
तुज देवी भेटवितों, व्यसनीं धृति हितकरी, तमीं यष्टी ' ।। ७१ ।।

—परंतुरामायण.

युद्ध कराया हटकवुनि पळें एकशरें शतमखसख वाळी
सर्वशरण्यप्रवर विभु वधी, त्या सुगळा कपिपति करि, पाळी ।
ऋक्षसुरांशप्लवग मिळविले, ते सुगळें मग महिजनिशोधा
पाठविले हो ! अवधि करुनियां एकचि मास कथुनि हितबोधा ।।७२।।
तीन दिशांतें हुडकुनि फिरले, सांगति 'तो खळ दशमुख नाहीं '
त्यांत यमाशा निरखिति हरि जे त्यांहि कळे न कुशळगति कांहीं ।
शोध न लागे, अवधिहि टळला, उग्र सुकंठ म्हणुनि बहु भ्याले
सागरतीरीं प्लवग सकळही सिद्ध मरों अनशन दृढ झाले ।। ७३ ।।

—तन्वीरामायण.

गृध्रं तारात्मजः प्राह; ' रावणं रावणालयम् ।
अंतिके यदि वा दूरे यदि जानासि शंस नः ' ।। ७४ ।।
विहगमपतिः प्राह " लोकान्वेद्म्यखिलानहम् ।
रामस्य यदिदं कार्यं कर्तव्यं प्रथम मया ।। ७५ ।।
इतस्तोयनिधेर्द्वीपे पूर्लंका शतयोजने ।
तामध्यास्ते विश्रवसस्तनुजो रावणाभिधः ।। ७६ ।।
तस्यां सा राजतनया रावणांतःपुरे सती ।
रुद्धा वसति लंकायां राक्षसीभिः सुरक्षिता " ।। ७७ ।।

—संस्कृत मंत्ररामायण.

कपि ते श्रीसीतेचा यापरि ऐकोनियां समाचार ।
झाले मुदित मनीं परि त्यासि गमे सिंधु रिपुसमाचार ।। ७७ ।।
कैसें सामर्थ्य असे कोणातें ? कोण लंघिता यातें ।
मार्गप्रत्यूहातें, नदीपतीतें, अगाधतोयातें ! ।। ७९ ।।
सरसिजभवजृंभोद्भव ऋक्षपती जांबवान् वदे त्यांस ।
" मारुति नौका असतां चिंतासिंधूत जीव देत्यांस ।। ८० ।।

१ शत्रुसारखा. २ विघ्नातें. ३ ब्रह्मदेवाच्या जांभईपासून जन्मलेला जांबवान्.

हा विजयवीर्यशाली दुर्धर दुर्धर्ष सर्ववीरमणी ।
लंघुनि नदीपतीतें शोधील नृपालसूनुची रमणी " ॥ ८१ ॥
ऐसें कंजभवात्मज वदतां तो मारुती महाकाय ।
वाढे महेंद्रशिखरीं, वामन बलिराज्यकाम हा काय ? ॥ ८२ ॥
—मंत्ररामायण,

लंका शोधुनि, चिंता वाहे । मग तीस अशोकवनीं पाहे ।
तों ये खळ, तत्कुवच न साहे । सुज्ञ म्हणे, 'प्रभुयोग्या आहे !'८३
देवी बहु धिक्कारी क्षुद्रा । तो जातां कपि तिस दे मुद्रा ।
श्रीसीता चूडामणि अर्पी । आधीं आशीरमृतें तर्पी ॥ ८४ ॥
—कल्याणरामायण.

आज्ञा आशी घेउनि हर्षें मारुति उपवन मोडी ।
झोडी वनपाळातें, उग्रें राक्षसकटकें तोडी ॥ ८५ ॥
लीलेनें मारी दणदक्षा शत्रुकुमारा अक्षा, ।
भस्म करी घनरव-भटलक्षा, जेंवि दवदहन कक्षा ॥ ८६ ॥
घननाद ब्रह्मास्त्रासि वळें सांपडतां त्या बांधी ।
ने तातसभेसि, महाकपि न भ्रमविल अरिची कां धी ? ॥८७॥
कपि बोले, 'श्रीरामप्रभुचा दूत, सती शोधाया ।
आलों बा ! तव दर्शन व्हाया हित तुजला बोधाया ॥ ८८ ॥
वांच, शरण चाल प्रभुला, दे प्रभुदार उपायनसें ।
यावांचुनि वांचाया दुसरा तुज सार उपाय नसे " ॥ ८९ ॥
वेष्टविलें वायुजपुच्छ खळें बहुतैलार्द्रपटांनीं ।
पेटविलें, चालविला नगरीं फिरवायासि भटांनीं ॥ ९० ॥
साधुबिभीषणगृह संरक्षी, लंकेची करि होळी ।
घोळी बहु कटकें हरि, अरि तो 'हाय' म्हणे, कर चोळी॥९१॥
विझवि समुद्रीं पुच्छ, 'हा म्हणे सीतालय मानून ।

---

१ रावण. २ रावणाच्या चाटूक्ति ऐकतांच सीतेनें त्याचा धिक्कार केला हें पाहून मारुति मनांत ह्मणतो 'ही सीतादेवी रामायोग्य आहे खरी !'

तीस पुन्हां पाहुनि सुकवि निवे, तो न गमे भानून ॥ ९२ ॥
अंगदजांबवदादिकपीतें कुशळ वृत्त आयकवी ।
नायकवीरानंद अतुळ तो त्या वर्णिल काय कवी ? ॥ ९३ ॥

—पंचशतीरामायण.

प्रमुदितहृदय विभु कपिस पसरुनि भुज उठुनि सुचिर दृढ कवळि ।
स्तवुनि बहु तदुपकृतिभर मिरवि, सुयश विशरि, सकळ जग धवळि ९४

—लघुरामायण.

शत्रुच्छेदा राम निघाला अति तेज्या । उत्साहातें देति कपींचि पति जे ज्या
पाथोधीच्या उत्तरतीरा अज पावे । ज्याचे गाय, त्यागुनि सर्वस्व, जपावे

—मत्तमयूररामायण.

लंकाराज्य विभीषणा प्रभु दे नमितां पाय ।
कनकाचळचि करी कणा, कृपा वदावी काय ? ॥ ९७ ॥

—दोहारामायण.

प्रभु करवि पयोनिधींत सेतु । प्रबळ निशाचरराज्यधूमकेतु ।
भिववि, उतरितांचि, शोक, लंका । तुडवि तिच्या कपिराज तो कलंका ९८

—पुष्पिताग्रारामायण.

न लवे दशास्य. कथि अंगद या । " प्रभुची न वांछि तव भंग दया ।
कर साम, आजिस न राम सजा । बुडतां अधर्मरत तामस जो "॥९९॥
दशतुंड पुंड खवळे, धरवी । परवीर ते वधुनि ' हा ! ' करवी, ।
प्रभुसीं भिडे, वरमदें खळ हा । बळहानिहेतु उभवी कळहा ॥ १०० ॥

—वरदरामायण.

दिकंठातें सुवेळ प्रथम निरसितां दाखवी तज, ताडी,
तो दूता अंगदातें धरवि, धरितैयां बाहु झाडूनि पाडी ।
युद्धप्रारंभ होतां बहुबळ खपवी रामकोदंडधारी
बांधी उग्राहिपाशीं घनरव विभुला लक्ष्मणा नाकॅपारी ॥ १०१ ॥
' हा ! ' बोले दाखवीतां विकळ महिसुता, दे जटा जी त्रिपूर्वा

---

१ सूर्याहून उणा. २ सेतु बांधला हाच रावणराज्याला मोठा अपशकुन झाला. ३ धरणाऱ्याला. ४ स्वर्गाचा अधिप जो इंद्र त्याचा शत्रु —इंद्रजित. ५ त्रिजटा.

ती धैर्या; स्वास्थ्य पावे करपलिहि सती वृष्टिनें जेंवि दूर्वा ।
पक्षीश व्याळमूर्छा उडवि, करि तनू स्पर्शतां अक्षता, ते
ऐकोनि प्रेविला जो यमसम कलेशश्रोत्र तो अक्षतातें ॥ १०२ ॥

—सत्कीर्तरामायण.

समय कठिन जाणुनि घटकर्णा उठवी दशास्य, तोख रची ।
तो खरचित्त सुगळ धरि, हरि मारुतिच्या प्रभा मुखावरची ॥ १०३॥
वरचील काय यूथप, तत्कर्णघ्राण सुगळ तोडि खळ ।
तो डिखळ तेंवि रगडी, त्या मारी स्वजनवज्रकवच पळ ॥ १०४॥
चपळत्व गांठि पडतां न करूं दे जेंवि हारिस शरभ वनीं
शर भवनीं अरिच्या 'हा!' प्रभुचे म्हणविति, निवे जयें अवनी॥ १०५॥
अवनीं स्वबळाच्या पळ करुनि वनरवेंहि पाडिले शवसे ।
लेश वसे न कपिबळीं धृति, केले प्रभुहि विकळ मानवसे॥ १०६॥

—दामरामायण.

दुर्वासनाशल्य ज्याचें हरी नाम । तो प्राकृतें काय शल्यें श्रमी राम ? ।
या मेघनादासही दे प्रभु ख्याति । याच्या प्रसादेंचि वातात्मजा गाति॥ १०७॥
औषध्यगाचें महाशृंग खाणून । तत्काळ अत्यंत दुरून आणून ।
केले विशल्य प्रभू ते चमूयुक्त । वातात्मजाच्या यशा वर्णिती मुक्त ॥ १०८॥
होतांहि बंधुप्रधानात्मज प्रेतें । सामाकडे तो न दिकंठ दे चेत ।
घाली सतीकंठनाळीं रणीं घाय । दे शक्रजित् सर्वसेनामुखीं 'हाय !'॥ १०९॥
माया असें जाणवी, हर्ष न स्तोक । दे कुंभकर्णानुजन्मा, हरी शोक ।
श्रीलक्ष्मणें मारिला तो महामाय । आनंद लोकत्रयींही न हा माय ॥ ११०॥

—रमणीयरामायण.

पडे पुत्रशोकें सुराराति, मोहें । पडे, पाप योजो मनामाजि तों हें ।
'घडे जीमुळें नाश हा ती वधावी । जडे या न कंठा, कृपाणा बधावी !' १११
अकस्मात् पुढें देखतां खड्गपाणी । भयें रावणाची म्हणे 'हाय !' राणी ।
सुपार्श्वप्रधान स्वयें त्यास वारी । फिरे वायुनें मेघसा वासवारी ॥ ११२ ॥

---

१ कुंभकर्ण २ वरकड. ३. मृत. ४ जी मला स्पर्श करूं देत नाहीं ती खड्गाला धर देईल कीं नाहीं? बधावी = भ्यावी

‘वधा राम, सौमित्रि, सुग्रीव, भक्षा,’। म्हणे राक्षसांतें, ‘निवा, राज्य रक्षा,।
उठा, दाव व्हा शत्रुच्या सैन्यकक्षा,! भिडा, जानकीचें जडो वक्ष वक्षा!’ ११३
न त्या ऐकवे दायकांच्या विलापा । न कंठ पुरीं राक्षसांच्या इळोपा[१] ।
मनाचा खचे सर्व थारा, मराया, । वधाया निघे सर्वथा रामराया ।।११४।।
करीं रावण क्रव्यभुक् सर्व गोळा । म्हणे ‘हूं,’ बना वीर हो! शत्रु घोळा’।
वदे त्यांसि सुग्रीव, ‘धूळींत लोळा; ।रणीं भग्न व्हा, दात खा, हात चोळों!’ ११५

—सुरामायण.

प्रभुसह खळ भांडे तो अहोरात्र सत, ।
त्रिदश, मुनिहि, झाले युद्ध पाहोनि तप्त ।
उडवि शत शिरें जों तोंचि आलीं नवीनें
बहु नवल कथावें काय हो! तें कवीनें? ।। ११६ ।।
प्रभु करि बहुचिंता, जो श्रितस्वांत शोधी[३]
‘रविहृदय’ जपाया तो अगस्त्यर्षि बोधी ।
दिनकर वर दे, या ईश्वरातें घडाया
विजय, अरि पडाया, कीर्ति विश्वीं जडाया ।। ११७ ।।
कुळकरमिहिराशी घे असी सारणातें
करुनि सुख सुरांतें दे असीमा रणातें ।
रघुपति वर बाण, ब्राह्म योजूनि सोडी
कठिणतर अरीचें वक्ष तत्काळ फोडी ।। ११८ ।।

—रामायणपीयूष.

अशेष सुर हर्षले, कुसुमराशितें वर्षले,
जयध्वनिहि माजले, अमित दुंदुभी वाजले ।
बहु प्रभुयशोरतें नटति अप्सरांचीं शतें
सुरर्षिसह पर्व तें, महित गाति गंधर्व ते ।। ११९ ।।
बिभीषण विभुप्रिया करि बरी दशास्यक्रिया

---

१ इला पृथ्वी, इलाप राजा. रावणाला लंकेंत कंठवेना, राहवेना. २ रावणाचा त्वेष व सुग्रीवाचें त्यावर अधीक त्वेषाचें उत्तर हीं चांगलीं साधलीं आहेत. ३ जो राम आश्रितांचें अंतःकरण शुद्ध करितो. ४ आपल्या कुळाचा जो मूळ पुरुष सूर्य त्याचे आशीर्वाद. ५रामास संमत अशी.

तया परिस हा अयों प्रभु, न गाति कां या अया ? ।'
अरीसहि महोदया अजित दे, न सोडी दया
म्हणे, ' करिन भव्यें या,' गति सुखें वरा अव्यया ॥ १२० ॥
बिभीषण वरासनीं बसविला; मग क्ष्मासुता
तया पुसुनि आणवी स्वदायिता त्रिलोकस्तुता ।
बिभीषण सभार्जना विनवि त्या रमाभाजना
नये, भरतकामना न पुरतां, प्रभूच्या मना ॥ १२१ ॥

—पृथ्वीरामायण.

यश मेळवी धवळ । जेंवी सुधेचा कवळ ।
शीघ्र आणवी जवळ । पुष्पका वहावया ॥
रक्षःकपीशांचा हेत । जाणुनी तयांचें चेत ।
हर्षवी सैन्यासमेत । त्या सख्यांतें घेउनी ॥
सदार सानुज राम । पुष्पकीं विश्वाभिराम ।
भक्तकल्पद्रुमाराम । बैसे स्तुती सेवुनी ॥
युद्ध वियोगचरित-। -सुधा कर्णांत भरित ।
जाय गुहेतें त्वरित । भान लया नेउनी ॥ १२२ ॥
श्रीचा पुरवाया काम । तारेतें आणवी राम ।
मुख्य स्त्रियांसह धाम । सोडुनी ती पातली ॥
श्रीतें सांगे शत्रुचूक-। सूर्य, " तो हा ऋष्यमूक ।
जेथें वियोगाची हूक । सुग्रीवमंत्रें शमे ॥
हें पंपा सरसी जाण । येथें तापले मत्प्राण !
त्वद्विश्लेषीं काम बाण । हाणी, काळसा गमे ॥
कांते ! हा मतंगाश्रम । येथें गेला माझा श्रम ।
शबरी उडवी भ्रम । चित्तींचा, मनोरमे ! ॥ १२३ ॥
या गोदेतें प्राणिपात । करीं, तीर्थ तीर्थव्रात ।
इच्या पोटीं म्हणे ' मात-। रव त्वं महादये ! ' ॥

१ त्या लोहास हा परिस २ कल्याण. ३ सीता. ४ अभ्यंगस्नानादिकांचा महोत्सव करण्याविषयीं. ५ आरोळी.

कुंभजाचा मनोरम । शरभंगाचा आश्रम ।
हा अत्रीचा जेथें श्रम । आमुचा न राहिला ॥
गंगेतें डोळे भरून । पहा नमन करून ।
संकटाब्धीतें तरून । आलीस इच्या बळें ! ॥
हें गुहाचें शृंगवेर । साकेत तें सीते ! हेर ।
नमस्कारीं वाटे येर । पूर यापुढें दुजें "॥ १२४ ॥

—वनाक्षरीरामायण.

रघुपति म्हणे 'हा तीर्थेंद्र प्रयाग, असा धुतो
दुरित; भजतां यातें होतोचि साधु असाधु तो ।
सतत यमुना गंगा संगा न सोडिति याचिया
म्हणति पतिता जीवां 'तारूं पळांतचि या चि या !'॥ १२५॥
उतरुनि भरद्वाजा वंदी, मुनींद्र गळां पडे
दशरथ तसा प्रेमें गोंजारुनि प्रभुला रडे ।
पवनतनया धाडी स्वामी गुहाभरताकडे
पर किति सुखी त्या योग्यांचें समाधिजही दडे ॥ १२६ ॥

—सच्छ्राव्यरामायण.

त्या प्रयागसत्पदीं मुनीस हर्ष दें, वसे;
विप्र तच्छिरीं करीति पुष्पवर्ष देवसे ।
भक्तवत्सळ स्वबंधुनिश्चयासि आठवी
सूचवावया स्ववृत्त मारुतीस पाठवी ॥ १२७ ॥
तो[२] वदे, " तुला विलोकितांचि सर्व पावलें
नाशितील बा ! तुझीं सुरद्रुगर्व पावलें ।
रामहंसमानसा ! रघूत्तमाळिसारसा !
सार साधिलें यश, [३] या करीं पसा रसा " ॥ १२८॥
श्री वसिष्ठ, वामदेव, मातृवर्ग, नागर,
स्वप्रधानसैन्ययुक्त शुद्धसत्वसागर ।

---

१ या रामभरतभेटीचा व अयोध्येंत परत जाण्याचा प्रसंग कवीनें फार प्रेमळपणानें वर्णिला आहे. २ मारुती भरतास म्हणतो. ३ बृहस्पति या भक्तिरसाला वांछितो.

मराठी ग्रंथ संग्रहाल
नं.........
ता.........

सानुज प्रभूत्तमासि जाय चिंतित क्षण,
प्रेक्षितां दिसे विमान भव्य पुण्यलक्षण ॥ १२९ ॥
होय पुष्पक त्यजूनि, दास तेंवि, पत्ति; तें
जन्ममृत्युच्या, स्वकाळ भासतें, विपत्तितें ।
वाटला विलोकित्यांस गाय वत्सल क्षण
श्रीनिवास, तोहि साधुराय वत्सलक्षण ॥ १३० ॥
लेववूनि पादुका, पदाब्जयुग्म पाहिलें[१]
साधुनें तयावरि स्वशीर्षराज्य वाहिलें ।
हुंगतां शिरीं दयासमुद्र अश्रु वर्षला
भेटला सुतासि तात तेंवि, राम हर्षला ॥ १३१ ॥
वृद्ध जे गुरु, प्रधान, ते सुखांत वातले,
पातले समस्त पौर दर्शनेंचि मातले ।
भेटले बिभीषण, प्लवंगराज, सज्जना
सानुजास, पावले सुधासमुद्रमज्जना ॥ १३२ ॥
वासवादि नंदनोत्थ पुष्पवर्ष वर्षले
देवगायक प्रभूसि गाति, फार हर्षले, ।
नाचल्या वराप्सरा, मृदंग वेणु वाजले,
दिव्य दुंदुभिध्वनीस मेघनाद लाजले ॥ १३३ ॥
—पंचचामररामायण.

अभिषेकमहोत्सव होय दया-
निधिचा, म्हणती कवि ' तोयद '[२] या ।
' अमरादिक जीव मयूर, मही
सरसी, सुख तें जळ, ताप अही ! ' ॥ १३४ ॥
प्रभुचें यश सेव्य सुधासरसें

---

१ पुढील तीन श्लोकांत वर्णिलेल्या क्रिया जितक्या जलद झाल्या, तितक्याच त्वरित कवीनें अनेक वाक्यांत तुटक क्रियापदं घालून अर्थ व वर्ण यांची अनुरूपता साधून वर्णिल्या आहेत. २ रामावर मेघाचे रूपक चांगलें साधलें आहे. राम हा मेघ. सारे देव मयूर, पृथ्वी हें सरोवर, जळ तें सुख, व अही तो ताप.

भुलवी अबुधास बुधास रसें ।
पशु पी रघुपाळकथा नरसा,
वरि सोडुनि बाळक थान रसा ! ॥ १३५ ॥
—हररमणीयरामायण.

सत्यप्रतिज्ञत्वयश प्रभुनें निज रक्षिलें ।
भक्षिलें वन्य, वेदोक्त गुरुक्त सम लक्षिलें ॥ १३६ ॥
भक्तकल्पद्रुमागमें रामें रंजविलें जग ।
एकादशसहस्राब्द पुर उद्धरिलें मग ॥ १३७ ॥
चरित्रीं विश्व रमलें, शमलें सर्व पातक ।
श्रीराम मेघ गमला, भक्त ते मोर चातक ॥ १३८ ॥
—मंत्रिरामायण.

धन्या पुरी अयोध्या, धन्या सर्व प्रजा, धरा धन्या ।
धन्या भास्करसंतति, रामकथा लाजवी कथा अन्या ॥ १३९ ॥
धन्य श्रीवाल्मीकि प्रभुचें यश जो अशेष गाय कवी ।
नायक विश्वाचा जो ऐक सादर, सभेसि आयकवी ॥ १४० ॥
—धन्यरामायण.

प्रजा सर्वांहि विमळा विमानामाजि वाहिल्या ।
नेल्या स्वलोका ताराया, कथा श्रोत्यांसि राहिल्या ! ॥ १४१ ॥
—सप्तमंत्ररामायण.

व्हावें कृतार्थ जनु, जावें लयासि अघ, यावें महागतिमना
घ्यावें विशुद्ध यश, मावे जगीं न तरि भावें दशास्यदमना
ध्यावें, स्वतत्त्व उमगावें, असेंचि शुचि, ठावें असें गुरुमुखें
'पावे प्रभो !' म्हणुनि नांवें सदा जपत गावें चरितचि सुखें१४२
—कविप्रियरामायण.

———

१ हा श्लोक फार गोड आहे. रामयश सुज्ञ अज्ञ सर्वांना प्रिय आहे रामकथामृत पशूही असोसीनें पितात, व बाळही मातृस्तन्य सोडून याच रसाला वरितात.

# उपसंहार.

भावें वंदुनि रामचंद्रचरणीं म्यां ग्रंथ हा वाहिला
कीं याचि प्रभुनें प्रसन्न जन जो तो बंधुसा पाहिला।
उच्छिष्टें बदरें महामखपुरोडाशाधिकें लक्षिलीं
ताराया शबरीस, साधु म्हणती, अत्यादरें भक्षिलीं ॥ १४३ ॥

सदा गावें सीतापतिरमण हा योग बरवा
रवा या साधी जो जन धरि पराची न परवा।
रवा नामाच्या भी भव, कलिकथा काय ? गमला।
मला न श्रेष्ठाही गुरु म्हणुनि देवर्षि रमला ॥ १४४ ॥

नामातें प्रभुच्या, मयूर विनवी, चित्ता भरी या भरीं
श्रीरामायण गायिलें तरि पुन्हां गावेंचि ऐसें करीं।
पापाचा परिहार फार बरवा व्यापार हा साधुनीं
गावा यासि सदैव या मम मुखीं बापा ! रहा साधुनीं ॥ १४५ ॥

—रम्यमंत्ररामायण.

'गावा भक्तमयूरमेव भगवान् श्रीरामसीतापती
याच्या भव्ययशें निवे मति, भवीं अत्यंत जी तापती'।
ऐसें सांगति साधु, येतहि असें गातां यश प्रत्यय
स्वामीच्या स्मृतिनें घडो कलियुगीं दुर्बुद्धिला अत्यय ॥ १४६ ॥

—पूतरामायण.

---

१ रामयशलुब्ध कवीनें म्हणून तरतें १०८ वेळां गायिलें. २ नाश.

# ७ विविधविषयपर कविता.

## ( १ ) द्रौपदीचें सत्व.

( दुर्योधनाच्या सांगण्यावरून दुर्वासऋषि पांडवांचें सत्व हरण करण्यासाठीं मध्यरात्रीं येऊन अन्न मागूं लागले पांडव भयातं झाले तेव्हां द्रौपदीनें श्रीकृष्णाचा धांवा केला. श्रीकृष्ण आले व थालीस लागलेलें एक भाजीचें पान होतें तें खाऊन ढेकर दिला, तेव्हां विश्वाची तृप्ति झाली. ऋषिही तृप्त झाला पण पांडवांच्या सत्वाला भिला व सज्जनांचा छळ पुढें न करण्याची त्यानें प्रतिज्ञा केली. धर्माला श्रीकृष्णानें धीर दिला व धर्मानें स्वभार्येचें फार फार गौरव केलें. )

शिष्यायुतयुत भगवान् दुर्वासा गजपुरासि ये राहे ।
सत्संगति सत्फळदा, सुज्ञासि पचे, पचे न येरा हे ! ॥ १ ॥
प्रार्थुनि धर्मे मुनि तो स्नानासि सशिष्यकटक पाठविला ।
त्या संकटीं सतीनें श्रितकल्पद्रुम मुकुंद आठविला ॥ २ ॥
स्वमनिं म्हणे ती कृष्णा " श्रीकृष्णा ! धांव, पात्र नाश तदा ।
हीचा होवूं न दिला, स्मरतें मज तेंचि पावना ! शतदा ॥ ३ ॥
नेसविता झालासि प्रेमें तूं करुनियां दया लुगडीं ।
आतां चुडे भरीं बा, आश्रय मज एक तूं दयालु गडी ॥ ४ ॥
तुजहुनि इतरें कोणें वारावा क्षिप्र अंतराय महा ।
दंडीलचि, साहेल न, देवा ! स्वल्पाहि अंतरा यम हा ॥ ५ ॥
या मुनिकोपासि जसा लागं न पयाचिया उता वेळ ।
श्रीकृष्णजी ! तुह्मीं मजवरि करुनि दयाचि या उतावेळ " ॥ ६ ॥
स्मरतांचि ये प्रभु; दया सत्य सुरभि, भक्तवत्स लागावें ।
कासेसि याचियाचि, त्यजुनि सकळ, याचि वत्सला गावें ॥ ७ ॥

---

१ दहा हजार शिष्यांसह. २ वस्त्रहरणप्रसंगीं. ३ विघ्न. ४ थोडाही विलंब हा यमस्वरूप क्षानें सहन करणार नाहीं. ५ स्त्रियांना दुधाचा दृष्टांत सुचणें किती स्वाभाविक आहे !

येतांचि दीनबंधुप्रति कळवी ती नमुनि ओवींतें ।
भगवान् म्हणे " भुकेलों सखि ! वाढ मला, असोचि आधीं तें " ॥८॥

कृष्णा म्हणे, " अहा ! बा ! वाढावें काय ? गा ! पहा हातें ।
क्षाळूनि घातलेंसे आतां कीं पालथें अहाहा ! तें ॥ ९ ॥

अन्न मदशनावधि रविदत्तस्थालींत, मग नसे लवही ।
त्वद्दृष्टि सर्व जाणे, यमधर्माची असी नसेल वही ! " ॥ १० ॥

'आण बरें पाहोंदे ' ऐसा आग्रह करूनि आणविली ।
कृष्णेसि सत्सभेसि स्थालीसहि बहु दयाचि जाणविली ॥ ११ ॥

त्या पात्राच्या कंठीं स्वल्पचि शाकान्न लागलें होतें ।
सत्परिचयचि जडही समयीं सत्वासि जागलें हो तें ! ॥ १२ ॥

तो यज्ञ–भुक् तशाही त्या शाकान्नासि वोढवी पाणी ।
कृष्णेकरवीं आपण सांगुनि संकल्प सोडवी पाणी ॥ १३ ॥

प्राशुनि म्हणे प्रकट हरि ' विश्वात्मा देव तुष्ट हो येणें ।
हळुचि म्हणे ' मुनि किति हे ? वेतुनि शतकोटि तुष्ट हो ! येणें ' ॥१४॥

अघमर्षणींच तो मुनि झाला आकंठ तृप्त सहसा, जे ।
शिष्य अयुतामित होते गर्भिण्यांपरि तयांहि सह साजे ! ॥ १५ ॥

हरिला स्वजन प्राणाधिक, तैसें वित्तही न लोभ्याला ।
चिंतूनि अंबरीषच्छळपरिणामहि मुनींद्र तो भ्याला ॥ १६ ॥

ते शिष्य म्हणति " गुरुजी ! न सुचे कर्तव्य काय तें कळवा । "
गुरु त्यांसि म्हणे " मळवा यश, परि सत्वर पळा, मला पळवा! ॥१७॥

झालीं गुरूदर जशा अत्यासन्नप्रसूति गरवारी ।
सच्छळकर्म स्वल्पहि सद्य:क्षयहेतु जेंवि गरवारी ॥ १८ ॥

---

१ चिंततें. २ थालीपात्र. ३ माझें भोजन होईपर्यंतच. ४ द्रौपदीला आनंद झाला कारण तिची चिंता हरिली, सज्जनांना आनंद झाला कारण सतींचें विघ्न टळलें, व थालीला आनंद झाला कारण परमात्म्याचा स्पर्श तिला झाला. ५ हात पुढें करी. ६ 'श्रीपरमेश्वरः प्रीयताम्' हा. ७ पापनाशक मंत्र जपतांच. ८ गर्भिणीसारखें, पोट भरल्यामुळें वर आलेले. ९ प्रसूति जवळ आलेल्या गर्भार स्त्रियांप्रमाणें. १० विषयुक्त जळ.

त्या श्रीमदंबरीषाहुनि धर्म तपोबळें नसे ऊन ।
हा मी मंदचि केवळ सच्छळगरळा जळेन सेऊन ॥ १९ ॥
त्या पांडुसुतांमध्यें भीम महात्मा उदार बळ-सत्वें ।
चारील मुष्टिमोदक, आतिथ्यासि न चुकेल अळसत्वें ! " ॥ २० ॥
ऐसें म्हणताचि पळतां प्रबळ भयाचि होय बळद दुर्वास्या ।
धांवे लंबोदरसा तो, गळत्या तज्जटाहि दूर्वास्या ! ॥ २१ ॥
झाला होता सानुज तो राजा धर्म चित्रसा साधी ।
सुयश, निशीथीं भेटुनि भक्तां पद्मांशि मित्रसा, साधी ॥ २२ ॥
देव म्हणे " मी आलों कृष्णेपाशीं सर्वांचि, मज्जन हो ! ।
चिंतितसें कीं स्वप्नव्यसनींहि क्षण तुह्मां न मज्जन हो ॥ २३ ॥
कृष्णाचिंतनें हें संकट मज कळविलें अगा राया ! ।
आलों संरक्षाया धांवत मी आपल्या अगारा या ॥ २४ ॥
अनेक-समीहित साधी राया ! वारा महीवरा ! कामा ।
अनळस मींहि तसा, धीरा ! यावा रामही, वरा कां मा ? " ॥२५॥
ऐसें बोलोनि करी स्वजनघनश्रीद यांन दीपकसा ।
भक्तांसि उपेक्षील व्यसनीं तो श्रीदयानदीप कसा ? ॥ २६ ॥
धर्म म्हणे " मतिमति ! सति ! संसारामाजि अन्य कुणगां तो ।
केवळ अनिष्ट, परि हा बहु धन्य तुझा म्हणोनि गुण गातों ॥ २७॥
तुजविण न दीपिके ! सति ! कृष्णे ! तरतों नयज्ञहि तमातें ।
करितों जरि तरि गमता कृष्णेतर तो न यज्ञ हित मातें ॥ २८ ॥
देव तुझा कैवारी शुद्ध प्रेमें तुझ्याचि वळला गे ।

१ सचिंत २ रात्रीं. ३ या प्रसिद्ध आर्येचा अर्थ 'हे गंभीर पृथ्वीपते ! धर्मा ! वारा जसा अग्नीचें इच्छित साधून देतो, तसें तुझें साह्य करण्यास मीहि सदैव तत्पर आहें. प्रसंग पडला तर बळिराम दादाही येतील मग आह्मी आल्यावर लक्ष्मीही येईल, ती कोण मोठी आहे !" ४ गमन. ५ स्त्रिया पुरुषमंडळीला न कळवितां गुप्त द्रव्यसंग्रह करितात तो; सांठा. धर्म म्हणतो ' द्रौपदि ! संसारांत बायका कुणगा करितात तो अनर्थावह असतो. पण तूं आह्मांस न कळत श्रीकृष्णप्रेमाचा जो कुणगा केलास तो मात्र धन्य आहे. ६ कृष्णभक्तिरूप जो यज्ञ त्याहून इतर यज्ञ.

दे धेनु दुग्ध धांवुनि वत्सा, इतरा तदर्थ वळ लागे " ॥ २९ ॥

— वनपर्व अ. ८

---

## ( ४ ) श्रीकृष्णाचा रुक्मिणीशीं विनोद.

मोटा विनोद भीष्मककन्येसी एकदां करी; तीतें ।
देव म्हणे, " सुदति ! वृथा वरिलें मातें अलोकरीतीतें ! ॥ १ ॥
भर्ता, योग्य, कुलज, नृप, न वरुनि, मजला वरुनि चुकलीस ।
राजसुते ! चित्रेंन लिनरतमधुपासी, हितास मुकलीस ! " ॥ २ ॥
म्हणे विभु " नृपात्मजे ! गुणवती असी तूं बरी
नसे उचित मी पती ! गति मतिभ्रमें ही खरी ।
सुरूप अनुरूप तूं सुमुखि ! भूप आतां तरी
वरीं ! हित चुके जरी कुशळ तें पुन्हां सांवरी ! ! " ॥ ३ ॥
वचन नव अति अप्रिय कानीं पडतां रडे पडेचि सती ।
उचली करुणार्णव कीं दीनाहुनि दीन जाहली दिसता ॥ ४ ॥
तेल जसें उत्तेजन देतें तत्काळ दीपकलिकेला ।
प्रभुचें कृपावलोकन तेंवि तिला; तो हितार्थ कळि केला ॥ ५ ॥
नेली शीघ्र चतुर्भुजे प्रियतमा आंगें पलंगावरी
हस्तें तल्कचभारहारवसनं स्वाधार तो आवरी ।
शोकाश्रुक्षित गल्लोचनकुचद्वंद्वें पुसी हा, बरी
स्वस्था होय, तसा दयाचि करि कीं झाली सती बावरी ॥ ६ ॥
वैदर्भीस म्हणे प्रियवद " अहा ! मच्छब्द जे हे तुतें
झाले तापकर प्रतप्तशरसे मूर्च्छेसही हेतु ते ।
कांहींही मृदुमानसे ! तव मनें नाहींच कीं साहिलें !
म्यां केला परिहास हा सति ! कसी तूं कोपसी पाहिलें ! ! ॥ ७ ॥

---

१ विलक्षण रीति वर्तनपद्धति आहे ज्याची त्याशास ! २ चित्रांतल्या कमळासीं रत झालेल्या भ्रमरीसारखी. ३ ही अवस्था तुझ्या बुद्धीला भ्रम पडल्यामुळें प्राप्त झाली. ४ चतुर मनुष्य चूक झाल्यावर सांवरून घेतो ५ भक्तांचा आधार. ६ शोकाश्रूनीं भिजलेले ( गाल, नेत्र व कुच ).

कसें वदसि, पाहसी, चलकटाक्षमोक्षेक्षण
प्रिये ! भ्रुकुटिशोभि हें मुख तुझें पहावें क्षण ।
कसें अधरपल्लवस्फुरण ? लोचनीं शोणता ?
गृही जन तयास यापरिस लाभ तो कोणता ? ॥ ८ ॥
विनोदरससागरीं रमति मीनसे दंपती,
अशा कलहसांत्वनीं दिवसयामिनी संपती ! ।
म्हणोनि परिहास हा सहज अजि केला, लसें
तुझें न मुख, भीतिला न धरि नायिके ! लालसे !" ॥ ९ ॥
वैदर्भी त्यागभीति त्यजि, पति पहिले बोलिला जे स्वदोष
स्वांतीं होतेचि, त्यांचीं कथुनि समुचितें उत्तरें दे सुतोष ।
ते कृष्णें बोलवीलि प्रियगुण मुरली गोड अत्यंत बोले
श्रोत्यांचें वृंद वृंदावन, हरिहि तयामाजि अद्यापि डोले ॥ १० ॥

## ( ३ ) लक्ष्मीचें स्वयंवर अथवा पतिशोध.

( लक्ष्मीला आत्मगुणयोग्य पति पाहिजे होता. म्हणून तिनें सिद्ध, मुनि, देव, दानव या सर्वांत शोध केला, पण तप व वेदाध्ययन करणाऱ्या बहुतेक पुरुषांत तिला दोष आढळल्यामुळें तिला कोणताच वर पटेना. दुर्वास तपस्वी पण कोपिष्ट म्हणून; शुक ज्ञानी पण संगविवर्जित नाहीं म्हणून; ब्रह्मदेव व चंद्र मोठे पण कामांध म्हणून इंद्र समर्थ पण परापेक्ष म्हणून, परशुराम धर्मज्ञ पण निर्दय म्हणून; कार्तवीर्य पराक्रमी पण शांत नव्हे म्हणून; सनक विषयपराङ्मुख म्हणून; मार्कंडेय दीर्घायु पण इंद्रियमारक म्हणून; कनककशिपु गुणवान् पण साधुद्वेष्टा म्हणून, शंकर या सर्वांहून श्रेष्ठ पण अमंगळ व भयासुर म्हणून,–याप्रमाणें प्रत्येकांत तिनें कांहीं खोडी काढली ! अखेर या पूर्वोक्त दोषांपासून मुक्त व सर्वगुणसंपन्न अशा भगवान् विष्णूच्याच गळ्यां लक्ष्मीनें माळ घातली. )

श्रीदेवी मग चाले उत्पलमाला सलील धरुनि करीं ।
शोभे सुरासुरगणीं मूर्त मधुश्रीच जेंवि तरुनिकरीं ॥ १ ॥
गंधर्वयक्षचारणसिद्धसुरासुरगणांत ती पाहे ।
कीं आपणासि आश्रय कोण ध्रुव अतुलशुद्धगुण आहे ॥ २ ॥

---

१ रागानें लाल होऊन चंचलपणें डोळे मुरडणें. २ वक्र भुवयांनीं शोभणारें ३ लालपणा, रक्तिमा ४ शोभे. ५ लाडके ! मजला भुलविणारणी. ६ कमळांची माल. ७ वसंताची शोभा. ८ निश्चल व विमलगुणी.

जेथें जेथें सुतपश्रुतइत्यादी ज्यगुण जना दिसती ।
तेथें तेथें पाहे बहुधा दोषांसि ती अनादि सती ! ॥ ३ ॥
" कोठें शुद्ध तप असे, परि दारुण नाशहेतु कोप महा ।
दुर्वास:प्रभृति तपोधन सुभुजंगमणिकरंडकोपम हा ॥ ४ ॥
कोठें सुरगुरुशुक्रप्रभृतींत ज्ञान बहु असे, परि तें ।
संगविवर्जित नाहीं, परिपूर्ण हि दूषितांबु पात्र रितें ! ॥ ५ ॥
आहे महत्त्व बहु परि न द्रुहिणीं चित्तभूजय, न सोमीं ।
भलता वर वरुनि, म्हणे कवि, सुवर जरि नसे तरि नसो, मीं ! ६
जरि ईश्वरत्व दिसतें शक्रप्रभृतींत तरि न तें साचें ।
होय परापेक्ष कसा ईश्वर ! निववी न पान फेंसाचें ॥ ७ ॥
जरि धर्म परशुरामप्रभृतींत असे, नसेंचि भूतदया ।
निजभर हरिला म्हणवुनि चिंतू कल्याण एकें भू तदया ॥ ८ ॥
कोठें वीर्य असे परि तें परिहरिलें न काळवेगानें ! ।
पित्त कृतवीर्यसुतमुखवीर्यकथांच्याचि चाळवे गानें ॥ ९ ॥
सनकादि समाधिनिरत, विषयांचे त्यापुढें कसें मांडे ? ।
पीतामृतासि कैसें वश करितिल आपुल्या रसें मांडे ? ॥ १० ॥
मार्कंडेयादि असे दीर्घायु, परतु तें नसो शील ।
सोशील सर्वहि स्त्री, परि इंद्रियदमन हें न सोशील ॥ ११ ॥
जेथें इंद्रियलालन तेथें क्षण भरंवसा न आयूचा ।
काळाचा वेग जना दुःसह, अभ्रासि जेवि वायूचा ॥ १२ ॥
कनककशिपुप्रभृतिला करिता झाला क्षणांत गट काळ ।
सुगुणहि साधुद्वेष्टा तो केवळ दोषसिंधु फटकाळ ॥ १३ ॥
इंद्रियदमनहि नाहीं, आयुष्याचाहि भरंवसा आहे ।

---

१ सर्पाच्या मस्तकांतल्या मण्याच्या करंड्यासारखा, किंवा महासर्प ज्यांत आहे अशा मणिकरंडकासारखा. २ ब्रह्मदेव स्वकन्या सरस्वती हिच्यावर व चंद्र गुरुपत्नी तारा हिच्यावर लुब्ध होता. ३ इंद्राला शत्रु जिंकायला अप्सरांचें किंवा देवांचें साह्य लागतें तेव्हां त्या परावलंबी देवाला ईश्वर कसें म्हणावें? ४ शत्रुनिर्दळणानें आपलें ओझें कमी झालें म्हणून एक पृथ्वी मात्र तदया ( त्याच्या दयेसाठीं ) त्याचें कल्याण चिंतो. ५ पित्त चाळवे = चित्तक्षोभ होतो.

श्रत पूर्वोक्त न दोष श्रीरुद्रीं म्हणुनि आम्हां वाहे । १४ ॥
परि तोहि अमंगळसा मसणीं भूतांत नग्न कां नांदे ? ।
बाळांच्या भस्मभुजंगभूषण हें नाम भीति कानां दे ! " ॥ १५॥
ऐसा विचार करितां श्री श्रीपुरुषोत्तमासि पाहूनी ।
चित्तीं म्हणे " सुमंगळ वर हाचि, न अन्य धन्य याहूनी ॥१६॥
जरि हा आत्मरत प्रभु, याला माझी नसे तिळहि परवा ।
पर वाहेन वपु पदीं, ऐसा कैंचा मिळेल वर बरवा ? ॥ १७ ॥
जावें शरण प्रभुतें, जसि गेली सुरनदी नदीनातें ।
शोभे, महत्तमातें आश्रय करितां, न दीन दीनातें " ॥ १८ ॥
यद्यपि आत्मरत प्रभु हरि तरि वारिला, परासि न वरी हो ।
कंठीं घालुनि माळा झाली श्री विष्णुचीच नवरी हो ! ॥ १९ ॥

—अमृतमथन. अ. २

## ( ४ ) कुलीन सासरा ( सुनेचें गौरव. )

( रावणवधानंतर लोकनिंदेकडे लक्ष देऊन रामानें सीतेकरवीं अग्निप्रवेशाचें दिव्य करविलें, तेव्हां दशरथ विमानांत बसून आले व त्यांनीं आपल्या सुनेचा गौरव केला तो प्रकार सीता स्वमुखानें आपल्या बहिणींस सांगते.

संसारीं असतात साधु, कुलज, स्नेहाढ्य, कैं सासरे;
मामाजी परि एक, यासह दुजा साम्यास कैसा सरे ?
पोटासी धरिलें सये ! मज शिरीं हुंगोनियां दाटले,
प्रेमें ताताचि वाटले, नयनिंच नाहीं झरे आटले ॥ १ ॥
मातें ते वदले, " तुवां उपवनें तैसींच वत्से ! वनें
केलीं; जें पतिभक्तिसद्व्रत सतीसर्वस्व, तत्सेवनें ।
भर्ता तारुनि संकटीं कविसभाश्रीसंपदे ! वारिला
विश्वोपद्रव, जाहला तव तपें या कंप द्वेवारिला ॥ २ ॥
त्वां सूर्यवंश सुयश सति ! धन्य केला

---

१ भस्म लावणारा व सर्पमाळा घालणारा म्हणून या चें नांव ऐकूनच मुलें भितात. हा पति केला तर याच्याबरोबर संसार सुखाचा होणार नाहीं हा लक्ष्मीचा भाव. २ नदींचा पति, समुद्र. त्याला

वैदेह धन्य तुज पावुनि कन्यकेला " ।
प्रेमें असा मज दिला बहु मान, लज्जा
सांगे मदीय नयनांसि, 'पदींच मज्जा ' ॥ ३ ॥

—सीतारासायण.

---

## ( ५ ) सीतात्याग.

ऐसें ऐकोनियां राम चिंतला मानसीं घरीं ।
लोकापवादावित्रस्त विचारातें मनीं करी ॥ १ ॥
" जाली वन्हिमुखीं शुद्धी तथापि जन निंदिती ।
टाकावी कीं न टाकावी हे शुद्धचरिता सती ? ॥२॥
कैशी हे त्यागावी सद्वृत्ता साधुसंमता प्रमदा ? ।
श्रोत्रीयमुखें जेशी त्याज्या स्वाचारपद्धती न कदा ॥ ३ ॥
त्यागीन अवश्य इला विप्र जसे कळियुगीं निजश्रुतिला "
ऐसें हृदयीं चिंती वारंवार स्मरोनि साश्रु तिला ॥ ४ ॥
जलजलसद्रम्यमुखी नव नवनीतापरीस मृदुला हे ।
शिव ! शिव ! मजविण भीरु न वनवसतीदुःखभोगणें लाहे ५
श्रुतीतें निंदितो जैसा पाखंडी पापभाजन ।
रक्षोगृहीता यासाठीं मैथिलीतें तसा जन ॥ ६ ॥
योगी जैसा त्यजितो संसारभयास्तव स्वमसतेला ।
अपवादभयास्तव मी कीर्तिप्रतिपालनार्थ सीतेला " ॥ ७ ॥
पुसूनियां शोकपाणी पाणी जोडुनियां नयें ।
रामापुढें दीनवाणी वाणी भरत हे स्वयें ॥ ८ ॥
" अंत्यजसदनापासुनि पूर्वी जे आणिली बळें गाय ।
संसर्गपातकास्तव पुनरपि ते धेनु टाकिजे काय ? ॥ ९ ॥
शुद्धि दिली वन्हिमुखीं प्रविशवुनीयां विशंक निजकाय ।
त्या दिव्याचें रामा ! स्मरण नसे सांग आज तुज काय ' ?१०

---

१ कमलासारखें सुंदर मुख आहे जिचें अशी. २ राक्षस रावण यानें हरण केली म्हणून. ३ हे ( सीता ) वाणी ( स्तवी ). ३ परटानें केलेल्या निंदेमुळें

' जाला ज्या मानवाला मरणद वनितापुत्रवित्तादिशोक ।
त्याला नाहीं च कांहीं बुधजन ह्मणती पुण्यलभ्योच्चलोक ।
सीता हे सून माझी सुविमळचरिता यामुळें देवलोकीं ।
रे वत्सा ! वर्ततों मीं प्रमुदित मजला ऊर्ध्वनेत्रें विलोकी '११
एवं सदैव गगनीं विमानगत तात बोलिला वदनें ।
त्याचें स्मरण करावें रामा ! त्वां ज्ञानिलोकहृत्सदनें ॥ १२ ॥
स्मरण करी पूर्वी जें वदला व्योमस्थ देवसंघात ।
करुणाब्धे ! सीतेसह न करावा आत्मकीर्तिचा घात "॥१३॥
एवं वदोनि भरतें केलें रामासि वंदन ।
जाला अश्रुजलभ्रष्टहृदयालिप्तचंदनें ॥ १४ ॥
सौमित्रि क्रोधतप्ता क्षितिपतिसि ह्मणे " प्रार्थना ऐक रामा ! ।
मिथ्या लोकापवादें करुनि विकलुषा त्वां त्यजावी न रामा ।
म्लेंच्छांहीं निंदिजेते श्रुति म्हणवुनियां काय ते विप्रलोकीं ।
टाकावी हें विचारें करुनि बुधपते ! शास्त्रनेत्रें विलोकी ॥१५॥
सांग मला हें सत्य तूं दोषज्ञांचा राय ।
स्त्रीकलहास्तव पंडितें माय त्यजावी काय ? " ॥ १६ ॥
" अपवादभयास्तव मी स्वतनूतें ही तुम्हांसि हे देखा ।
त्यागिन सहसा, मग या सीतेचा कायसा असे लेखा ! ! " ॥१७॥
—कुशलवचरित अ. ४.

## ( ६ ) सूड कां क्षमा ?

द्वैतवनीं द्रुपदसुता पतिला होवूनि तप्ततनु गांजी ।
वदली लेशहि न कधीं श्रुतिकटु अपराधियांहि अनुगां जी ॥ १ ॥
" द्यूत महाव्यसन असें नायकिलें काय ? नरवरा ! कानीं ? ।
सर्वस्व हरुनि सहसा केलासि अरण्यचर वैराकांनीं ! ॥ २ ॥
व्यसनप्रसंग तुजही तेजस्विवरासि, अंक हा रविला ।

---

१ ज्ञान्यांच्या हृदयाचें सदन ( राम. २ अश्रुप्रवाहानें ज्याच्या उरास लागलेलें चंदन पुसून गेलें आहे असा. ३ पंडित. ४ जी द्रौपदी सेवकालाही कधीं कठोर बोलली नाहीं ती संतापानें धर्मराजाला म्हणाली ६ क्षुद्रकौरवांनीं.

झालासि दीन, वाटे द्यूतीं तोही प्रताप हारविला ! ॥ ३ ॥"
सर्वत्र क्रोध जसा तैसी सर्वत्र न क्षमा साजे
ते कैसे न वधावे तोडिति परघातदक्ष मांसा जे ? ॥ ४ ॥
येऊं द्या कोप मनीं, एकिकडे संप्रति क्षमा राहो ।
कां गोष्पदांत बुडतां ? यश रक्षा, खळ विपक्ष मारा हो ॥ ५ ॥
क्रोध असावा समर्यी, केवळ वश चित्त न क्षमेला हो ।
कोप त्यजितां जरि जमदग्नि धनुर्वेददक्ष मेला हो ! " ॥ ६ ॥
धर्म म्हणे " मतिमति सति ! यतिपतिगति अति समर्थ जो हरि तो।
म्हणतो ' क्षमाचि बरवी ' पर-वीर-यशें स्वसद्गुणें हरितो ॥ ७ ॥
व्याघ्र व्याळ क्रूर, क्रूरतर क्रोध,बोधरोधक हा ।
क्रोधवशासि विलोकुनि बहु म्हणति स्वहित-तत्व-शोधक हा!"॥८॥
वरिली सुयोधनें ती ज्यांही भावुक-पद क्षमा; तींत ।
रत जे हिला न सेविति, दवडिति हित ते अदक्ष मातींत ॥ ९ ॥
त्यजुनि तिला बहु तरले, एकहि न हिला त्यजूनि तरला गे ! ।
कृष्णे ! क्षमासुधारसरसिकां रस गोड कां इतर लागे ? ॥ १० ॥
श्रित-हित करिती, हरिती सर्व-व्यसन क्षमा-भवानी हो ।
आराधावी आम्हीं खल-महिषाऽपहृतवैभवांनीं हो " ॥ ११ ॥
भीम म्हणे " देवा ! त्वां जन्मापासूनि सेविला धर्म ।
त्याचें हें फळ ! नाहीं धन, मान, स्थान, यश, नसे शर्म ॥१२॥
ज्यांसीं जैसें त्यांसीं तैसे जरि वर्ततासि तरि अरि ते ।
हरिते कां सर्वस्व ? व्यसनीं आम्हांसि मग्न कां करिते ? ॥१३॥
न क्षत्रिय तूं ! साधु ब्राह्मण आम्नाय पढविता पढता ! ।
मान-धन क्षत्रिय या व्यसनें, ज्वलनें कैटाहसा कढता ! ॥ १४ ॥
राँज्योपद्रव गेला, झाला अभिलषित लाभ अजिनाचा ! ।

---

१ शत्रु. २ ज्ञाननाशक. ३ कल्याणाचें स्थान. ४ दुर्योधनें ती क्षमा (पृथ्वी) वरिली ज्यां ही ( सहनशीलता ) सेविली. क्षमा शब्द येथें श्लिष्ट. ५ खल दुर्योधन हाच कोणी-महिषासुर यानें ज्या आमचें वैभव हरण केलें आहे त्या आम्हीं क्षमादेवी आराधावी हें योग्य आहे. ६ कढई. ७ भीम टोंचून ह्मणतो ' राज्याचा त्रास गेला ! इच्छेसरसीं वल्कलें मिळालीं ! या महोत्सवीं स्वस्थ कां ? आनंदानें वस्त्रें उडवून नाचा !'

परमोत्सवीं उगे कां ? अजि गा ! उडवा स्वचल्क, अजि नाचा! १५
काय म्हणों तुज आर्या! ब्राह्मणवृत्तीस काय अनुसरसी ? ।
त्यजुनि जळधि वपति कसा तिमिंगिळें सेविजेल तनु-सरसी।। १६।।
श्रेयस्कर स्वधर्म त्यागुनि धावी न विप्रता पदरीं ।
नकरीं यशोऽर्थ, बुडवा न कधीं स्वत्समकवि प्रताप दरीं ।।१७।।
हे आर्या ! हे भार्या, हे आम्हां, योग्य काय वनवासा ? ।
वल्काऽजिन-धर वससी स्वस्थ कसा या वनांत न नवासा ? १८
देतील राज्य न सुखें, धरिजे कितवोक्तिचा न विश्वास ।
काळाचाहि भरंवसा नाहीं जो नित्य खाय विश्वास ॥ १९ ॥
द्वादश वर्षें गहनीं, दुसरें अज्ञात वर्ष तेरावें ।
लोटावें कवि वेरें ! दूर विचारें करून हेरावें ! ॥ २० ॥
रवि-वरि अभ्रें तैसीं वस्त्रें तव विग्रहाउपरि मळकीं ।।
गुप्ताहि मृगमदातें प्रकट करितसे स्वयें सुपरिमळ कीं ।। २१ ॥
सांडील कसा तीतें, जी देती नित्य लाभ नव धरणी ? ।।
वध्याचि खळ, धर्मचि हा, चोराचा दोषहेतु न वध रणीं ।। २२॥
भणगापरि न वस वनीं, म्हण गा ! बापा ! मनुष्य-देवा ! 'हूं' ।
दे बाहूंस यश रणीं खळखळ खळरक्तपूर दे वाहू " ।। २३ ।।
धर्म म्हणे " भीमा ! बा ! दुर्व्यसनीं मीच हेतु तापा तें ।
दुःखी साश्रितहि बुडे करितो जो मीलिताऽक्ष पापातें ॥ २४ ॥
तेव्हांचि क्षण निष्ठुर होवुनि हे मूर्तिमंत पाप कर ।
त्यां जरि केले असते भस्म, न होते तुम्हांसि ताप-कर ! ।।२५॥
द्यूताला युद्धाला जावेंचि बलाविल्या, प्रतिज्ञा ती ।
रक्षूं जातां, कपटें हारिता झाला पदाप्रति ज्ञाती ।। २६ ।।
पूज्या मर्यादा, परि भ्याला कांहींहि न शकुनी तीतें ।।
तो नावेरचि घातक दुर्जन जो होय यश कुनीतीनें ।। २७ ।।

---

१तिमिंगलनामक मोठा मासा आहे.तो महासागर सोडून अल्पसरोवराचा आश्रय करील काय ? तनु—लहान. २ पुष्कळ दिवस वनांत राहण्याची सवय झालेल्या मनुष्यासारखा. ३शरीरावर. ४डोळे मिटून पाप करणारा पुरुष संसर्गी पुरुषासह दुःख भोगतो. ४ पापी.

प्राणांस तुह्मांसहि मी त्यजिन न धर्मासि पळहि सोडीन ॥
हें व्रत धर्मचि रक्षूं, बापा ! न कदापि अयश जोडीन ॥ २८ ॥
बा ! गा ! धर्माच्या ता कोण्हीं सोडूं नयेचि काळेतें ॥
निष्फळ होतीं सर्वें त्यजिती आळींहि जिविका सेतें ॥ २९ ॥
निज-हित कर-धर्माचें कुशळें विटवूं नयेचि मन कांहीं ॥
याभरि पोषणलाळनलालन करिज न अन्यजन कांहीं ॥ ३० ॥
अंभोदास पहाती जैशी पसरूनि नित्य आ शेतें ॥
धर्मासि तशीं भूतें; करि पूर्ण समर्थ हाचि आशेतें ॥ ३१ ॥
साधु म्हणति जो न करी धर्मासीं नीतिसीं विरोधा, त्या ॥
रक्षीं व्यसनीं; तदितर जन उदकीं लोष्ठसा विरोधात्या ! ' ३२
म्हणवूनि अनुसरावें सुज्ञें न क्रोधलोभकाममता ॥
पतनार्थ कां अहंता पोषावी, गा ! तशीच को ममता ॥ ३३ ॥
तुमचे प्रताप जे जे दिग्विजयीं प्रगटले न ते लटिके ॥
कुरु[3]-गुरुपुढें परि न गुरु, यज्ञांत घृतापुढें न तेल टिके ॥ ३४ ॥
आम्ही नियम त्यजितां न चुकेल नदीजही[4] उगाराया ॥
त्या सर्वज्ञ प्रभुला बा ! कोण ह्मणेल ' गा ! उगा राया ' ॥ ३५ ॥
यांसीं कलि करणें हें न म्हणेल कधीं सुधी नःविहित रे ॥
धर्म-न्याय त्यजितां तेजस्वीही तमीं न रविहि तरे !! ॥ ३६ ॥

—वनपर्व अध्याय २.

---

## ( ७ ) कर्णाचा थोरपणा.

( श्रीकृष्ण कर्णास पांडवाकडे वळविण्यास गेले तेव्हां झालेला कृष्णकर्णसंवाद. )

श्रीकृष्ण म्हणे " कर्णा ! तूं कुंतीचा कुमार कानीन[5] ।
त्वद्दैनात्य[6] न पडला आर्यजनाच्या कधींहि कानीं ' न ' ॥१॥

---

१ शेतें जीविका आलीं ह्मणजे पिकास आलीं. २ खोटा अहंकार. ३ द्रोणाचार्य. ४ गंगापुत्र भीष्म. ५ कानीन पुत्र म्हणजे कन्यकेला कुमारावस्थेंत झालेला पुत्र. ६ तुझ्या तोंडातून निघालेला ' न ' कार याचकांच्या कधीं कानीं पडला नाहीं.

ऐसा वदान्य विद्वान् विश्रुत तूं शुद्धविप्रजनदास ।
चाल, भजोत भ्राते तुज, चातक भजति जेंवि वनदासें ॥ २ ॥
साऽनुजसुत धर्म तुला नमिल, सयादव करीन मी नमन ।
सच्चित्त गुर्वनादर, तोयानादर करी न मीनमन ॥ ३ ॥
राज्याभिषेक करितिल तुज मजसह विप्र भूमिप देरानें ।
किंबहुना घेइल तव तांबूळ क्षिप्र भूमि पदारानें ॥ ४ ॥
चाल कसा, हो राजा, मातेच्या मानसासि दे सुख गा ! ।
यांचा तुज काकांचा सहवास, जसा सितच्छदा सुखँगा " ॥ ५ ॥
कर्ण म्हणे " बा देवा ! वदसि स्नेहेंचि बा दयाळो ! हें ।
भट-कँर गें जोडावी स्पर्शमणीची कसी दया लोहें ? ॥ ६ ॥"
मातृत्यक्ता मजला राधाहस्तीं दिलें अधिरथानें ।
मज पाजाया प्रेमें पय, पळ धारतां तिची न थिर थानें ॥ ७ ॥
दुर्योधन नांवाचा, राजा मी, सर्वराज्यभोग मला ।
मूर्त नरक, नरकविच्या हृदयाला, जो कृतघ्न, तो गमला ॥ ८ ॥
संस्कार विवाहाऽवधि केले माझे यथोक्त सूतानें ।
निर्मळपणें निघावें रक्तपटांतूनि केविं सूतानें ! ॥ ९ ॥
श्रीकृष्णजी ! करावा कैसा विश्वासघात अवसांनीं ।
युद्ध कसें न करावें ? आम्हां हा युद्धलाभ नवसांनीं ! ॥ १० ॥
तरि मग उरले काय प्रभुजी ! त्यजिल्या जरि प्रशिज्ञा त्या ? ।
नच सोडवेल देवुनि धीर भरंवसा अरिप्रति ज्ञात्या ॥ ११ ॥
राज्य न करील, देइल धर्म मला, उमजतांचि हें नातें ।
देइन सुयोधना मां ! तेव्हां होइल तुम्हांसि हें ना तें ! ! ॥ १२ ॥
धारातीर्थींच मिळे सद्गति सत्कीर्ति शुद्धि अधमातें ।
राज्यपदभोग नलगे द्यावा देवा रणांत वध मातें ॥ १४ ॥
मज समजलें प्रभो ! हें त्वद्दृष्टिपुढें उरेल न क्षेत्र ।

---

दाता. १ मेघास २ मासा जसा जलाचा अनादर करीत नाहीं, तसें सज्जनाचें चित्त ३ गुरूचा अनादर करीत नाहीं. ४ भयानें. ५ शुभ्रवर्णाचे पंख ज्यांचे अशा पक्षिश्रेष्ठ हंसास. ६ वीरहस्तांतल्या लोहानें म्ह. शस्त्रानें. ७ शेवटीं वचन राल्यावदे शत्रूचाही त्याग करवणार नाहीं, मग मित्राचा कसा करवेल ! दिल्यावर ८क्षत्रिय.

रवि काळरुद्रदृष्टिसि न पुरे, तेथें पुरेल नक्षत्र ?" ॥ १५ ॥
देव म्हणे "राज्य नको ? उपदेश अयोग्य काय हे महिम्या ? ।
कुलिबाला कन्यासी तुज कां द्यावी बळेंचि हे महि म्यां ? ॥ १६ ॥
जा, सर्व सिद्ध व्हा, जरि आहे उद्युक्त मानस मराया ।
सम रायास तुम्हांसहि भीमाऽर्जुन वरद, शीघ्र समरा या" ॥ १८ ॥
कर्ण म्हणे "बा ! वचना मान्य न झालों म्हणों नको, पावे !
वध्यें वधाचि म्हणतां प्रभुनें आग्रह म्हणोन कोपावें ? ॥ १९ ॥
सत्य उपदेश आम्हीं वरिचेवरि भव्यहेतु झेलावे ।
जाणोनि सर्व देवा ! लाविसि कां बोल ? हे तुझे लावे !" ॥ २० ॥
श्रीकृष्ण म्हणे, "बहुधा मरणाराचि हे समस्त सुपदेश ।
कीं तव हृदयें माझा हितहि स्वीकारिला न उपदेश" ॥ २१ ॥
कर्ण म्हणे "भेटि असो परलोकीं मात्र बा दयालो ! कीं ।
कलहीं स्नेह न राहे, हे दुर्लभ म्हणुनि पाद या लोकीं" ॥ २२ ॥
ऐसें म्हणोनि कर्ण प्रभुला कडकडुनि भेटला सुचिर ।
मुग्धासहि जडित कनक-मरकतनग न गमला तसा रुचिर ॥ २३ ॥
झाला मंत्र असा; मग आला नगरांत कर्ण परतोन ।
पर तो न प्रभु कोपे; वरि पुरता आंत, पूर्ण पर तो न ॥ २४ ॥

—उद्योगपर्व अ. १०.

## ( ८ ) राजकन्या* व गुरुकन्या यांचें भांडण.

उदकीं क्रीडत होत्या त्यांचीं वस्त्रें सरस्तटीं होतीं ॥
मारुतरूपें शक्रें मिश्रित केलीं परस्परें हो तीं ॥ १ ॥
राजसुता शर्मिष्ठा जळकेलि करूनि त्या तटीं आली ॥
होती जळाशयींच श्रीमत्कवि-कन्यका तिची आली ॥ २ ॥

---

१ तुमच्या महिम्यास ( कीर्तीस ) हे उपदेश अयोग्य आहेत काय ? २ राजे. ३ वादामुळें स्नेह राहत नाहीं व तूं पांडवपक्षपाती आणि मी कौरवपक्षपाती असे दोघेही दोन विरुद्ध पक्षाकडे असल्यामुळें या मृत्युलोकीं हे तुझे पाय दुर्लभ झालें, आतां आपली भेट परलोकीं मात्र होणार ! ४ सुवर्ण व पाच यांचा पर्वत
*गुप्त मसलत. हें प्रकरण मूळाबरहुकूम उतरलें आहे. ५शुक्राचार्यांची कन्या देवयानी

शर्मिष्ठा कविजांबर नेसे झडकरि कळों न वासव दे ॥
तों तीस देवायानी ओढुनि तत्परिहितांत्मवास वदे ॥ ३ ॥
' असुरसुते ! मच्छिष्या होउनि मद्वस्त्र नेससी कां गे ।
बहु मातलीस ऐसें मज समुदाचारलोप हा सांगे ॥ ४ ॥
मर्यादा पाळावी, निजशिव गुरुचेचि पाय, रीतीतें ।
सोडूं नये म्हणति कवि साधुपदाचीच पायरी तीतें' ॥ ५ ॥
शर्मिष्ठा तीस म्हणे ' बैसावें जैं सभेंत मत्तातें ।
त्वत्तातें व्हावें तैं बंदी, तूं विसरलीस मत्ता तें ॥ ६ ॥
सिंहासनीं विराजे मद्गुरु, न सहस्रकरहि परि सविता ।
बैसे खाले सद्गुरु कवि कविता करुनि त्यासि परिसविता ॥ ७ ॥
माझी न पाविजे त्वां मत्ताताची तुझ्या न सैरि तातें ।
जें जन्हुकन्यकेच भाग्य न पावेल अल्पसरिता तें ॥ ८ ॥
तूं तों कन्या जो स्तुति–कर याचक दान घे सदा, त्याची ॥
मीं कन्या स्तव्याची भव्याची सर्वसेव्य दात्याची ॥ ९ ॥
होती महेंद्रनयनें पाहुनि राजेश्वरा जया चकितें ।
मत्तातभाग्य कैचें त्वत्ताता भिक्षुकासि याचकि ! तें ॥ १० ॥
मत्ताताची जी श्रीकीर्ति कवीला नयेचि भिक्षुकि ती ।
अमृतरसासीं व्हाया सम माधुर्यें समर्थ इक्षु किती? ॥ ११ ॥
राजसुतेचें यश जें तुज येइल काय गे दरिद्रे ! तें ।
पाहसि विकावया तूं केसरमूल्यें कसें हरिद्रेतें ' ॥ १२ ॥
निर्भर्त्सना करी बहु संपादी द्वेष पाप, गाढ केली ।
करुनि कविजेसि कूपीं, ती कोणाची महापगा ढकली ॥ १३ ॥
मेलीच असें मानुनि शर्मिष्ठा आपल्या घरा गेली ।
कूपीं कविजा होती जैसी नागी मनांत रागेली ॥ १४ ॥

—आदिपर्व. अ. १०.

---

१ 'राज्यकन्या जें नेसली तें स्ववस्त्र ' पंतटीप. २ ' सदाचार ' पंतटीप. ३ माझा बाप. ४ बरोबरी. ५ भिकारड्ये ! ६ हळेद्रव. ७ भांडणें. ८ कोणाची महानदी.

## ( ९ ) भीष्माचा निर्याणसमय.

भारतयुद्धीं वधिले गुरु, बंधु, स्वजन, मित्र, शूर, हित, ।
केली भुवनख्यातप्रियनृपवृंदेंकरुनि भू राहित. ॥ १ ॥
यास्तव मन धर्माचें पावे शोकेंकरूनि कष्ट महा. ।
सांगे भागवताचा अध्याय स्पष्ट अर्थ अष्टम हा. ॥ २ ॥
व्यासादिक गुरु सांगति शोकशमन सदितिहास रायास; ।
तरि मोह घर्णमणींना, कीं दे गुरुवरचि आसरा यास. ॥ ३ ॥
व्यासादिक जे बोधिति धर्माला, त्यांत देवेंहि तसाच ।
बोधी; जें जें बोले, तें तें सर्वांसि मान्य हित साच. ॥ ४ ॥
परि धर्माच्या चित्तीं अविवेक जगद्धितार्थ वाढविला ।
आपण न काढिला, मुनिबोधाहातींहि तो न काढविला ॥ ५ ॥
कुरुगुरु कविरवितेजा संप्रति करणार देहसंन्यास; ।
धन्यास त्यास द्यावें हें यश, देवूं नयेचि अन्यास ॥ ७ ॥
ऐसा प्रभुसंकल्पें प्रौढहि नृप तो, जसा शिशु भ्रमला ।
'प्रसवोनि, मलिन झाला वंश, ' म्हणे ' दुग्धराशिशुभ्र मला !'८
ऐसा भ्याला लोकद्रोहाला, आठवूनि कृतकर्म, ।
धर्मनृपाळ विनशना गेला, भीष्मा पुसावया धर्म ॥ ९ ॥
भासे भीष्म महात्मा भूमिवरि स्वर्गविच्युतामरसा ।
वेष्टिति जन ते त्यातें, तृषित मधुव्रत जसे सुतामरसा. ॥ १० ॥
पांडव पितामहातें वंदिति, घेवूनि आपुलें नाम. ।
विनयें तसेंच वंदी, बंदी ज्याचे शिवादि तें धाम. ॥ ११ ॥
देवर्षि, ब्रह्मर्षी, राजर्षी तेथ तेधवां आले, ।
त्या भरतनायकातें देखाया सर्व एकवट झाले ॥ १२ ॥
जे हे आले त्यातें पूजी धर्मज्ञ तो स्वदृक्कमळें; ।
तपीं कुशळप्रश्नें, स्वागतशब्दामृतेंहि अत्यमळें ॥ १३ ॥
भीष्म म्हणे, ' पुत्रक हो ! परिसा मद्वाक्य पांडुनंदन हो !
कां म्लानवदन झालां ? जो हेता, तो विवेक मंद न हो ॥ १४ ॥

---

१ जाईना, घाबरेना. २श्रीकृष्ण. ३कुरुक्षेत्र.४स्वर्गांतून पतन पावलेल्या देवासारखा.

जे हें झालें, याच्या तापें निजजीवितीं तुम्हीं विटलां ? ।
निर्मळ विवेकमानसहंस कसे शोककर्दमें किटलां ? ।। १५ ।।
यावरि वांचावें हें योग्य नव्हे आपणांसि लोकांत, ।
ऐसें मनांत आणुनि, सुत हो ! झालां निमग्न शोकांत! ।। १६ ।।
भूदेव, धर्म, अच्युत, हे कीं आश्रय तुह्मांसि आहेत; ।
या चिंतारत्ना जो पूर्ण नव्हे, कोण तो वदा हेत ? ।। १७ ।।
तुमचें अप्रिय झालें मागें; आतांहि सर्व जें कांहीं ।
तें काळकृत असें मी म्हणतों; हें सत्य अन्यथा नाहीं. ।। १८ ।।
तस्मात् सुखदुःखादिक हें सर्वहि होय ईश्वराधीन; ।
जाणुनि असा करावा निश्चय कीं तत्प्रसाद साधीन. ।। १९ ।।
व्हावें अनुवर्ती या प्रभुचें, याचि प्रभूत्तमा गावें; ।
' स्वामी ! प्रभुजी ! पाळा प्रजा अनाथा ' असेंचि मागावें।।२०।।
हा साक्षात् नारायण भगवान् परपुरुष; याचि जगदाद्या ।
म्हणति मुमुक्षु,' गुरुवरा !भवशमना स्वभजना सदगदा द्या'।।२१।।
जे निरुपाधिक सेवक, देव करी त्यांवरीच फार कृपा; ।
आला मरणावसरीं मज भेटाया पहा मुकुंद, नृपा ! ।। २२ ।।
हें सुप्रसन्नहास, प्रांतारुणनेत्र, वदनतामरस ।
मद्दृष्टिभ्रमरीला देवूं प्राशावया प्रकाम रस ।। २३ ।।
चतुर [१]चराचरचेतश्चोर चतुर्बाहु चारु चारुरुची ।
अन्या संन्यासिजनें चिंतावें मात्र हें स्वरूप शुची. ।। २४ ।।
जव्हां सानेल मना, तव्हां टाकीन या शरीरा हो !
तोंवरि मदग्रभागीं हा गीतामृतनिधी हरी राहो ! ।। २५ ।।
प्रभुदृष्टि साय, भीष्मा वत्साला होय भव्यधारा हे ।
आलिंगी करुणार्द्रा, देहीं कांहींच न व्यथा राहे ।। २६ ।।
देहत्यागावसरीं, भीष्म प्रेम प्रभूत मागाया, ।
श्रीचरणीं स्थिरचित स्थापुनि, लागे प्रभूत्तमा गाया; ।। २७ ।।
" सर्वस्व वेचिती परि संरक्षिति नित्य जीप्रति, ज्ञाते ।

---

१ स्थावर जंगमात्मक विश्वाचें चित्त हरण करणारा.

त्याजिली, 'साहाय्य करिन, शस्त्र न धरितां,' असि प्रतिज्ञा ते; ॥ २८ ॥
जरि विजयपक्षपाती दिसला, लोकप्रतीतिनेंचि तदा, ।
परम अनुग्रह मजवरि करि हरि, जाणें असेंचि सद्वितदा. ॥ २९ ॥
करुनि अकृत्यें शतही, जेंवि कुटुंबी कुटुंब संरक्षी, ।
पाळी तसा विजयरथ, जो आश्रितरक्षणींच शुभ लक्षी. ॥ ३० ॥
ज्यातें 'गुरुवर' म्हणती श्रीवाल्मीक्यादि विप्र, तो दास ।
झाला धनंजयाचा, सूतत्व करी धरी प्रतोदास ! ॥ ३१ ॥
यासि विलोकुनि मेले जे त्यांचें भाग्य तें असीम रणीं ।
ज्यां पाहिले चतुर्भुज झाले; गति पावले असी मरणीं ॥ ३२ ॥
त्या भगवंतीं माझी रति अतिशय बैसली सदा राहो, ।
साहे क्षणहि न विरह, श्री जैसी श्रीनिवासदारा हो ! ॥ ३३ ॥
जे निर्मिले अनेक प्राणी, भोगावया स्वकर्मफळें, ।
त्यांच्या हृदयीं, एकचि, परि भासे विविध, त्या उपाधिबळें ॥ ३४
रवितेज विविध भासे प्रतिदृष्टि, जसें उपाधिभेदानें, ।
प्रतिपादिलें असें ज्या तत्वाचें अद्वयत्व वेदानें, ॥ ३५ ॥
त्या या मूर्तब्रह्मा, टाकुनि भेदभ्रमश्रमा आजी, ।
मी पावलोंचि; झाली धन्या जननी जगत्त्रयीं माजी; " ॥ ३६ ॥
ऐसें स्तवितां, भीष्म स्वमनोवाग्दृष्टिवृत्तिहीं प्रवण ।
आत्मा करूनि, मिसळे श्रीकृष्णीं, जेंवि सागरीं लवण ॥ ३७ ॥
भगवान् कृष्णचि साक्षात् ब्रह्म, म्हणुनि भीष्मराय तो यांत ।
मिसळे, जसें नभ नभीं, कीं तेजीं तेज, तोय तोयांत ॥ ३८ ॥
भीष्म ज्ञानी झाला मुक्तचि; परि धर्म धरुनि आवडिला ।
संस्कार सर्व करवी; मग फार रडे स्मरोनि त्या वडिला ॥ ३९ ॥

—भीष्मभक्तिभाग्य.

---

## ( १० ) कांहीं निवडक आर्या.

( मागील प्रकरणांत पंतांच्या लोकप्रिय आर्या पुष्कळ येऊन गेल्या आहेत. त्य वाचकांना सहज ओळखतां येतील. मग याशिवाय कांहीं सुंदर आर्या प्रसंगानु आठवल्या पाहिजेत अशा आहेत त्या खालीं देतों. )

( १ ) श्रीकृष्णाचें भक्त विदुरावरील प्रेम ( उद्योग० ७ )
शतसंख्य वाजवी ज्या जेववितां माय देवकी चिटक्या ।
तो नित्य तृप्त भगवान् विदुरगृहीं भोजनांत दे मिटक्या ॥७६॥
आले ढेकर, दिधल्या मिटक्या, बहुसाल मारिले भुरके ।
उरकें सर्वांमागुनि अश·, परि न ताट चाटणें उरके ॥ ७७ ॥

( २ ) नांदत्या घरांत भांडणें वाढविणारा शकुनि ( सभा० ४ ):—
शकुनि कुनीतिज्ञ कुमति—येथुनि आतांचि या खळा दवडा ।
हा न भला, बुडवाया शिरला या राजमंदिरीं कवडा ॥ २७ ॥

( ३ ) व्यास धृतराष्ट्राला म्हणतात ( वन १. ):—
तूं, पांडु, विदुर मज सम; परि माझा पांडवांकडे ओढा ।
निम्नाकडेचि धांवे, नाटोपे, जेविं अद्रिचा ओढा ॥ ६१ ॥

( ४ ) युद्धवर्णनांतली आर्या ( भीष्म० ३ ):—
'सूं सणणण सणणणणण' वाजति शरनिकर कायहानिकर
वदले सुरमुनि 'करितो नररूपें रुद्र काय हा निकर' ! ॥ ५८ ॥

( ५ ) बालवीर अभिमन्युसंबंधी ( द्रोण० ३ ):—
अंध म्हणे रे संजय ! हें त्या पौत्रास वर्ष सोळावें ! ।
लोळावें मांडिवरी, तेणें द्रोणादिकांसि घोळावें ! ! ॥ ८५ ॥

( ६ ) द्रौपदीवस्त्रहरणप्रसंगींचा दुःशासन ( सभा ० ५ ):—
देवी म्हणे 'अनार्या ! नाहींच तुझ्या मनांत पापदर ।
ओढूं नको फरफरां, वेढूं दे सांवरूनि हा पदर ॥ ७ ॥

( ७ ) त्याप्रसंगीं द्रौपदीनें श्रीकृष्णाचा धांवा केल्यावर:—
अवतरला उतराया तो दुःसह दुष्टभार महिवरला ।
अहिवर-लास्यपटु प्रभु करुणोक्तें द्वारकेंत गहिंवरला ॥ ८० ॥
शेले, शालू, साड्या; क्षीरोदक, लांब रुंद पाटावें ।
झाला अनंतवस्त्रें—कीं तीस अनाथसें न वाटावें ॥ ८३ ॥

( ८ ) नलाची भेट घेऊन आलेला हंस दमयंतीस म्हणतो ( वन० ४ )
नररत्न तोचि, तूंचि स्त्रीरत्न, उदंड आडनावांचीं ।
न बुडविति न वा तारिति चित्रें बरवींहि आड-नावांची ॥ ३४ ॥

( ९ ) उत्तराची रणभीरुता ( विराट० ३ )—
कुरुकटकासि पहातां तो उत्तर बाळ फार गडबडला ।
स्वपरबळाबळ नेणुनि बालिश बहु वायकांत बडबडला ॥ ३९ ॥

( १० ) दुर्योधनापासून पार्थानें गाई सोडविल्या ( विराट० ४ ) तेव्हां:—
खळबळ जळनिधिमग्ना धेनु उसळल्या, अलाबु जाल्या हो ! ।
हांसुनि विजय मनिं म्हणे ' कां गोपसख्या मला बुजाल्या हो ! '
गेल्या पळोनि गाई पृष्ठावरि पुच्छभार वाहोनी ।
राहोनि निश्चळ क्षण विजय निवे त्याकडेच पाहोनी ॥ ८९ ॥

( ११ ) दुर्योधन व अर्जुन कृष्णसाह्य मागण्यास गेले ( उद्योग० १ )
पार्थ म्हणे ' गोविंदा ! न्यस्तायुध तूंचि पाहिजेस मज ' ।
मागे सैन्य सुयोधन, वरहि वरायासि पाहिजे समज ॥ ४१ ॥

( १२ ) विराटनगरींतल्या बल्लवपणाबद्दल दुर्योधनाचा भीमास टोमणा
( गदा० २ )
तुज लाविलें स्वतेजें म्यांच कढीभातवरण वाटाया ।
बांटाया प्राज्य पुरण पापडपोळ्या प्रभूत लाटाया ! ॥ १६ ॥

( १३ ) धर्माची निंदा करणाऱ्या दुर्योधनास विदुर ( सभा० ४ )
हरिच्या पुनःपुन्हां कां काड्या नाकांत घालिसी शशका ? ।
यश काय पक्षपतिचें येइल हे चार करुनि तुज मशका ? ॥८४॥

( १४ ) शर्मिष्ठेची पुत्रसुखलालसा ( आदि० १० )
शिशु पाळण्यांत घालुनि हालवितां निजवितां सुखें 'जो जो ' ।
धात्री म्हणति, सखीला अमृतरसाचि तो मुखें निघे जो जो ॥ ३ ॥

( १५ ) मुलांच्या भांडणांत थोरांनीं कसें वागावें ? ( आदि० १० )
अज्ञ मुलें कलह करिति, न वदावें तेंचि बोलती स्वैर ।
तें चित्तांत धरुनियां प्राज्ञें पुरुषें करूं नये वैर ॥

( १६ ) आत्मा पुत्र, सखा स्त्री, कन्या चिंताचि सर्वकाळ, जिला ।
प्रसवोनि वाहबि मनीं श्रीमंतहि पितर सर्व काळजिला (आदि० ३०)

( १७ ) सासूला जावयाचें प्रेम ( स्त्रीपर्व ५ )
बहुतकरुनि तों एका कन्येच्या या जगांत ज्या माता ।

त्यांसि गमे स्वतनु परिस, अधिक सुतासूनुपरिस, जामाता ॥

( १८ ) मदालसेनें पुत्रांस शिक्षण केव्हां दिलें ?:—

स्तन पाजितां, निजवितां, हालवितां, बाळकांसि खेळवितां ।
दे बोध—जो सुदुर्लभ थोरांसि सहस्रकल्प मेळवितां ॥

( १९ ) भीष्मभक्तिभाग्यनामक प्रकरणांत:—

सेवुनि संतत पाला संत तपाला यदर्थ करितात ।
तो पी या स्तवना कीं यास्तव नाकींहि हेंचि वरितात ॥ ११७ ॥

( २० ) भीष्माला सायुज्यमुक्ति मिळाली तेव्हां:—

' अगड् धों अगड् धों धों धों ' वाजविती देव दुंदुभी शतशा ।
वरि कुसुमवृष्टि करिती, झाल्याचि धरातळीं कधीं न तशा ॥

( २१ ) अजामेळाला नारायणपुत्राचा ध्यास कसा होता:—

देतां, घेतां, पीतां जळ, खातां अन्न, जागतां निजतां ।
लुब्धाचें प्रेम धनीं, त्याचें नारायणीं तसें झिजतां ॥

( २२ ) मन्त्रभागवतांत यशोदेचें पुत्रसुख वर्णिलें आहे:—

वामनपणीं न अदितिला, कौसल्येला न जें नृपाळपणीं ।
तें सुख गोपीला दे शतदा दिवसांत देव बाळपणीं ॥ १६४ ॥
भरली वरि आनखशिख नंदवधू शुद्धमणिगणें हेमें ।
आंतहि पुत्रीभूत ब्रह्माच्या दिव्यगुणगणप्रेमें ॥ १६८ ॥
गळती नेत्रांतूनि प्रेमाश्रु जळें, फुलें शिराहूनीं, ।
ऐसें मंथन करितां श्रीकृष्ण धरी रवीस बाहूनीं ॥ १६९ ॥
बसवी बळेंच तीस स्तन्यार्थी देव तो धरूनि रवी ।
शिशुपण तिच्या न केवळ उद्धारा आमच्याहि तें मिरवी ॥ १७० ॥

( २३ ) देती फळ बहु दिवसां देव शिळाकाष्ठमृण्मय प्रणतां ।
जळमय तीर्थेंहि तशीं—संतचि फळती 'नमोस्तुते' म्हणतां ॥ ६२५ ॥

( २४ ) हरिवंशांत पुढील सुंदर आर्या आहे:—

चुकल्या जनांसि कोणी सांगुनि निजहितपथासि जो लावी ।
धनदेंहि उपकृतीसी त्याच्या निजसंपदा न तोलावी ॥ ८२ ॥

## सुंदर लोकोक्ति.

(पंतांच्या कवितेंतले कित्येक आर्यार्ध सिद्धांतस्वरूपाचे असून म्हणीवजा आहेत.)

( १ ) अरिच्याहि सद्गुणातें प्रेमें वाखाणितातिं सुज्ञानी ।
( २ ) सत्कुलजाचेंचि सदा स्वकुलाचाराकडेचि मन वाहे ।
( ३ ) पुरुषें आरंभावें कर्म, न पौरुष कदापि सोडावें ।
( ४ ) व्यसनीं प्रवृत्ति आवरि थोर, जसा सिंधु आवरी लहरी ।
( ५ ) बहु जनवाद अनावर, वेग निरोधील कोण तोयाचा ? ।
( ६ ) बहुतांचें संकल्पित जें तें होतेंचि निश्चयें कार्य ।
( ७ ) चित्त प्रसन्न नसतां उपचाराग्रह नव्हेत जाच कसे ? ।
( ८ ) हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं ।
( ९ ) मरणाऱ्या रोग्याला काय करिल जाणता भला वैद्य ? ।
( १० ) दीप्तालय विझवाया दाटुनि घालील कोण तलातें ? ।
( ११ ) जरि उकिरड्यांत पडला मळला, न हिरा तथापि सामान्य ।
( १२ ) होय भय न संसारीं हरिभक्तिरसायनाचिया पानें ।
( १३ ) यश, सुख, पुण्य मिळे—मग बंधूंनीं कां न नीट नांदावें ? ।
( १४ ) तो काय जन—जयाच्या धन्यत्वें हर्षली प्रसू नाहीं ? ।
( १५ ) द्यावें शीलचि, द्यावें केवळ व्हाया न वात वसु, तातें ।
( १६ ) सत्पुरुषकथा अद्भुतरसदा, ह्मणतो इलाच सुरभी मी ।
( १७ ) आनृण्य न जोडावें तरि आम्हीं अर्थ जोडिला काय ? ।
( १८ ) धन काय ? काय तेंही जें स्वजन व्यसन पळविना शास्त्र? ।
( १९ ) स्वजनपरित्राणाहुनि अन्य व्रत मत नसेचि आर्याला ।
( २० ) स्वच्छंदाचरणानें राहेना कुलजकीर्तिची शुचिता ।
( २१ ) संसारीं पुरुषार्थप्रासादा साधुसंग हा पाया ।
( २२ ) हंसें मुक्ता नेली, मग केला कलकलाट काकांनीं ! ।
( २३ ) तो मित्र होय बापा ! पापाचारांत जो बुडों नेदी ।
( २४ ) सरळेचि वक्र दिसती काळानें दृष्टि जेधवां तरळे ।
( २५ ) वेंचिति परोपकारीं सर्वस्व, अनित्य जीवितहि, संत ।
( २६ ) बापा ! स्त्रीनेत्रशरें पावेना जो व्यथेसि—तो योधा ।
( २७ ) तो आप्तोत्तम—कामा ये जो धांवोनि अवसरीं विषमीं ।

---

१ विनयशील, नम्र. 2 A friend in need is a friend indeed

## ( १२ ) पंतांचे आप्त इष्ट व समकालीन राजकीय पुरुष.

### १ स्वकुटुंबीय.

धन्य **श्रीराम पिता** धन्या **लक्ष्मी प्रसू** जगीं झाली ।
आली सत्यवतीचा कीं भारतकीर्ति सुतमुखीं आली ॥ १ ॥
मातेहूनि बहु दया केली आदर करूनि **आकानें** ।
विष्णुपदा ! तारी, गुण घ्यावेचि इचे करूनि ' आ ' कानें ॥२॥
वदला प्रसन्न चित्तें साहित्य करूनि **बंधु आबा** ' जा ' ।
विष्णुपदा ! तारावा, याची **सगुणा** तशीच बा भाजा ॥ ३ ॥
मी जरि अशक्त निर्धन कोपी तरि बहु भली **रमा भार्या** ।
ईतें सद्गति दे तूं हेचि करि प्रथम बोध या कार्या ॥ ४ ॥
मद्बंधूचे माझे तारावे श्वशुर मेहुणे साडू ।
धाडूं चित्त तुजकडे गंगे ! नच मोह मज्जना नाडू ॥ ५ ॥
भ्रात्यांसि, मज **अपत्यें**, जेंवि दहांचीं तशींच आहेत ।
पुरवी विष्णुपदा ! रत व्हावीं हरिगुणरसींच हा हेत ॥ ६ ॥

### २ गुरु.

गुरु माझे **श्रीराम श्रीमत्केशव गणेश हरि** चवघे ।
यांचा प्रसाद वदला ' गंगामृत पी यथेष्ट वरि चव घे ' ॥७॥

---

१ या प्रकरणांतील बऱ्याचशा आर्या गंगावकिली व विष्णुपदवकिली या काव्यांतल्या आहेत. विठोबादादावरच्या आर्या मात्र अप्रसिद्ध आहेत. २ महाभारतग्रंथ संबंध आर्यावृत्तांत आणल्यावर पंतांस कृतार्थता वाटली ती आर्येंत त्यांनीं प्रकट केली आहे. ३ पंतांची बहीण. ४ धाकटा बंधु. हा व पंत एकत्र रहात त्यांचा वडील भाऊ सोनोपंत नांवाचा होता तो मात्र विभक्त होता. पंढरपुरीं पंतलिखित 'गोवर्धनाचार्य सप्तशतीदीपन' नामक ग्रंथ आहे त्याचे शेवटीं 'लक्ष्मीरामात्मजनुषा स्वर्णदेवानुजन्मना मयूरेश्वरपंतेन' असा उल्लेख आहे. ५ पंतांची स्त्री रमाबाई मोठी सुशील होती, तिनेंच पंतांना काशीयात्रेस जाण्याला उद्युक्त केलें. ६ पंतांस तीन पुत्र व तीन कन्या होत्या. आपलीं अपत्यें धनवान् किंवा विद्वान् होण्यापेक्षां भक्तिमान् व्हावीं असें पंतांस वाटत असे. ७ पंतांना गुरूंत अग्रस्थान आपल्या पित्यास दिलें आहे. केशव पाध्ये व गणेशपाध्ये यांजपाशीं पन्हाळगडावर बारा वर्षें संस्कृत
हरि हे त्यांचे कुलोपाध्याय असावे.

श्रीमदुपाध्यायोत्तम कविवर केशवगणेशपादरजा ।
धरुनि शिरीं हें सद्यश लिहितों पीतातेि साधु सादर जा ॥ ८ ॥
श्रीमद्गणेशगुरुपदनखशशिकांतिच्छटा जयन्तुतराम् ।
प्रतिभारत्नं लब्धं यासु मयेदं मनस्तमोघ्नीषु ॥
माझ्या सद्गुरुवंशीं झाले आहेत पुरुष होतील ।
विष्णुपदा ! म्हण ' यांच्या श्रीगुरु कर्णांत अमृत ओतील ' ॥९॥
महीसुरान्वामदेवप्रमुखानृत्विजः प्रभो ।
श्रीकेशवं श्रीगणेशं वंदे विद्यागुरुं हरिम् ॥ १० ॥

## ३ मित्र.

स्नेह करी, हृष्ट करी, तर्पी, रक्षी, सदैव संमानी, ।
पावे सुखें सुखहि तें मित्र असें म्हणति सर्वहि ज्ञानी ॥ ११ ॥
मम बाळमित्र सर्वहि गंगे ! तूं **अच्युतप्रमुख** तारी ।
वारी संसारभ्रम, सारीं प्राचीन पातकें सारीं ॥ १२ ॥
**रघुनाथपंत कोशे** संप्रति गेले समीप सेवला ।
प्रेमें सिंचित होते या कवना ते सखे जसे वेला ॥ १३ ॥
**श्रीनारायणभट्ट** जाते श्रीपांडुरंगपदभक्त ।
शेजारी मीं त्यांचा पुसतां कथितील वृत्त तें व्यक्त ॥ १४ ॥
नित्य पुराणकथांचें यांस तुम्हांसहि असें समव्यसन ।
करितिल **अनंतनारायग** बाबा सर्वगुणसमुल्लसन ॥ १५ ॥
**श्रीविठ्ठल** निजनिजजनसद्गुणकीर्तनसुखार्थ अवतरला ।
ज्याच्या सूक्तिश्रवणें जडही गोष्पद करूनि भव तरला ॥ १६ ॥

---

१ पंतांना साठ वर्षांच्या वयांत सुद्धां आपल्या लंगोटीमित्रांचें स्मरण झालें यावरून त्यांचें मन किती प्रेमळ होतें हे दिसतें. २ रघुनाथपंत कोशे, नारायणभट दात्ये, अनंत नारायण बाबा हे बारामतीस रहात, पंतांच्या आर्या वाचून त्यांना उत्साह देणाऱ्यांत हे प्रमुख होत. पुढील तीनही आर्या ' नामरसायनां'तील आहेत ३ विठोबादादा चातुर्मासे हे आठ मास मोंगलाईत अनवे गांवीं रहात व चतुर्मास पंढरीस रहात. हे परम प्रेमळ भक्त व मोठे साक्षात्कारी असत. पंतांनीं यांना लिहिलेलीं पन्नास पत्रें सांपडलीं आहेत. हे फार सप्रेम कीर्तन करीत व कुणब्यामाळ्यांत मुलाबाळांत प्रिय असत. वारकरी सांप्रदायांत यांना फार मान आहे.

नेत्रांत मुखांत कृपा ज्याच्या हृदयांत सर्वदा वसली ।
शब्दांत मधुरता श्री हरिच्या अंकीं जशी तशी बसली ॥ १७ ॥
प्रेमळ रसिकशिरोमणि दाता मृदुहृदय परमपटु शांत ।
कांतमुखश्री ज्याच्या उपदेशें बहुत जाहले दांत ॥ १८ ॥
संत विठोबा दादा लहानथोरांत सांगतां वाटे ।
टाकुनि खेळ मुलांनीं यावें पायां पडावया वाटे ॥ १९ ॥
गंगे ! देवि ! विठोबा दादा श्रीविष्णुभक्त शिवशील ।
एतद्गीतहरियशश्रवणें काशीसमेत निवशील ॥ २० ॥
याचा परमप्रेमळ नंदन भैराळ तो तथापि कसा ।
येतो ? जो पंढरपुरचूतवनीं करितसे कथा पिकसा ॥ २१ ॥
भवभय जायास्तव त्या नमितों मीं सर्व काळ *जीजीतें ।
बहुभूतदया हृदयीं रंकाची सर्व काळजी जीतें ॥ २२ ॥
श्रीगीतेच्या एकादशसंख्याचा जसा उपाध्याय ।
केवळ भक्तिरसमय श्रीमदनंताख्य जो उपाध्याय ॥ २३ ॥
तो होय शोभवुनि या कवनातें साधु विप्र भासविता ।
निजतेजें श्री दडनि पंकरुहा जेंवि विप्रभा सविता ॥ २४ ॥
विष्णुपदा ! दे दर्शन पुनरपि करुणा करूनि बाबातें ।
हा बा तेंवि करितसे प्रेम करी जे द्रवोनि बाबा तें ॥ २५ ॥
वरशील, सहाध्यायी, साधु सदाशिव तयासि तूं गंगे ! ।
दर्शन दे, द्रवशिल तरि, विघ्न न करितील सर्वथा दंगे ॥ २६ ॥

**४ यजमान बाबूजी नाईक बारामतीकर.**

**श्रीबाबूराय प्रभु** माझा अत्यंत सदय अन्नद हा ।
अर्थिजना न म्हणों दे जैसा तसांस जेंवि सन्नद ' हा ! ' ॥२७॥

---

१ यांना पंतांच्या आर्यांचा फार नाद असे. यांचीं हातचीं पंतकाव्यें पंढरीस आहेत. २ बाबापाध्ये यांचे वडील अनंत पाध्ये हे मोठ साधु होते. ३ धर्मसिंधुकार पंतव्याही बाबापाध्ये. ४ केशव पाध्यांचे चिरंजीव. हे कऱ्हाडास रहात. *ही विठोबादादांची बहीण. ५ बाबूजी नाईक जोशी बारामतीकर हे पेशवाईत अति श्रीमान सावकार होते. पहिले बाजीरावाचे हे धनको. बाजीरावाचे मृत्यूनंतर यांनीं पेशवाईची खटपट केली ती निष्फळ झाली. हे ताराबाईपक्षाचे होते व पुढें राघो[illegible]चे

श्रीगायत्रीगंगागीतासिद्धेश्वरैकभक्तातें ।
या विष्णुपदा मुक्ति न वरिल कशी गुरुपदाब्जसक्तातें ॥ २८ ॥
श्रीमत्सदाशिवात्मज बाबूजी नायक प्रभु ज्ञानी ।
धन्य म्हणावें ज्याला शुद्धगुणश्रवणतृप्त सुज्ञांनीं ॥ २९ ॥
दाता वक्ता योद्धा तेजस्वी मानधन असा मान्य ।
अतुळें पितृप्रसादें मंडित देवव्रता असा मान्य ॥ ३० ॥
या साधुसंगमुदिरें मुदित श्रीरामसुत मयूर कृती ।
नरनारायणविजयग्रंथ करी व्हावया सुखी सुकृती ॥ ३१ ॥
जो धीर वीरहीर श्रीसिद्धेश्वरमहादयापात्र ।
श्रीमान् बाबूराय प्रभु ज्याचें शोभलें यशें गात्र ॥ ३२ ॥
भीष्मद्रोणसम गुणें शांडिल्यसुगोत्रपद्मरवि देहा ।
आश्रय शंकर जैसा उपमन्युमना मयूरकविदेहा ॥ ३३ ॥
शीलजितामरचंदन तन्नंदन **पांडुरंगरायहि** तें ।
यश मिरवितो, प्रजांचीं करि दशरथसा न राम काय हितें? ॥ ३४ ॥
ज्या बाबूरायाची तत्पुत्राचीहि साधली सेवा ।
विष्णुपदा ! तारावे ते सर्वहि विनिव तूं असें देवा ॥ ३५ ॥

## ५ अहल्याबाई होळकरीण.

देवि ! अहल्याबाई ! झालीस जगत्त्रयांत तूं धन्या ।
न न्यायधर्मनिरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या ॥ ३६ ॥

---

पक्षाचे झाले. नाईक व पेशवे यांचें वैमनस्य इतिहासप्रसिद्ध आहे. हिंदुस्थानांतील बहुधा प्रत्येक सरदार व राजा यांचा ऋणको होता. राज्यकारभारांत यांनीं पुष्कळ ढवळाढवळ केली पण यांना यश मिळालें नाहीं. हे सृष्टिसौंदर्याचे मोठे भोक्ते, उदार व गुणज्ञ होते. पहिल्या बाजीरावाची बहीण यांच्या बंधूला व राघोबादादांची कन्या दुर्गाबाई यांच्या द्वितीय पुत्राला-पांडुरंगरायाला दिली होती. हे कांहीं लढायांत गाजले होते. पंतांच्या कुटुंबास यांचा उदार आश्रय मिळाला होता.

१ इ. स. १७९०सालीं पंत काशीयात्रेहून परत येत असतांना चोळीमहेश्वर येथें त्यांनीं जगप्रख्यात अहिल्याबाईची गांठ घेतली. त्यांनीं अहल्याबाईचें यथार्थ गौरव केलें आहे

धर्मार्थ गोत्रजन्या किंवा झालीस तूं धराजन्यां ।
तुज देवि भेटली जी सत्कीर्ति कधींच हे न राजन्या ॥ ३७ ॥
श्रीविष्णुपदा ! स्तविली त्वद्भक्ता हें तुलाच मानावें ।
विश्व जिला वानितसे कां न मयूरेंहि तीस वानावें ?

### ६ पेशवे व त्यांचे सरदार.

त्रिभुवनराज्य प्रभुचें प्रतिनिधिनें त्वां स्वहस्तगत केलें ।
भोळ्या दिगंबराचें आक्रमिलें वतन जळ जसें तैलें ॥ ३९ ॥
जो अमरसिंह जाधव या धवल प्राज्य यश असे मातें ।
तोकहि लोकहितावह दे जें शिवभक्तिच्या रसें मातें ॥ ४० ॥
गंगे ! संदर्शन दे श्रीविष्णुस्वामिभक्त नानांतें ।
जग तोक, माय तूं, हें पूर्ण करु मनोरथासि या नातें ॥ ४१ ॥
यावे, प्रभुप्रतापा करुनि पुढें, तुज नमावया फडके ।
गंगे ! तव तेजें तों विघ्नांचें उर कठोरही तडके ॥ ४२ ॥
यावे, द्युनदि ! खळांतें श्रीमाधवराय पेशवे दमुनी ।
व्हावे श्रीरामजयें हृष्ट जसे सर्व देश वेद मुनी ॥ ४३ ॥

---

२५८३

REFBK-0002583

REFBK-0002583

१ पार्वती किंवा सीता. २ पंतांचा पेशव्यांविषयीं ग्रह चांगला नव्हता. ही आर्या 'नाभार्या' प्रकरणांत आहे. ३ हा प्रसिद्ध धनाजी जाधवाचा नातू. याच्या बरोबर पंतांनीं महायात्रा केली. ४ नानाफडणीस. ५ हरिपंत फडके. ६ सवाई माधवराव. पंतांचा पेशव्यांविषयीं ग्रह इ. स. १७९० च्या समारास बहुतेक नाहींसा झाला होता. नानासाहेब पेशवे व बाबूजीनाईक आटपून बरींच वर्षे झाली होतीं. आपल्या राष्ट्राच्या अधिपतींचें पंतांनीं आर्येत अभीष्ट चिंतिलें आहे.